व्यवहारांत आपल्याला या दोन्ही पातळीवरचें लोक पुष्कळ वेळां दृष्टीस पडतात. कांही माणसें व्याधीमधें त्यामानानें पुष्कळशी शांत असतात तर कांही किरकोळ दुखण्यानेंहि हळवेपणानें सगळें घर डोक्यावर घेतात. हा जो दुसरा प्रकार आहे तो मुख्यत: शारीरिक नसून मानसिक आहे. यामुळें शरीराला होणाऱ्या पीडा उणावत नाहींतच. उलट स्वत:चें दुखणें वाढण्याचे आणि इतरांना दुखणें येण्याचें तें निमित्त ठरतें. म्हणून तें टाळावें असे समर्थांचे सांगणें आहे. शोक आणि चिंता या दु:खाच्याच पुढच्या वा दु:खामुळें निर्माण होणाऱ्या मनाच्या अवस्था आहेत, त्या तर कधींच उत्पन्न होऊ देऊं नयेत असे समर्थ सर्वथा या शब्दानें सुचवित आहेत.

वेदान्तज्ञानाचें खरें प्रयोजन, दु:ख दूर करणें हे नसून, शोक दूर करणें हें आहे. दु:ख हे पुष्कळवेळा वस्तुतंत्र असतें. त्यामुळे त्यावर माणसाचें नियंत्रण प्रस्थापित होईलच असें नाहीं; पण दु:खामुळें उत्पन्न होत आहे असें वाटले तरी, शोक वा चिंता ही स्थिति पूर्णपणें कर्तृतंत्र आहे, माणसाच्या स्वाधीनची आहे. म्हणून दु:ख झाले तरी शोक करू नये या शब्दानें तें सांगतां येईल. शोक आणि चिंता ही हायहाय, तळमळ, व्यग्रता, अनिश्चितता, धरसोड, खंत, विषण्णता, वैताग, नैराश्य अशा स्वरूपांत व्यक्त होत असतात. आणि विचारानें, विवेकानें या स्थितीला न येणें हें पुष्कळसें माणसाच्या स्वाधीन आहे; तेच प्रयत्नपूर्वक करावें असे समर्थ सांगतात.

या सर्वच गोष्टी साधण्यासाठीं मी म्हणजे देह नाहीं हा विचार निदान बुद्धीच्या पातळीवर तरी मान्य व्हावा लागतो आणि तो आचाराच्या पातळीवर उतरण्यासाठीं विवेकानें प्रयत्न करावे लागतात. तेच समर्थ सांगत आहेत. कारण देह म्हणजे ''मी'' नाही. हा ''मी'' त्यापेक्षा कुणी वेगळा असला पाहिजे हें विचारवंतांच्या लक्षात येणें शक्य आहे. देह प्रत्यक्षत: जड आहे. त्यात दिसणारी चैतन्याची प्रेरणा ही कुठें तरी निराळ्या ठिकाणीं उगम पावत असली पाहिजे, हें विचारी माणसाच्या लक्षात येणें शक्य आहे. कोणत्याहि प्रकारानें शरीराचे विश्लेषण केलें तरी त्यात चैतन्याचा मूलस्रोत सांपडत नाहीं हें निश्चित. आणि या चैतन्यावांचून ''मी'' पणा स्फुरत नाहीं हेंहि निश्चित. तेव्हा रक्त-मांस-हाडें-कातडें इत्यादि धातु वा त्याच्या मुळाशीं असलेली पंचमहाभूतें यांचा समुदाय म्हणजे जरी देह असला तरी मी म्हणून होणारे स्फुरण या जड द्रव्याचें नाहीं हें लक्षांत येऊं शकतें. हे लक्षांत घेऊन तो विचार निश्चित करून साधनेला लागणें व त्यामुळें क्रमाक्रमानें स्वत:ची प्रगति साधून मी देह नाहीं ही धारणा दृढावणें व योग्य त्या प्रमाणात ती व्यवहारांतहि अनुभविता येणें हेंच विदेहीपण प्राप्त झाल्याचें लक्षण आहे. सामान्यत:



मुक्तीचे स्वरूप हेंच आहे. विदेहीपणा अनुभवणें म्हणजेच मुक्ती भोगणें आहे. साधना कोणत्या दिशेने करावयाची आहे हे लक्षांत आणून देण्यासाठींच कदाचित् समर्थांनी या विदेहीपणाने भोगावयाच्या मुक्तीचा उल्लेख मनाच्या श्लोकांत इतक्या आधीच केला असावा.

माणूस प्रकृति-प्रवृत्ति-परिस्थितिप्रमाणें कुठेंहि असला तरी त्याचें अंतिम ध्येय मोक्ष, मुक्ति हेंच आहे. कुठें जावयाचें आहे तें ठरल्यावांचून वाटचालीचा आरंभ होऊं शकत नाहीं. पण हें लक्षांत न आल्यामुळें कांही वेळा लोक अशा या सांगण्यावर आक्षेप घेतात. त्यांचे म्हणणें असते कीं तुम्ही म्हणतां तशी मोक्ष, मुक्ति कांहीं असलीच तर ती फार अंतिम अवस्था आहे. ज्यांच्यापुढे तुम्ही ती सांगता त्या माणसापासून ती कोसों दूर आहे. स्वार्थ, भ्रष्टाचार, द्वेष, तिरस्कार, विषयलालसा, लुबाडणूक इत्यादि मानव समाजाला कलंक असणारे विकार थैमान घालीत असतांना मोक्षाच्या उपदेशांत काय अर्थ आहे? ज्यांना स्वार्थापोटीं देशाचें, समाजाचें, तर राहूं द्या पण कुटुंबाचेंहि कल्याण साधावेसें वाटत नाहीं त्यांना मोक्षाचें तत्त्वज्ञान सांगणें हें केवळ श्रमाचा आणि कालाचा अपव्ययच नसून दंभाचारास प्रोत्साहन देण्यासारखेंहि आहे. ज्यांना स्वच्छताच कळत नाहीं त्यांना पावित्र्य कसें काय कळणार? ज्याला चार पावलेंहि टाकतां येत नाहींत त्याला गिर्यारोहणाच्या बिकट यात्रेंत भाग घेतां येईल कां?

वरवर पाहतां हा आक्षेप योग्य वाटतो. पण तें पूर्ण सत्य नाहीं. अवस्थाक्रमानें ध्येयवाद सांगणें आणि माणसाच्या श्रद्धा दृढ करीत नेणें, रुचेल-पचेल तेवढेंच सांगणें, हेंहि संतांनींच केलें आहे व बौद्धिक पातळीवर अजून बालकंच असणाऱ्या माणसांच्या करितां तें करावेंच लागतें. पण सर्वांनाच असें समजणें हा अन्याय आहे. रोग फार घातक आहे असें प्रत्येक रोग्यास सांगू नये हें कितीहि खरें असले तरी कांहीं रोग्यांना तें सांगावेंच लागतें. सगळेच रोगी कांहीं सारखेच हळवे असतात असें नाहीं. उलट रोगाच्या परिणामाची स्पष्ट कल्पना असणें कांहीं लोकांना इष्ट असतें कारण त्यामुळें त्यांना व्यवहारांची वा कुटुंबाची व्यवस्था लावणें सोयीचें होते. ध्येयवादाचेंहि तसेंच आहे.

आपण आज लोकसत्तेचा पुरस्कार करतो. जीवनामध्यें स्वतंत्रता, समानता, बंधुता असावी असें मानतो, त्यावरची व्याख्यानें देतो आणि ऐकतोहि. पण हा ध्येयवाद प्रत्यक्ष परिस्थितीपेक्षां किती दूर आहे हे आपणास माहीत आहेच ना? अगदीं आपल्या स्वाधीन असलेल्या निवडणुकांतहि आपण हा ध्येयवाद कधींहि साकार करूं शकलों नाहीं. सगळ्याच पक्षोपपक्षांनीं निवडणुकांच्या वेळी डिमडिम् पिटलेला ध्येयवाद प्रत्यक्ष व्यवहारांत पायदळींच तुडविला आहे. जात लक्षांत

ठेवली आहे. भ्रष्टाचार केला आहे. या गोष्टी तर पूर्णपणें इहवादीच आहेत ना? तेथेहि ध्येय आणि व्यवहार यांत राहणारें पराकाष्ठेचें अंतर तसेंच टिकून आहे ना? मग परमार्थ मार्गातील ध्येयवादाव 'तो फार दूरचा' असा आक्षेप घेण्यांत काय अर्थ आहे.

मोक्ष हा पुरुषार्थ आपण समजतो तसा इतर तीन पुरुषार्थांप्रमाणें सामाजिक संबंधानें नियंत्रित नाहीं. तो तत्वत: आणि व्यवहारत:हि वैयक्तिक आहे. आणि पात्रता असलेल्या कोणाहि व्यक्तीला "याचि देही याचि डोळां" हा मुक्तीचा सोहळा भोगणें शक्य आहे. त्यांतलें कठीणपण परिस्थितीचें नसून प्रवृत्तीचें आहे. दूरता वाटते तीहि याच कारणानें. आणि स्वत:च्या प्रवृत्तीला योग्य तें वळण लावणें हें कोणत्याहि माणसास शक्य आहे. आणि म्हणून माणूस इतर प्राण्यांपेक्षां वेगळा आहे असें आपले शास्त्रकार मानतात. यासाठीं समर्थांनीं मोक्षमुक्तीचा उत्तुंग आदर्श प्रामाणिकपणें वाटचाल करण्याची इच्छा असलेल्या माणसापुढें आरंभीच मांडला आहे.

**मना सांग पां रावणा काये जालें ।**
**अकस्मात तें राज्य सर्वै बुडालें ।।**
**म्हणोनी कुडी वासना सांडिं वेगीं ।**
**बळें लागला काळ हा पाठिलागीं ।।१३।।**

माणसाचें जीवन हे त्याच्या स्वत:च्या मापानें साठ, सत्तर, शंभर वर्षांचें म्हणजे दीर्घकालीन वाटलें तरी तें विश्वाच्या उत्पत्ति-स्थितीच्या मापानें फारच लहान आहे. आपण कृमिकीटकांचें जीवन क्षणभंगुर समजतो. कालप्रवाहाच्या मापानें माणसाचें आयुष्यहि सापेक्षत: तसेंच म्हटलें पाहिजे आणि जें कांहीं आहे तेंहि भरवंशाचें नाहीं. काळाच्या तोंडांत गेल्यासारखेंच आहे. मगरीच्या तोंडात असलेल्या मासोळीनें तिचें तोंड मिटण्यापूर्वी स्वत:स सुरक्षित मानावें तसेंच माणसाचें आहे. त्यासाठी मोठ्यांतमोठे ऐतिहासिक उदाहरण देऊन समर्थ सांगतात-बा मना ! म्हणजे विचारी माणसा ! रावणाचें काय झालें तें तुला माहीत आहे ना !

रावण ही कोणी सामान्य व्यक्ति नव्हती. अलौकिक सामर्थ्यानें संपन्न असा तो विलक्षण पुरुष होता. जन्मानें ब्राह्मण होता. चांगला विद्वान् होता. वेदाची पदें त्यानें पाडलीं आहेत. भगवान शंकराला त्यानें प्रसन्न करून घेतलें. त्यासाठीं उग्र तपश्चर्या केली. आपल्या पराक्रमानें जग जिंकलें, देवांना दीन करून सोडलें. त्याच्याजवळ ऐश्वर्यानें भरलेले भव्य प्रासाद, शोभिवंत उद्यानें, अपार संपत्ति, सहस्रावधि सुंदर स्त्रियांनीं भरलेलें अंत:पुर, विपुल संतति, विशाल साम्राज्य,



असें सगळें कांहीं होते. 'अकुतोभय वैभव' त्याच्याजवळ होतें. पण त्याची वृत्ति राक्षसी होती. त्याच्या धाकानें मी मी म्हणणारे वीरहि थरकांपत असत. पण त्याचें पुढें काय झालें ? माणसाची कालगणना चकित व्हावी अशा दीर्घकाळाचें त्याचें ऐश्वर्यशाली साम्राज्य अवघ्या दोन महिन्यांत, त्याच्या हातून निसटलें. लंकेचे तें राज्य बिभीषणाला मिळालें. रावण आपल्या विशाल बलदंड सेनेसह धुळीला मिळाला. त्याचा स्वत:चा तर सर्वस्वी नाश झालाच पण त्याच्या कीर्तीचाहि नाश झाला. उलट तो वाईटपणाचें, अधमतेचें एक प्रतीक ठरला. त्याची अपकीर्ति तेवढी टिकून राहिली.

म्हणून समर्थ सांगतात, ऐश्वर्याकरितां तूं वेडेवांकडे वागूं नकोस. पिढ्यान् पिढ्यांचें कर्तृत्व पाठीशी असेल तर गोष्ट निराळी. अन्यथा एका पिढींत रंकाचा लखपति सरळ मार्गानें होणें क्वचित्‌च शक्य असतें. यासाठींच 'पापं हि श्रियो मूलम्' असें म्हटलें आहे. चांगल्या मार्गानें मिळालें तरी ऐश्वर्य मिळवूंच नकोस असें गृहस्थाश्रमी माणसाला सांगितलें नाहीं. तें तसें सांगितलें असलें तर परमार्थमार्गांत त्वरेनें प्रगति व्हावी असें ज्याला वाटत असेल त्याच्या करितां तें सांगितलें आहे असें समजावें. चांगल्या मार्गामध्यें सन्नीति, सदाचार तर गृहीत आहेच पण या यांत्रिक युगामध्यें सामाजिक समतोल ढासळणार नाहीं याचाहि विचार करणें आवश्यक आहे. तेव्हां ऐश्वर्याचा लोभ धरतांना आपलें वर्तन सन्नीतीची कक्षा ओलांडून जाणार नाहीं याची दक्षता घेतलीच पाहिजे. पण तें फार कठीण आहे. नर्काडीच्या खतानेंच पीक चांगलें येतें तसेंच जणू ऐश्वर्याचेंहि होतें. पण तें चालतें तर हें कां चालू नये असें मात्र म्हणूं नये. परंतु माणूस तसाच विचार करतो. सत्ता, संपत्ति, वैभव मिळतें आहे ना ? मग त्यासाठी सन्नीतीचा त्याग करावा लागला तर काय बिघडलें असें माणसास वाटतें.

सन्मार्गानें ऐश्वर्य मिळणारच नाहीं असें नाहीं. पण त्यासाठीं योग्य कर्तृत्वाला सरळ वाव मिळाला पाहिजे. पण बहुतेकांच्या अंत:करणांत स्वार्थभावना हीच प्रबल असते. ती न्यायान्यायाचा विचारच करीत नाहीं आणि मग कर्तृत्वाला सरळ मार्ग उरत नाहीं. वाकडी वळणें घ्यावीं लागतात. पुष्कळ वाहतूक असलेल्या मार्गावरची वेगवान वाहनें आणि पादचारी माणसेंहि अनियंत्रितपणें चालू लागलीं कीं कुणा एकाला स्वत:चें वाहनहि सरळ नियमाप्रमाणें चालवितां येत नाहीं.

व्यवहारांत माणसानें गृहीतच धरल्यासारखें असते कीं दुसरा मला फसवणारच आहे; मी सरळ वागून भागणारच नाहीं. आणि दोघांनींहि असें गृहीत धरलें म्हणजे मग सरळपणा बाजूला राहतो. वस्तू घेतांना मूल्यासाठीं होणारी घासाघीस हें याचें एक लहानसें उदाहरण. वस्तू घेतांना योग्य मूल्याचा विचार राहत नाहीं.

भाव चढवून सांगितले जातात आणि पाडून मागितले जातात. आणि मग होणाऱ्या घासाघाशींत उभय पक्षांना आपल्या चतुरपणाचें समाधान मिळवावयाचें असतें. या पद्धतीच्या व्यवहारांत घासाघीस न करणारा सरळ मनुष्य बावळट ठरतो. गिऱ्हाइकाला खरें सांगून पटत नाहीं. त्याला चांगली वस्तु स्वस्त मिळाल्याचें समाधान हवें असतें आणि व्यापाऱ्याला गिऱ्हाईक घालविणें परवडत नाहीं; मग वंचना हाच व्यवहार होऊन बसतो. सगळेच सज्जनपणानें वागतील तर असा प्रसंग येणारच नाहीं, पण स्वार्थाला कुठेंतरी लोभ चिकटतो आणि फसवणूक हाच व्यवसाय होऊन बसतो.

बरीच जुनी गोष्ट आहे. एक वकील आपल्या व्यवसायामध्यें चांगले श्रीमंत झाले होते. ते त्यांच्याकडे आलेल्या अशिक्षित माणसाला असें सांगत म्हणें कीं- तुझा खटला या मोठ्या पुस्तकात पाहून लढवू कां लहान पुस्तकात पाहून लढवू ! मोठ्या पुस्तकाप्रमाणें २०० रुपये पडतील, लहान पुस्तकाप्रमाणें ५० रुपये पडतील. आता हा काय न्याय आहे का? पण हे असें चालतें. डॉक्टर, इंजिनियर, व्यापारी, पुढारी, अधिकारी, मंत्री, बुवा, महंत सगळे असेंच वागतात. म्हणून समर्थ म्हणतात कीं बाबा ! वाईट वासनेचा त्वरित त्याग कर. वासनाच टाकून दे असें समर्थ म्हणत नाहींत तर ती वाईट नसावी ही त्यांची अपेक्षा आहे.

आवश्यकतेपेक्षा अधिकाची अपेक्षा करणें हे वाईटाचे पहिले रूप आणि तें मिळविण्यासाठीं दुसऱ्याच्या न्याय्य अधिकारावर अतिक्रमण करून बलात्काराच्या, वंचकतेच्या मार्गानें जाणें हें वाईटपणाचे दुसरे रूप. ऐश्वर्यासाठीं त्या वाईटाचा अवलंब करूं नकोस. अन्यथा त्या रावणासारखे होईल असे समर्थ सांगत आहेत.

याठिकाणी कांही वेळां एक युक्तिवाद केला जातो. विचारलें जातें कीं- चांगल्या मार्गानें मिळालेलें ऐश्वर्य तरी टिकून राहतें काय? तेंहि नष्टच होतें ना ! मग तें चांगल्याच मार्गानें मिळविलें पाहिजे असा आग्रह कशाला ? ज्याला शक्य आहे त्याने कोणत्याहि मार्गानें, पण ऐश्वर्य मिळवावें. जर मरावयाचेंच आहे तर भरपूर भोगून तरी मरावे. भीषण युद्धाच्या आघाडीवर निघालेले सैनिक जसे अनिर्बंधपणें विलास भोगून घेतात, तसेंच माणसाने का वागूं नये ? पण ही भूमिका विचारीपणाची नव्हे; कारण माणसाचे व्यक्तिजीवन हें असे एकांडे नाहीं. तें कुटुंब, समाज, राष्ट्र आणि पुनर्जन्म यांशी संबद्ध आहे. माणसानें संबंधाचें हें सर्व क्षेत्र विचारांत घेणें आवश्यक आहे आणि म्हणूनच पाठीमागें लागलेला काळ विचारांत घेऊनच माणसानें सदाचरणी राहिले पाहिजे. आपल्यापुरतें आणि या जन्मापुरते पाहणें हे माणसास तरी न शोभण्यासारखें आहे.

धर्मराज युधिष्ठिराला जें भोगावें लागलें तें त्यांच्या सदाचरणामुळेंच,



सौजन्यामुळेंच, असें म्हणणें खरें नाही. त्याच्यावरची संकटे हीं त्याच्या द्यूताच्या आसक्तीतून म्हणजे समर्थांच्या भाषेत कुड्या वासनेंतूनच जन्माला आलेली आहेत.

वाईट वासनांचा त्याग, सन्नीतीचा अवलंब, सदाचरण हें योग्य आहे असें ज्याक्षणीं पटले त्याक्षणीं माणसानें त्याचा अवलंब केला पाहिजे, आतांच काय घाई आहे ? पाहू म्हातारपणी; असा दीर्घसूत्रीपणा उपयोगाचा नाही. म्हणून समर्थ म्हणतात ''बळे लागला काळ हा पाठिलागी ॥'' प्रत्येक क्षण महत्त्वाचा आहे. गेलेला पुन्हां परत मिळत नाहीं. आणि हे सर्व केव्हां संपेल याची शाश्वती नाहीं. म्हणून मिळणाऱ्या प्रत्येक क्षणाचा उपयोग चांगले घडावें, चांगले मिळावें, हित साधावें याकरितांच केला पाहिजे.

**जिवा कर्मयोगें जनीं जन्म जाला ।**
**परी शेवटीं काळमूखीं निमाला ।।**
**महाथोर ते मृत्यपंथे चि गेले ।**
**कितीयेक ते जन्मले आणि मेले ।।१४।।**

कोणतेहि जीवन हे जन्म आणि मृत्यू यांच्याशी जोडलेले आहे. मेला म्हणजे संपले असे चार्वाक समजतात. मेल्यानंतर जीव थडग्यात पडून राहतो. आणि मग केव्हां तरी एकदा शेवटच्या दिवशी ईश्वरी निवाड्याप्रमाणें तो आपल्या पापाचें फळ भोगण्यासाठीं नरकांत वा पुण्याचें फळ भोगण्यासाठी स्वर्गात जातो असें कांहीं म्हणतात.

हिंदू धर्म जन्म आणि मृत्यु यांचें चक्र मानतो. प्रत्येक जीवन हें पूर्वजन्म आणि पुनर्जन्म यांनीं युक्त आहे आणि त्याचें स्वरूप माणसाच्या कर्माप्रमाणें निश्चित होतें. कर्माची योग्यता पारखावी लागते ती यासाठींच. जे जे जन्मास आले ते ते नियमानें मेले आहेत. ''मारुनि मरणा अमर जाहलो'' असें म्हणणें हा केवळ अर्थवाद आहे. थोर माणसाला मृत्यु हा चुकलेला नाहीं. प्रत्येकाचें इहलोकीचें जीवन केव्हां ना केव्हां तरी संपुष्टांत येतेंच. मरणाला मारून राहणें म्हणजे एकतर मुक्त होणें किंवा सत्कीर्तीरूपानें उरणें. त्यामुळें जन्माला आल्यानंतरचें मरण टळतें असें होत नाहीं. तें प्रत्येकाला भोगावेंच लागतें. अगदीं सर्वश्रेष्ठ अवतारहि या नियमाला अपवाद नाहीं. मृत्यु कोणालाहि टळत नाहीं, कोणालाहि टाळतां आला नाहीं. जीं खरीच थोर माणसें आहेत तीं आपलें कार्य संपतांच त्याला आमंत्रण देतात वा तो जेव्हां येईल तेव्हां त्याचें आनंदानें स्वागत करतात. मरणाला न भिणें एवढाच फार तर मरणाला मारून राहणें याचा अर्थ करतां

येईल. ''पीर मरे पैगंबर मरे मर गये जिंदा जोगी'' हेंच शेवटी खरें आहे. द्वैतानें किंवा भेदानें भरलेल्या या दृश्य जगांत प्रत्येक जीवनाला अदृश्य होणें चुकत नाहीं. मग गौरवानें फार तर त्याला मृत्यु हे नांव देऊं नये. कैलासवासी झाले, देवाज्ञा झाली असे म्हणावे; पण अर्थ एकच आहे.

समर्थांनीं दासबोधामध्यें मृत्यूची अपरिहार्यता सांगणारा एक स्वतंत्र समासच लिहिला आहे. त्यांत ते म्हणतात–

**मृत्यू न म्हणे ऋषेश्वर । मृत्यू न म्हणे कवीश्वर ।।**
**मृत्यू न म्हणे दिगंबर । समाधिस्थ ।।**
**मृत्यू न म्हणे संत । मृत्यू न म्हणे हा महंत ।।**
**मृत्यू न म्हणे हा गुप्त । होतसे ।।**
**मृत्यू न म्हणे थोर थोर । मृत्यू न म्हणे हरिहर ।।**
**मृत्यू न म्हणे अवतार । भगवंताचे ।।**

हें ऐकायला चमत्कारिक वाटतें, नकोसें वाटते, कांहीं वेळां श्रद्धेला, भावनेला धक्का देणारें वाटते. म्हणून समर्थांनीं - **श्रोतीं कोप न करावा ।** अशी विनंति केली आहे. आहे ती वस्तुस्थिति मान्य करण्यावांचून गति नसते. जन्माला आल्यानंतर मृत्यू ही टाळतां येणारी गोष्ट नाही. एका राजाला म्हणे ज्योतिषानें सांगितलें की तुझा मरणकाळ जवळ आला आहे. राजाला वाटलें राजधानी सोडून पळालो म्हणजे मरण टळेल. तो घोड्यावर बसून दूरच्या गावांला जाण्यासाठीं पळाला. त्या गांवाच्या जवळ आला तों मृत्यू त्याला भेटला. राजा म्हणाला-अरे ! तुला चुकविण्यासाठीं तर आलो. यम म्हणाला-इथेंच तर तुझी माझी भेट ठरलेली होती. मी वाटच पाहत होतों अजून तूं कसा येत नाहींस म्हणून. राजा दचकला आणि त्याच्यापासून दूर होण्यासाठीं त्यानें घोड्याला पिटाळलें. तो वेशींतील दगडाला अडकून घोडा पडला आणि राजा आंत फेकला जाऊन पडल्याजागीं गतप्राण झाला.

सारांश, जन्म काय, जीवनांतील सुखदु:खें काय किंवा मृत्यु काय, तिन्हीं, माणसांनीं केलेल्या बऱ्या-वाईट कर्मांशीं संबद्ध असून अपरिहार्य आहेत. तें जसें असेल तसें भोगावेंच लागतें. जसे मृत्यु टळावा आणि जीवनांतले भोग भोगावे हें होऊं शकत नाहीं तसेंच जीवनांतील भोग टाळण्याकरितां मृत्यूलाहि जवळ करतां येत नाहीं. तसें बुद्धिपुरस्सर करणें ही आत्महत्या ठरते व तें पातक आहे. तुरुंगांतून पळून जाणें व फांशीच्या कैद्यानें आत्महत्या करणें हा जसा अपराध आहे तसेंच आत्महत्येचें आहे. यासाठीं कर्में करतांना सावध राहिलें पाहिजे. अन्यथा जन्माला येणें, जगणें आणि मृत्यु पावणें हें वेदनामय होऊन जाणारें



आहे. त्यांतून कोणाचीहि सुटका नाहीं.

**मना पाहतां सत्य हे मृत्युभूमी ।**
**जितां बोलती सर्व ही जीव मी मी ।।**
**चिरंजीव हे सर्व ही मानिताती ।**
**अकस्मात सांडूनियां सर्व जाती ।।१५।।**

सर्व जगत ही मृत्यूभूमि आहे. **''मरणं प्रकृतिः शरीरिणाम्''** हाच इथला नियम आहे. पण माणसें जणूं अमरपट्टा घेऊन आल्यासारखीं वागतात. मी मी ची जाणीव अहंकाराचें रूप घेते आणि माझें माझें म्हणत नाना प्रकारचे व्याप पाठीं लावून घेतले जातात. रेल्वेच्या डब्यांत शिरलेला नवीन येणाऱ्याला जसा वागवतो त्याप्रमाणें माणसें जीवनांत वागतात. आपण जागेवर टोपी, पिशवी असें कांहींतरी ठेवून जागा अडवतो आणि इतर प्रवाश्यांना तेथें बसूं देत नाहीं. ''मी''पणाचा बळावलेला अहंकार किती पीडाकर होतो याची स्वत:ला जाणीव होत नाहीं. दुसऱ्याचा अहंकार मात्र त्याच वेळीं तिरस्कारार्ह वाटत असतो. आपलेंहि तसेंच आहे हें लक्षांत घेतलें जात नाहीं. माणसानें स्वत:ला चिरंजीव मानून वागावें पण तें ज्ञान मिळवतांना. ज्ञानाचीं फळें **''याचि देहीं याचि डोळा''** भोगावीं या कल्पनेनें. पण धर्माचरण करतांना मात्र मृत्यूनें शेंडी पकडली आहे, हिसडा मारून केव्हां घेऊन जाईल तें सांगतां येत नाहीं, हीच भावना ठेवली पाहिजे.

सत्तासंपत्तीचा कितीहि संग्रह केला असला तरी त्यांचा त्याग करून अकस्मात् निघून जावें लागते. कृतकर्माशिवाय कांहींहि समागमें येत नाहीं. **''धनानि भूमौ पशवश्च गोष्ठे । भार्या गृहद्वारि जनः स्मशाने । देहश्चितायां परलोकमार्गे । कर्मानुगो गच्छति जीव एकः ।।** ही अगदीं वस्तुस्थिति आहे. म्हणून समर्थ सदाचारानें वाग असें सांगतात. सदाचरणानें वागण्यानें मन:स्वास्थ्य तरी निश्चयानें अबाधित राहते. पण माणसें तेंहि करीत नाहीत. मी आणि माझें या अहंकारानें स्वत:हि बुडतात आणि इतरांनाहि बुडवतात. बुडत्याचा पाय खोलांत जातो आणि त्यानें घाबरून, जो काढावयास आला त्याच्याहि गळ्याला मिठी मारावी आणि दोघांनाहि बुडण्याचा प्रसंग ओढवावा तसें होतें. यासाठीं मृत्यूची जाणीव ठेवून, जगतांतील प्रत्येक गोष्ट विनाशी आहे, हें लक्षांत ठेवून माणसानें वागावें हेंच त्याच्या कल्याणाचें आहे. या विषयांत सर्व संतांचें एकमतच आहे. ज्ञानेश्वर महाराज तर मनुष्य ऐट कशाकरितां मिरवितो हेंच लक्षांत येत नाहीं (ज्ञा. ९।५०७), असें म्हणतात. सदाचारानें वागले, ईश्वराला आपलेसें केलें, तरच तरणोपाय आहे; अन्यथा मृत्युलोकांतील वावरणें हें पेटलेल्या वणव्यांत

सापडण्यासारखें आहे (ज्ञा. ९।४९२). विषयाच्या सुखाला मोहित व्हावें आणि त्यांतील अनित्यता विचारांत घेऊं नये असें करणें म्हणजे विषारी वनस्पतींच्या मुळ्यांचा रस काढावयाचा आणि त्याला अमृत नांव ठेवायचें असें आहे (ज्ञा. ९।४९८) तुझ्यावर काळाची उडी पडेल तेव्हां तुला कोण वाचवणार आहे, असें तुकाराम महाराजहि म्हणतात.

संतांचीं हीं बोलणीं आपणापैकीं पुष्कळांना न रुचलीं तरी तीं पूणर्पणें यथार्थ आहेत. अगदीं सत्य आहेत. साक्षात्कारी महानुभावांनीं तें अनुभविलें आहे. निरपवाद सुखाचा, शाश्वत आनंदाचा, अखंड अव्यय प्रसन्नतेचा त्यांनीं अनुभव घेतला आहे. म्हणून विषयसुखाविषयींचे वा इहलोकाविषयींचे त्यांचे बोल हे आमच्या कल्याणाचे आहेत. त्याविषयीं अनादर बाळगणें कृतघ्नपणाचें आहे. चंद्रावर जाऊन आलेल्या अंतराळवीरांचे अनुभव आपल्या इहलोकीच्या अनुभवापेक्षां अगदीं वेगळे असले तरी आपण ते यथार्थ मानतो आणि लहानशा उंचवट्यावरहि चढतांना दमणारे आपण त्या अंतराळवीरांचा प्रेमादरानें सत्कार करतो. गौरीशंकरावर जाऊन आलेल्या परिश्रमी व्यक्तींचे सर्व जगतांत केवढें कौतुक झालें ! देशोविदेशीं ते सन्मानिले गेले. अशा स्थितींत ब्रह्मपदीं पोचलेल्या आणि जगत्कल्याणासाठीं संसारांत वावरणाऱ्या महात्म्यांच्या विषयीं अनादर व्यक्त करणें कृतघ्नपणाचें आहे; निदान अडाणीपणाचें तरी आहेच आहे.

**मरे येक त्याचा दुजा शोक वाहे ।**
**अकस्मात तो ही पुढें जात आहे ।।**
**पुरेना जनीं लोभ रे क्षोभ त्यातें ।**
**म्हणोनी जनीं मागुता जन्म घेतें ।।१६।।**

कोणी एक मरण पावतो. त्याच्या विषयींच्या आपुलकीनें दुसरा रडतो. परंतु असा रडणाराहि आपण स्वत: या मरणारांच्या रांगेत उभे आहोंत हें लक्षांत घेत नाहीं. जन्मलेले सगळे या एका मार्गानेंच जावयाचे असतात. त्यांतून कोणाचीहि, अगदीं कोणाचीहि, सुटका होत नाहीं. कोणी जात्यांत तर कुणी सुपांत असतात इतकेंच. तेव्हां कोणाच्या मृत्यूमुळें हर्षशोक मानण्यांत अर्थ नसतो. प्राप्त परिस्थितीला समाधानानें तोंड देत आपलें कर्तव्य करीत राहणें हेंच इष्ट असतें. अन्त्येष्टीच्या विधींतहि मरणाराच्या नांवानें रडूं नये असा आदेश आहे.

माणूस योग्यतेचा असला, त्याच्याशीं जिव्हाळ्याचे संबंध असले कीं त्याच्या मृत्यूनें दु:ख होईल हे अगदीं स्वाभाविक आहे. योग्य नाहीं तें शोक करणें. शोकाचे मूळ लोभांत आहे आणि शोकाची परिणति क्षोभामध्यें होतें. प्रारब्धानुसार



घडावयाच्या गोष्टी घडतच असतात. अगदीं कोणाचेंहि कोणावांचून अडत नाहीं. तेव्हा आत्मीयतेपोटीं दु:ख होणें नैसर्गिक असले तरी शोक होतो तो मोहापोटी, आसक्तिपोटी, अविवेकापोटी. जन्ममृत्यूचें चक्र मागे लागते ते यामुळेंच. शोक ही दु:खाची स्वाभाविक परिणति नसून तो लोभमोहाचा परिणाम आहे. आपणास वाटते, प्रेम-जिव्हाळा असणें ही जर चांगली गोष्ट आहे तर त्यांतून वियोगामुळें शोक निर्माण होणारच; पण तें योग्य नव्हे. थोर लोकांच्या जीवनात याची उदाहरणें दिसून येतात.

लो. टिळकांचा थोरला मुलगा प्लेगनें वारला. तरी केसरीचा निघावयाचा अंक वेळेवरच निघाला. टिळकांचीच पत्नी ते मंडालेला तुरुंगात असतांना वारली तेव्हा अंत:करणाला जाऊन भिडणारे एकच वाक्य विद्वांसांना पाठविलेल्या पत्रात टिळकांनी लिहिलें आहे, पण गीतारहस्याचे लेखन थांबले नाहीं.

माझ्या वडिलांच्यावर (श्री. दामुआण्णा आठवले) ती. दादांचे पोटच्या मुलापेक्षा अधिक प्रेम होते. माझ्या वडिलांच्या मृत्यूनें ती. दादांना (दासगणूमहाराज) दु:ख निश्चितच झालें पण अमृतानुभव भावार्थमंजिरी पूर्ण झालीच. आपल्याला मात्र पुष्कळ वेळां हा विवेक राहत नाहीं.

दया काय, वात्सल्य काय, हे सन्माननीय सद्गुणच आहेत. पण ते तद्विषयक लोभामुळें आपत्तीजनक होतात.

महर्षि भरताची कथा यादृष्टीने लक्षांत घेण्यासारखी आहे. त्यानें हरिणाचें एक अनाथ पोर दयाबुद्धीनें सांभाळलें आणि त्याच्यावरील लोभानें त्यांना इतकें मोहित केले कीं मुळांत अधिकारी तत्त्ववेत्ते असूनहि महर्षि भरतांना हरिणाचा जन्म घ्यावा लागला. म्हणून त्यानंतर तें फार सावध राहिले आणि कोणतीहि प्रतिक्रिया स्वत:च्या ठिकाणी निर्माण होणार नाही याची दक्षता त्यांनी बाळगली आणि म्हणूनच त्या जन्मांत त्यांना जडभरत म्हणू लागले. त्यावेळी त्यांची अवस्था कांहींशी बालोन्मत्त पिशाचवत् होती. यास्तव दया काय, प्रेम काय, वात्सल्य काय, मोहांत परिणत होणार नाही असें पाहिलेच पाहिजे. ''**पुण्यमपि पापमेव बंधकत्वात्**'' असें म्हणतात ते यासाठीच. एरवीं अनाथाची दया करणें यांत वाईट काय आहे ? पण भरतांना यामुळेच हरिणाचा जन्म घ्यावा लागला.

आपल्याकडे गृहस्थाश्रमानंतर वानप्रस्थाश्रम सांगितला आहे तो हा मोह टाळण्यासाठींच. मुलें मोठी झाली, कर्ती झाली, कीं त्यांच्या विषयींचें ममत्व सोडून माणसाने वानप्रस्थी झालें पाहिजे. पण हा मोह सुटत नाहीं हे खरें. इतर काहीं नसले तर निदान एकटेपणाचाच उबग येतो आणि तोच मोहांत पाडतो. मुलांच्या संसारात राहिले तर निदान तटस्थवृत्तीने रहावें, तेंहि घडत नाहीं.

स्वत:च्या आवडी-निवडी, राहणीच्या कल्पना, वागण्याची पद्धत मुलांवर प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणें लादली जाते आणि मग मुलें वडीलधाऱ्या माणसांचा तिरस्कार करतात, निदान कंटाळा तरी करू लागतात. त्याची बोंच वृद्धांना अधिकच खेद उत्पन्न करणारी ठरते. कांहींचे वागणें तर याहिपेक्षा पुढच्या पायरीवर जाऊन लोभामुळें विषयासक्त होते. या अवस्थेला उद्देशून आमच्या ती. दादांचें एक सुभाषित आहे–

**केसांनीं बघुनी वयास आपुल्या कृष्णत्वहि त्यागिले ।**
**लक्षावे विषयांस ना म्हणुनि ते चक्षूहि मंदावले ।।**
**ताठा टाकून वाकली बघ तनु सर्वास वंदावया ।**
**चित्ता टाक आतां भटकणें शोभे न जे या वया ।।**

माणसाचा हिरवेंपणा वयोमानाने जातो. पण हिरवटपणा मात्र उणावत नाही. लोभ सुटत नाही. आसक्ति मोहांत पाडते आणि हीच आसक्ति **''पुनरपि जननं पुनरपि मरणम्''** या चक्रांत गुंतविते. पुरता न होणें हें लोभाचें लक्षण आहे. शरीर दुबळें झालें तरी मनांतून तो जात नाहीं. त्यामुळें मग क्षोभ अधिकच वाढतो. इहलोकींचे जीवन दु:खमय होते आणि पुढच्या दु:खमय जीवनासाठीं जणू ती शिदोरी नव्याने बांधून घेतली जाते.

**मनीं मानव वेर्थ चिंता वाहातें ।**
**अकस्मात होणार होऊनि जातें ।।**
**घडे भोगणें सर्व ही कर्मयोगें ।**
**मतीमंद तें खेद मानी वियोगें ।।१७।।**

मानव मनीं चिंता व्यर्थ वाहतें. असा नपुंसकलिंगी शब्दप्रयोग करण्यांत माणसाचें दौर्बल्य विशेषरीतीनें व्यक्त झालें आहे. संबंधिताविषयींची तुच्छता, उद्वेग प्रगट करणें हाहि एक भाव अशा प्रयोगांत असतो. एकाद्या माणसाला तो वेडा आहे असें म्हणणें यांतसुद्धां एकप्रकारचा सन्मानच आहे असें म्हटलें पाहिजे. पण आहे झालं वेडं–खुळं हें म्हणण्यानें मात्र पराकाष्ठेची तुच्छता व्यक्त होते.

माणूस आधीं दक्षता घेत नाहीं. आणि मग जें व्हावयाचें तें टळत नाहीं हें निश्चित असतांनाहि काय होईल, कसें होईल याची चिंता करीत बसतो; आणि ही चिंताहि प्रयत्नाला सहाय्यक होणारी नसून व्यर्थ असते. भावी घटनांचें गांभीर्य लक्षांत घेऊन तें टाळण्यासाठीं, यथाशक्ति प्रयत्नशील होण्यासाठीं ज्या तऱ्हेची भावना मनामध्यें बाळगावी लागते ती चिंता नव्हे. ज्या तऱ्हेची भावना माणसाला



गोंधळांत पाडते, नुसतेंच काय करावें, कसें करावें असें विचार उठत राहतात आणि हातून होत कांहींच नाहीं ही जी स्थिति ती व्यर्थ चिंता. ही बाळगण्यांत कांहींच अर्थ नाहीं. हिच्यामुळें उरलीसुरली कार्यक्षमताहि धुळीला मिळते.

भूतकाल माणसाच्या हातून निसटून गेलेला असतो आणि भविष्याचा कोणताहि भरवंसा देता येत नसतो. माणसाच्या हातात आहे तो वतर्मानकाल. त्याचाच त्यानें सदुपयोग केला पाहिजे; पण तेवढेंच होत नाहीं आणि मग जें व्हावयाचें तें टाळण्याचा कोणताहि मार्ग उपलब्ध असत नाहीं. वर्षभर उनाडक्या करणारा विद्यार्थी परीक्षेच्या निर्णयाचा दिवस जवळ येऊं लागला कीं चिंता करीत रडवेला होतो. तसेंच सगळीकडे होतें. हें माणसाला कळत नाहीं असें नाहीं; पण ती वेळ गेलेली असते.

पीक येईल कीं नाहीं आणि किती येईल यासंबंधीं सामान्य तर्क बांधतां आले तरी त्यावरचें नियंत्रण हें माणसाच्या स्वाधीनचें नसते. शेतीसाठी करावयाचे कष्ट तेवढे त्याच्या स्वाधीनचे असतात. पण तिकडे दुर्लक्ष होते. आतां भवितव्याची चिंता करून लाभ कोणता? जे व्हावयाचें तें होणारच. **''होणारें न चुकेल होईल जरी ब्रह्मा तया आडवा.''** काळजी घ्यावयाची असते ती बाण सोडण्यापूर्वी,प्रत्यंचा चढविण्यापूर्वी, बाण काढण्यापूर्वी, बाण जोडण्यापूर्वी, धनुष्य ओढण्यापूर्वी. यावेळीं दक्षता घेतली तर त्याचा उपयोगहि असतो. या गोष्टी माणसाच्या स्वाधीनहि असतात. माणसाच्या स्वाधीन त्याचें कर्म असते. भोग त्याच्या स्वाधीन असत नाहीं. सगळें जें भोगावें लागते तें कर्मानुसार भोगावें लागतें. हें लक्षांत न ठेवणारीं माणसें हीं व्यवहारत: कितीहि बुद्धिमान वाटलीं तरी खरोखरीच मतिमंदच ठरतात.

कर्म करण्याचें वेळीं योग्य ती दक्षता न घेणें हें बुद्धिमत्तेच्या अभावाचें पहिलें लक्षण आणि जें आपल्या स्वाधीनचें नाहीं तें मनाप्रमाणें घडलें नाहीं तर खेद करीत बसणें हें बुद्धीच्या हीनतेचें दुसरें लक्षण. जी गोष्ट आपल्या हातांतील नाहीं तिच्याविषयीं माणसानें भगवदिच्छा समजून कोणत्याहि प्रकारचा खेद न बाळगतां समाधानानें राहिले पाहिजे. **''ठेविले अनंतें तैसेचि रहावें । चित्तीं असूं द्यावें समाधान ।।''** पण हें समाधानच राहत नाहीं.

जें घडावयास हवें होतें तें घडत नाहीं या वियोगानें माणसे रागावतात, संतापतात, दु:खीं होतात, विषण्ण होतात. समर्थांच्या दृष्टिकोनांतून हाच माणसांचा मूखर्पणा आहे. आपलें आवश्यक तें कर्तव्यकर्म करीत राहणें निराळे आणि त्याची फळें प्राप्त झालीं नाहींत म्हणून विषण्ण होणें निराळें. पण माणसें कर्तव्य करतात असें दिसतें तेंहि ममत्वानें, आणि हें ममत्व एका परमेश्वराव्यतिरिक्त कोठेंहि राखणें दु:खालाच कारणीभूत ठरणारें असते.

या श्लोकांतील वियोग शब्दाचा अर्थ मृत्यु असाहि करणें शक्य आहे. कुणाच्याहि मृत्यूनें असें शोकाकुल होऊन जाणें हेंहि अज्ञानमूलकच आहे.

या मागच्या ४-५ श्लोकांत समर्थांनीं मानवी शरीराची, पर्यायाने संसाराची क्षणभंगुरता आणि त्याच्या विनाशाची अपरिहार्यता सांगितली आहे. अतिसामर्थ्यसंपन्न असूनहि रावणासारखे दुष्ट मरतात. अपकीर्ति होऊन नष्ट होतात. म्हणून दुष्ट वासनांचा त्याग करावा. अत्यंत थोर थोर लोकहि कालवश होतात असें दिसत असल्यानें माणसानें कशाचाहि लोभ धरूं नये, कसलाहि अहंकार बाळगू नये, असें लक्षांत ठेवावें आणि कालक्रमानें शरीर हें स्वभावतःच नष्ट होणारें असल्यानें अनेक प्रकारच्या व्याधींनीं, नाना प्रकारच्या दुःखांनीं पीडिलें जात असल्यानें कशाविषयींहि उगीचच चिंता करीत बसूं नये. आणि योग्य ते उपाय करीत असून अपेक्षित तें यश मिळाले नाहीं तर खेदहि करीत राहूं नये. अशा नकारात्मक गोष्टी सांगून झाल्यानंतर समर्थ माणसाला कांहीं विधायक सूचना करीत आहेत. समर्थ म्हणतात :

**मना राघवेंवीण आशा नको रे ।**
**मना मानवाची नको कीर्ति तूं रे ।।**
**जया वर्णिती वेद शास्त्रें पुराणें ।**
**तया वर्णितां सर्व ही श्लाघ्यवाणें ।।१८।।**

हे मना ! एका रामचंद्रावांचून दुसऱ्या कशाचीहि आशा बाळगूं नकोस. मुलें-बाळें, आप्तेष्ट, नेते-पुढारी कुणी कामाला येणार नाहींत. ईश्वराला आपलेसे करशील तर तोच एक तेवढा कोणत्याहि प्रसंगीं पाठीराखा म्हणून उपयोगी पडेल. तेव्हां आशा बाळगावयाची झाली, भरंवसा धरावयाचा झाला, तर एका रामचंद्राचाच, ईश्वराचाच धरावा हेंच चांगलें. ईश्वराविण कशाची आशा धरूं नको हें सांगण्यांत ईश्वरप्राप्तीविण कशाची अपेक्षा असूं नये हेंहि गृहीतच आहे. प्रापंचिक सुखांना प्रमुख मानून तीं सुखें वा तीं सुखें पुरविणारीं साधनें ईश्वराकडे मागत राहणें हें ईश्वराची आशा न धरण्यासारखेंच आहे.

रामचंद्राशिवाय इतर सर्वांची आशा सोडून दे असें म्हटलें कीं कोणत्याहि माणसाची कीर्ति गाऊं नकोस हा नियम ओघानेंच प्राप्त होतो. कारण माणसें जी कोणाची तरी स्तुति करतात ती श्रीमंतांची, सत्ताधाऱ्यांची वा प्रतिष्ठा पावलेल्या व्यक्तींची करतात. या लोकांची स्तुति करून त्यांना संतुष्ट केले म्हणजे प्रत्यक्षपणें वा अप्रत्यक्षपणें स्वतःचा लाभ साधतां येतो हें मर्म व्यवहारी माणसास पक्कें ठाऊक असतें. त्यामुळें भरमसाठ गौरवाच्या शब्दप्रयोगानें मानपत्राची वा स्तुतीची



भाषा ओसंडून वाहते यांत एक प्रकारें लाचारी आहे. स्वार्थलंपटता आहे. ती योग्य नव्हे. माणसाची स्तुति करूं नये असें म्हणण्यांत, गुणग्राहकता असूं नये, कौतुक करूं नये, आदर बाळगूं नये, वा जे खरोखरीच चांगलें आहे त्याचा प्रचार करूं नये असें मुळींच नाहीं. पण माणसें स्तुति करतात ती या भावनेनें क्वचितच. एरवीं अघळपघळ वागणारीं, बोलणारीं, माणसेंहि खऱ्या गुणग्राहकतेच्या प्रसंगीं कृपणाहूनहि कृपण होतात. मग त्यांच्या कोशांत ठीक, बरें या व्यतिरिक्त जणूं शब्द उरतच नाहींत. चांगलें, उत्तम, उत्कृष्ट हे शब्द जणूं त्यांना अज्ञात असतात. सत्ताधाऱ्यांच्यापुढें स्तुतीच्या शब्दांचीं कारंजीं नाचविणारी विद्वत्ता खऱ्या गुणग्राहकतेच्या समयीं दुष्काळी ओढ्याप्रमाणें कोरडी पडते. पण मत्सरापोटीं निंदा करतांना मात्र प्रतिभेला पांडित्याचा बहर येतो.

आपल्या परंपरेमध्यें गुणग्राहकता वर्ज्य मानलेली नाहीं. उलट सज्जनाची व्याख्या करतांना भर्तृहरीनें ''**परगुणपरमाणुं पर्वतीकृत्य नित्यं । निजहृदि विकसन्तः सन्तिसन्तकियन्तः ।।**'' असेंच म्हटलें आहे. सज्जन स्वतःचे गुण सांगतच नाहीं. तो वर्णन करतो दुसऱ्याच्या गुणांचें आणि केवळ त्यामुळेंच तो स्वतः गुणवान् असल्याचें लोकांच्या लक्षांत येतें असेंहि भर्तृहरीनें म्हटलें आहे. तेव्हां समर्थांच्या वचनांतून गुणग्राहकता वर्ज्य मानावी असें समजण्याचें मुळींच कारण नाहीं. संत, सद्गुरु, सज्जन यांची जेव्हा केव्हां संधी मिळेल तेव्हां तेव्हां माणसानें स्तुति केलीच पाहिजे तरच चांगलेपणाचे संस्कार घडतील. लहान मुलांचें योग्य त्या प्रसंगीं कौतुक करावें, तरच त्यांना प्रोत्साहन मिळेल. पण एवढेच नेमकें होत नाहीं. केलेल्या आणि न केलेल्या कामाचेंहि श्रेय स्वतःकडेच ओढून घेण्याची माणसाची प्रवृत्ति असते. असो.

खरोखरीच ज्यांची स्तुति करावी असे सद्गुण माणसाजवळ किती असतात ? ईश्वर मात्र सर्व सद्गुणांचा सागर आहे. म्हणून वेदांनीं, शास्त्रांनीं, पुराणांनीं, संतमहात्म्यांनीं वारंवार गुणगान केलें आहे तें एका ईश्वराचेंच. ईश्वराची स्तुति करणें हेंच श्रेयस्कर आहे.

**मना सर्वथा सत्य सांडूं नको रे ।**
**मना सर्वथा मिथ्य मांडूं नको रे ।।**
**मना सत्य तें सत्य वाचे वदावें ।**
**मना मिथ्य तें मिथ्य सोडूनि द्यावें ।।१९।।**

माणसाची स्तुति कां करूं नये हें समर्थ या श्लोकांत सांगतात. माणसाच्या अंगांत बहुधा खरें सद्गुण नसतात. त्याचे गुण भासतात ते पुष्कळदां अज्ञानानें

किंवा स्वार्थानें वा दंभानें ते त्याच्यावर लादले जातात म्हणून. पाहुणा जेव्हां स्वयंपाकाची स्तुति करतो तेव्हां तो पुढच्या जेवणाची चांगली सोय करून ठेवीत असतो इतकेंच. त्याचें बोलणें अमृतासारखें आहे, तो जणूं पृथ्वीला नमवीत चालतो, हा सूर्यासारखा तेजस्वी आहे, ही तरुणी चंद्रासारखी सुंदर आहे, असें म्हणण्यांत काव्य असेल कदाचित् पण हें कधी यथार्थ ठरेल काय ? रसिकता व्यक्त करण्यासाठीं वा प्रतिष्ठितपणा सांभाळण्यासाठी माणसे असें काहींसें बोलतात. व्यवहाराच्या दृष्टीने कांहीं मर्यादेंत अशा बोलण्याची उपयुक्तताहि आहे. पण सभ्यतेपोटी, शिष्टाचार सांभाळण्यासाठी असे बोलणे निराळे आणि स्वार्थासाठी लाचारीनें कुणाचा भाट होणें निराळें. निदान परमार्थमार्गांतल्या साधकानें तरी सत्याची कांस सोडतां कामा नये आणि मिथ्या गोष्टीचा पुरस्कार करतां कामा नये.

व्यवहारामध्यें मिथ्या आणि असत्य हे दोन शब्द सामान्यत: सारख्याच अर्थाचे मानले जातात. पण शास्त्रदृष्ट्या त्यांत अंतर आहे. जें खरें नसून खऱ्यासारखें भासतें तें मिथ्या. दोरीवर भासणारा साप हा मिथ्या आहे. जें वस्तुत: जसें नाही तसें तें अज्ञानानें, मोहानें, वैयक्तिक दुर्बलतेनें, भासणें हें मिथ्यापणाचें स्वरूप. दंभ हाहि मिथ्याच. तेव्हां सत्याचा पुरस्कार करावा, सत्य ओळखावें आणि तें जाणण्याइतकी मन, बुद्धि, किंवा इंद्रियें हीं शुद्ध, सात्त्विक असावींत तरच सत्याचा त्याग न करणें आणि मिथ्या न स्वीकारणें घडूं शकतें. सत्य हें सत्यच आहें. तें तसेंच जाणलें पाहिजे व सांगितलें पाहिजे. नवीन बुद्धिवादानें सत्याला सापेक्ष ठरविणारे तर्क मांडले आहेत ते वास्तविक कुतर्क आहेत. सापेक्षता सत्याच्या ठिकाणीं नसून ती तें ओळखणाऱ्या व पाहणाऱ्याच्या ठिकाणीं असूं शकते. पण ती व्यक्तींतली उणीव आहे. तो इंद्रिय-मनबुद्धीच्या ठिकाणचा दोष आहे. जें सत्य त्रिकालाबाधित आणि निरपेक्ष तेंच वास्तविक सत्य होय. सत्याला स्थलकालाचें वा पाहणाराच्या योग्यायोग्यतेचें बंधन असूं शकत नाहीं. बुद्धिमध्यें रजोगुण, तमोगुण नसले, मनामध्यें स्वार्थ नसला, इंद्रियांना आसक्ति नसली म्हणजे सत्याचें दर्शन सहजपणें होते आणि अशी व्यक्ति जें पाहतें, जें सांगते तें आपल्याला कळत नसलें तरी सत्यच असतें. भगवान् श्रीकृष्णासारखे पूर्णावतार आणि ज्ञानेश्वरांसारखे महात्मे ही या सत्यवादाची उदाहरणें.

पण माणसाला सत्य रुचत नाही, सोसत नाही, खरा अभिप्राय बहुधा कोणालाच नको असतो. खरें बोलणाऱ्याला मित्र मिळतील हें क्वचितच घडतें. व्यवहारांतील शिष्टाचार काय असतील ते असोत कारण ते खऱ्या अर्थानें पाळणें हें फारच अवघड आहे.



**सत्यं ब्रूयात् प्रियं ब्रूयात् न ब्रूयात् सत्यमप्रियम् ।**
**प्रियं च नानृतं ब्रूयात् एष धर्म सनातनः ।।**

खरें बोलावें, लोकांना आवडेल असें बोलावें, आवडणार नाहीं ते खरें असलें तरी बोलूं नये, आवडतें म्हणून खोटें सांगू नये. ही खरोखरच तारेवरची कसरत आहे. ही फक्त **''न ब्रूयात् मौनमाश्रयेत्''** हा नियम पाळणारालाच साधेल. प्रत्यक्ष आचरण्याच्या वेळीं अप्रिय सत्यहि सांगावें लागते. तर प्रसंगविशेषी प्रिय असें असत्यहि बोलावें लागते. अप्रिय सत्याचीं उदाहरणें देण्याचें कारण नाहीं. माणूस पुष्कळ वेळां अहंकारानें तर, कांहीं वेळां तरी कर्तव्यपालनाच्या भावनेनें अप्रिय असें सत्य बोलत असतोच. लाचारीनें व स्वार्थासाठीं बोलल्या जाणाऱ्या प्रिय असत्याचा निषेध मागच्या श्लोकांतील स्तुतीच्या प्रकरणांत आलाच आहे.

शास्त्रकारांनी सत्याची कसोटी **'हित'** ही सांगितली आहे. **''यद्भूतहितमत्यन्तं तत् सत्यमिति धारणा.''** मात्र हित म्हणजे जे स्वार्थ साधून देणारे वा आपातत: सुखावह वाटणारें ते नव्हे. जे श्रेयस्कर, परिणामी लाभदायक, वस्तुतः कल्याणकारक तें हित आणि प्रसंगविशेषीं या हितासाठीं वर वर दिसणाऱ्या वा भासणाऱ्या असत्याचाहि अवलंब करावा लागतो. नुकत्याच चालूं बोलूं लागणाऱ्या लहान बालकाचे कौतुक जर त्याची आई करणार नाही तर मुलाची प्रगति होणें शक्यच नाही. मुलं वेड्यावाकड्या रेघोट्या काढतें आणि प्रारंभी तरी आईला म्हणावे लागते, वा ! काय छान लिहिलें आहे ! मुलाचे पोट बिघडू नये अशी इच्छा असेल तर लाडू लपवून ठेवावे लागतात आणि संपले म्हणून सांगावें लागते. विहिरीजवळ जाऊं द्यावयाचें नसेल तर जाऊं नको तेथें बागुलबोवा आहे असें भय घालावें लागते. हें सर्व वरवर पाहतां खोटेच आहे, मिथ्याच आहे. पण यामुळें निर्माण होणारी सापेक्षता व्यक्तीची आहे हें लक्षांत ठेवले पाहिजे.

हे लक्षांत न घेतल्यामुळें अहंकारानें स्वत:ला न्यायाचा जणूं मूर्तिमंत अवतार समजणारे अतिशहाणें, श्रीकृष्णाला अनेक प्रसंगी दूषणें देत असतात. पण श्रीकृष्णाच्या वर्तनाची कसोटी परीक्षिताच्या जन्माच्या निमित्ताने लागलेली आहे आणि तरी श्रीकृष्णाला दोष देणें हें मिथ्या पुरस्कारणेंच आहे. ते करता कामा नये.

दुसऱ्याची निंदा करताना वा दोष दाखवताना मनुष्य जितका जागृत असल्याचा वा कांटेकोरपणाचा आव आणतो तितका तो स्वत:च्या उणीवा लक्षांत घेण्याच्या कामीं दक्ष असतो काय? याचाहि विचार करणें आवश्यक आहे. दुसऱ्याचे अंगी नसलेले दोष त्याचेवर लादणारा माणूस स्वत:च्या झालेल्या चुका वा असलेल्या उणीवाहि आग्रहपूर्वक अमान्य करीत असतो. आपल्या स्वभावाचे वा कृत्याचे

नाना प्रकारांनी समर्थनच करीत असतो. आपलें चुकलें व आपल्यांत दोष आहेत असे त्यास कधी वाटतच नाहीं. अगदीं जिव्हाळ्याच्या अधिकारी आप्तानें, सन्मित्रानें वा ज्याला तो आपण होऊन गुरु मानतो त्यानेहि दाखविलेल्या चुका माणसाला मानवत नाहींत, आवडत नाहींत. त्याचाहि रागच येतो. दोष दाखविणारा चांगला विद्वान आणि कुशल वक्ता असेल तर माणूस एकवेळ निरुत्तर होईल पण तरी त्याला मार्गदर्शकाचें सांगणें पटणार नाहींच. वस्तुत: झालेल्या चुका आपण होऊन लक्षांत येणे, निदान कोणी सांगितल्या तर मोकळ्या मनानें मान्य करणें व न संतापतां, न वैतागता पुनरपि त्या वा तशा चुका हातून घडणार नाहीत याची दक्षता घेणे हेंच माणसाच्या प्रगतीचें साधन आहे. पण हृदयांत घर करून बसलेला अहंकार इतका बलवान् असतो कीं तो सत्याचें खरे ज्ञान होऊच देत नाही. अहंकारामुळें जे वाटते तें वाटणें यथार्थ नसतें. हें लक्षात घ्यावे म्हणून समर्थ 'सत्य तें सत्य वाचे वदावे आणि मिथ्य ते मिथ्य सोडून द्यावें' असें आग्रहाने सांगत आहेत.

चूक ही चूकच. अपराध हा अपराधच. त्याचे लहान-मोठेपण मानणें सापेक्ष आहे. वीर परशुरामांची माता आणि महर्षि जमदग्नींची पत्नी महासाध्वी रेणुका हिचा शिरच्छेद ज्या अपराधासाठी जमदग्नींनी करविला त्याचे स्वरूप इतके तुच्छ आणि नगण्य होते की तिच्या त्या स्वाभाविक भावनेला अपराध म्हणणेंहि अतिशयोक्तीचें ठरावें. अलीकडे तर आपण यापेक्षा कितीतरी पटीनें दोषास्पद असणाऱ्या घटनांना 'यात काय बिघडले?' 'याने काय होते?' असेंच सहजपणानें म्हणत असतो. 'काकडीच्या चोरीला फाशीची शिक्षा योग्य नाही' अशा अर्थाची मराठीमधें एक म्हण आहे. रेणुकेला जें वाटले ते काकडीची चोरी म्हणण्याइतक्या पातळीवरहि येणें शक्य नाही आणि तरी जमदग्नीनें आपल्या पत्नीला, साध्वी पत्नीला व्यभिचारिणी अशा घाणेरड्या नावाने संबोधलें आणि शिरच्छेदाची शिक्षा ठोठावली. स्वत: मातृभक्त पुत्रानें पित्याची आज्ञा म्हणून ती कार्यवाहींत आणली. या आज्ञाधारकपणानें जमदग्नि प्रसन्न झाले आणि परशुरामास वर माग म्हणाले. परशुराम म्हणाले–माझ्या आईस जीवंत करा. जमदग्नींनी प्रसन्न मनाने ती मागणी मान्य केली. रेणुका जिवंत झाली पण त्या थोर स्त्रीने एवढ्याशा लहान, अगदी नगण्य अशा अपराधासाठीं क्रूर शिक्षा ठोठावली म्हणून जमदग्नींना दोष दिला नाहीं. उलट आपली चूक लहान नव्हती, त्याचें हे योग्य प्रायश्चित्त मिळालें असेंच तिला वाटलें. त्यामुळेच ती देवता म्हणून वंदनीय, पूजनीय ठरली. माहूर हें रेणुकेचे स्थान पवित्र क्षेत्र ठरलें. श्रीविष्णुदासासारखे थोर अधिकारी तिचे अनन्य भक्त झाले.



स्वत:च्या हातून घडलेल्या मोठ्यांत मोठ्या चुकांनाहि निरनिराळ्या कारणासाठीं समर्थनीय मानणारांची जात आणि मनुष्य स्वभावाचा विचार करतां व्यवहारत: तरी अगदीं नगण्य असलेल्या दोषांनाहि शुद्ध तात्त्विक भूमिकेनें कठोर शिक्षेसहि योग्य मानणाऱ्यांची वृत्ति यांतील अंतर लक्षांत घेण्यानेंच मनुष्य अध्यात्मिकदृष्ट्या प्रगत होण्याची शक्यता आहे.

व्यवहारांत वागतांना इतका सूक्ष्म, इतका कठोर कांटेकोरपणा वा इतकी उग्र सत्यनिष्ठा अवलंबिता येणार नाहीं हें खरेंच; पण त्यामध्यें द्वेषबुद्धि, दांभिकता, राक्षसी स्वार्थ वा लाचारी नसावी, एवढें तरी मान्य केलेंच पाहिजे. सभ्यता, सौजन्य, शिष्टाचार समजूं शकतो. दुसऱ्याला सुधारण्याचें उत्तरदायित्व ज्याच्यावर प्रत्यक्षपणें सोपवलें गेलेलें नाहीं वा दुसऱ्याची सुधारणा करणें हें ज्यानें जीवनकार्य वा व्रत म्हणून स्वीकारलेलें नाहीं त्यानें सौजन्य आणि सभ्यता यांचेंच पालन करावें. मग सत्यवादाला थोडीशी मुरड घालावी लागली तरी चालेल. सत्यवादाच्या नांवाखाली वा स्पष्टवक्तेपणा असावा म्हणून सौजन्याचा घात करणारा फटकळपणा हे व्यवहारशून्यतेचेंच लक्षण मानलें पाहिजे. खऱ्या, नि:स्पृह व्यक्तीला कांहीहि शोभते. तोच आव इतर स्वार्थपरायणांनीं आणूं नये. त्यांनीं केवळ स्वत:च्या सुधारणेचा विचार करावा. खरी नि:स्पृह माणसें फटकळ असतातच असे नाहीं. लोकांमध्यें जो फटकळपणा आढळतो तो बहुधा सत्ता आणि संपत्तीनें युक्त असणाऱ्या अहंकारी व्यक्तीमधें. म्हणून आपल्या प्रगतीपुरतें पहावें. सौजन्य हें आत्मविकासाला सहाय्यक आहे.

वस्तुत: दुसऱ्या कोणाला सुधारतां येतच नाहीं. कुणी कोणाचें ऐकत नाहीं. महर्षी व्यासांसारख्या थोर महात्म्यालाहि, प्रज्ञावंत पुरुषालाहि, माझें कुणी ऐकत नाहीं असेंच म्हणावें लागलें, तेथें सामान्यांची काय कथा? तेव्हां दुसऱ्याच्या बाबतींत सत्यवादी असण्याचें कारणच नाहीं. याच दृष्टीनें **''कासया गुणदोष वानूं आणिकाचे । मज काय त्याचें उणें आहे ।।''** असे संत म्हणतात. सुधारणें शक्य आहे फक्त आपलें आपणाला. तेथें मात्र सत्य काय आणि मिथ्या काय याचा करतां येईल तेवढा सूक्ष्म विचार करावा आणि मिथ्याचार टाळून सत्यनिष्ठ होण्याचा अहर्निश प्रयत्न करावा.

**बहू हिंपुटी होइजे मायपोटीं ।**
**नको रे मना यातना ते चि मोठी ।।**
**निरोधें पचे कोंडिलें गर्भवासी ।**
**अधोमूख रे दुख त्या बाळकासी ।।२०।।**

भगवंतांनी गीतेच्या १३ व्या अध्यायांत ज्ञान कशा-कशाला म्हणावें तें १८ लक्षणांनीं सांगितलेलें आहे. त्यांत **जन्ममृत्युजरा-व्याधिदुःखदोषानुदर्शम्** (भ. १३।८) असें एक ज्ञानलक्षण सांगितलें आहे. त्यांत पुढच्या तिघांचेंहि जन्म हेंच मूळ कारण असल्यामुळें जन्माचीं दुःखें व जन्माचे दोष लक्षांत घेतले तर पुढील सर्वच दुःखदायक प्रवासाचा परिहार होणें शक्य असल्यानें पुन्हां जन्मच येणार नाहीं अशी दक्षता माणसानें घ्यावयास हवी. कारण एकदां जन्म स्वीकारला कीं मग जरा, व्याधि आणि मृत्यु हे अपरिहार्य आहेत. आत्महत्या हा त्यांतून सुटावयाचा मार्ग नाहीं. कारण तो घोर अपराध आहे. तुरुंगांतून पळून जाणें हें जसें शासकीय क्षेत्रांत दंडनीय मानलें जातें तसेंच अध्यात्मिक क्षेत्रांत आत्महत्येचेंहि आहे. तेथें जसें तुरुंगांतून पळून जाणाऱ्या माणसाला मागील सर्व शिक्षा व पळून जाण्याच्या अपराधाबद्दल पुन्हां अधिक शिक्षा भोगावी लागते तसेंच आत्महत्येनंतर होते. पुढचा जन्म चुकत नाहीं. त्यांत उरलेले भोग भोगावे लागतातच आणि आत्महत्येचें पातक शिरावर बसल्यानें त्याचेंहि प्रायश्चित्त अधिक दुःखभोगाच्या रूपानें घ्यावेंच लागतें.

जरा, व्याधि, मृत्यु या प्रत्यक्षपणें अनुभवास येणाऱ्या आणि अंवतीभोंवतीहि प्रत्यहीं उघडपणें दिसूं शकणाऱ्या अवस्थांची, त्यातील दोषांची आणि दुःखाची जशी माणसाला स्पष्ट कल्पना असते वा येऊं शकते, तशी स्थिती जन्म या अवस्थेची नाहीं. पण तीच इतरांना मूळ कारण असल्यानें समर्थ जन्मदशेचें स्वरूप या श्लोकामधें स्पष्ट करून सांगत आहेत.

जे अनुभवलें वा वारंवार दिसलें, त्यानें तरी माणूस कोठें शहाणा होतो? एक बुद्धाचा तेवढा अपवाद. त्यानें तेवढें रथातून जातांना एक व्याधिग्रस्त, एक वृद्ध, एक प्रेत पाहिले आणि पित्यानें अत्यंत सुखांत वाढविलेल्या या सुकुमार आणि सुखी राजपुत्रानें सारथ्यास विचारलें हें काय आहे? सारथ्यानें सांगितलें– प्रत्येक माणसास या अवस्थांतून जावेंच लागते आणि त्याचक्षणीं गौतमानें संसारातील सर्व सुखें आपल्या हातानें बाजूस सारून, ज्यामुळें या आपत्तीतून तरून जातां येईल असा मार्ग शोधून काढण्याचा प्रयत्न केला. लौकरच यशोधरेसारखी तरुण, सुंदर, सालस पत्नी आणि राहुलासारखें राजबिंडें कोवळें पोर यांचा त्याग करून तो तपश्चर्येसाठीं अरण्यांत निघून गेला. सामान्य माणसाचें असें होत नाहीं. पुढच्यास ठेंच लागून मागच्यानें शहाणें व्हावें एवढा विवेक तो दाखवीत नाहीच पण स्वतः ठेंचा खात असतांनाहि शहाणा होत नाहीं. असें लक्षात आल्यानें जनकल्याणाची तळमळ असलेल्या संतांनीं आपल्या वाङ्मयांतून जन्मदोषाचें, जन्मदुःखाचें अनेकवेळां सविस्तर वर्णन करून ठेवलें आहे.



अलीकडील कांहीं नवीन लोकांना, विशेषतः नवविचारांच्या बुद्धिवाद्यांना, संतांनीं केलेलें हें वर्णन बीभत्स, किळसवाणें, अमंगल म्हणून आक्षेपार्ह वाटतें. त्यासंबंधीची त्यांची भूमिका ते मोठ्या आग्रहीपणानें मांडीतहि असतात. त्यांतील त्यांचें पहिलें म्हणणें असें कीं ज्या तऱ्हेच्या दुःखाचें कोणालाहि थोडेसेंहि स्मरण असत नाहीं त्याचें वर्णन करून पुढच्या संपूर्ण जीवनाविषयीं तिरस्कार निर्माण करणें हा संतांचा प्रयत्न नैराश्य पसरविणारा आणि म्हणूनच घातक आहे. या अनुषंगाने मग बुद्धिवादी इतरहि आक्षेप घेत असतो. गर्भात असतांना बालकाला वेदना होतात हें मानण्यास तरी पुरावा काय आहे? असेंहि त्यांचें म्हणणें असते. पण गर्भांत असतांनाहि बालकाला फार वेदना असतात, हें अलिकडील शास्त्रज्ञांनींहि मान्य केलें आहे. दुसरें असें कीं ज्याचें स्मरण नाहीं, जाणीव नाहीं, त्याचें वाईटपण जर नाकारावयाचें असेल तर वेड्याला बरें करण्याचें प्रयत्न सोडून दिले पाहिजेत.

बहुधा कोणत्याहि वेड्याला आपण वेडे आहोत हें पटत नाहीं. आणि त्यावर केले जाणारे उपचार त्यास मानवत नाहींत. उलट दुःखदायक वाटतात. तरीहि समाजांत शहाणा म्हणविणारा समुदाय वेड्यावर उपचारांचे बलात्कार करीतच असतो. अपराध्यानें स्वतःचा अपराध, अपराध म्हणून स्वीकारला तरच त्याला शिक्षा द्यावी; अन्यथा त्याला दोषमुक्त मानावें, हें कोणत्या समाजांत चालण्यासारखें आहे. ४-५ वर्षांचें मूल रोगानें पीडलें असलें तर त्याच्यावर पथ्य लादावें लागतें. तें करावें कीं नाहीं हें त्याच्यावर सोंपवून चालत नाहीं. जन्माचें दोष सांगू नका म्हणणाऱ्या बुद्धिवाद्यांनीं यांची उत्तरें शोधलीं तर संतांची भूमिका योग्य असल्याचे कळण्यास अडचण पडणार नाहीं.

दुसरा एक विचार असा असतो कीं जन्माला येण्याची जी प्रक्रिया आहे, ती निसर्गसिद्ध स्वाभाविक अशीच असल्यानें अपरिहार्य आहे. तेव्हा तिचे दोष, हे दोष म्हणून मानण्यांत अर्थ नाही. संतांनीं तें केलें आहे म्हणून तें चूक आहे. यांतील अपरिहार्यतेचा जो अंश आहे तो कांहीं अंशी योग्य असला तरी पूर्णपणें उचित नाहीं. अपरिहार्यता प्रक्रियेस आरंभ झाल्यानंतर आहे. प्रक्रियाच अपरिहार्य नाहीं. तत्त्वज्ञानाप्रमाणें जन्माचें दुःख पुन्हां भोगावयास न लागणें ही गोष्ट माणसाच्या स्वाधीनची आहे. ज्यांना पुनर्जन्म नाकारावयाचा आहे त्या चार्वाकमतानुयायांची गोष्ट निराळी. त्यांचा विचार येथें करतां येणार नाहीं.

एकादी गोष्ट अपरिहार्य असेल पण त्यामुळें ती चांगली ठरत नाहीं आणि अपरिहार्य म्हणून चांगली वाटतांहि कामा नये. मलमूत्रांत लोळणें चांगलें नाहीं. लहान मूल मलमूत्रांत लोळते व त्याहि स्थितींत तें हात पाय हालवीत हंसत

खिदळत असतें. थोडें मोठें झालें तर तें विष्ठाहि चिवडतें. पण शहाणी आई, दक्ष आई, त्याला तसें करूं देत नाहीं. मुलाला लगेच स्वच्छ करते. कदाचित् त्याच्या इच्छेविरुद्ध ती स्वच्छता त्याच्यावर लादते. मूल आक्रोश करीत असते आणि आई त्याला धुवून पुसून स्वच्छ करीत असते. क्वचित् मारतेहि. मुलाला जे वाईट, वाईट म्हणून जाणवत नाहीं, उलट आईला जें चांगलें वाटतें तें मुलाला आवडत नसतांनाहि आई मुलावर लादते. पण ही गोष्ट चांगली नाहीं असें बुद्धिवादी म्हणत नाहींत. काहीं विक्षिप्त मानसशास्त्रज्ञांची एकांगी, एककल्ली भूमिका सोडली तर आई मुलाच्या स्वच्छतेची काळजी घेते ही गोष्ट समाजानें आणि आरोग्यशास्त्रानेहि आवश्यक अशीच मानलेली आहे.

हीच स्थिति जन्माच्याहि वर्णनाची आहे. म्हणून जन्माला येण्यासाठीं भोगाव्या लागणाऱ्या अवस्थांना संत चांगले मानीत नाहींत व माणसानें त्या प्रसंगातून सुटका करून घ्यावी असा त्यांचा उपदेश असतो. अपवाद केवळ मानवी कल्याणासाठीं अतिशय उदात्त जीवन जगण्याच्या अवतारकार्याचा. पण तो संदर्भ स्वतंत्र आहे. या वर्णनाचा त्याच्याशी कांहीं संबंध नाहीं. जन्ममृत्यूच्या पाशांतून सुटणें यालाच आपल्याकडे मोक्ष म्हटलें जातें व मोक्ष हाच परम पुरुषार्थ आहे. मृत्यूच्या पाशांतून सुटावयाचें असेल तर जन्माच्या पाशांतून सुटले पाहिजे अन्यथा **''मरणं प्रकृतिः शरीरिणाम्''** हा नियम सार्वत्रिक आणि त्रिकालाबाधितच आहे. आणि त्यामुळें पुन्हां जन्माला न येणें हाच त्यावरचा एकमात्र खरा उपाय आहे.

कांहीं अवस्थेंमध्यें आपल्याला हें पटतें. जीवन नको वाटावें आणि संपलें तर बरें झालें असें म्हणावें असे प्रसंग मानवी जीवनांत घडतात कीं नाहीं? उदा. अर्धांगवायूच्या विकारानें विकल झालेला मनुष्य क्वचित् वर्षानुवर्ष जगतो, त्याला हालचाल करतां येत नाहीं, मलमूत्रत्यागासाठीं अंथरुण सोडतां येत नाहीं, मलमूत्राचे वेग आवरतां येत नाहींत, क्वचित् आलेले कळतहि नाहींत. शुश्रूषा करणारी माणसें दक्ष नसलीं, जिव्हाळ्याचीं नसलीं म्हणजे मग त्या रोग्याचे हाल पाहवत नाहींत. शुश्रूषा करणाऱ्या माणसाला स्वत:चे जीवन असल्यानें त्याला, रोग्याची उपेक्षा केली म्हणून, फार दोषहि देतां येत नाहीं. अशा स्थितींत तो रोगी, विवेकी असेल तर, आतां मरण आलें तर बरें असें स्वत: म्हणत असतो आणि त्याच्या अंवतीभोंवतीचें इष्टमित्रहि हा सुटला तर बरे असेच प्रगट किंवा अप्रगट म्हणत असतात. त्या रोग्याचें खरें दु:ख परस्वाधीनपणाचें असतें. ज्या रोग्यामध्यें परस्वाधीनपणा येत नाही, किंवा आलेला निश्चयानें फार काळ टिकत नाही, अशा रुग्णावस्थेंत मरण बरें अशी भावना आप्तेष्टांना तरी होत नाही. वेदनांच्या तीव्रतेनें कदाचित् त्या रोग्यास होईल.



जन्म आणि जन्मापासूनचें सर्व जीवन हें खऱ्या अर्थानें कधींच स्वतंत्र नसतें. उण्याअधिक प्रमाणांत तें परतंत्रच असतें. त्यासाठीं कोणत्या ना कोणत्या स्वरूपाचीं बंधनें स्वीकारावींच लागतात. आपल्या मर्यादांची जाणीव ठेवावी लागणें हें एरवीं गुप्त म्हणून प्रसिद्ध असलेले एक फार विचित्र असें बंधनच आहे. मोक्ष म्हणजे सर्व बंधनांचा अभाव असा सिद्धांत असल्यानें, जन्माच्या मागोमाग सोसावीं लागणारी बंधने टाळणें हेंच उचित असल्यानें संतांनीं त्याचाच विचार सामान्यांना चांगली जाणीव व्हावी इतक्या स्पष्टतेनें केला आहे. म्हणून समर्थ म्हणतात आईच्या उदरांत असतांना काय अवस्था भोगावी लागते याचें स्वरूप तर लक्षांत घ्या.

खरोखरींच जाणीव नसते म्हणूनच तें जाणवत नाहीं. जाणीव असलेल्या स्थितींत तशी अवस्था भोगत असल्याची कल्पना करून पहावी म्हणजे संतवचनांची यथार्थता समजेल. स्मरण नसतें म्हणून बरें वाटतें म्हणण्यांत काय अर्थ आहे? अज्ञानाला वरदान मानण्यासारखेंच तें आहे. पारमार्थिक दृष्ट्या तें काय उपयोगाचें? हितकर काय आहे तें एकदां ठरल्यानंतर त्याकडे प्रवृत्त करण्यासाठीं मनुष्याच्या स्वभावाला अनुसरून कांहीं गोष्टी स्पष्ट सांगितल्या तर त्यासाठीं राग कां वाटावा? स्मरण राहत नाहीं, म्हणून वस्तुस्थिति खोटी म्हणतां येईल कां? हितकर त्याचें स्मरण द्यावेंच लागतें. आवडो न आवडो, सोयीचें असो वा नसो, तें आवश्यकच असते. विमान आक्रमणाची कल्पना देण्यासाठीं भोंगा होतो. त्यावेळीं कोणी जेवत असतो, कोणी खेळत असतो, कोणी झोपलेला असतो. सर्व गोष्टी सोडून तळघराकडे पळावें लागते. आतां अशा परिस्थितींत कुणी त्या भोंग्यावर चिडला तर त्याला विचारी मनुष्य काय म्हणेल? त्याच दृष्टीनें संतांच्या उपदेशाचा राग धरण्यांत अर्थ नाहीं.

गर्भवासांत काय होतें तें सांगतांना समर्थ म्हणतात – गर्भावासांत जीवाला फार यातना असतात. कारण तो तिथें शिजत असतो, पचत असतो, पण वाढ होण्यासाठीं या उष्णतेची आवश्यकताच असते. थंडींत वाढ होत नाहीं. वाढीसाठीं उष्णताच उपयोगी असते. धान्याला मोड येणें ही एकच गोष्ट उन्हाळ्यांत व हिवाळ्यांत कशी होते तें पाहिलें म्हणजे हें लक्षांत येईल. दुधाचें दही होतांनाहि हेंच लक्षांत येते. गर्भाचें पोषण नि आरोग्य पूर्णपणें आईच्या आहारविहारावर अवलंबून असल्यानें तिनें अज्ञानानें वा मोहानें केलेले मिथ्याचार तिच्यापेक्षां, कोवळ्या गर्भालाच अधिक भोगावे लागतात. हें परस्वाधीनपण फारच केविलवाणें आहे. म्हणूनच समर्थ बहू हिंपुटी होईजे मायपोटीं असें म्हणतात.

जन्मास येतांना अधोमुख होऊनच यावें लागतें. जणू हताश पराभवाचें हें

प्रतीक. तसें न यावें तर आईच्या व स्वत:च्याहि जीवास धोका निर्माण होतो. अगदीं सरळपणें जन्म झाला तरी संकुचित मार्गानें बाहेर पडण्याचें जें दडपण डोक्यावर आणि शरीरावर येतें व त्यामुळें ज्या वेदना होतात त्याहि असह्य म्हणाव्या अशाच असतात. जाणीव नसल्यामुळें त्यांचें स्मरण नसतें इतकेंच. नाना प्रकारचीं शस्त्रकर्मे संमोहन देऊन केलीं जातात. त्यामुळें शस्त्रकर्माच्या वेदना जाणवत नाहींत. अर्थात् त्याचें स्मरणहि असत नाहीं. पण म्हणून कोणी शस्त्रकर्म करण्याचा प्रसंग हौसेनें ओढवून घेत नाहीं. तेंच जन्माच्याहि बाबतींत समजलें पाहिजे.

जन्माला येणें नको हें मान्य झालें तर मग त्यांतून सुटावयाचा मार्ग कोणता? जन्मयातना पुन्हा भोगण्याचा प्रसंगच येणार नाहीं हें कसें घडेल ते समर्थ पुढील श्लोकांत सांगत आहेत.

**मना वासना चूकवीं येरझारा ।**
**मना कामना सांडिं रे द्रव्यदारा ।।**
**मना यातना थोर हे गर्भवासीं ।**
**मना सज्जना भेटवीं राघवासी ।।२१।।**

जन्मानंतर मरण व मरणानंतर जन्म हें जें जिवाचें मागें अखंडपणें लागलेलें चक्र आहे तेंच येरझारा या शब्दानें सुचविलेलें आहे. मानवी जन्माला आल्यानंतर तें चुकविण्यासाठीं प्रयत्नशील असणें हेंच त्याचें खरें कर्तव्यहि आहे. म्हणून समर्थ या श्लोकांमधें जन्ममृत्यूचें चक्र, येरझारा चुकव असे आवर्जून सांगत आहेत. या येरझारा जिवाच्या पाठीशीं कशामुळें लागतात त्याचें कारणहि, समर्थ वासना या शब्दानें सांगत आहेत. कारण वासना याच जन्माचें कारण असतात. **''जन्म घेणें लागे वासनेच्या संगे''** हा अध्यात्मांतील एक महत्त्वाचा सिद्धांत आहे. या श्लोकांतील चूकवी हा शब्द देहली-दीप न्यायानें घ्यावयाचा आहे. उंबऱ्यांत ठेवलेला दिवा जसा दोन्हीं खोल्यामध्यें प्रकाश पाडतो तसा चुकवी या शब्दाचा अर्थ-संबंध मागच्या आणि पुढच्या शब्दांशीं आहे. वासना चुकवी आणि (त्या बळावर) येरझाराहि चुकवी असा अन्वय या चरणाचा लावतां येईल. कोणत्या ना कोणत्या तरी वासनांच्या बळें माणूस कर्में करतो व त्या क्रियमाणांतूनच पुढें भोगावें लागणारें संचित व प्रारब्ध निर्माण होतें. म्हणून वासना सोडणें, म्हणजेच हवें नको सोडणें हेंच जन्म टाळण्याचें मूळ साधन ठरतें.

वासना सोडण्याचें सामर्थ्य येण्यासाठीं, मनुष्याला त्यांचें जे स्थूल परिणाम संस्कारांच्या रूपानें जीवनामधें प्रत्ययाला येतात, ते सोडण्यापासून आरंभ करावा



लागतो. आणि म्हणून समर्थ दुसऱ्या ओळीमधें मनाला धनसंपत्ति आणि स्त्रीविषयींचें आकर्षण यांचा त्याग कर असा आदेश देत आहेत. या ओळींतील सांडि रे हें क्रियापदहि वरच्या ओळींप्रमाणें दोन्हीकडे घ्यावयाचें आहे. कामना सांडी आणि द्रव्यदारां सांडी. द्रव्यदारांविषयक कामना सांडी असाहि अर्थ त्या ओळींतून घेतां येईल. पण विभक्तीची रूपें स्पष्ट नसल्यानें सांडि रे क्रियापद दोन्हींकडे स्वतंत्रपणें घेणेंच अधिक योग्य ठरेल.

त्यातून कामना ही द्रव्यदारेपुरतीच मर्यादित असते असेंहि नाही. कित्येक वेळा लोकेषणेच्या स्वरूपातील कामना ही अधिक बलवान् आणि उग्रहि असूं शकते आणि त्यांत सज्जनतेच्या मर्यादा फारशा सुटत नसल्यानें चांगल्या चांगल्या माणसांनाहि तिचा मोह टाळता येत नाहीं, टाळावासा वाटत नाहीं.

आपण सामान्यत: वासना आणि कामना हें शब्द सारख्याच अर्थाचें समजतो. पण येथें ते त्यांच्या मधील सूक्ष्म अंतर गृहीत धरून वापरलेले आहेत. वासना ही मूलभूत आणि पुष्कळ वेळा आवश्यकहि असूं शकते. याच वासनेला जेव्हां आसक्तीचे रूप प्राप्त होते, उत्कटता येते, मर्यादेचे भान राहत नाहीं, तेव्हा ती वासना कामनेत परिणत झाली आहे असें समजावें. हा भेद प्रकाराचा नसून प्रमाणाचा आहे.

द्रव्यदारांविषयक कामना या आपण सामान्यत: समजतो तितक्या नैसर्गिक व आवश्यक नाहींत व म्हणून अपरिहार्यहि नाहींत. संस्कारानें, अभ्यासानें, प्रयत्नानें त्यांच्या आसक्तींतून सुटणें शक्य आहे. रामकृष्ण परमहंसांसारख्या अनेक थोर पुरुषांची चरित्रे त्यादृष्टीनें प्रसिद्ध आहेत. जें उत्कटतेनें वाटते तेंहि सोडता येतें असें लक्षात आले म्हणजे मग त्या मानानें कमी उत्कट असणाऱ्या इच्छा आकांक्षा आवरतां येतील असा विश्वास माणसाला वाटू लागतो. आणि मग वासना सोडणें हेंहि साधणें शक्य होते. पण माणूस-स्वत:ला सभ्य आणि सुसंस्कृत समजणारा माणूसहि-अनेक प्रकारांनी या द्रव्यदारांविषयक कामनेमधें गुरफटून गेलेला असतो आणि तसें राहणें हें त्याला रसिकपणाचें आणि भूषणाचेंहि वाटत असतें. अनेक प्रकारच्या मर्यादांमुळें, उणीवांमुळें, वा दौर्बल्यामुळें द्रव्यदारांविषयक जी अभिलाषा त्याला स्वत:च्या जीवनांत प्रत्यक्षपणें पूर्ण करून घेता येत नाहीं ती मग तो साहित्याच्या, ललित वाङ्मयाच्या माध्यमातून अनुभविण्याचा प्रयत्न करतो. ललित साहित्याची लोकप्रियता वाढते ती यामुळेंच. हा संस्कार मनावर होणें चांगले नाही म्हणून तर नारदांनीं आपल्या भक्तिसूत्रामधें ''स्त्रीधन नास्तिकचरित्रं न श्रवणीयम्'' असा आदेश दिला आहे. संयम कार्यवाहीत यावा असें वाटणाऱ्या साधकाने नारदीय आदेशाला मान देणेंच हिताचें आहे हें निश्चित.

अपरिहार्य वाटणाऱ्या, स्वाभाविक वाटणाऱ्या द्रव्यदारांविषयक कामना जिंकता आल्या कीं मग कीर्ति, सत्ता, बरें खावे, बरें ल्यावें, बरें असावें यांच्या विषयींच्या अपेक्षा याहि टाळणें वा नियंत्रित ठेवणे सहज शक्य होतें आणि हें सर्व करावें लागतें तें पुन्हां पुन्हां भोगाव्या लागणाऱ्या जन्ममृत्यूचें संकट टाळण्यासाठीं. म्हणून समर्थ तिसऱ्या ओळींत मागच्या श्लोकांत सांगितलेल्या गर्भवासाच्या यातनांचें पुनरपि स्मरण करून देत आहेत. आणि मनाने परमेश्वराशीं जीवाची भेट घालावी असें जणू मनाची विनवणी करून सांगत आहेत.

परमेश्वराचें प्रेम नसेल, परमेश्वरदर्शनाची ओढ नसेल, परमेश्वरस्वरूपाचें ज्ञान नसेल, तर मग कोणत्याच साधनांना यश म्हणून येत नाहीं. केलेले प्रयत्न वाया जातात. वा उगीच व्यर्थ शिणलो, निरर्थक कष्ट घेतले अशी जाणीव बोंचत राहून मनुष्य आंतून परमार्थापासून दुरावतो, आणि मग शरीराने जे करीत राहतों ते टाकणें टाकल्यासारखें कसेंतरी केलेलें, लादलेलें ओझे रटाळपणें ओढत नेल्यासारखें, वरवरचे, केवळ यांत्रिक स्वरूपाचे होते. समर्थ ''भेटवी'' या शब्दातून साधकाच्या अंत:करणातील परमेश्वराच्या भेटीची ओढ सुचवीत आहेत आणि मनाला सज्जन म्हणून त्याचा अनुनय करीत आहेत. खरें म्हणजें मनाला सज्जन म्हणणे हा वदतो व्याघात वाटावा अशी वस्तुस्थिति आहे. त्याचा उद्दंडपणा, त्याचा हट्ट, त्याची चंचलता, त्याचा ओढाळ स्वभाव, याचें वर्णन अर्जुनासारख्या संयमी, सदाचारी पुरुषानेंहि केलें आहे. आणि प्रत्येकाला, विशेषत: साधकाला, मनाच्या या स्वरूपाचा अनुभव आल्यावांचून राहत नाही. अशा स्थितींत त्याला सज्जन म्हणणें हे केवळ अनुनयाचें वाटणें स्वाभाविक आहे.

मागे एकदा ती. दादांना असा प्रश्न विचारला होता की समर्थांसारख्या थोर संतांनी मनाला सज्जन म्हटलें आहे हें आईनें नाठाळ कारट्याला त्याच्याकडून काम करून घेण्यासाठीं शाहणा माझा बाळ! म्हणून गोंजारावें तशा स्वरूपाचें आहे काय? तेव्हां दादा म्हणाले, तसें असलें तरी बिघडलें कोठें? एखाद्या अज्ञान्याला त्याच्या स्वत:च्या कल्याणासाठीं हितकर गोष्टीकडे प्रवृत्त करावें म्हणून थोडें चढविलें तरी तें इष्टच आहे. तो कांहीं दंभाचार नव्हे, वा त्यांत वंचकतेचा दोषहि नाहीं. मनुष्य स्वभावाचें तें एक वैशिष्ट्य आहे आणि तें लक्षांत घेऊन वागणें संतांच्या जीवित-कार्याच्या दृष्टीनें उचित असेंच आहे. पण असें असलें तरी मनाला सज्जन म्हणण्यामागें आणखी एक भाव आहे आणि तो शास्त्रीय स्वरूपाचा आहे.

मन हे मुळांत रजोगुणी वा तमोगुणी नाहीं. तें सात्त्विक आहे. जें मुळांत चांगलें असतें तेंच पुन्हां प्रयत्नानें चांगलें करणें शक्य होतें. मन हें मुळांत



सत्त्वगुणी असल्यानें सज्जनपणा हाच त्याचा स्वभाव आहे. तें संस्कारानें रजोगुणी, तमोगुणी होतें, आणि जन्मजन्माच्या आवर्तनांतून पुन्हां पुन्हां तेच रजोगुणादि संस्कार दृढावत जातात, आणि मग जणूं मनाचा तोच स्वभाव आहे असे वाटूं लागते. यासाठीं समर्थ जणूं मनाला सज्जना म्हणून त्याच्या मूळ स्वरूपाची ओळख करून देत आहेत. आयुर्वेदाने **सत्त्वं मन:** असे सांगून **''रजस्तमश्च मनसौ द्वौ च दोषावुदाहृतौ''** असे म्हटले आहे. जन्माने, पिंडाने माणूस आहे पण तसे असून जेव्हां कोणी माणसासारखा वागत नाही तेव्हां त्यालाच माणसासारखें वाग, माणुसकीनें वाग, असें सांगितलें जातें. त्याच दृष्टीने मनाला सज्जन म्हणून संबोधिलें आहे व सांगितलें आहे, कीं बाबा! तू सज्जन आहेस. सात्त्विकता, सज्जनता हे तुझे मूळ रूप आहे. तेव्हां तूं मला माझा घात करणाऱ्या विषयांकडे ओढीत नेऊं नकोस. मला राघवाची, रामाची गांठ घालून दे. मला परमेश्वराकडे घेऊन जा. त्याचें दर्शन घडव.

**मना सज्जना हीत माझें करावें ।**
**रघूनायका दृढ चित्तीं धरावें ।।**
**महाराज तो स्वामि वायूसुताचा ।**
**जना उधरी नाथ लोकत्रयाचा ।।२२।।**

समर्थ म्हणतात हे मना! तूं सज्जन आहेस आणि म्हणून माझें (जीवाचें) हित करणें हेंच तुला उचित आहे. सज्जनानें कोणालाहि कल्याणाच्या मार्गाला न्यावें. अध:पाताकडे ढकलणें हें सज्जनाला शोभणारें नाहीं. ती दुर्जनाची प्रवृत्ति आहे.

श्रेय आणि प्रेय यांचें द्वंद्व माणसाला नेहमींच मोहांत पाडीत असतें. श्रेयाची ओळख पटत नाहीं असें नाहीं. पण प्रेयाची ओढ सुटत नाहीं. पुष्कळ वेळां बुद्धि विवेक करूं पाहते पण मन सन्मार्गानें जाऊं देत नाहीं. इंद्रियांचीं सुखें त्याला आकर्षक वाटतात आणि तेंच खरें सुखाचें आहे असेंहि वाटूं लागतें. विषयांच्या संगतींत सुख नाहीं, विषयांचा उपभोग घ्यावयाचा तर तो शरीरधारणा लक्षांत घेऊनच घ्यावयाचा. पण ही मर्यादा बहुधा कधींच पाळली जात नाहीं. त्यामुळें शरीरधारणाहि होत नाहीं, आरोग्य दूर जातें, अध्यात्मिकदृष्ट्या हानी होईल तें वर आणखी निराळेंच. यासाठीं प्रेयाकडची ओढ नाहीशीं करणें वा नियंत्रित ठेवणें हेंच हिताचें असतें. प्रेयाला श्रेय समजणें हें तर फारच घातक. श्रेय हेंच ज्याचें प्रेय बनलें आहे–तो भाग्यवान. हे भाग्य केवळ श्रेष्ठ भक्तांच्या ठिकाणींच दिसणें शक्य आहे. तुकाराममहाराजांनी यासाठींच **''भाग्यवंत म्हणो तया । शरण गेले पंढरीराया''** असें म्हटलें आहे. श्रीशंकराचार्य फार स्पष्टपणें

**''कौपीनवन्तः खलु भाग्यवन्तः''** असें म्हणतात.

सामान्याला प्रेयाचे दुष्परिणाम अनेक प्रकारें पटवून देऊनच श्रेयाकडे वळवावें लागतें. त्याला हित नको असते असें नाहीं, पण दुर्दैवाने तो सुखालाच हित समजत असतो. विषयोपभोगांच्या विपुलतेला तो समृद्धि समजतो, विषयांच्या अमर्याद उपभोगाला तो रसिकता समजतो. या गोष्टी खऱ्या हितांत बसत नाहींत हें समर्थ लक्षांत आणून देतात आणि मग म्हणतात–बाबा मना! तूं सज्जन ना ! मग माझें हित कर आणि त्यासाठीं श्रीरामचंद्राला घट्ट धरून ठेव. विषयाची ओढ सोडून दे.

रामचंद्र हें समर्थांचें दैवत. ते रामाचे एकनिष्ठ उपासक. रामचंद्रावर त्यांचें प्रेम फार. रामचंद्राची भक्ति त्यांच्या अंत:करणाला वेड लावते आणि त्यामुळें रामासंबंधींचा कोणताहि विषय निघाला कीं रामचंद्राचें श्रेष्ठत्व अनेक प्रकारांनीं पटवून दिल्यावांचून त्यांना राहवत नाहीं. प्रेमाचें आणि भक्तीचें हेंच स्वरूप आहे. तें आपल्या आराध्यदेवतेविषयीं परोपरीनें, उत्कटतेनें बोलणारच–आपल्या आराध्यदेवतेचें गुणगान करणारच. अंत:करणांत प्रेम नसते, ओढ नसते, आणि मग माणसाला मर्यादेचें स्मरण होतें. खरें प्रेम कधीं मर्यादित असूं शकत नाहीं, आणि म्हणून तें मर्यादा पाळीतहि नाहीं. हें प्रेम स्तुतीच्या रूपानें व्यक्त होत असते. पतिव्रता आपल्या पतीची, सत्‌शिष्य आपल्या गुरुची, भक्त आपल्या देवतेची स्तुती करतांना कधीं कंटाळणार नाही. समर्थांना तसेच रामाच्या संदर्भांत प्रेमाचें भरते येते, आणि मग तें रामचरित्रांतील गोष्टींचा वैशिष्ट्यानें उल्लेख करतात. रामाचें श्रेष्ठपण इतरानांहि पटवून द्यावें हाहि उद्देश त्यांत प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणें असतो. समर्थ सांगतात कीं बाबा मना! तुझ्यासारखा वेगवान मनोजव असा मारुती रामाला आपला धनी मानतो, स्वामी मानतो हें ध्यानीं घे. मारुती हे एक मोठें अद्‌भुत व्यक्तिमत्व आहे. वानर जातींत जन्माला आलेला हनुमान असामान्य बुद्धिमान् आहे. बुद्धिमतां वरिष्ठं आहे, संगीतापासून व्याकरणापर्यंत अनेक शास्त्रांत पांडित्य संपादन केलेला मारुती वेदाभ्यासजड नाहीं, चतुर आहे. राजकारणधुरंधर आहे, असामान्य शक्तिशाली असून, नवनागसहस्रबळी असून, जितेंद्रिय आहे आणि असें हे असामान्य व्यक्तिमत्त्व रामचंद्रापुढें नम्र आहे. रामाचा दास म्हणवून घेण्यांत भूषण मानणारें आहे. यावरून रामचंद्राच्या मोठेपणाचें गणित मांडता येणें शक्य आहे. फार मोठी व्यक्ती रामचंद्राला श्रेष्ठ मानते, एवढीच रामचंद्रांच्या थोरवीची मर्यादा नसून ते सर्व विश्वाचे, स्वर्गमृत्यूपातळाचे, त्रिलोकाचे धनी आहेत. आणि त्याहिपेक्षां त्यांनी (रामचंद्रांनी) लोकांच्या उद्धाराचें व्रत घेतलें आहे. लोकोद्धाराचे व्रत हा जणूं रामचंद्रांच्या श्रेष्ठत्वाच्या मुगुटावरील



तुरा आहे. असे असल्यामुळें या अशा अत्यंत श्रेष्ठ दैवताला दृढ धरून ठेवणें हेंच हिताचें आहे.

कोणाचा तरी उपासक असणें, आपल्या उपास्याची स्तुति करणें, आणि आपल्या ह्या उपासनेचा प्रचार करणें हें मनुष्यस्वभावाला अगदीं धरून आहे. भले तो स्वत:ला बुद्धिवादी म्हणो पण कोणाविषयीं तरी त्याला नितांत आदर असतो. त्याच्याहि काही श्रद्धा असतात. आणि आपल्या या श्रद्धेचा वा आदर्शाचा तो प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणें समर्थक असतो, प्रचारकहि असतो. तो शंकराचार्यांना मानीत नसेल परंतु मार्क्सला मानीत असेल, त्याला राणाप्रतापचें मोठेपण पटणार नाही, पण स्टॅलिन त्याला थोर पुरुष वाटेल. तो जन्मदात्या बापाचें श्राद्ध करणार नाही पण नाहीं त्या व्यक्तींच्या जन्मशताब्द्या उकरून काढून स्मृतिदिन साजरे करील. श्राद्ध करणें हा गबाळेपणा आणि स्मृतिदिन साजरे करणें हें प्रगतीचे लक्षण; वास्तुशांत करणें बुरसुटलेपणाचें आणि कोणाच्या तरी अध्यक्षतेखाली, कोणाच्या तरी हस्ते, उद्‌घाटन समारंभ करणें हें मात्र बुद्धिवादाचें असे तो मानतो. मला तरी पारंपरिक सनातनीपणापेक्षां हे बुद्धिवादी-गतानुगतिकत्वच अधिक गबाळेपणाचें वाटतें. यांत पद्धतीचें परिवर्तन असल्यामुळें खुळ्या परिवर्तनवाद्यांना तेंच प्रगतीचें लक्षण वाटत असेल तर कोणास ठाऊक? पण साध्य काय, ध्येय काय, तें अस्पष्ट असतांना परिवर्तनाचा धोशा लावणें आणि तेंच श्रेयस्कर समजणें याच्याइतकें आत्मघातकी तत्त्वज्ञान दुसरें नाहीं. जें जुनें आहे, तें निदान काळाच्या ओघांत परीक्षिलें गेलें आहे. त्याचें चांगुलपण पिढ्यान्‌पिढ्यांच्या अनुभवानें स्पष्ट झालेलें आहे आणि म्हणूनच तें टिकून राहिलेलें आहे. यासाठींच समर्थ कित्येक सहस्रकांपूर्वी होऊन गेलेल्या रामचंद्राचें महिमान आवडीनें गात आहेत.

**न बोलें मना राघवेवीण कांहीं ।**
**जनीं वाउगें बोलतां सूख नाहीं ।।**
**घडीनें घडी काळ आयुष्य नेतो ।**
**देह्यांती तुला कोण सोडूं पहातो ।।२३।।**

रघुनायका दृढ चित्तीं धरावें. या चरणाचा अर्थ काय? तें कसें करावें याचें स्पष्टीकरण समर्थ जणुं या श्लोकांत करीत आहेत.

परमेश्वर आपल्या चित्तांत ठसावा, त्याचें चिंतन घडावें, त्याचें ध्यान साधावें, त्याचा साक्षात्कार व्हावा, अशी इच्छा परमार्थाची गोडी असणाऱ्या माणसाच्या मनांत उण्या-अधिक प्रमाणांत स्पष्ट किंवा अस्पष्टपणानें असतेच. पण या इच्छा फारच क्वचित् परिपूर्ण होतात. जे परमार्थाला लागत नाहीत. पण जे परमार्थमार्गात

आहेत–लोक म्हणतात म्हणून नव्हे–तर खरेंच आहेत, त्यांनाहि त्यांच्या इच्छेप्रमाणे यश किती मिळतें याचा विचार केलाच तर नन्नाचा पाढा वाचावा लागेल. इच्छेप्रमाणें यश मिळूं नये हें खेदजनक असतें. वात्सल्यभावानें समर्थ त्याचीं कारणें स्पष्ट करीत आहेत.

रघूनायकास चित्तीं धरावें असें जरी वाटलें तरी दृढ धरावे या जाणिवेंत उत्कटता नसते. त्यासाठीं करावीं लागणारीं साधनें कटाक्षानें आचरिलीं जात नाहींत. सर्व साधनांत सोपें साधन म्हणून नामस्मरणाचा साधा उपाय संतांनीं सांगितला आहे. **''मनीं नसें तरी नसो परी वाचें तरी वसो ।''** एवढी सवडहि देऊन ठेवली आहे. आतां हें तरी सातत्यानें घडतें काय? जेमतेम तास अर्धा तास नांव घेणारा मनुष्यहि आपण मोठी साधना केली असें समजतो आणि इतर वेळ अक्षरश: वायफळ गप्पांत घालवतो. आवश्यक तें बोलणें, कामापुरते बोलणे टाळतां येत नाहीं, टाळूंहि नये. पण माणूस दिवसाकांठीं जें बोलतो तें आवश्यक आणि कामाचेंच आहे असें म्हणतां येईल काय? स्वत:ची स्तुति करणें, इतरांच्या कुचाळक्या करणें, मान्यता पावलेल्या व्यक्तींच्या दोषांविषयीं चिकित्सा करीत राहणें, आपण त्यांतले नाहीं हें सिद्ध करण्यासाठीं स्वत:संबंधीं बोलणें, वर्तमानपत्रांतल्या बातम्या, राजकारणें, आप्तेष्टांची वर्तणूक, महागाई, तरुण मुलें व वृद्ध माणसें यांची वागणूक, नटनट्या, चित्रपट, नाटकें या संबंधात वेळेचें भान न ठेवतां माणसें जे बोलत असतात, त्यांतील किती टक्के भाग महत्त्वाचा असतो, आवश्यक ठरतो, उपयोगी असतो? याचा विचार केला म्हणजे रिकाम्या वेळांतील बहुसंख्य वेळ वायाच घालविला जातो असें लक्षांत येईल.

अलीकडच्या नियतकालिकांनीं तर मनुष्याचा रिकामा वेळ वांया घालविण्यासाठीं साहित्य पुरविण्याचें व्रत घेतलेलें दिसतें. खेळ, अपराध आणि निवडणुका यांच्यासंबंधीं प्रसिद्ध होणारें भडक आणि सविस्तर वृत्त उपयोगाचें आहे हें कोणत्या निकषानें ठरविणार? त्यामुळें मन:स्वास्थ्य नाहींसें होतें, क्षोभ निर्माण होतो व त्याचे परिणाम उण्या-अधिक प्रमाणांत रक्तदाबावर होतात आणि तरी वृत्तपत्रांच्या स्वरूपांत पालट होत नाहीं तो नाहींच. चांगलीं, सुसंस्कृत म्हणविली जाणारी वृत्तपत्रेंहि याला अपवाद नाहींत. ललित वाङ्‌मयहि अश्लीलतेच्या, बीभत्सतेच्या, अनैतिकतेच्या अधिकाधिक घातक असणाऱ्या मार्गानें जणूं घोडदौड करीत आहे. आतां याच्या वाचनांत व त्यावरील चर्चेत जाणारा वेळ हा केवळ वांया जातो इतकेंच नव्हे तर हानिकारकहि असतो. म्हणून समर्थ म्हणतात–जनीं वाऊगें बोलतां सूख नाहीं.

मानवी आयुष्य हे अतिशय महत्त्वाचे आहे. त्यांतला प्रत्येक क्षण फार



मोलाचा आहे. गेलेला कोणताहि क्षण, कितीहि द्रव्य मोजलें तरी पुन्हां परत येणारा नव्हे, इतका मूल्यवान् आणि दुर्लभ आहे. शंकराचार्य म्हणतात–

**''आयु: क्षणलवमात्रं न लभ्यते हेमकोटिभि: क्वापि । तच्चेत् गच्छति व्यर्थं तत: परं काधिका हानि: ।''** प्रत्येक जाणारा क्षण पुन्हां परत येणार नसल्यानें आयुष्याचा तेवढा तुकडा कापून फेंकून दिला आहे असें होतें. आयुष्य संपण्याचा क्षण, मृत्यूचा क्षण, पळ, घटिका, दिवस, वर्षांनी जवळ जवळ येत असतो. कुणीहि, केवढाहि अधिकारी असला तरी यांतून सुटका नाहीं आणि ज्यांच्याकरितां त्याने आतांपर्यंतच्या आयुष्यातले असे अनेक क्षण, कारणीं लावले या कल्पनेनें, वांया घालविलेले असतात त्या आप्तेष्टांपैकीं कोणीहि शेवटच्या क्षणीं त्याच्या उपयोगी पडत नाहीं. मग ती व्यक्ति कुणीहि असो. आई, बाप, मुलगा, मुलगी, बहीण, भाऊ, पति, पत्नी, सत्ताधारी, पुढारी, यांतील कुणीहि कामाला येत नाहीं. श्रीतुकाराम महाराजांनी एका अभंगात त्याचें छान वर्णन केलें आहे.

अंत:करणपूर्वक कांहीं परमार्थसाधन केलें असलें, नि:स्वार्थ भावानें कांहीं योग्य कर्तव्यें पार पाडलीं असलीं, तर शेवटच्या क्षणीं त्यांचा कांहीं लाभ मानवाला होऊं शकतो. पण ही जाणीव शेवटच्या क्षणीं होऊन काय उपयोग–ती पुष्कळ आधीं, अगदीं तरुणपणीं झाली तरच कांहीं उपयोग होऊं शकतो. दुर्दैवानें तसें घडत नाहीं. शरीर थकलें, आतां प्रपंचाकरितां कांहीं करणें शक्य राहिलें नाहीं, म्हातारा जवळच्यांना आणि घरच्यांना नकोसा झाला, म्हणजे लोक ज्ञानेश्वरी हुडकू लागतात. कधींच न करण्यापेक्षां उशीरा करणें चांगलें म्हणून तें मान्य करावयाचें इतकेंच. तें खरें उपयोगी पडणारें नव्हे. म्हातारपणीं उशीरा आरंभ केला ठीक. आतां तरी देहरक्षणापलीकडे मिळालेला सर्व वेळ नामस्मरणांत, श्रवणांत, चिंतनांत, ध्यानांत, पूजापाठांत जातो काय? तसेंहि होत नाहीं. त्याहिवेळी प्रपंचाच्या नको त्या चिंता डोक्यावर चढलेल्या असतात. म्हातारपण हा स्वत:च एक रोग आहे. त्याचीं अनेक लक्षणें अनेक रूपांनीं वारंवार प्रगट होत असतात. आणि त्या दु:खांतच किती तरी वेळ जातो. याहिपेक्षां आल्यागेल्याजवळ स्वत:च्या दु:खाचीं गाऱ्हाणीं गाण्यांत म्हातारपणाचा किती वेळ वांया जातो याचा विचारहि कुणी करीत नाहीं.

हें सर्व जाणून–नेणून, प्रगट-अप्रगट देह म्हणजेच मी मानण्याचे प्रकार आहेत. देहापलीकडे कांहीं आहे आणि तें साध्य केलें पाहिजे असें वाटल्यावांचून वांया जाणारा वेळ कारणीं लावण्याची इच्छाच होणार नाहीं. म्हणून समर्थ **'रघूनायका दृढ चित्तीं धरावे'** असें सांगतात आणि दृढ धरणें कसें साधेल असें

कुणी विचारलें तर त्याचें 'वेळ वायां घालवूं नये, वायफल बोलूं नये' इत्यादि साधन सांगून तेंच शेवटीं तुझ्या उपयोगी पडेल दुसरें कांहीं पडणार नाहीं, असा बोध करतात.

**रघूनायकावीण वांया शिणावें ।**
**जनासारिखें वेर्थ कां वोसणावें ।।**
**सदासर्वदा नाम वाचे वसों दे ।**
**अहंता मनीं पापिणी ते नसों दे ।।२४।।**

माणूस आपल्या जीवनामध्यें ज्या गोष्टीकरितां फार धडपड करतो त्या सर्व गोष्टी परमार्थापेक्षां निराळ्याच असतात. सुखोपभोगाच्या अभिलाषेनें नाना तऱ्हेची संपत्ति मिळवीत राहणें व ती मिळविण्यासाठीं कोणत्याहि प्रकारचा विधिनिषेध न बाळगणें हेंच जणूं जीवनाचें सर्वस्व मानलें जातें. याच्या जोडीलाच सत्तेची, कीर्तीची हांव मिळाली कीं मग विचारावयासच नको. सर्व जीवन त्याकरितां कराव्या लागणाऱ्या श्रमांनीं ओतप्रोत भरून जातें. या सर्व धडपडींतून सुखाचा किती लाभ होतो हा प्रश्न इतका विवाद्य आहे कीं त्याचें खरें उत्तर शोधण्याचा प्रयत्न मनुष्य करीत नाहीं म्हणूनच बरें.

समाधान, तृप्ति, स्वास्थ्य, आनंद या गोष्टी इतक्या दूर राहतात कीं खरें सुख म्हणून खरोखरीच कांहीं असतें हेंहि माणसाला पुढें पुढें पटेनासें होते. सत्ता, संपत्ति, कीर्ति, अनेक प्रकारचे विषयोपभोग, विलासाचीं सर्व साधनें ही शेवटीं असमाधान देणारीं, स्वास्थ्य घालविणारीं ठरतात, इतकेंच नव्हे तर त्यामुळें कोणालाहि निसर्गत: सहजप्राप्त असलेलें आरोग्यहि दुर्लभ होऊन जातें. ही गोष्ट केवळ व्यक्तीपुरतीच मर्यादित राहत नाहीं तर सर्व कुटुंब, सारा समाज अस्वास्थ्यानें भरून जातो. अनेक प्रकारचे संघर्ष ठायीं ठायीं उभे राहतात. त्यामुळें शरीरच नव्हें तर मनबुद्धीहि पिळवटून निघते आणि मग मनुष्य विचार करूं लागला कीं त्याचेपुढें आपणास हवें होतें तें काय आणि येऊन पोंचलो तें कोठे? असे मोठें प्रश्नचिन्ह उभें राहते. अंत:करण निराश होतें, विषण्ण होतें. देहाचें सुख हेंच सर्वस्व मानून केलेली खटपट अशारीतीनें अगदीं व्यर्थ ठरतें, तो सर्व शीण वांया जातो. खरे सुख कशांत आहे हें न कळल्याचा, न वळल्याचा हा परिणाम आहे.

समर्थ म्हणतात–बाबा! परमेश्वराची प्राप्ति हें मनुष्यजन्माचें खरें सार्थक असूनही त्या रघुनायकाला, रामचंद्राला तूं विसरलास. त्याच्या प्राप्तीची कांहींच खटपट न करतां प्रापंचिक लाभानें प्राप्त होणाऱ्या काल्पनिक सुखाच्या मागें लागून सर्व प्रकारचें श्रम सातत्यानें केलेस. त्यांतून कांहीं निष्पन्न होत नाहीं हें



लक्षांत आलें तरी निरनिराळ्या प्रकारांनीं पुन्हां तेंच तेंच करीत राहिलास. शेवटीं तें सर्व वांयाच गेलें ना! देहधारणेच्या पलीकडे विषयोपभोगाला सर्वस्व मानून केलेले परिश्रम वाया जाणारच. मृगजळाच्या पाठीमागें धांवणें म्हणजे उरीं फुटून मरणेंच आहे. विचारी माणसानें असें करूं नये.

पण असा विचार, असा सद्विचार माणसाच्या मनामध्यें येऊंच नये, उमजूंच नये, क्वचित् स्फुरलाच तर टिकू नये असेंच भोंवतीचें वातावरण असतें. ज्या समाजामधें आपण वावरतो त्या समाजांतील बहुतेक सर्व लोक तत्त्वज्ञानदृष्ट्या फसव्या असलेल्या सुखोपभोगाच्या मागेंच लागलेले असतात. खोट्या प्रतिष्ठेच्या भ्रामक कल्पनांना बळी पडलेले असतात आणि त्यामुळें जीवनामधें पदार्पण करूं पाहणारा युवक हा प्रवाहपतित झाल्यासारखा त्याच त्याच मार्गानें चालत राहतो. त्याला विचार करावासा वाटत नाहीं. देखाव्यानें मोहित होऊन तो केवळ अनुकरण करीत राहतो. आसपासचे लोक वागतात तसेंच वागावें. शेजाऱ्याच्या घरांत जशी सामग्री आहे तशीच माझ्याकडेहि असावी. त्याच्यासारखे वा त्याच्याहून अधिक चांगले कपडे आपण करावेत. अनेक प्रकारच्या वस्तू, साधनें, उपकरणें, संपादन करावींत. तेंच सुखाचें आहे. त्यामुळेंच प्रतिष्ठा वाढते, असें समजून मग तसें राहणीमान मिळविण्यासाठीं सर्व प्रकारचे न्यायअन्याय गुंडाळून ठेवून, विधिनिषेधांची क्षिति न बाळगतां, माणूस वागूं लागतो आणि मग तें अस्वास्थ्याचें आमंत्रण ठरते.

यासाठीं समर्थ म्हणतात– लोकांचें पाहून कां बोलतोस? कां वागतोस? स्वत:ला काय पाहिजे, कां पाहिजे, यांचा विचार स्वतंत्रपणें आणि शास्त्रीयदृष्ट्या करून मनुष्य वागला तर तें योग्यच आहे. आवश्यक आहे. पण स्वत:ची बुद्धि जणूं गहाण ठेवून दुसऱ्याचें केवळ अनुकरण करण्याचा मोह जेव्हां माणसाला होतो तेव्हां तो घातकच असतो. परकीयांच्या आचारविचारांनी आपले असेंच झालें आहे. आपण स्वत्वाला पारखे झालों त्यामुळें सर्व दिशांनीं आपली घसरण होत असतांनाहि आपण नाविन्याच्या मोहानें खुळ्या विचारांना कवटाळून बसलों. आपण आज बोलतो ते विचारहि परक्यांचे आहेत, भाषाहि परक्यांचीच आहे. एरवीं स्वाभिमानाची आणि बुद्धिवादाची प्रौढी मिरविणारे लोक परकीय आचार-विचारांचे दास होण्यांतच प्रतिष्ठा मानतात असें आढळून येतें. समर्थ म्हणतात, असें कां करतोस?

सत्ता, संपत्ति, कीर्ति, प्रतिष्ठा यांच्यामागे लागूं नये, तें सुखाचें नाहीं हें जर खरें तर मग सुखासाठीं काय करावें? सामान्यत: संसारी माणसाला न पटणारी गोष्ट समर्थ येथें सांगत आहेत. ते म्हणतात, सदा सर्वदा देवाचें नांव घेत जा.

मनापासून घेतां आलें, आवडीनें घेतां आलें, नामस्मरणाचें प्रेम वाटूं लागलें तर तें उत्तमच. तसें झालेंच पाहिजे. पण नामस्मरणाविषयीचें प्रेम उत्पन्न होणें ही गोष्ट कांहीं सोपी नाहीं. व्हावी म्हटल्यानें होत नाहीं. नको म्हटल्यानें राहत नाहीं. तेव्हां ज्या गोष्टीवर आपली सत्ता चालत नाहीं ती न मिळाली तर त्याविषयीं खंत बाळगणें इष्ट नाहीं. जें आपल्या स्वाधीनचें आहे तेंच करीत रहावें. नामस्मरणाचें प्रेम वाटूं लागणें हें आपल्या हातचें नाहीं. पण नामाचा उच्चार करणें हे आपल्या हातचें आहे. समर्थ तेंच साधन येथें सांगत आहेत.

सहजसुलभ, सोपें, कोणत्याहि अटी नसलेले असें हें एक साधन आहे. तें सातत्यानें करीत राहिलें तर इतर आवश्यक त्या गोष्टी आपोआप साधतात असे सर्व संतांचें आश्वासन आहे. शरीराचें पोषण व्हावें म्हणून पक्वान्न खाणें कितीहि चांगले वाटलें तरी तें मिळणें वा करतां येणें हें सहज जमण्यांतलें नाहीं आणि क्वचित् जमले तरी तें योग्य रीतीने पचणें हेंहि अवघडच आहे. त्यापेक्षां साधी भात-भाकरी काय वाईट ! नामस्मरणाचें तसेंच आहे. भात-भाकरी हितकर खरी पण रुचकर नसल्यानें माणसें मिष्टान्नाचा मोह धरतात आणि आरोग्य बिघडवून घेतात. परमार्थांत तसेच होते. 'योगयाग विधि येणे नोहे सिद्धि' असें थोर थोर संतांनी अगदीं जीव तोडून सांगितलें तरी कुणी ऐकत नाहीं.

परमार्थमार्गामध्यें गुरु करणें महत्त्वाचें मानलें जातें ते धार्मिकदृष्ट्या, आपल्या कल्याणाचें काय करावें तें नेमकें कळावें म्हणून. पण शिष्य गुरुला न विचारतांच आपल्याच लहरीनें धार्मिक कृत्यें करीत असतो. त्यांतहि त्याच्या प्रतिष्ठेच्या कल्पना, बरें वाटतेच्या कल्पना, त्याला गुरुचा आदेश घेऊं देत नाहींत, कुळधर्मकुळाचारासारख्या परंपरेनें चालत आलेल्या ज्या गोष्टी आहेत त्याचें पालन करीत असतांना गुरूंच्या आदेशाची आवश्यकता न मानली तर चालेल. पण तदितर पूजापाठ, तीर्थयात्रा, दानधर्म, होमहवन इत्यादि ज्या गोष्टी माणूस करतो, त्यामध्यें खरें म्हणजे तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाची नितांत आवश्यकता असते. पण लोक जे बोलतात त्यावरूनच हा स्वत: काय करावें त्याचे निर्णय घेत असतो आणि याचें महत्त्वाचें कारण, तें चांगलें दिसतें मग तें मी कां करूं नको? त्यानें केलेलें चालतें तर मी कां करूं नये? असे वा यासारखे विचार माणसाच्या मनांत येतात. या सर्व गोष्टी म्हणजे खरोखरीच जाणत्या अनुभवी वैद्याला न विचारतां आपल्या रोगावर आपणच औषध घेण्यासारखें आहे. औषधाची प्रसिद्धि कोणीहि वाचावी, कोणतीहि वाचावी पण औषध घेण्यापूर्वी तज्ज्ञाचीच संमति घेतली पाहिजे. हें सर्व सांगण्याचें कारण इतकेंच की नामस्मरणासारखें अत्यंत सोपे आणि प्रभावी साधन उपलब्ध असतांनाहि तिकडे दुर्लक्ष करून कोणत्या ना



कोणत्या कल्पनेनें वा कोणाचें तरी पाहून, ऐकून, कांहींतरी वांचून लोक स्वत:च निर्णय घेत असतात. ही स्वत:च निर्णय घेण्याची जी प्रवृत्ति आहे ती अहंकारांतून उगम पावत असते.

हा अहंकार मी आणि माझें या रूपानें प्रगट होत असतो व तोच माणसाच्या सर्व व्यापारांच्या मागें कारण म्हणून असतो. व्यवहारांतहि हा अहंकार फारसा उपयुक्त ठरत नाहीं. तेथेंहि तो ज्याचा त्याला इष्ट वाटला तरी इतरांना उबगच आणतो; पण परमार्थात तर त्याच्या इतकें घातक दुसरें कांहीं नाहीं, असेंच सर्व संतमहंतांनीं म्हटलें आहे. येथेंहि समर्थांनी अहंकाराला-अहंतेला पापिणी हेंच विशेषण दिलें आहे. आपल्या सोयींसाठीं फार तर पातकाच्या पातळीवर जाणारा अहंकार नसावा असाहि अर्थ करतां येईल. स्वाभिमानाच्या नांवाखालीं जे अहंकार खपतात त्यांची सोय यामुळें होईल. जें हिताचें आहे तें प्रिय वाटत नाहीं. जें कर्तव्य आहे तें आवडीचें ठरत नाहीं! आणि त्यामुळेंच सर्व प्रकारचें अनर्थ जन्माला येतात. असें जें होतें त्याच्या मुळाशीं अहंता हेंच कारण असते आणि हें, विचार केला तर, ज्याचे त्याच्या लक्षांत येणेंहि शक्य आहे.

**मना वीट मानूं नको बोलण्याचा ।**
**पुढें मागुता राम जोडेल कैचा ।**
**सुखाची घडी लोटतां सूख आहे ।**
**पुढें सर्व जाईल कांहीं न राहे ।।२५।।**

अहंकाराचा एक अगदीं स्वाभाविक परिणाम असा दिसून येतो कीं त्याला दुसऱ्याचें बोलणें नको वाटतें, कंटाळवाणें वाटतें, म्हणून समर्थ सांगत आहेत कीं बाबा! बोलण्याचा वीट मानूं नको. हें वाक्य पुष्कळ व्यापक अर्थानें लक्षांत घेण्यासारखें आहे. माणसाला स्तुतीचा कधीं कंटाळा येत नाहीं. ती कितीहि झाली तरी अधिक हवीच असे वाटतें. एका आधुनिक कवीनें 'अंबाड्याच्या भाजींत घातलेलें फोडणीचे तेल कितीहि असलें तरी कमीच वाटतें, तसेंच स्तुतीचेंहि होतें' असें म्हटलें आहे. माणसाला ज्या बोलण्याचा वीट येतो त्याचे दोन प्रकारांत वर्गीकरण करणें शक्य आहे. साधकानें त्या दोन्हीं दृष्टिकोनांतून विचार करून स्वत:चें वर्तन सुधारलें पाहिजे.

ज्याचा वीट येतो आणि नकोसे वाटतें असे दोन प्रकारचें बोलणें माणसाच्या कानांवर पडतें. एक उपदेशाचें आणि दुसरें तिरस्काराचें वा निंदेचें. उपदेशाचें बोलणें हे दोन प्रकारच्या लोकांकडून ऐकण्याचा प्रसंग येतो. (१) अधिकार, योग्यता आणि संबंध असलेल्या व्यक्तींकडून आणि (२) तसे नसलेल्यांकडून.

ज्यांच्याजवळ अधिकार व योग्यता नाहीं आणि ज्यांचा कांहीं संबंधहि नाहीं अशा व्यक्तीनें कांहीं सांगितलें तर माणसाला तें ऐकावेसें वाटत नाहीं. पण साधकानें तेंहि वाटू देतां कामा नये. अशा परिस्थितींत जें सांगतो तें योग्य आहे कीं नाहीं याचा विचार अवश्य करावा. सांगणारा त्या योग्यतेचा आहे कीं नाहीं याचा विचार करणें तादृश महत्त्वाचें नाहीं. **बालादपि सुभाषितं ग्राह्यम्** असें म्हटलें जातें तें यासाठींच. योग्यतेच्या माणसानें अधिकार असतांना केलेल्या उपदेशासंबंधींहि माणसाला वीट येतो आणि मग तो त्या व्यक्तीलाच टाळीत असतो. तें बोलणें योग्य नाहीं, चांगलें नाहीं असें तर म्हणतां येत नाहीं, कारण तसें सिद्ध करता येत नाहीं; पण त्याप्रमाणें आचरण करणें कष्टाचें वाटतें, दु:खदायक वाटतें, खरोखरींच हितावह ठरेल कीं नाहीं याविषयीं शंका येते. तें उपदेशाचें बोलणें आपल्या धारणेपेक्षां वेगळें असतें आणि असा विचार त्या उपदेशाविषयीं मनांत आल्यामुळें तें सांगणें, पुन्हां पुन्हां ऐकणें कंटाळा आणतें. अशा वेळीं अलीकडचीं सुधारलेलीं माणसें बोअर झालों म्हणतात. मुळांत तें उपदेशाचें बोलणें पटत नाहीं, मानवत नाही, हेंच खरें.

साधकानें उपदेशाचें बोलणें तर काय पण तिरस्काराचें, निंदेचें भाषणहि आत्मशोधनाला कारणीभूत होत असल्यानें, सोशिकपणा वाढविण्यास सहाय्य करणारें असल्यानें, स्वागतार्हच मानलें पाहिजे. निंदकाला आपला शत्रू न मानतां संप्राप्ति-विशारद (पॅथालॉजिस्ट) मानावें. तो नेहमीं शरीरामध्यें काय काय दोष आहेत तेंच सांगत असतो, काय, कसें, किती बिघडलें तेंच सांगत असतो, आणि आपण त्याच्याकडून तीच अपेक्षा करीत असतो. निंदक शुल्क न घेतां, कुणी अपेक्षा ठेवली नसली तरी, आपणहून दोषांचें दिग्दर्शन करीत असतो, मग साधकानें त्याच्याविषयीं शत्रुत्वाची भावना कां बाळगावी? दुसरा कोणी सुधारत नसतो. आपलें आपण सुधारावयाचें असते आणि प्रत्येक घटनेचा उपयोग त्यादृष्टीनें करून घ्यावयाचा असतो हें साधकानें लक्षांत ठेवलें पाहिजे.

म्हणून समर्थ म्हणतात– ''**मना वीट मानूं नको बोलण्याचा ।**'' बोलण्याचा असा वीट मानशील तर तितिक्षा कशी वाढेल! नको वाटतें, कंटाळा येतो, म्हणून सोडून देशील, तर तें पळून जाणें ठरेल आणि हिताचें आहे हें पटत असून ऐकणार नाहींस तर प्रगति खुंटेल. निंदा सोसली पाहिजे, उपदेश ऐकला पाहिजे, म्हणजे आचरणांत आणला पाहिजे. हें जर केलें नाहीं तर जी गोष्ट साधावयाची आहे म्हणून माणूस परमार्थमार्गाला लागतो, ती कशी मिळणार? ईश्वरदर्शनाचा दुसरा मार्ग उपलब्धच नाहीं. नामस्मरण करणें, सदाचार न सोडणें, संयमानें वागणें, कामक्रोधांना जिंकणें, आळस सोडणें, कर्तव्यें पार पाडणें या



गोष्टी केल्याच पाहिजेत. परमेश्वर भेटावयाचा तो याच मार्गानें. मार्गानें जा म्हणून कोणी सांगत असेल तर त्याचा कंटाळा करून कसें चालेल! ईश्वर भेटावा अशी इच्छा आहे तर मग नामस्मरणादि साधनें स्वीकारलींच पाहिजेत.

ईश्वर भेटावा अशी इच्छा उत्कटतेनें होत नाहीं त्याचें कारण चालू घडी असते ती त्यांतल्यात्यांत सुखावह असते हें होय. आणि त्यामुळें ज्याची कल्पना नाहीं, अनुभव नाहीं अशा परमार्थसुखाची ओढ लागत नाहीं. म्हणून तर परमार्थाचा अधिकारी कोण होतो हें सांगतांना-**जो संसार दु:खें दुखावला । त्रिविधतापें पोळला । तोच एक अधिकारी झाला । परमार्थासी ।।** असें म्हणून ठेवलें आहे. पण अशा अगतिकतेंतून, नैराश्यांतून परमार्थाकडे ओढलें जाणें हें कांहीं फारसें इष्ट नाहीं, कारण मग ही मनोवृत्ति वैराग्याची नसते. ती वैतागाची असण्याची शक्यता अधिक असते. वैताग हा तसा फलदायी ठरूं शकत नाहीं. कारण परमार्थांत कांहीं पी हळद आणि हो गोरी अशी अपेक्षा धरतां येत नाहीं. तेथेंहि धीरच धरावा लागतो, वाटच पहावी लागते. नाहींतर तर तेथेंहि **भजन्नलिया सवें । सिद्धि न जरी पावे । तरी म्हणे आघवें । टवाळचि हे ।** (ज्ञा. १३।८१०) अशी वृत्ति उत्पन्न होते आणि ही नास्तिकता प्रपंचाच्या आसक्तीइतकीच किंबहुना थोडी अधिकच घातक असते. म्हणून परमार्थाकडे लागावयाचें ते पूर्ण विचारांती, विवेकानें लागले पाहिजे. रोग झाल्यानंतर मग आरोग्य मिळविण्याकरितां प्रयत्न करण्यापेक्षां रोग नसतांनाच आरोग्य टिकविण्यासाठीं, वाढण्यासाठीं, प्रयत्न करणें हेंच अधिक इष्ट असतें. म्हणून समर्थ सांगतात–प्रपंचातलें सुख हें न टिकणारे सुख आहे. सुखावह परिस्थिति नाहींशी होते. मुलें-माणसें, आप्तेष्ट कोणत्या ना कोणत्या तरी रूपांत दुरावतात. प्रतिष्ठा नाहींशी होते, शक्ति क्षीण होते. हें असें तर होतेंच पण प्रपंचांत वाटणाऱ्या सुखाची विलक्षणता अशी आहे कीं, एकदां जें सुखाचें वाटलें व तें बाह्यपरिस्थितींत तसेंच टिकून राहिलें असलें तरी मग सुखाचें वाटत नाहीं. जणूं **'अतिपरिचयादवज्ञा'** होते. त्यापेक्षां अधिक, त्यापेक्षा निराळें हवेसें वाटूं लागतें. पहिल्याचा कंटाळा येतो आणि नवीन मिळालें नाहीं, प्राप्त झालें नाहीं तर कांहींच नव्हते तेव्हां जसें दु:ख वाटत होते, तसें दु:ख वाटूं लागते.

आहे त्यांत समाधान न वाटणें, तृप्त न होणें व त्यामुळें अधिकाच्या प्राप्तीकरता प्रयत्न करीत राहणें ही महत्त्वाकांक्षा म्हणजे ईश्वरानें माणसाला दिलेली एक अद्‌भुत शक्ति आहे. मुळांत ती परमेश्वराच्या प्राप्तीमधें परिणत व्हावी यासाठीं मानवाला दिली आहे. समुद्रांतून निघालेल्या पाण्याचा वाहण्याचा जो गुण आहे तो जसा समुद्राला मिळण्यासाठी आहे, तसेच जीवाचेंहि आहे.

ईश्वरापासून निघालेला जीव पुन्हां ईश्वरालाच मिळण्यासाठीं प्रयत्नशील असल्यानें त्याला त्या आधींच्या कोणत्याहि स्थितींत नित्याचें सुख लाभत नाहीं, म्हणून प्राप्त झालेलें कोणतेंहि सुख त्याला तृप्ति वा समाधान देऊं शकत नाहीं. पण अज्ञानानें, विषयांच्या उपभोगांतून निर्माण झालेल्या संस्कारानें, मोहानें, माणसें या मूलभूत प्रवृत्तीचा उपयोग ज्या हेतूकरितां ती वापरली पाहिजे त्याकरितां न करतां भलत्याच ठिकाणीं करतात त्यामुळेंच त्याला नाना प्रकारांनी 'खरें प्राप्तव्य काय? खरें कर्तव्य तरी काय?' ते समजावून देण्याचा प्रसंग येतो.

समर्थांनी येथें सुखाची क्षणभंगुरता सांगून तेंच केलें आहे. ते म्हणतात– आतां तुला जें प्राप्त झालें व कांहीं काळ जें सुखाचें वाटत आहे तें पुढें लौकरच नाहीसें होणार आहे, त्याचें स्वरूप पालटणार आहे. या भौतिक जगांत कांहींहि जसेंच्या तसें टिकणारें नाहीं. तारुण्य, आरोग्य, मान, धन, सत्ता, संपत्ति, प्रतिष्ठा, ज्यांना तूं जिव्हाळ्याचे समजतोस ते आप्तेष्ट, यांतलें कांहींहि तुला पाहिजे त्या स्वरूपांत दीर्घकाळ टिकणारें नाहीं. मग त्यांत आसक्त होऊन कां राहतोस! कारण या आसक्तीच्या पोटी केले जाणारे श्रम सगळे वांया जाणार आहेत.

**देहेरक्षणाकारणें यत्न केला ।**
**परी सेवटीं काळ घेऊनि गेला ।।**
**करी रे मना भक्ति या राघवाची ।**
**पुढें अंतरीं सोडिं चिंता भवाची ।।२६।।**

समर्थ विचारतात–जन्माला आल्यापासून जें जीवन तूं जगतोस त्यांत तुझी धडपड, तुझे प्रयत्न, तुझी हांव, तुझा आग्रह कशासाठीं असतो? देहाच्या रक्षणासाठीं! हें त्याचें उत्तर. मनुष्यानें देहरक्षण हेंच सर्वस्व मानावें काय? विचारी माणूस याचें उत्तर नाहीं असेंच देईल. बहुसंख्य माणसें या देहरक्षणापलीकडे बाकी कांहींहि फारसें करीत नसलीं तरी देहरक्षण हेंच ध्येय असें कुणी म्हणणार नाहीं. आस्तिक असेल, परंपरेच्या श्रद्धा मानणारा असेल, तर तो ईश्वरभक्ति, ईश्वरप्राप्ति, मोक्ष हें ध्येय सांगेल. नास्तिक असेल, स्वत:ला बुद्धिवादी समजणारा असेल, तर देशभक्ति, समाजकार्य, वैज्ञानिक प्रगति, शास्त्रीय संशोधन, मानवतेची सेवा, समतेची प्रतिष्ठापना इत्यादि इत्यादि गोष्टी ध्येय म्हणून सांगेल. पण हें जें आपलें ध्येय तो मानतो त्यासाठीं तो किती वेळ देतो. देहाचें भरण, पोषण आणि उपयोग यासाठींच माणसाचें बहुतेक सगळें बळ आणि वेळ वेंचला जातो! कां? प्रपंचाकरितां संयोजन असतें पण परमार्थाकरितां कांहीं योजना असते काय?



नाहीं! असेंच सर्वसाधारण उत्तर आहे.

देहाची उपेक्षा करावी असें कोणी म्हणत नाहीं. पार्वती तपश्चर्या करीत असतांना तिची परीक्षा पाहण्याकरितां बटुवेषानें प्रगट झालेल्या शंकरानें तिला पहिला प्रश्न विचारला आहे कीं :

**अपि स्वशक्त्या तपसि प्रवर्तसे ।**
**शरीरमाद्यं खलु धर्मसाधनम् ।।**

आपली शक्ति पाहून तपाचें आचरण करीत आहेस ना? धर्माचरणाचें शरीर हें पहिलें साधन आहे. संतांनींहि **'कथेची सामग्री देव अवसानावरी'** असेंच म्हटलें आहे. वैदिक ऋषींनींहि प्रार्थना करतांना आम्हांला शंभर वर्षांचें आरोग्यसंपन्न दीर्घायुष्य मिळावें, शरीराचे सर्व अवयव धडधाकट आणि कार्यक्षम असावेत असेंच म्हटलें आहे. पण अशा आरोग्य-संपन्न दीर्घायुष्य लाभलेल्या धडधाकट शरीराचा उपयोग आम्ही देवाच्या कामासाठीं करूं असें ते ऋषी पुढे म्हणतात. रुद्रांतील चमकांनीं जगांतील सगळे पदार्थ मला द्या, मला द्या, अशा, शब्दांत मागितले आहेत. धनधान्य, संपत्ति, गाई, घोडे, वासरें मागितलीं आहेतच; पण दगड सुद्धां मागितले आहेत. यावरून भौतिक जगांतील सर्व वस्तू उपयुक्त आहेत आणि आवश्यक आहेत हेंच सिद्ध होतें. पण अशा या भौतिक वस्तूंच्या सहाय्यानें संपन्न झालेलें आयुष्य आणि कार्यक्षम झालेलें शरीर हें शेवटीं यज्ञाच्या कामीं लावावयाचें आहे आणि तो यज्ञहि शेवटीं यज्ञासाठीं म्हणजे परमेश्वरासाठीं आहे असेंहि रुद्रामध्ये सांगितलें आहे. संरक्षिलेल्या देहाचा हा उपयोग कोणी लक्षांत ठेवतो काय?

हा उपयोग लक्षांत न घेतां केलेले देहरक्षण हें शेवटीं खरोखरीचें देहरक्षणहि होत नाहीं. शरीर निरोगी आणि काटक असलें, पडतील ते कष्ट सोसणारें असलें, थंडी, ऊन, वाऱ्याला घाबरणारें नसलें म्हणजेच देहाचें रक्षण साधलें असें म्हणावयाचें ना? पण सुखोपभोगाच्या मागें लागलेल्या माणसाचें तेंहि होत नाहीं. शरीर-सुखाच्या अपेक्षेनें तो इंद्रियांचे लाड करतो, विषयोपभोगांत विलासी होतो, आणि शरीराची कार्यक्षमता व आरोग्य गमावून बसतो. अनेक दुर्धर रोगांना भर तारुण्यांतच शरीर बळी पडतें, देहाला दुबळेपणा येतो. वेलदोड्यानें थंड, लवंगेनें उष्ण अशी स्थिति होते. हे परिणाम बहुधा विलासी जीवनाचे आहेत.

कोणतेंहि ध्येय पुढें न ठेवतां देहरक्षण केलें तर त्या देहाचें पुढें काय होते? शरीर शेवटीं मातीलाच मिळतें ना! देहाची शेवटीं राखच होते ना! कितीहि देहरक्षण करतो म्हणाला तरी शेवटीं म्हातारपणीं येणारी दुर्बलता, विकलांगता टाळतां येते काय? मग कोणताहि ध्येयवाद न ठेवतां केलेलें देहरक्षण काय

कामाचें? शरीर हें साधन म्हणून वापरणेंच चांगलें. त्याचे लाड करणें व्यर्थच आहे. म्हणून समर्थ मानवाचें सर्वोच्च ध्येय, ईश्वरभक्ति, तेंच साधावें असें सांगतात.

संसाराची वा संसारातल्या अनुकूल-प्रतिकूल परिस्थितीची चिंता करूं नये. योग्य ते प्रयत्न आणि प्रारब्ध यांचा परिणाम म्हणून जें व्हावयाचें तें होईल. आग्रह असावा तो परमेश्वराच्या भक्तीचा. शरीर आणि मन यांच्या पातळीवर पारमार्थिक क्षेत्रांत साधन म्हणून जें करतां येईल तें प्रामाणिकपणें आणि निष्ठेनें करीत रहावें. आपल्या ऐश्वर्याला अनुसरून सत्पात्रीं दान द्यावें, पूजापाठ, तीर्थयात्रा या गोष्टी शक्त्यनुसार कराव्यात आणि नामस्मरणामध्यें अधिकाधिक वेळ घालवावा. या गोष्टी व्रत म्हणून कराव्याच व त्यांतील आवड वाढावी आणि भगवंताच्या चरणावरचें प्रेम वृद्धिंगेत व्हावें यासाठी तळमळीनें प्रार्थना करावी. म्हणजे क्रमाक्रमाने संसाराविषयींच्या चिंता उणावत जातात आणि शेवटीं नाहींशाहि होतात.

ऐहिक मनोरथ पूर्ण होतात आणि भौतिक संकटे येत नाहींत असें ईश्वरकृपेचें फळ सांगितलें जातें. तें फारसें खरें नाहीं. तसा अनुभव फार क्वचित्‌पणेंच विशेष कारणांनीं येतो आणि हे क्षेत्र मंत्रतंत्र मार्गाचे आहे. खऱ्या अर्थाने भक्तिमार्गाचें नव्हे. भक्तांवर दु:खें येतच नाहींत हें खरें नाहीं. सामान्यावर होतो तसा दु:खाचा परिणाम त्याच्यावर होत नाहीं हें मात्र खरें. **''यस्मिन् स्थितो न दु:खेन गुरुणापि विचाल्यते ।''** (भ. ६।२२) अशी भक्ताची स्थिति असते. वाहनाचे आघातशोषक उत्कृष्ट असले आणि आंतील गाद्या मऊ गुबगुबीत असल्या म्हणजे रस्त्यावरच्या खड्ड्यांचा त्रास होत नाहीं तसे भक्तीत होते. तितिक्षा, श्रद्धा आणि प्रेम या बळावर कोणत्याहि स्थितींत भक्त प्रसन्न आणि समाधानी राहूं शकतो. पण हे भक्तिमार्गाच्या फार वरच्या स्थितीतले अनुभव झाले. सामान्य स्थितींतील व्यक्तीला आणि प्राथमिक अवस्थेंत हें तत्त्व पेलणारच नाहीं. त्याच्यासाठीं समर्थ सांगतात–

**भवाच्या भयें काय भीतोसी लंडी ।**
**धरीं रे मना धीर धाकासि सांडी ।।**
**रघूनायका सारिखा स्वामि शीरीं ।**
**नुपेक्षी कदा कोपल्या दंडधारी ।।२७।।**

लंडी म्हणजे भेकड. समर्थ म्हणतात–मानवा! किती रे भेकड तू! संसाराच्या भयानें काय घाबरतोस. ज्याला घाबरावें, भ्यावें त्याचे ठिकाणी कांहीं पराक्रम लागतो. लहान मुलें बागुलबुवाला भितात. कारण अज्ञानी असतात. बागुलबुवा ही वस्तूच मुळांत नाहीं हें वयानें थोराड झालेल्या माणसाला कळायला हवे!



दोरीवरच्या सापाला घाबरण्यांत काय अर्थ आहे? संसाराची स्थिति तशीच आहे. तत्त्वत: ज्याला अस्तित्व नाहीं त्याला काय घाबरतोस? दाढी मिशा आल्यावर रांगणें जसें शोभत नाहीं, तसें जाणत्या माणसांनीं संसाराला भिणें शोभत नाहीं. मनुष्यानें ईश्वरावर निष्ठा ठेवावी आणि परिस्थितीला तोंड देण्यासाठीं धैर्यानें ताठ उभें रहावे. परिस्थितीला घाबरणें म्हणजे परिस्थिति आणखी बिकट करून ठेवणें आहे. शिडीवर चढायचें झाले तर पाय लटपटूं देतां कामा नयेत. कोसळण्याचा धोका वाढतो तो शिडीच्या लटपटण्यापेक्षां पायांच्या लटपटण्यामुळें. सर्वत्र असेंच होते. रस्त्याला वळणे नसलीं, रस्ता पुष्कळ रुंद असला, चांगला मोकळा असला म्हणजे चांगल्या वेगानें सतत जातां येईल हें वरवर पाहतां खरें वाटले तरी अशा रस्त्यावर वेगानें जाताना सारथ्याला डुकली येते आणि अपघात वाढतात असा अनुभव आहे. रस्त्याला वळणें, वळसे, आवश्यकच असतात असें म्हणावें लागतें. संसारातल्या प्रतिकूल परिस्थितीचेंहि तसेंच म्हणावें. आपण सावध व्हावें आणि धीरानें वागावें हेंच शेवटीं उपयोगी पडणारे आहे. म्हणून समर्थ म्हणतात, मना! धैर्य धारण कर, धाक सोडून दे, भय बाळगूं नकोस, आणि विश्वास वाढण्यासाठीं आश्वासन देतात की भगवान् रामचंद्रासारखा धनी तुझ्या मस्तकावर आहे. त्याच्या कृपाछत्राखालीं तूं आहेस. भक्तांच्या रक्षणाकरितांच त्याने धनुष्य धारण केलें आहे आणि तें सज्ज आहे. तो तुझी उपेक्षा करणार नाहीं. रामरक्षेत रामाचें वर्णन.

**आत्तसज्जधनुषाविषुस्पृशा- । वक्षयाशुगनिषंगसंगिनौ ।।**

असें केलें आहे. त्यानें धनुष्यावर प्रत्यंचा चढविलेली आहे आणि बाण जोडून तो सिद्ध आहे. 'आम्हांला कल्पना नव्हती' असें म्हणणारा मेणचट, मेंगळट नेता हा नाहीं, अनुयायांवरच संतापणारा आणि शत्रूपुढें नांगी टाकणारा असाहि हा नाहीं. दीर्घसूत्री तर नाहींच नाहीं. भक्तरक्षणाच्या कामीं तो चांगला तापट आहे. त्याचा लक्ष्मण त्याहून तापट आहे. तेव्हां रामभक्तानें आपलें रक्षण कसें होईल अशी चिंता बाळगण्याचें कारणच नाहीं.

रामचंद्रानें सुग्रीवाचें रक्षण केलें तो प्रसंग लक्षांत घेण्यासारखा आहे. विचारवंत म्हणून प्रसिद्ध असलेले अनेक बुद्धिवादी, रामशास्त्री प्रभुण्यांचा आव आणून, वालीवध प्रकरणीं रामचंद्राला दोष देत असतात. सुग्रीवापेक्षां वाली बलवान् आणि पराक्रमी होता. वालीपासून मी तुझें रक्षण करीन असें रामचंद्रांनीं सुग्रीवाला वचन दिलें होतें. वाली आणि सुग्रीवाच्या मल्लयुद्धाला आरंभ झाला तेव्हां सुग्रीव अशा बिकट परिस्थितींत आला होता, की रामचंद्र क्षणाचाहि विलंब करते तर सुग्रीव जिवंतच राहिला नसता. म्हणून रामचंद्रांनीं तांतडी केली. इथे न्यायान्यायाचा

विचार करणें म्हणजे कर्तव्याला चुकणें आहे आणि सर्वदा अन्यायानेंच वागणाराशीं, अत्याचार आणि अतिक्रमण हेच ज्यांचें धोरण असते त्यांच्याशीं, न्यायानें वागून त्यांना अधिक उन्मत्त होण्याची संधि देणें हें धोरण कांहीं रामचंद्रांचें नव्हतें. साधनशुचितेचा अतिरेकी हट्ट वैयक्तिक क्षेत्रापुरता संन्याशाला शोभतो. राजकारणांत उतरलेल्या वीराला शोभणारा कांहीं तो फार मोठा सद्‌गुण नाहीं. **''ये यथा मां प्रपद्यन्ते तांस्तथैव भजाम्यहम् ।''** (भ. गीता ४।११) हाच ईश्वरी न्याय आहे. तेंच तत्त्व रामचंद्रांचेंहि होते. म्हणून आपण त्यांना ईश्वरी अवतार मानतों. तेव्हां असा दक्ष आणि समर्थ धनी मनुष्याला लाभला असतांना रागावलेल्या दंडधराचें म्हणजे यमाचें म्हणजे मृत्यूचें भय बाळगण्याचें कारण काय? रामचंद्रावरील विश्वासानें मृत्यू टळत नसतो. मृत्यूचें भय टळतें हें लक्षांत ठेवलेंच पाहिजे.

**दिनानाथ हा राम कोदंडधारी ।**
**पुढें देखतां काळ पोटीं थरारी ।।**
**जना वाक्य नेमस्त हें सत्य मानी ।**
**नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ।।२८।।**

परमेश्वर आपल्या भक्तांची कधीं उपेक्षा करीत नाहीं हें निरनिराळ्या उपायांनीं आणि उदाहरणांनीं समर्थ समजावून देत आहेत. ''नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ।'' राम भक्ताचा अभिमानी आहे. तो त्याची कधीं उपेक्षा करीत नाहीं असें पालुपद असलेले १० श्लोक या ठिकाणी क्रमानें आहेत.

हा विषय समर्थांना साधकाच्या मनावर चांगला बिंबवावयाचा आहे. आणि म्हणून याच अर्थानें नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी हे पालुपद असलेले १० श्लोक समर्थांनीं मनोबोधांतच पुन्हां एकदा सांगितले आहेत. (११६ ते १२५)

कोणत्याहि जीवाला आपल्याला कोणाचा तरी आधार आहे असें निश्चित वाटावें लागतें. या आधाराच्या बळावर त्याला मोठें धैर्य लाभत असतें. साधें कुत्रेंहि आपल्या धन्याच्या दारांत उभें राहून रानांत सिंह गरजला तर त्यालाहि भुंकून मोठ्या धैर्यानें प्रत्युत्तर देतें. कविवर्य मोरोपंतांनीं ही घटना उपमेसाठीं वापरलेली आहे. आई जवळ असतांना लहान पोर जितक्या खोड्या करतें तितक्या आई जवळ नसतांना परक्या घरांत करीत नाहीं. बालकाला आईचा आधार वाटतो. असा आधार हवासा वाटणें, आहे असें वाटणें, हीच आस्तिकता. माणूस आपल्या जीवनामध्यें असा कोणता ना कोणता तरी आधार शोधीतच असतो. तो ईश्वर असेल, सत्पुरुष असेल, विचारवंत असेल, तत्त्ववेत्ता असेल, संशोधक, शास्त्रज्ञ, नेता, कार्यकर्ता यापैकी कुणीं असेल, कुणीं जिव्हाळ्याचा



मित्र असेल, कुणी आप्त असेल; पण विश्वासाच्या आधारावांचून माणसाला तरी उभें राहणें अशक्य आहे.

अलीकडे माणसें स्वत:ला भूषणानें नास्तिक म्हणवून घेतात. त्यांना तें बुद्धिमत्तेच्या प्रखरतेचें द्योतक वाटतें. पण तो अडाणीपणा तरी असतो. नाहीं तर दंभ तरी असतो. आधार आहे या कल्पनेंतच माणसाचें दैन्य उणावतें, आत्मविश्वास वाढतो. इतर प्रकारचे आधार हे तेवढे बळकट नसल्यानें संतांनीं सर्वसमर्थ ईश्वराचाच आधार घ्यावा आणि त्याच भरंवशावर राहावें असें सांगितलें आहे. कारण परमेश्वर हाच शेवटीं सर्वाधार आहे. त्याच्याच बळावर इतर लहान मोठ्या आधारांना कार्यक्षमता येत असते आणि हा आधार सर्वांसाठीं केव्हांहि उपलब्ध आहे. अडचण आधार देणाराकडून नाहीं, घेणाराकडून आहे. ती दूर व्हावी म्हणून तर नाना प्रकारांनी संत उपदेश करीत असतात. आपण ज्या रीतीनें लहान व मोठी ही कल्पना करतो ती कल्पना परमार्थांत नाहीं. ईश्वर दीनानाथ आहे. दीन दुबळ्यांचा **'जे कां रंजले गांजले'** त्यांचा तो नाथ, रक्षक, पालक असा आहे. त्यामुळें त्याला भेटण्यासाठीं मध्यस्थ नको. तुम्हीं त्याला सरळ भेटूं शकता. आणि असा हा दीनानाथ परमेश्वर, रामचंद्र धनुष्य धारण केलेला आहे. धनुष्य सज्ज करून उभा आहे. त्यानें शस्त्रसंन्यास केलेला नाहीं. शस्त्र वापरणारच नाहीं अशी त्याची प्रतिज्ञा नाहीं. कृष्णावतारीं तशी प्रतिज्ञा केली होती तरी भक्तरक्षणासाठीं तीहि मोडावी लागली. आणि हा प्रतिज्ञाभंगहि संतांनीं भूषण म्हणूनच गायिला. विष्णुसहस्रनामामधें परमेश्वराचें गुणवर्णन करणारीं हजार नांवें आहेत. पण उपसंहार करतांना घेतलेलें नांव 'सर्वप्रहरणायुध' असें आहे. शस्त्र बाळगण्याचीच लाज वाटणें हा विचार अवैदिक आहे. भगवान् रामचंद्र शस्त्रधारी आहेत. इतकेंच नव्हें तर त्यांचें शस्त्रकौशल्यहि असामान्य आहे. हत्यार नुसतें हातांत असून चालत नाहीं, तें वापरण्याचें कौशल्यहि हातांत असावें लागतें. आणि त्या शस्त्रापासून समोरच्याला धाक उत्पन्न व्हावा अशी वीरश्रीहि अंगाअंगांतून प्रगट व्हावी लागते. ज्ञानेश्वरांनीं **कुमारीच्या हातांतले शस्त्र काय कामाचें** (ज्ञा. ९।१७७) असें म्हटलें आहे. 'मानापमानां'तील लक्ष्मीधराच्या हातांतलें शस्त्र उपहासाचा विषय होतो. भगवान् रामचंद्र कोदंडपाणि आहेत, आणि त्यांचा धाक इतका विलक्षण आहे, कीं त्यांना समोर पाहतांच, ज्याला सर्व त्रिभुवन घाबरतें असा, कळिकाळहि भयानें थरकांपतो. समर्थ म्हणतात, आम्हीं ही अतिशयोक्ति करीत नाहीं. हें आमचें बोलणें नेमस्तपणाचें आहे, नेमकें, नेटकें यथार्थ आहे.

सामान्यत: आपण असें बोलत नाहीं. आपल्या बोलण्यांत स्तुतीचा गौरव तरी असतो नाहीं तर निंदेची तुच्छता तरी असते. चहा चांगला झाला तर आपण

म्हणणार वा! अमृतासारखा झाला आहे. आणि बिघडला तर म्हणणार काडेचिराईताचा काढा यापेक्षां काय वाईट! या दोन्हीं प्रकारांत अतिशयोक्ति आहे. एखादा पदार्थ रुचकर आहे कीं नाहीं एवढेच फार तर म्हणतां येईल. पण इतक्या शब्दांनीं आपलें समाधान होत नाहीं. जणूं आपल्या दुबळ्या ग्रहणशक्तीचा हा परिणाम आहे. यथार्थ बोलणें आपल्याला आकर्षक वाटत नाहीं.

संत नि:स्वार्थी आणि सत्यवादीं असल्यानें ते सहसा अतिशयोक्तीचा अवलंब करीत नाहींत. माणसाला त्याच्या नेहमीच्या संवयीनें भगवान् रामचंद्राच्या प्रभावाचें वर्णनहि अतिशयोक्तीचे वाटेल. तसें तें वाटूं नये म्हणून समर्थ त्यांतल्या यथार्थपणाची प्रतिज्ञा करीत आहेत. रामाचें सामर्थ्य अलौकिक आहे आणि वत्सलहृदय असल्यानें तो भक्तांची उपेक्षा करीत नाहीं हें जें आम्ही म्हणतो तें आमचें बोलणें नेमस्त आहे, वस्तुस्थितीला अगदीं धरून आहे.

**पदी राघवाचें सदा ब्रीद गाजे ।**
**बळें भक्तरीपूशिरीं कांबि वाजे ।।**
**पुरी वाइली सर्व जेणें विमानीं ।**
**नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ।।२९।।**

मी भक्तांचें रक्षण करीन अशी रामचंद्रांची प्रतिज्ञा आहे. आणि ती त्यांच्या चरित्रांत पदोपदीं जणूं गर्जना करीत प्रगट होत असते. म्हणजे सहज कळण्याइतकी उघड स्वरूपांत असते. जे कुणी भक्तांचा छळ करीत असतील अशा दुष्टांच्या मस्तकावर रामचंद्रांच्या हातांतील शस्त्र वेगानें आघात केल्याशिवाय राहत नाहीं. बळें या शब्दांतून रामचंद्रांना येणारा रागच समर्थांनी व्यक्त केला आहे. संरक्षणासाठीं राग येणें, आणणें आवश्यक असतें.

शाकुंतलांतील एक प्रसंग मोठा लक्षांत घेण्यासारखा आहे. इंद्राला राक्षसांच्या पारिपत्यासाठीं दुष्यंताच्या सहाय्याची अपेक्षा होती. दुष्यन्त शकुंतलेच्या विरहानें खिन्न झाला होता तेव्हां इंद्राचा सारथी मातली यानें दुष्यंत सहाय्यासाठीं सिद्ध व्हावा याकरितां गुप्तरूपानें दुष्यंताच्या मित्राला, विदूषकाला छळलें. दुष्यंत मोठ्या त्वेषानें विदूषकाच्या रक्षणासाठीं धावला तेव्हां मातलीनें प्रगट होऊन वस्तुस्थिति सांगितली. **''प्राय: स्वं महिमानं क्षोभात् प्रतिपद्यते हि जन: ।''** रागामुळेंच माणसाचें सामर्थ्य प्रगट होतें म्हणूनच मी आपणाला राग आणला असें मातली म्हणाला आणि मग दुष्यंत इंद्राच्या सहाय्यासाठीं गेला. परमार्थमार्गामध्यें क्रोध वाईट म्हटला आहे हें खरें पण त्यामागची भूमिका निराळी आहे. स्वार्थ वाईट आणि स्वार्थ दुखावल्यामुळें उत्पन्न होणारा क्रोध वाईट. संरक्षणाकरितां आवश्यक



असलेला क्रोध या जातीचा नव्हे. शांतता निराळी आणि मिळमिळीतपणा निराळा. परमार्थमार्गांतील व्यक्ति शांत असतात, सोशिक असतात, दयाळू असतात, क्षमाशीलहि असतात; पण त्यावरून त्या शेळपट, विळविळीत असतात किंवा असाव्यात असें समजणें चूक आहे. नाठाळाचें माथीं काठीच घालावी लागते हें संतांनांहि मान्य आहे व आपण तसें करतों, तीक्ष्ण शब्दांचे बाण घेऊन आपण वावरतों असें त्यांनीं आवर्जून सांगितलें आहे. दयेच्या व्याख्येंत संतांनीं भूतांचें पालन आणि कंटकांचें निर्दालन या दोन्हीं गोष्टींचा समावेश केला आहे. दुष्टांचें पारिपत्य करण्यासाठीं रागवावेंच लागतें. ज्याला योग्य वेळींहि रागावतां येत नाहीं, वाईटाची आणि वाईट गोष्टीची ज्याला चीड येत नाहीं, तो कोणाचें संरक्षण करूं शकणारच नाहीं. आणि अशा नेभळट व्यक्तीविषयीं कोणासही आपलेपणा वाटणार नाहीं आणि ती व्यक्ति दुष्टांना धाकहि दाखवूं शकत नाहीं. समर्थ म्हणतात, रामचंद्राची स्थिति तशी नाहीं. ते भक्तांच्या संरक्षणासाठीं त्याच्या शत्रूचें पारिपत्य करतांना मागेपुढें पाहणार नाहींत.

रामचंद्रांचा आणखी एक गुण फार महत्त्वाचा आहे. त्यांच्याजवळ अजेदुजे, लहानमोठे हा भेद नाहीं. ते उदार आहेत. त्यांचें हें औदार्य मोठें विलक्षण आहे. विशाल लोकसंख्या असलेली सर्व अयोध्यानगरी त्यांनीं उद्धरून नेली होती. तेव्हां तुझी एकट्याची ते उपेक्षा करतील हें शक्यच नाहीं.

**समर्थाचिया सेवका वक्र पाहे ।**
**असा सर्व भूमंडळीं कोण आहे ।।**
**जयाची लिळा वर्णिती लोक तीन्ही ।**
**नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ।।३०।।**

मनोबोधांतील या श्लोकाची शब्दरचना अत्यंत प्रभावी अशी आहे. हा श्लोक खड्या सुरांत स्वच्छ, स्पष्ट शब्दांनीं नुसता उच्चारला तरी प्रत्यक्ष समर्थ पुढें उभे राहून, कुबडी धरलेला उजवा हात उभारून मेघासारख्या धीरगंभीर ध्वनीनें–आपलें कसें होईल या भयानें व्याकुळ झालेल्या जीवाला जणूं आश्वासन देत आहेत, त्याचा उत्साह वाढवित आहेत, त्यांचें धैर्य जागें करीत आहेत, असें वाटावें, असें सामर्थ्य या श्लोकांत प्रगट झालेलें आहे.

भक्त देवावर प्रेम करतो. पण देवाला भक्ताचा अभिमान असतो. अभिमानामध्यें प्रेमापेक्षां थोड्या अधिक भावना एकवटलेल्या असतात. जणूं भक्ताच्या प्रेमाचें ऋण देव व्याजासुद्धां फेडीत असतो. रामचंद्राला आपल्या भक्ताचा अभिमान असल्यामुळें त्या भक्ताकडे वाकड्या दृष्टीनें पाहण्याची कोणाची छाती आहे!

एखाद्या साधारण रक्षकाच्या पाठीशीं अगदी सामान्य अशी राजसत्ता थोड्याशा प्रमाणांत उभी असली तरी त्या रक्षकाचा धाक बाळगला जातो, गणवेषांतील रक्षकाचा तर अधिकच. मग ज्याच्या पाठीशीं प्रभु रामचंद्र उभे आहेत, ज्यांच्या पराक्रमाची, दृढनिश्चयाची, सत्यवादित्वाची, भक्तवात्सल्याची; औदार्याची अपार कीर्ति तिन्हीं लोकांत पसरली आहे; महर्षी वाल्मिकीसारख्या अनन्यसाधारण-प्रतिभेचा कवि, आद्यकवि, महाकवि, ज्या रामचंद्रांचें गुणवर्णन करतांना मोहून गेला, त्या समर्थ रामचंद्रांच्या सेवकाकडे वाकड्या दृष्टीनें कोण पाहू शकणार?

**महां संकटीं सोडिले देव जेणें ।**
**प्रतापें बळें आगळा सर्व गूणें ।।**
**जयातें स्मरें शैलजा शूळपाणी ।**
**नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ।।३१।।**

रावणानें उन्मत्तपणानें सर्व देव बंदींत घातले होते. या बंदिवासांत हलकीं-सलकीं कामें करणें इंद्रादि देवांना भाग झालें होते व त्यांचें जीवन या भीषण संकटानें लाजिरवाणें व दु:खमय होऊन गेले होते. भगवान् रामचंद्रांनीं आपल्या शौर्याच्या बळावर लंका जिंकली. गर्विष्ठपणानें अत्यंत शूर बनलेल्या महापराक्रमी रावणाचा त्याच्या शूर परिवारासह नि:पात केला आणि देवांना बंदिवासांतून सोडविलें. स्वर्गामध्यें आनंदीआनंद झाला. रामचंद्राचा प्रताप सामर्थ्यानें बळानें असा अलौकिक आहे, अद्‌भुत आहे.

केवळ पराक्रमी असणें, प्रतापी असणें, अत्यंत शौर्यशाली असणें एवढेंच रामचंद्रांचें वैशिष्ट्य नाहीं. ज्या ज्या सद्‌गुणांच्या अस्तित्वामुळे थोरपणा येतो, श्रेष्ठता प्राप्त होते, ज्या एखाद्याहि गुणामुळें मनुष्य फार मोठा मानला जातो ते सर्व सद्‌गुण भगवान रामचंद्रांच्या ठिकाणीं एकवटलेले आहेत. अत्यंत विरक्त असलेल्या महातपस्वी, वाल्मिकी ऋषींना रामचंद्रांचें चरित्र काव्यांतून गावें असें जें वाटलें तें त्यांच्या ठिकाणीं एकवटलेल्या सद्‌गुणसमुच्चयामुळेंच. वाल्मिकी रामायणाच्या बालकांडांतील पहिल्या सर्गांतच रामाच्या गुणसमुच्चयाचें अत्यंत मनोहर वर्णन आलेले आहे. अतिथि म्हणून आश्रमांत आलेल्या देवर्षि नारदांना वाल्मिकीनें प्रश्‍न केला कीं, महाराज सांप्रत या पृथ्वीतलावर सद्‌गुणी, शौर्यसंपन्न, धर्मज्ञ, कृतज्ञ, सत्यवादी, दृढव्रत, चारित्र्यसंपन्न, सर्व भूतमात्रांचें हित साधण्यामधें तत्पर असलेला, विद्वान्, समर्थ, ज्याचें दर्शन कोणालाहि प्रिय होईल असा, संयमी, क्रोध जिंकलेला, निर्मत्सर, संतापून रणांगणांत उभे राहिल्यानंतर ज्याच्या पराक्रमाचा देवानांहि धाक वाटावा असा वीर पुरुष सध्यां कुणी आहे का? आपण



सर्वत्र संचार करतां तेव्हां अशा महापुरुषाचें ज्ञान आपणालाच असणार. नारद प्रसन्नपणानें हंसून म्हणाले–मुनिश्रेष्ठा तूं ज्या सद्‌गुणांचें वर्णन केले आहेस त्यांतला एखादा गुण कांहीं प्रमाणांत जवळ असलेलीं माणसेंहि दुर्मिळ. मग हे सर्व सद्‌गुण आपल्या पूर्णरूपांत एकत्र असलेला महापुरुष आढळणे किती अवघड आहे, याचा तूंच विचार कर; पण तरी हेंच सर्व काय पण याहूनहि किती तरी पटीनें अधिक सद्‌गुणांनीं अलंकृत असलेला एक असामान्य पुरुष सध्या पृथ्वीतलावर आहे. इक्ष्वाकूच्या कीर्तिमान् वंशांत जन्मलेला, अयोध्येचा राजा रामचंद्र सर्व सद्‌गुणांचा जणूं मूर्तिमंत पुतळा आहे. मदनानेहि लाजावें असें त्याचें शरीर सर्व शुभलक्षणांनीं युक्त आहे, रेखीव आहे, सुडौल आहे, खांदे भरलेले आहेत. बाहु दीर्घ नि बलिष्ठ आहेत. छाती रुंद आहे. कपाळ भव्य आहे. तो बुद्धिमान् आहे, नीतिमान् आहे, असामान्य वक्ता आहे. सर्व शास्त्रांचें मर्म जाणणारा आहे, चतुर आहे. सगळ्यांच्याकडे समदृष्टीनें पाहणारा आहे, साधु-संत-सज्जनांनाहि हवाहवासा वाटेल असा लोकप्रियहि आहे, समुद्रासारखा गंभीर आहे. त्याचें धैर्य हिमालयासारखें उत्तुंग आहे. महाविष्णूप्रमाणें तो पराक्रमी आहे. चंद्राप्रमाणें आल्हाद देणारा आहे. पृथ्वीसारखा क्षमाशील आहे. संतापला म्हणजे प्रलयकाळचा अग्नि वाटावा असा तेजस्वी आहे. कुबेरासारखा वैभवसंपन्न आहे. प्रजावत्सल आहे. त्याचें आचरण अत्यंत पवित्र आहे. ज्याला आपलें म्हणतो त्याच्या पाठीशी रक्षणाकरितां सदैव उभा असतो. वेदशास्त्रनिपुण आहे. आणि असें म्हणून नारदांनीं सर्व रामचरित्र थोडक्यांत सांगितलें. वाल्मिकीनें ज्या ज्या गुणांची अपेक्षा केली त्याहिपेक्षां अधिक गुण नारदांनीं वर्णन केले. प्रत्यक्ष सरस्वती प्रगट होऊन बोलते आहे असें तें सर्व वर्णन अत्यंत श्रुतिमनोहर आहे. समर्थ म्हणतात, माझा प्रभु राम सर्व सद्‌गुणांनीं युक्त आहे. त्याचे हें स्वरूप असामान्य आहे. नारदासारखे देवर्षि किंवा महर्षि वाल्मिकीसारखें प्रतिभासंपन्न कवि रामाच्या या गुणसंपदेला मोहित झाले यांत आश्चर्य वाटण्यासारखें काय आहे! देवाधिदेव भगवान् शंकर आणि त्रिलोकजननी महासति पार्वतीहि रामचंद्रांचें स्मरण करण्यांत धन्यता मानतात. या विषयांत त्या पतिपत्नींचेंहि एकमत आहे. असा रामचंद्र भक्तांचा अभिमानी आहे. तो भक्तांची कधींहि उपेक्षा करणार नाहीं.

**अहल्या शिळा राघवें मुक्त केली ।**
**पदीं लागतां दिव्य होऊनि गेली ।।**
**जया वर्णितां सीणली वेदवाणी ।**
**नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ।।३२।।**

अहल्येच्या हातून घडलेल्या व्यभिचारदोषामुळें संतापलेल्या गौतमानें तिला शाप दिला होता आणि ती एका निबिड, निर्जन अरण्यामध्यें शिळा होऊन पडली होती. प्रत्यक्ष वाल्मिकीरामायणामध्यें शिळा होऊन पडल्याचा उल्लेख नाहीं. पण इतरत्र अनेक ठिकाणीं अनेकांनी अहल्या शिळा होऊन पडली होती असेंच गृहीत धरलें आहे. आणि सर्व संतांनीं त्याचाच अनुवाद केला आहे. संशोधन या विषयांत मला फारसा रस नाहीं. तेव्हां अहल्येच्या प्रकरणीं वस्तुस्थिति काय आहे त्या विषयीं खोलांत शिरण्याचें कारण नाहीं. रामचंद्रांच्या कृपेनें अहल्येचा उद्धार झाला हें सर्वमान्य आहे आणि प्रस्तुत विषयाच्या संदर्भांत आपणांस तेवढें पुरेसे आहे.

व्यभिचारासारखें स्त्रीजातीला कलंक लावणारें अत्यंत घोर पातक हातून घडलें असतांनाहि रामचंद्रांच्या पवित्र चरणकमलांचा स्पर्श होतांच अहल्या सर्व पातकांतून मुक्त झाली आणि दिव्य देह प्राप्त होऊन तिचा उद्धार झाला असे रामचंद्र पतितपावन आहेत.

परब्रह्मस्वरूप असलेल्या या रामचंद्राचें वर्णन करतांना वेदांचें सामर्थ्यहि तोटकें ठरलें. गुणवर्णन यथार्थपणें करतां आलें नाहीं. वेद शेवटीं नेति नेति म्हणाले.

स्वत: चारित्र्यसंपन्न असलेले रामचंद्र पातक्याचा तिरस्कार करून त्याला दूर ठेवीत नाहींत, उलट त्याला जवळ करतात, पातकांतून सोडवितात. उद्धाराचा मार्ग दाखवितात, उद्धरून नेतात. आपल्या भक्तांची रामचंद्र कधींहि उपेक्षा करीत नाहीत.

**वसे मेरुमांदार हे सृष्टिलीळा ।**
**शशी सूर्य तारांगणें मेघमाळा ।।**
**चिरंजीव केले जनीं दास दोन्ही ।**
**नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ।।३३।।**

रामचंद्रानें आपले दोन भक्त, हनुमंत आणि बिभीषण यांना चिरंजीव केले आहे. जोंवर पृथ्वीतलावर मेरुमांदार हे पर्वतराज स्थिरपणानें टिकून आहेत आणि जोंवर आकाशामध्यें चंद्र, सूर्य, ग्रहनक्षत्रें आणि जलवर्षाव करणाऱ्या मेघांचा समुदाय अस्तित्वांत आहे, म्हणजे एकूण या सर्व सृष्टीचे व्यापार जोंवर होत राहणार आहेत तोंवर बिभीषण आणि मारुती रामभक्ति करीत राहणार आहेत. चिरंजीव शब्दांतील चिर पदानें एवढा कल्पनातीत दीर्घकाळ अपेक्षित आहे. आणि हा केवळ आशीर्वाद नाहीं. नाहीं तर आपल्याइकडे पूर्वी शेत, गांवें इत्यादि गोष्टी दान दिल्या जात असत, आणि त्या ताम्रपटावर मोठ्या गौरवानें अमक्या



अमक्या राजानें अमुक अमुक व्यक्तीला ही भूमि यावचंद्रदिवाकरौ दान दिली आहे, असा उल्लेख असे. दान देणाराचें राज्य आणि दान देणाराचा वंशहि शें-दोनशें वर्षांपलीकडे कधीं टिकला नाहीं. अशीं ताम्रपत्रें सांपडतांत तीं उत्खननामध्यें आणि त्यामुळें इतिहासांत एखाद्या ओळीची भर पडते. यापलीकडे यावच्चंद्रदिवाकरौला (जोंवर चंद्र, सूर्य आहेत तोंवर ला) अर्थ नसतो पण बिभीषणानें आणि मारुतीनें, दोघांनींहि, आपल्या जीवावर उदार होऊन रामचंद्रांची सेवा केली आणि रामचंद्रांनीं त्यांना खरोखरीच चिरंजीवपद दिलें. अधिकारी उपासकांना त्यांचें साक्षात् दर्शन अद्यापि होतें, असा भाविकांचा विश्वास आहे. सृष्टीचा सामान्य निसर्गक्रम गुंडाळून आपल्या भक्तांवर अशी अलौकिक कृपा करणारा रामचंद्र माझी उपेक्षा करणार नाहीं असा विश्वास प्रत्येकानें बाळगावा या हेतूनें समर्थ सांगत आहेत.

**उपेक्षा कदा रामरूपीं असेना ।**
**जिवा मानवां निश्चयो तो वसेना ।।**
**शिरीं भार वाहेन बोले पुराणीं ।**
**नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ।।३४।।**

मी माझ्या भक्तांचा सर्व प्रकारचा भार वाहीन असें आश्वासन रामचंद्रांनीं दिलें आहे. असा उल्लेख पुराणांत आहे, ''**योगक्षेमं वहाम्यहं**'' (भ. ९।२२) असें भगवंतांचें गीतेंतील वचन प्रसिद्धच आहे. आणि त्यामुळें भक्तांची उपेक्षा होईल ही शक्यताच रामचंद्रांच्या ठिकाणीं संभवत नाहीं. पण माणसाला भरंवसा वाटत नाहीं हें मात्र खरें. मी परमेश्वर मानतों, ईश्वरावर माझा विश्वास आहे असें मनुष्य तोंडानें कितीहि म्हणत असला तरी तो विश्वास त्याच्या वर्तनांत दिसावयास पाहिजे तसा दिसत नाहीं. परमेश्वराच्या अंत:करणांत कृपा आहे, प्रेम आहे, जिव्हाळा आहे, उपेक्षा मुळींच नाहीं. पण तो सर्वज्ञ आहे, न्यायी आहे, त्यामुळें मागितलें तरी, काय द्यावें, किती द्यावें, केव्हां द्यावें आणि कोणाला द्यावें, कसें द्यावें हा विचार वात्सल्यापोटींच ईश्वराला करावा लागतो.

वत्सल कुटुंबांतहि याचीं उदाहरणें आपण पाहतों ना! घरांत बनवलेले खाद्य पदार्थ आईनें मुलांसाठींच केलेले असतात. पण मुलांना तो भरवंसा नसतो. आई देते तेव्हां थोडें देते, आतांच देणार नाहीं म्हणून सांगते, कित्येक वेळां डबा उचलून लपवून सुद्धां ठेवते. हें सर्व ती मुलांच्या हितासाठींच करीत असते. अज्ञानी बालकें मात्र मागितलेलें मिळालें नाहीं कीं रडून गोंधळ करतात; मग कित्येकवेळां आई त्यांना मारते सुद्धां. पण या सर्व वेळीं ती वत्सल माताच असते.

सर्वज्ञ परमेश्वराचेंहि तसेंच आहे. माणसाला अज्ञानामुळें, तो भरवंसा येत नाहीं आणि मग त्याची निष्ठा चंचल होते, विश्वास डळमळतो. तो आपल्या खुळ्या कल्पनेप्रमाणें श्रद्धेसाठीं निरनिराळे आधार शोधतो. स्वत:ला पटणारें पथ्य सांगेपर्यंत निरनिराळ्या वैद्याला मी आतां काय करूं म्हणून विचारणारे रोगी मला माहीत आहेत. चिकित्सकावर विश्वास नसल्याचेंच हें लक्षण आहे. परमार्थमार्गामध्यें **''संशयात्मा विनश्यति''** (भ. ४।४०) हा दंडक आहे. माणसें उणीं ठरतात तीं श्रद्धेच्या स्थिरतेंत आणि प्रयत्नाच्या सातत्यांत. एरवीं सगळें उदंड असतें.

ईश्वरावर खरोखरीच श्रद्धा असती तर माणसाला प्रपंचाची काळजी वाटली नसती. आपलें कसें होणार असें भय पडलें नसतें, पण भाविक म्हणविणारीं, देवधर्म करणारीं, पूजापाठ न चुकूं देणारीं माणसेंहि, आपत्तींत शोकाकुल, दीन, कासाविसी करणारीं अशीं आढळतात. विश्वास असतो पण तो कसाला उतरत नाहीं. समर्थ म्हणतात अरे, मी तुझा भार घेतला आहे, भक्तांचें उत्तरदायित्व माझ्यावर आहे, असें भगवंतांचें आश्वासन आहे आणि त्याला व्यासांसारख्या थोर महात्म्यांची साक्ष आहे. रामचंद्र आपल्या भक्तांची उपेक्षा करीत नाहींत असा विश्वास निश्चयानें बाळग, संशयांत पडूं नकोस.

**असे हो जया अंतरीं भाव जैसा ।**
**वसे हो तया अंतरीं देव तैसा ।।**
**अनन्यास रक्षीतसे च्यापपाणी ।**
**नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ।।३५।।**

मनोबोधांतील सर्व श्लोक मार्गदर्शक आहेत, चांगले आहेत, पण हा श्लोक फार महत्त्वाचा आहे. समर्थ वर्मावर बोट ठेवून मर्माचें विचार सांगत आहेत. आतापर्यंत जणूं प्राथमिक स्वरूपाचें, परमार्थमार्गाविषयीं आकर्षण निर्माण करील असें भाषण समर्थ करीत होते. पण आतां त्यांनीं अगदीं गाभ्याला हात घातला आहे. जें सत्य तें मोकळेपणानें स्पष्ट केलें आहे. समर्थ या श्लोकामध्यें जो सिद्धांत सांगत आहेत तो यथार्थ आहे; पण न रुचणारा आहे. आमचें चांगलें व्हावें, तें लौकर व्हावें अशी अपेक्षा सर्वच बाळगतात व तशी प्रार्थनाहि करतात. समर्थ म्हणतात–तुमचें चांगलें निश्चित होईल. पण केव्हां? तर तुम्हीं चांगले व्हाल तेव्हां. ही मोठी पंचाईत आहे. आम्ही तोंडानें म्हणत असलों तरी आमची अपेक्षा अशी असते की आम्ही कसेंहि असूं, कसेंहि वागूं, परमेश्वरानें मात्र आमच्यावर कृपाच केली पाहिजे. तसें न घडल्यास आम्हीं परमेश्वरावर रागावणार, पूजापाठ सोडून देणार किंवा ईश्वर म्हणून कोणी नाहीं, आतांपर्यंत उगीच फसलों असें मानणार.



माणसानें एक लक्षांत ठेवलें पाहिजे. आपण करतो ते देवधर्म, पूजापाठ, व्रतें, साधनें आपल्या स्वत:साठीं असतात. स्वत:च्या देहाच्या, मनाच्या, कार्यक्षमतेसाठीं, इच्छांच्या संयमासाठीं वा युक्ततेसाठीं या साधनांचा उपयोग व्हावयाचा असतो. ईश्वरावर उपकार होण्यासाठीं या गोष्टी करावयाच्या नसतात. ईश्वराचें त्यावांचून कांहींहि अडत नाहीं! ईश्वर दयाळू आहे हें निश्चित. पण तितकाच तो न्यायी आहे हेंहि विसरून चालणार नाहीं. तो सर्वशक्तिमान आहे. तसाच सर्वज्ञहि आहे. ईश्वराच्या रागानें आपण साधनें सोडलीं तर त्यांत आपलीच हानी आहे. आम्ही नास्तिक झालों तर त्यांत आमचेंच अकल्याण आहे. यासाठीं समर्थांनीं, शास्त्रकारांनीं, संतांनीं ईश्वर केव्हां कोणावर प्रसन्न होतो तें निश्चयानें सांगितलें आहे. **''ये यथा मां प्रपद्यन्ते तांस्तथैव भजाम्यहम्''** (भ. ४।१०) अशी ईश्वराचीच प्रतिज्ञा आहे. **''भावेन देव:''** भाव तसा देव असा शास्त्राचा सिद्धांतच आहे. इतकेंच नव्हे तर भाव तोचि देव असेंहि म्हटलें जाते.

वीज कार्यक्षम असली तरी, आपली तार जर ढिली पडली असेल तर दिवा लागणार नाहीं, पंखा फिरणार नाहीं, यंत्र चालणार नाहीं. ईश्वरी प्रसादाचें तसेंच होतें. म्हणून समर्थ म्हणतात–तुमच्या अंत:करणांतील भाव जसा असेल तसा ईश्वर तुमच्यासाठीं होईल. तुम्हीं तोंडानें काय म्हणतां हें महत्त्वाचें नाहीं. आदरणीय सोनूमामा दांडेकर एक उदाहरण सांगत असत. देवाला जाणारा एक गृहस्थ बिडी पीत जायचा आणि मूर्तीपुढे आला कीं बिडीचा हात पाठीमागें करून नमस्कार करायचा. या वर्तनाला ईश्वराविषयींचा आदरभाव म्हणतां येईल कां? याच्या उलट एक उर्दू कविता आहे. एक दारूडा दारू वाटणाऱ्या साकीला म्हणतो–मी आतां मशिदींत असलों म्हणून काय झालें! इथेंहि मला दारू दे नाहींतर दारू पिण्यासाठीं जिथें ईश्वर नाहीं अशी जागा दाखव. आतां ही ईश्वराच्या व्यापकतेवरची श्रद्धा म्हणावयाची काय? अशा माणसाला दारू मागितली कीं गोमूत्र पाजलें पाहिजे आणि सांगितलें पाहिजे कीं ईश्वर सर्वत्र असल्यानें तो जसा दारूंत तसा गोमूत्रांतहि आहे, म्हणून दोन्ही एकच. पी गोमूत्र. हीं अशी व्यापकता मानणें मात्र चालणार नाहीं. भाव कसा शुद्ध नसतो हें यावरून लक्षांत येईल.

आपली जितकी व जशी श्रद्धा असेल त्याप्रमाणांत व तितका देव आपल्याजवळ असतो. नुसत्या भाषणानें आणि विचारानें कार्यें होत नसतात. त्या सर्व ठिकाणीं भाव हा महत्त्वाचा आहे. लाटा वेगवेगळ्या आकाराच्या लहान मोठ्या कशाहि असल्या तरी पाणी एकरूपच असतें. शुद्ध, सात्त्विक, निष्ठावंत भाव हें गंगाजल आहे. बाह्य साधना, उपचार उपासना, ह्या तरंगासारख्या आहेत. भावानें माणसाची घडण कळते. ब्राह्योपचार हे दांभिकहि असूं शकतात.

देवाचें कांहीं करावेसें वाटतें यामागें पुष्कळदां एक प्रकारची मनोरंजनाची, करमणुकीची भावना असते. वेळ घालविण्याचें तें एक पर्यायी साधनहि असूं शकतें. त्यांत कधीं गतानुगतिकता असते, कधीं भय असतें, कधी व्यापारीवृत्ति असते. **अकरणात् मंदकरणं श्रेयः** या न्यायानें तें स्वागतार्ह मानलें तरी परमार्थाच्या मूलभूत उद्देशाच्या दृष्टीनें तेवढें पुरेसें होत नाहीं. खऱ्या महत्त्वाचें वा उपयुक्त ठरत नाहीं हेंहि प्रामाणिक साधकानें लक्षांत ठेवलेंच पाहिजे. कधींहि कीर्तनाला न येणारे एक सद्गृहस्थ एकदां कीर्तनाला उपस्थित होते. पूर्वीचा परिचय असल्यानें कीर्तनकाराला आश्चर्य वाटले. त्यानें विचारले, अहो! तुम्हीं इकडे कसे! गृहस्थ म्हणाला, चित्रपट पहायला म्हणून गेलों होतो; उघडीं तर काय पण काळीं तिकिटेंहि मिळालीं नाहींत. तेव्हां म्हटलें चला! कीर्तनालाच जाऊं; वाटेवरच होतें म्हणून आलों. कीर्तनश्रवणामागची ही भावना स्पृहणीय नाहीं. ज्या भावनेनें मनुष्य माथेरान, नैनिताल, उटकमंड या निसर्गरम्य ठिकाणीं जातो, त्याच भावनेनें जर बदरीकेदार, बदरीनारायण, गंगोत्री, पंढरपूर, व्यंकटेशगिरी, रामेश्वर या तीर्थक्षेत्रींहि गेला तर त्याचा लाभ काय आणि किती? पत्ते खेळणें आणि पूजा करणे हें एकाच हेतूनें करून कसें चालेल?

दुचाकीवरून जाणारा मनुष्य जसा स्वत:चा तोल सांभाळतो, तसा प्रपंचामध्यें परमार्थ सांभाळला पाहिजे. परमार्थामध्यें अनन्यभाव लागतो, म्हणतात तो हाच. दुचाकीवरून जातांना मनुष्य पायटे मारण्याव्यतिरिक्त किंवा मुठीचे दांडे नियंत्रित करून दिशा ठरविण्याव्यतिरिक्त कांहीं करीतच नाहीं असें नाहीं. पण तें सर्व इतर करणें तोल राखण्यांत व्यत्यय येणार नाहीं इतक्या बेतानेंच केलें जातें. आपण जणूं संसार सांभाळण्यासाठीं परमार्थ करीत असतो आणि तोंडानें मात्र **'अन्यथा शरणं नास्ति त्वमेव शरणं मम'** हा मंत्र घोकीत असतो. आतां **'तस्मात् कारुण्य भावेन रक्ष रक्ष परमेश्वर'** हा अनुभव आला नाहीं तर तो दोष कोणाचा? परमार्थहि आपण देवाणघेवाणीनें करतो. एक व्यापार या भावनेनें करतो. नवसाच्या रूपानें केला जाणारा देवधर्म बहुधा याच प्रकारचा असतो. रोग बरा होण्यासाठीं रोग-चिकित्सक आणि औषधें यावर होणारा खर्च आणि नवस फेडीसाठीं केलेलीं व्रतें यांचा हिशोब तपासावा म्हणजे मला काय म्हणावयाचें आहे तें लक्षांत येईल. पोथी वाचण्याचें आणि स्तोत्र म्हणण्याचें नवस तर याहीपेक्षां स्वस्तांतले आहेत. पोथी वाचली, स्तोत्र म्हटलें कीं हा सुटला. ही कांहीं अनन्यता नाहीं. हेंहि लागते पण ती फारच प्राथमिक अवस्था आहे. यांतहि कांहीं मंत्रशास्त्र आहे आणि या तंत्रमंत्रांचीहि कांहीं फळें आहेत. पण हा परमार्थ नाहीं आणि त्यांत माणसाची उन्नतीहि नाहीं. फलश्रुति लक्षांत घेऊन देवधर्म करणें ही



परमार्थाची फारच प्राथमिक अवस्था आहे. त्याला शिक्षण क्षेत्रांतील शिशुवर्गाची उपमा दिली पाहिजे. यासाठीं साधकानें जपलें पाहिजे ते भावाला, निष्ठेला, तज्जन्य त्यागाला आणि सातत्याला.

रामचंद्रांनीं बिभीषणावर व मारुतीवर कृपा केली. दोघेहि रामाचे भक्त. त्यांची योग्यताहि सामान्य नव्हे. पण पारमार्थिक दृष्ट्या जें मारुतीला मिळालें तें बिभीषणाला मिळालें नाहीं. असें सांगतात कीं लंकेहून परत आल्यानंतर भगवान् रामचंद्रांचा राज्याभिषेक झाला. त्यावेळीं लंकेवर विजय मिळविण्यासाठीं ज्यांचें ज्यांचें सहाय्य घडलें त्या सर्वांना पारितोषिकें वाटण्यांत आलीं. कोणाला महावस्त्र, दिलें, कोणाला मुकुट दिले, कोणाला रत्नहार दिले, कोणाला रथासारखीं वाहनें दिलीं. सुग्रीव, बिभीषण, अंगद, नलनील, जांबुवंत यांच्यासारख्यांचें विशेष सत्कार झाले. कांहीं दिलें नाहीं तें केवळ मारुतीला. तें सीतेच्या लक्षांत आलें आणि ती म्हणाली, हें हो काय? ज्यांनीं अगदीं किरकोळ कामें केलीं वा केल्यासारखें दाखविलें त्यांनाहि तुम्हीं आठवणीनें पारितोषिकें दिलींत, आणि ज्यानें सगळ्यांत जास्त कष्ट घेतले त्या मारुतीला मात्र अगदीं विसरलात, काय म्हणावें आता! रामचंद्र गंभीरपणें शांतच राहिले. सीतेनें पुन्हां विचारल्यावर भारावलेल्या शब्दानें म्हणाले, सीते! मारुतीनें खरेंच माझ्याकरितां फार केलें पण त्याच्या ऋणांतून मोकळें होण्याकरितां त्याला देण्यासारखें माझ्याजवळ कांहीं नाहीं. सीता म्हणाली–मी देते. माझ्या आईनें मला, ज्यांतील एकेक रत्न पृथ्वीमोलाचें आहे असा रत्नहार दिला आहे तो देते मारुतीला. ठीक आहे, तुझी इच्छा! दे. सीतेनें मारुतीला हांक मारली व त्याचा गौरव करून पारितोषिक म्हणून रत्नहार दिला.

तो रत्नहार घेऊन मारुतीनें समोरच्या उद्यानातील एका वृक्षावर उडी मारली, आणि मोठ्या कुतुहलाने तो रत्नहार व त्यांतील रत्नें उलटीसुलटी करून निरखून पाहिलीं आणि अपेक्षाभंग झाल्यासारखी मुद्रा करून हारांतून एकेक रत्न तोडून काढलें, दाताखालीं दाबून त्याचे तुकडे केले, ते तुकडे हातावर घेऊन निरखून तुच्छेतेनें फेंकून दिले. सीतेला या कृतीचा फार राग आला. ती भरसभेंत मारुतीला टाकून बोलली. तेव्हा मारुतीराय नम्रपणानें म्हणाले, मातु:श्री, मला रत्नहाराचें भूषण नाहीं. सुंदर दिसणाऱ्या आणि बहुमोल मानल्या जाणाऱ्या या रत्नांमध्यें राम नाहीं मग काय उपयोग त्यांचा मला? म्हणून फोडून पाहिलीं, निश्चिति करून घेतली व टाकून दिलीं. सर्वांना हा अडाणीपणाच वाटला.

सीता रागावलेलीच होती. ती म्हणाली– रत्नांत राम हुडकतोस, तुझ्यांत तरी आहे कां? तेव्हां मारुतीनें आपलें विशाल वक्ष:स्थल आपल्याच हातांच्या तीक्ष्ण नखांनीं फाडलें. सर्व सभा आश्चर्यचकित होऊन पहात होती. मारुतीरायांच्या

हृदयसिंहासनावर भगवान् रामचंद्रांची शामसुंदर मूर्ति विराजमान होती. तें दृश्य पाहिले आणि बिभीषण खिन्न झाले. त्यांना वाटले, माझा सन्मान झाला. मला पारितोषिकें मिळालीं. राज्य माझ्या स्वाधीन करून मला तिथला अधिपति बनवले. पण रामचंद्रांनीं मारुतीला जें दिलें तसें कांहीं मला दिलें नाहीं. त्यानें आपली ही तळमळ वसिष्ठांच्यापुढें व्यक्त केली. तेव्हां वसिष्ठ म्हणाले, बिभीषणा, रामचंद्रांना शरण येतांना तू म्हणालास–**त्यक्त्वा दारांश्च पुत्रांश्च त्वामहं शरणं गतः ।** रामचंद्रांनीं तुझी शरणागति त्याच मापानें मोजली. जसा भाव तसा देव. शरणागतींतहि वासनांचा अंश सूक्ष्मपणानें राहिलेला असतो, राहूं शकतो. खऱ्या अनन्यतेला तोहि सोसत नाहीं.

ज्या अपराधाकरितां रेणुकेला जमदग्नीनें शिरच्छेदाची शिक्षा ठोठावली त्या अपराधाचें स्वरूप तरी काय होते! आपण त्या अपराधाला अपराध म्हणणें, पाप म्हणणें, हेंहि घोर पातक ठरेल इतका तो अपराध अगदीं नगण्य होता. रेणुकेला वाटलें तसें वाटणें हेंच सज्जन माणसाच्या दृष्टीनेंहि अगदीं स्वाभाविक होतें. तरी जमदग्नीनें तिला क्षमा केली नाहीं आणि रेणुकेनेहि ती मागितली नाहीं. तिनें शिक्षा संतोषानें स्वीकारली म्हणूनच ती जगदंबा ठरली. देवता म्हणून वंदनीय झाली. आमच्या संवेदना, वासनांच्या संघर्षामध्यें बोथट होऊन गेलेल्या असतात. त्यांना ही सूक्ष्मता जाणून घेण्याचें सामर्थ्यच उरलेलें नसतें. पण भगवंत अलिप्त आहे, साक्षी आहे, तटस्थ आहे. त्यामुळें त्याची संवेदना फार तीक्ष्ण आहे. सूक्ष्मातिसूक्ष्म भेदहि त्याच्या लक्षांत येतो. कांहीं माणसें भोजनचतुर, शय्याचतुर असतात असें म्हणतात. भगवंत तसे भावचतुर आहेत. त्यामुळें कसोटीला शतप्रतिशत उतरणारी अनन्यता असल्यावांचून अपेक्षित कृपा कशी प्राप्त होणार! धंद्यांत मुरलेला सावकार दागिना कितीहि सुंदर असला तरी डाकलाख सोन्याला बावनकशी सोन्याचें मूल्य कधीं देतो काय?

आपण आपल्या सोयीकरतां **योगक्षेमं वहाम्यहम्** ही भगवंताची प्रतिज्ञा लक्षांत ठेवतो. हा श्लोकाचा चौथा चरण आहे. पहिल्या तीन चरणांत कोणाचा योगक्षेम वाहतो त्याचें वर्णन आहे. जो ईश्वराचें अनन्यभावानें चिंतन करतो (अनन्याश्चिन्तयन्तो मां), सर्व प्रकारानें सेवा करतो (पर्युपासते) आणि ज्याचें अंत:करण ईश्वराशीं निरंतर संलग्न असते (नित्याभियुक्तानां) त्याचा योगक्षेम ईश्वर वाहतो असें गीता सांगते. या तीन चरणांतल्या कसोटीला कोणी उतरतो कां?

श्रीएकनाथ महाराजांनीं सद्‌गुरूंची सेवा करीत असतांना गुरुगृहीं राहून निष्ठेनें सर्व प्रकारची सेवा केली. गुरुकडून केली जाणारी उपेक्षा आणि गुरुच्या तापटपणाचे आघात दीर्घकाळ सोसले. एक पैची चूक झाली होती तर ती सुधारण्यासाठी



रात्रभर जाग्रण केलें तेव्हां सद्‌गुरूची कृपा झाली. आपण कसें वागतो याचा आपण कधीं विचार करतो काय? गुरूने क्षमाशीलच असलें पाहिजे असा आग्रह आपण सोयीकरतां धरीत असतो आणि आम्ही मात्र, जाऊं द्या कीं, केलें हें काय थोडें आहे, आम्हींहि पुष्कळ करतों, एवढ्या तेवढ्यानें काय बिघडतें, आम्हीं आपलीं सामान्य माणसं, आम्हीं कोठें ज्ञानेश्वर, तुकाराम लागून गेलोंत असें बोलून माणूस स्वत:ला व दुसऱ्यालाहि फसवीत असतो.

परमार्थांत राजकारणी पुरुषाचें सत्य चालत नाहीं आणि व्यवहारांत सत्य काय तें स्पष्टपणें बोलतां येत नाहीं. बोलल्यास ऐकणाराला तें वाईट लागते त्यामुळें कटुता येते. संबंध दुरावतात, तुटतात सुद्धां. ज्याच्याविषयीं आदर बाळगून, पायांवर डोकें ठेवून नमस्कार करतात त्याचेंहि स्पष्ट बोलणें रुचत नाहीं. हा मनुष्य सांगतो आहे तेव्हां स्वत: सुधारले पाहिजे असें वाटत नाहीं. आले मोठे सांगणारे असेंच वाटतें. त्या बोलण्याला स्वार्थी हेतू सुद्धां चिकटविले जातात. कीर्तन-प्रवचनांत सामान्यपणें बोलतांना जितकें स्पष्ट बोलतां येतें, तितकें प्रत्यक्ष व्यवहारांत वैयक्तिक संबंधांत बोलतां येत नाहीं. पण ही भीड बाळगण्याचें समर्थांना कांहीं कारण नाहीं. ते स्पष्टपणें सांगतात की जसा ज्याचा भाव तसा त्याचा देव. तुम्हीं अनन्य झालांत कीं परमेश्वर तुमचें रक्षण करतोच करतो. रक्षण झालें नाहीं तर अनन्यता साधली नाहीं असें निश्चित समजावें. माणसाच्या अंत:करणावर अनेक प्रकारच्या वासना-संस्कारांचीं पुटें असतात. कधीं काम असतो, कधीं क्रोध असतो, कधीं मत्सर असतो, कधीं मद असतो, आणि त्यामुळें अनन्यता साधत नाहीं. इच्छा असूनहि साधत नाहीं. साधना करावी लागते ती त्यासाठींच. समर्थांनीं २०५ श्लोकांतून तोच मार्ग अनेक प्रकारांनीं पटवून दिला आहे.

**सदा सर्वदा देव सन्नीध आहे ।**
**कृपाळूपणें अल्प धारिष्ट पाहे ।।**
**सुखानंद आनंद कैवल्यदानी ।**
**नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ।।३६।।**

परमेश्वराचें स्वरूप हें भक्ताकरितां सगुण साकार होत असलें तरी वस्तुत: तें सर्व व्यापक आहे. ''**मया ततमिदं सर्वं जगदव्यक्तमूर्तिना**'' (भ. ९।४) असें गीता सांगते तें या दृष्टीनेंच. आणि तो प्रत्येक प्राणिमात्राच्या हृदयांतहि वास करतो असें शास्त्र सांगतें. तेव्हां भक्तावर आलेलें संकट ईश्वराला आधीं कळावें लागतें आणि तें नाहीसें करण्याकरितां तो दुरून कुठून तरी धांवून येतो असें समजणें हें अज्ञानाचें लक्षण आहे. ईश्वर जवळच आहे तर मग संकटें येतांतच कां

आणि आलीं तरी ती लगेच नष्ट होत कशीं नाहींत, असा प्रश्न सश्रद्ध म्हणविणारीं माणसेंहि विचारतात. समर्थ त्यांना या श्लोकांत उत्तर देत आहेत. समर्थ म्हणतात, परमेश्वर सर्वव्यापक असल्याने तो सदा सर्वदा प्रत्येक माणसाच्या जवळ आहेच आणि तो जें देतो तें कांहीं तरी क्षुद्र वा सामान्य असें नसतें. ज्यांत दुःखाचा लवलेशहि नाहीं अशा निरतिशय सुखानें भरलेला जो मोक्ष, केवळ आनंद हेंच ज्याचें स्वरूप आहे असा मोक्ष, भगवान् भक्तांना देत असतो आणि असा बहुमोल ठेवा सांभाळण्याची पात्रता आहे कीं नाहीं हें पाहण्यासाठीं देव साधकाची परीक्षा पाहत असतो.

या परीक्षा पाहण्यालाच आपण संकट समजतों आणि म्हणून त्याला आपण कंटाळतों. उनाड विद्यार्थ्याला जसें परीक्षा हें संकट वाटतें आणि मग त्याचें डोकें दुखू लागतें तसेंच आपलें होतें. परीक्षकाला आपण दुष्ट समजतो, आणि म्हणून आपली भाषा 'उत्तीर्ण (पास) झालों' आणि 'अनुत्तीर्ण (नापास) केलें' अशी असतें. आपणच स्थानकावर उशीरा गेलों असें म्हणत नाहीं, गाडी चुकली असें म्हणतो. दोष आपला नाहीं, परिस्थितीचा आहे असें मानणें आपल्या सोयीचें असतें. खरा निष्ठावंत साधक हा संकटानें कधीं डगमगतच नाहीं. **''तुका म्हणे गर्भवासी । सुखें घालावें आम्हांसी ।।''** अशी श्रीसद्गुरु तुकाराम महाराजांप्रमाणें किंवा **''विपदः सन्तु नः शश्वत्''** अशी माता कुंतीप्रमाणें आपणाला विचित्र वाटणारी मागणी त्याची असते.

प्रगति केव्हां होते, कशी होते, एखादी हवी वाटणारी वस्तु किंवा विद्या कशी मिळते? हें आपण जर नीट लक्षांत घेतलें तर कृपाळूपणें अल्पधारिष्ट पाहे या वचनाची यथार्थता समजेल. पोहायला शिकविणारा शिक्षक आणि लेंकराला चालायला शिकविणारी आई यांना कुणी दुष्ट, कठोर अशी विशेषणें लावील काय? शिक्षक नको नको म्हणत असतांना पाण्यांत खेंचतो, आधाराचा हात अचानक न कळत काढून घेतो त्यावेळी नाका-तोंडांत पाणी जाऊन जीव घाबरा होतो आणि मनुष्य घाबरला कीं नाका-तोंडात हटकून पाणी जातें आणि असें झाल्याशिवाय पोहायला कधीं येत नाहीं. पडल्याशिवाय कोणत्याहि मुलाला कधींहि चालतां आलें नाहीं. कित्येक वेळां पडल्यामुळें रडू येईल इतकेंहि लागतें. कांहीं मुलें, पडूं या कल्पनेनें, आधींच रडतात आणि तरी समोर उभी असलेली शहाणी आई त्या पडण्या-रडण्याची अगदीं उपेक्षा करते, हांसत उभी राहते. आतां आईला मुलाचें प्रेम नाहीं असें म्हणणार कां? दुचाकीवर बसायला शिकावयाचें म्हणजे हातपाय खरचटून घेण्याची सिद्धता ठेवावीच लागते. कधीं कधीं गुडघे फुटतात. डोक्याला खोकहि पडते. शस्त्राचा शस्त्रपणा त्याच्या तीक्ष्ण धारेंत आहे.



आणि धार लावण्याकरितां सहाणेवर घासून घ्यावें लागतें. हिमालयांतील तीर्थयात्रेचा आनंद मिळावयाचा म्हणजे थंडी सोसावी लागते. विलक्षण चढउताराच्या रस्त्यानें पायांत गोळे येईपर्यंत आणि गुडघे ठणकेपर्यंत चालावेंच लागतें. यांतील प्रत्येक गोष्ट ही कष्ट देणारीच आहे. तें संकट म्हणून त्याची भीति बाळगली तर प्रगतीला मुकावें लागतें. कष्टाशिवाय शरीराची कार्यक्षमता वाढत नाहीं आणि कष्ट कधींहि सुखावह नसतात. म्हणून संकटांमध्यें उपेक्षा होते असें वाटलें तरी कृपाळू परमेश्वर हिताकरितां तसें करीत असतो हें साधकानें लक्षांत ठेवलें पाहिजे.

धैर्य, धृति, निष्ठा, तितिक्षा या गुणांची परमार्थासाठीं नितांत आवश्यकता आहे आणि या गुणांची कसोटी संकटाविना, प्रतिकूल परिस्थितिविना लागत नाहीं. **स्वस्थे को वा न पंडितः** । अशी स्थिति सगळ्यांचीच असते. पण त्याचा कांहीं उपयोग नाहीं. आईला जसें मुलाचें भित्रेपण, दुबळेंपण सहन होत नाहीं तसें परमेश्वरालाहि सहन होत नाहीं. आणि म्हणून प्रारब्धादि कारणांनीं जेव्हां साधकाभोंवती प्रतिकूल परिस्थिति निर्माण होते तेव्हां शिक्षणाची ही संधी प्राप्त झाली आहे या भावनेनें तो साधकाच्या सहाय्याला लगेच धांवत नाहीं. भावनांना उत्कटता आपत्तींत जशी येते तशी सर्व अनुकूल असतांना येत नाहीं. आपत्ति ही कांहीं वेगळीच स्थिति आहे असें मानले तर मग **यच्चकिंचित् जगत् सर्वं दृश्यते श्रूयतेऽपि वा । अंतर्बहिश्च तत् सर्वं व्याप्य नारायणः स्थितः ।** हें उपनिषद्वाक्य व्यर्थ होईल. माणसाची श्रद्धा किती पोकळ असते, स्वार्थी असते, याचीं उदाहरणें पुष्कळ वेळां दिसून येतात. संकट आलें म्हणजे आमचें सुख देवाला पाहवलें नाहीं, असें लोक बोलतात. जणूं कांहीं याच्या सुखाचा देवाला मत्सर वाटला आहे. कारखानदारांचें वैभव पाहून कारकुनांनीं जळफळावें अशी कां देवाची स्थिति असते? तो षड्गुणैश्वर्यसंपन्न आहे, लक्ष्मीपति आहे, सच्चिदानंदस्वरूप आहे. त्याला कोणाचा हेवा वाटण्याचें कारणच काय? माणूस ही कुकल्पना करतो तेव्हां देवाचें कांहींच बिघडत नाहीं पण यावरून माणसाची पातळी कोणती हें समजते.

खरें म्हणजे साधकानें प्रत्येक आपत्ति हा एक नवा धडा आहे असें मानलें पाहिजे. त्यामुळें क्वचित् शरीराला थोडे कष्ट होतील पण त्यामुळें मनाची प्रसन्नता आणि बुद्धीची विवेकशक्ति चढतीवाढती राहील आणि तसें राहण्यात फार आनंद आहे. थोडेसें मनाविरुद्ध घडलें कीं माणसें क्षुब्ध होतात. त्यांचें डोकें गरगरतें, अंग थरकांपतें, कांहीं सुचत नाहीं, कोठें लक्ष लागत नाहीं, संताप अनावर होतो. हे असें काय कामाचें? कोणत्याहि परिस्थितींत मन शांत राहिलें, बुद्धि स्थिर राहिली, तरच बाहेर पडण्याचा मार्ग दिसूंहि शकतो व त्या वाटेनें जातांहि येते.

मन:शांति टिकणें हे परमेश्वराच्या दृढ श्रद्धेचें फळ आहे. सुदामदेव म्हणतात,

नियती घेऊन दु:खें भारीं ।
कष्टविण्या मज येते दारीं ॥
परी टाकिते श्वास हताशी ।
बघून मला तव पदकमलासी ॥

सुदामदेवाची ही जी भावना आहे ती साधण्याचा अभ्यास साधकानें केला पाहिजे. संकटाच्या वेळींच धीर सुटूं देतां कामा नये. आपण तूप, तेल, पाणी सांठविण्यासाठीं भांडें घेतों, तें फुटकें नाहीं असें निश्चयानें पाहतों. फुटक्या भांड्यांत भरलेले पदार्थ गळून वांया जातात. मोक्षासारखें असामान्य आनंदवैभव ज्यास घ्यावयाचें आहे त्याचें अंत:करण तें धारण करण्यास पात्र नको काय? तिजोरी विश्वासू माणसाच्या हातांत सोपवावयाची असते. चोराच्या नाहीं. महत्त्वाचीं कामें वेंधळ्या माणसावर सोंपविलीं कीं कार्यनाश झालाच. शहाणीं माणसें तें करीत नाहींत. तीं आधीं परीक्षा पाहतात. परमेश्वर तसेंच करतो. ज्या अंत:करणामधें परमार्थ सांठवावयाचा आहे त्या अंत:करणाला अहंकार, काम, क्रोध, मत्सर यांची छिद्रें असतां कामा नयेत. परमार्थ ही वस्तु फार सूक्ष्म आहे. नको त्या विकाराचें बारीकसेंहि छिद्र परमार्थाला सांठू देत नाहीं. छिद्रें बुजविण्यासाठीं भांडें तापवावें लागतें, ठोकावें लागतें, त्याला डाग द्यावे लागतात किंवा रोंगणहि भरावें लागतें. व्रतें, वैकल्यें, पूजा, पाठ हें डाग देणें वा रोंगण भरण्यासारखें आहे. डाग देण्यासाठीं सुद्धां पुन्हां तापवावें लागतेंच. संकटें, आपत्ति, प्रतिकूल परिस्थिति हें तापविणें, ठोके मारणें यासारखें आहे. तेव्हां साधकानें दृढ श्रद्धा ठेवावी, विश्वास ठेवावा. परमेश्वर भक्तवत्सल आहे, कृपाळू आहे, सर्वव्यापक असल्यानें सदा सर्वदा पाठीशीं उभाच आहे, अशा निश्चयानें वागावे. आपत्तीमध्यें सहाय्य लाभलें तर ती परमेश्वराची कृपाच समजावी; न च लाभलें तर ही आपली कठोर परीक्षा घेतली जात आहे, यांत पहिल्या क्रमांकानें उत्तीर्ण झालें पाहिजे म्हणजे चांगलें पद मिळविण्यासाठीं आपण पात्र ठरूं या निष्ठेनें विवेकानें वागावें, धैर्यानें वागावें. योग्य ते प्रयत्न न कंटाळतां, न खचतां करीत राहावे. साधकानें खरोखरीच अहर्निश ज्याचा जप करीत राहावा असा हा श्लोक आहे.

**सदा चक्रवाकासि मार्तंड जैसा ।**
**उडी घालितो संकटीं स्वामी तैसा ।।**
**हरीभक्तिचा घाव गाजे निशाणीं ।**
**नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ।।३७।।**



भक्ताच्या रक्षणासाठीं देवहि उत्सुक असतो असें समर्थ कविसंकेताच्या आधारानें दिलेल्या उपमेनें सांगत आहेत. चक्रवाक नांवाचा काव्यामधें वारंवार उल्लेखिला जाणारा एक पक्षी आहे. पाण्याच्या आश्रयानें राहणारा हा पक्षी रात्रीच्या वेळीं भेटीसाठीं चक्रवाकीला उत्कंठेनें साद घालतो. पलीकडच्या तीराहून ती प्रियकराच्या भेटीसाठीं या तीरावर येते. तोंवर मीलनासाठीं आतुर झालेला चक्रवाक झेंप घेऊन त्या तीरावर गेलेला असतो. प्रत्येकवेळी उभयतांचें तसेंच होते. उत्कट प्रेमाच्या ओढीनें भेटीसाठीं थोडा वेळ वाट पहावी एवढा धीर कोणालाच नसतो. रात्रीच्या अंधारांत त्यांना नीट दिसतहि नाहीं. आणि त्यामुळें रात्रभर इकडून तिकडे हेलपाटे घालूनहि दोघांची भेट घडत नाहीं. प्रत्येकवेळीं वाढत्या विरहदु:खानें तें चक्रवाकयुगुल आर्त आक्रंदन करीत राहतें. तेवढ्यांत सूर्योदय होतो आणि त्या सूर्याच्या कोमल सुवर्ण किरणांच्या प्रकाशांत परस्परांचें मधुर मीलन होतें. दु:ख नाहींसें होते आणि आनंद उसळतो.

या कविसंकेतांतील सूर्य उगवणें आणि दु:ख दूर होणें ही घटना तेवढी स्वीकारून समर्थ म्हणतात–चक्रवाकाला सुख देण्यासाठीं सूर्यानें धांवून यावे तसा संकटानें गांजलेल्या भक्ताच्या रक्षणासाठीं परमेश्वर धांवून येतो. कारण परमेश्वर हा जीवाचा स्वामी आहे, रक्षक आहे, पालक आहे. भक्ताच्या रक्षणासाठीं धांवून येणें हें त्याचें कर्तव्य आहे. त्याचेवरील तें दायित्व आहे. पुराणकथांतून, इतिहासांतून आणि संतांच्या जीवनांतून या प्रकारचीं उदाहरणें कितीतरी आहेत. गजेंद्रमोक्ष ही पुराणकथा, द्रौपदीच्या रक्षणाचा भारतांतील प्रसंग, संत सखू, जनाबाई, दामाजीपंतांची साध्वी पत्नी यांच्या हांकेसरशी परमेश्वरानें धांवून येणें, या सर्व कथा साधकास आश्वासन देणाऱ्याच आहेत. पण त्यासाठीं साधकानें काय करावें? त्याचें उत्तर समर्थ निराळ्या प्रकारानें ''हरीभक्तीचा घाव गाजे निशाणी'' या चरणामध्यें देत आहेत.

परमेश्वर उपेक्षा करीत नाहीं हे खरें, पण तो आपल्या भक्ताची उपेक्षा करीत नाहीं आणि भक्त होण्यासाठीं भक्ति केली पाहिजे. तोच आदेश समर्थ या चरणांतून देत आहेत.

तात्पर्य एकच असलें तरी या ओळींचा अर्थ तीन प्रकारांनीं लावणें शक्य आहे. निशाण शब्दाचें तीन अर्थ आहेत. (१) नगाऱ्यासारखे वाद्य (२) ध्वज, पताका, झेंडा, (३) लक्ष्य. हे तिन्हीं अर्थ घेऊन हा चरण लावतां येईल. शब्दांना अर्थाचें ओझें होत नाहीं असा एक मार्मिक सिद्धांत श्री. विनोबाजी भावे यांनी सांगितला आहे. महात्म्यांच्या वचनाची व्यापकतां लक्षांत येण्याच्या दृष्टीनें विनोबांचें हें मत विचारांत घेण्यासारखें आहे व साधकाच्या दृष्टीनें उपयुक्तहि आहे. नगारा

वाजवावा त्याप्रमाणें हरिभक्ति उद्घोषानें करावी. कोणाची भीडभाड वा संकोच या कामीं नसावा. लावुनी मृदंग श्रुति टाळ घोष ही वारकरी संप्रदायामध्यें रूढ असलेली पद्धति समर्थविचाराशीं सहमत अशीच आहे. यात एक प्रकारची सामुदायिकताहि आहे. मन रमतें, गोडी लागते, भाव वाढण्यासाठीं सहाय्य होतें. लयबद्ध टाळ वाजू लागले, मृदंग ठेक्यांत खणखणूं लागला आणि नामाचा सुस्वर गजर होऊं लागला कीं एरवीं फारशीं धार्मिक कृत्यें न करणारे लोकहि भारावून जातात, रोमांचित होतात. त्यांचेहि डोळे आनंदाश्रूंनीं भरून जातात. अंत:करणाच्या तळाशीं कुठेंतरी पडून राहिलेली श्रद्धा फुंकरीच्या वाऱ्यानें स्फुल्लिंग चेतावा तशी व्यक्त होते. भक्तिमार्गांतील ही एक आवश्यक प्रक्रिया आहे.

हरिभक्तीचें निशाण उंच फडकत ठेवावें. त्याचें फडकणें, डोलणें गाजूं दे हाहि दुसरा अर्थ. भक्तीची उत्कटता, तिच्याविषयीं असणारा अभिमान हे भाव या अर्थांतून सुचविले जातात. साधकाला हरिभक्तीचें भूषण अभिमानानें मिरवतां आलें पाहिजे आणि भक्तीची पातळी नेहमींच राखली पाहिजे हेंहि यावरून समजून घ्यावें. आपणहि उद्धरून जावे आणि इतरांनाहि मार्गदर्शन लाभावें. चांगल्या गोष्टीचा प्रचारहि व्हावा हाहि उद्देश या वरील दोन्हीं अर्थांतून व्यक्त होऊं शकतो.

लक्ष्यवेधासाठीं बाण फेंकावा तसें पारमार्थिक उद्दिष्ट साधण्यासाठीं हरिभक्तीचा उपयोग करावा. एकाग्रता, स्थिरता, वेग या गोष्टींची सूचना या अर्थांतून मिळते. परमार्थ साधनासाठीं हे तिन्हीं गुण उपयुक्त आहेत हें तर सर्वमान्य होण्यासारखें आहे. दूरवरचें लक्ष्य अचूक वेधण्यासाठीं, शस्त्राच्या ठिकाणीं आणि शस्त्र वापरणाऱ्याच्या ठिकाणीं सामर्थ्यहि अपेक्षित असतें. हाहि आशय पर्यायानें या तिसऱ्या अर्थांतून निघतो. हरिभक्ति हें परमार्थप्राप्तीचें असें समर्थ साधन आहे हाहि अर्थ साधकाच्या दृष्टीनें महत्त्वाचा आहे.

संकटाचा परिहार व्हावा. सुख लाभावें म्हणून समर्थ हा उपदेश करीत आहेत. सतत नाम घ्यावें. अंत:करणामध्यें श्रद्धा असावी, धीर धरावा. परमेश्वर भक्तवत्सल आहे, तो उपेक्षा करीत नाहीं, असा विश्वास बाळगावा. संकटानें गांगरून जाऊ नये. हें सर्व सांगणें, पुढच्या श्लोकांतून ''**राघवीं वस्ति कीजे**'' हा जो आदेश दिला आहे, त्याच्या प्रस्तावनेसारखें आहे. सुख मिळालें पाहिजे, स्वास्थ्य लाभलें पाहिजे असें मनापासून वाटतें ना? तर मग परमार्थामध्यें स्थिर होणें हाच एक उपाय आहे. शरीरधारणेसाठीं उपयोगी पडणारे कांहीं अंश प्रपंचांत आहेत हें निश्चित पण तेथें सुखाची अभिलाषा करणें म्हणजे कांजी पितांना अमृताचे परिणाम अपेक्षिणें आहे. वैभव, ऐश्वर्य हें सुखावह असते असें



सामान्यत: मानलें जाते. कांहीं एका अंशांत आणि प्रमाणांत तें खरेंहि आहे. पण सुखाचें तेवढें प्रमाण (निराळ्या स्वरूपांत असेल पण) दोन प्रहरची ज्याला भ्रांत नाहीं आणि ज्याच्या निवाऱ्याची बरी सोय आहे त्यालाहि मिळतें. मग ऐश्वर्याच्या मागें लागून नाना प्रकारची विवंचना लावून कां घ्यावी? सतत एक प्रकारच्या ताणाखालीं आणि भाराखालीं का राहावें कीं ज्याचा परिणाम म्हणून सहज प्राप्त असलेल्या आरोग्याचाहि बळी द्यावा लागतो? ज्यांच्याजवळ सगळ्या प्रकारचें ऐश्वर्य आहे त्यांच्या मन:स्थितीचा आपण कधीं शोध घेत नाहीं म्हणून मोहानें त्या ऐश्वर्याविषयीं आकर्षण वाटतें. खरी वस्तुस्थिति समजत गेली आणि मनुष्य विवेकी असेल तर तो ऐश्वर्य आणि वैभव नको असेंच म्हणेल. चांगल्या मार्गानें ऐश्वर्य मिळतच नाहीं आणि ऐश्वर्यामुळें सज्जनाचा अध:पात होतोच असें समजायचें कारण नाहीं. पण ऐश्वर्य ही गोष्ट प्रारब्धाधीन समजून प्रयत्नपूर्वक सन्मार्गानें चालावें हेंच उत्तम.

इंग्रजीमध्यें एका राजासंबंधी एक गोष्ट लहानपणीं वाचल्याचें आठवते. एका राजाच्या ऐश्वर्याची, सर्वंकष सत्तेची आणि विलासी जीवनाची, थोड्या खेळीमेळींत असलेल्या अधिकाऱ्यानें बरीच प्रशंसा केली. त्यावेळीं तो राजा म्हणे कांहीं बोलला नाहीं आणि एका समारंभात त्यानें आपल्या या अधिकाऱ्याला भोजनाचें आमंत्रण दिलें. समारंभ फारच ऐश्वर्यशाली आणि विलासी असा आखलेला होता. सगळीकडे थाटमाट आणि टापटीप यांची विपुलता होती, खाद्यपदार्थ विपुल होते, नृत्य-गायनासारखे रंगेल कार्यक्रम योजिलेले होते, पण हा अधिकारी ज्या आसनावर बसला होता त्या आसनाच्यावर थेट डोक्यावर येईल अशी तीक्ष्ण धारेची जड, मोठी तलवार सुतासारख्या अगदीं बारीक दोरीनें टांगून ठेवलेली होती आणि तें पाहतांच या अधिकाऱ्याची त्या समारंभाची चवच संपली. समारंभ संपल्यावर राजानें विचारलें–मन रमलें ना! तेव्हां तो म्हणाला–उठून गेलो असतो तर भित्रेपणाचा आरोप आला असता आणि इतरांच्या उपहासाला मी पात्र झालों असतो म्हणून निरुपायानें मी समारंभात भाग घेतला. दोरी तुटून तलवार खालीं येईल आणि अंगांत घुसेल या भयानें व्याकूळ होतो. राजा म्हणाला बाबा! आम्हीं ऐश्वर्य भोगतो असें दिसतें पण आमच्या डोक्यावरची टांगती तलवार तुम्हांला दिसत नाहीं. तेव्हां सुखाच्या कल्पनेनें ऐश्वर्याच्या मागें लागण्यांत कांहीं अर्थ नाहीं. आवश्यकतांची पूर्ति व्हावी लागते. त्यांत संकोच बाळगण्यासारखें कांहीं नाहीं असें संत-सज्जनांनीहि म्हटलें आहे. पण त्याचा लाभ घेऊन विलासालाच आवश्यकता मानण्याची, चैनीलाच गरज समजण्याची चूक कोणी करूं नये. जगामध्यें तीनच लोक सुखी असतात. वेडे, निर्लज्ज आणि हरिभक्त. यातील

पहिल्या दोन गोष्टी चांगल्या नाहींत. वेड्यांचें स्थान रुग्णालयांत. दुसऱ्यानें हवे तर राजकारणांत पडावे. हे दोन्ही मार्ग भल्या माणसाचे नव्हेत. त्याला सुखासाठीं करतां येण्यासारखीं एकच गोष्ट आहे आणि ती म्हणजे, 'हरिभक्तिचा घाव गाजे निशाणी', ही. या मार्गानें जाणाऱ्याची देव कधीं उपेक्षा करीत नाहीं.

**मना प्रार्थना तूजला येक आहे ।**
**रघूराज थकीत होऊनि पाहे ।।**
**अवज्ञा कदा हो यदर्थी न कीजे ।**
**मना सज्जना राघवीं वस्ति कीजे ।।३८।।**

समर्थ म्हणतात मना ! तुला एक आग्रहाची विनंति आहे, प्रार्थना आहे. रामचंद्रांविषयी तुझ्या अंत:करणांत आश्चर्याची भावना सतत असूं दे. रामचंद्रांचें दर्शन, स्मरण, भजन, पूजन हें प्रत्येक वेळीं माणसाच्या मनाला आश्चर्यचकित करणारें असलें पाहिजे. एकादी अत्यंत प्रिय गोष्ट कल्पना नसतांना अचानकपणें प्राप्त झाली म्हणजे आश्चर्याचा जो भाव उत्कंठित झालेल्या अंत:करणामध्यें दाटून येतो तसा रामचंद्रांच्या संबंधांत, ईश्वराच्या संबंधांत, परमार्थाच्या संबंधांत प्रत्येकवेळीं उत्पन्न झाला पाहिजे. परमार्थाची जीवाला ओढ लागली असेल तरच ही गोष्ट शक्य आहे. परमार्थाची अशी ओढ लागणें हीच मोठी दुर्लभ अशी गोष्ट होऊन बसली आहे. याचें कारण एकच कीं विषयासक्त अंत:करणामध्यें परमार्थाविषयींचें उत्कटं प्रेम मुळांतच नसतें, आणि ज्याच्याविषयीं ओढ वाटत नाहीं त्याच्याविषयीं, त्याच्या प्राप्तीविषयीं, दर्शनाविषयीं मग आश्चर्याचा भाव उत्पन्न न झाला तर नवल वाटण्याचें कारण नाहीं. आश्चर्याचा भाव उत्पन्न होणें तेव्हांच शक्य होतें की जेव्हां मन त्याविषयीं प्रेमादरानें पूर्ण भरलेलें असते.

समर्थ म्हणतात–परमार्थाविषयीं, रामदर्शनाविषयीं साधनेकरितां कराव्या लागणाऱ्या प्रयत्नांच्या विषयीं, माणसाच्या अंत:करणांत कधीहि अवज्ञा असतां कामा नये. अनादर, तिरस्कार, आळस, कंटाळा, तुच्छता, उपेक्षाबुद्धि, टाकणें टाकल्यासारखें थातुरमातुर कांहीं तरी करणें, सर्वांगीण प्रयत्नांचा अभाव असणें, सातत्य नसणें, सर्व शक्ति पणाला लावावी असें न वाटणें हीं सर्व अवज्ञेचीं लहानमोठीं किंवा स्पष्ट-अस्पष्ट रूपें आहेत, आणि आश्चर्याची गोष्ट अशी कीं हीं सर्व परमार्थाच्या संबंधांतच नेमकीं प्रगट होतात.

प्रपंचाविषयीं असें वाटलें तर तें एका दृष्टीनें हितकर आहे असेंच म्हटलें पाहिजें, पण तिथें असें कधींच होत नाहीं. मनुष्य प्रपंचाविषयीं आग्रही, उद्योगी, निष्ठेनें सतत धडपडणारा असा असतो. तेथील अपयश त्याला प्रपंचविन्मुख



करीत नाहीं. तो निराळ्या मार्गानें, निराळ्या प्रकारानें पुन्हां पुन्हां खटपट करीत राहतो. कार्यप्रवण राहतो. प्रपंचांत माणूस पक्का प्रयत्नवादी असतो, आणि परमार्थांत मात्र तो दैववादाची कास धरून वागत असतो. असेल आमच्या दैवांत तर घडेल परमार्थ! जेवढें घडते तेवढें तरी काय थोडें आहे! या भावनेनें तो भजन पूजन करीत असतो. हें घडतां कामा नये तरच परमार्थ साधेल अन्यथा तो जें जें करतो तें सर्व वाया जाईल, निरुपयोगी ठरेल. परमार्थ हा माणसाचें आश्रयस्थान बनला पाहिजे. तो साधले तर केव्हांतरी करण्याचा तात्पुरता विषय असतां कामा नये. यासाठीं समर्थ सांगतात, मना! तूं चांगला आहेस, सज्जन आहेस. सर्वदा रामचंद्रांच्या जवळच निवास कर.

'रघूराज थकीत होऊनि पाहे।' या ओळीचा निराळ्या प्रकारानें अर्थ केला जातो. तोहि लक्षांत घेण्यासारखा आहे.

मना! तूं परमेश्वराची रामचंद्राची–भक्ति इतक्या उत्कटतेनें कर, परमार्थविषयींची तुझी ओढ इतकी विलक्षण असूं दे कीं परमेश्वरानें, राजाधिराज रामचंद्रानें, आश्चर्यानें थक्क होऊन तुझ्याकडे पाहिले पाहिजे. तुझ्या निष्ठेविषयीं अपरंपार कौतुक रामचंद्राच्याच हृदयांत दाटून आलें पाहिजे. फार विलक्षण अशी गोष्ट समर्थ सुचवीत आहेत. ईश्वराची भक्ति सर्वच करतात. **पण हातींचेनी लीलाकमळें। पूजूं तयातें ।** (ज्ञा. १२।२२३) असें देवालाच वाटावयास लावणारी भक्ति केवढी थोर म्हणावयाची ! ती साधली पाहिजे. आतां देवालाच भक्ताची ओढ लागते. कबीरांचा एक दोहा मोठा बोधप्रद आहे. महात्मा कबीर म्हणतात, **''मनुवा मेरा मरी गयो दुर्बल भयो शरीर । पीछे पीछे हरि फिरे कहत कबीर कबीर ।''** आतां ईश्वरच कबीरांच्या मागें लागतो आहे. तो म्हणतो आहे, अरे ! कबीर थांब रे ! मला सोडूं नकोस. माझ्यापासून दूर जाऊं नकोस. एकदां तरी मला भेट.' भक्तीची ही अवस्था किती श्रेष्ठ ! किती आकर्षक आहे ! पण ही स्थिति केव्हां प्राप्त झाली ? तें कबीर पहिल्या ओळींत सांगत आहेत. माझें मन अमन झालें आहे. त्यानें कामक्रोधादि षड्विकार सोडले आहेत. विषयांची हांव त्याचें ठिकाणी उरली नाहीं. संकल्पविकल्पानें त्याला आतां चंचलता येत नाहीं. म्हणजे मनाला मनपणाच राहिला नाहीं. तें आतां प्रमाथी, हट्टी, दुर्निग्रह, चंचल असें राहिलेलें नाहीं. तें जणूं मरून गेलेलें आहे. परमेश्वराच्या चरणीं जणूं पूर्णपणें लीन झालें आहे. साधनेच्या बळावर देहभाव जवळ जवळ नाहींसा झाला आहे. देहाशीं आतां तादात्म्य राहिलेलें नाहीं आणि असें जेव्हां झालें तेव्हां मग ईश्वराला ओढ लागली. अशी अवस्था भक्ताला प्राप्त झाली पाहिजे. गोकुळांतल्या गोपी,

तुकारामांसारखे महात्मे, नामदेवांसारखे लडिवाळ भक्त या पायरीवरचे थोर पुरुष होत. हाच आदर्श साधकानें ठेवला पाहिजे.

**जया वर्णिती वेद शास्त्रें पुराणें ।**
**जयाचेनि योगें समाधान बाणें ।।**
**तयालागि हें सर्व चांचल्य दीजे ।**
**मना सज्जना राघवीं वस्ति कीजे ।।३९।।**

समर्थ रामदास स्वामी यांचें आराध्यदैवत श्रीरामचंद्र हेंच असलें आणि या रामाच्या चरित्रामध्यें, रामायणामध्यें वर्णन केलेल्या अनेक घटनांचा उल्लेख त्यांनीं रामचंद्राची थोरवी गाण्यासाठीं केला असला व त्यावरून सूर्यकुलावतंस, दशरथनंदन, अयोध्यापति, जानकीजीवन, राजा रामचंद्र याचीच उपासना ते करीत असले व तिचाच प्रसारहि करण्याची त्यांची भूमिका असली तरी आपल्या या उपास्यामागची समर्थांची कल्पना किती दिव्य आणि किती विशाल आहे तें या श्लोकांतील पहिल्याच ओळींतून प्रगट होते. ऋग्वेदादि चारी वेद, व्याकरणादि सहाही शास्त्रें आणि पद्मादि अठरा पुराणें-उपपुराणें हीं सर्व ज्याच्या वर्णनानें भारावलेलीं आहेत त्या रामचंद्ररूप परमेश्वराशीं योग साधला असतां समाधान बाणतें, समाधान मिळतें आणि टिकून राहतें, इतकेंच नव्हे तर तुम्हीं जणू समाधानरूप होऊन राहता. त्या रामचंद्राची दृढभावानें भक्ति करा. असा भाव समर्थांच्या या उपदेशाचा आहे.

प्रत्यक्षांत राम किंवा रामचरित्र हा कांहीं वेदशास्त्रपुराणांचा विषय नाहीं. शास्त्रामध्यें कोठेंच रामचंद्राचा संबंध आला असण्याची शक्यता नाहीं. व्याकरणामध्यें राम शब्दाची व्युत्पत्ति सांगितली असली किंवा उत्तरमीमांसा शास्त्रांत वेदान्तांत उपमेसाठीं रामचंद्राचा ओझरता उल्लेख आला असला तरी रामचरित्राचें गायन करणें हा त्या शास्त्रांचा विषय आहे असें म्हणतां येणार नाहीं. पुराणामध्यें पद्मपुराण-भागवत यासारख्या कांहीं ठिकाणीं पुराण-विस्तारांच्या मानानें अगदीं संक्षिप्तांत रामचरित्र आलें असलें तरी व्यावहारिक स्थूल अर्थानें सर्व पुराणें रामचंद्राचें गुणगान करतात असें म्हणतां येणार नाहीं. वेदांविषयीं तर हें आणखीनच खरें आहे. राम हा शब्द वेदांत क्वचित् कोठें आला असेल पण रामचरित्राशीं संबद्ध एकादें सूक्त तर राहोच, एकादी ऋचाहि वेदामध्यें असण्याचा संभव नाहीं. कारण ऐतिहासिकदृष्ट्या रामचरित्र वेदांच्या तुलनेंत फारच अर्वाचीन आहे. अशा स्थितींत ''जया वर्णिती वेदशास्त्रें पुराणें'' या ओळीचा अर्थ व्यापकपणें घेतल्यावांचून गत्यंतर नाहीं.



रामचंद्र हा परमेश्वराचा अवतार. परब्रह्माचें तें भक्तांच्यासाठीं धारण केलेलें सगुण साकार रूप. हीच धारणा रामोपासनेच्या मागें असल्यामुळें आणि सर्व वेदशास्त्रपुराणें हीं परमेश्वरपर असल्यानें समर्थ रामाचें वर्णन करतांना निश्चयात्मक रीतीनें ''जया वर्णितीं वेदशास्त्रें पुराणें'' असा घोष करीत आहेत. या रामभक्तीचें फल सांगत असतांना समर्थ म्हणतात – रामचंद्राशीं जोडले गेलांत तर तुम्हांला समाधान प्राप्त होईल. समाधान ही अंत:करणांत अनुभवाला येणारी एक विलक्षण अवस्था आहे. योगाचें फळ म्हणून सांगितलेली समाधि आणि समाधान हे दोन्ही शब्द मुळांत एकाच अर्थाचें आहेत. सम् + आ + धा अशीच व्युत्पत्ति तेथें आहे. या समाधान शब्दानें अंत:करणाची प्रसन्नता, स्थिरता, तृप्तता, अभिप्रेत आहे. कोणत्याहि प्रयत्नाचें वा साधनेचें यापेक्षां मोठें फळ असूं शकत नाही आणि तें रामोपासनेनें मिळतें. यासाठीं माणसानें आपलें मन रामचंद्राच्या ठिकाणीं स्थिर राहील असें केलें पाहिजे.

मन चंचल आहे हें निश्चितच, पण खऱ्या अर्थानें तो मनाचा स्वभाव नव्हे. चंचलपणा ही मनाची प्रकृति नव्हे. मन हें मुळांत सत्त्वगुणात्मक आहे. 'सत्त्वं मन:' असेंच शास्त्रकारांनीं सांगितलें आहे. **''रजस्तमश्च मनसौ द्वौच दोषावुदाहृतौ''** चंचलपणा रजोगुणामुळें येतो व तो मनाचा दोष आहे. म्हणून प्रयत्नानें, साधनेनें, निष्ठेनें तो काढून टाकणें शक्य आहे. आपलें सर्व चांचल्य रामचंद्राचें ठिकाणीं वाहून टाका असें समर्थांनी सांगितलें आहे तें याच दृष्टीनें. जर ती मनाची प्रकृति असती तर **''सर्व चांचल्य दीजे''** असें म्हणतांच आलें नसतें. कोळशाचा काळेपणा काढून टाकतां येत नाहीं. वस्त्रावरचा डाग, कापूस पांढराशुभ्र असल्यानें, काढून टाकतां येणें शक्य आहे. तेंच मनाच्या चंचलतेलाहि लागू आहे.

साधक निष्ठेनें उपासना करीत असला तरी आरंभीं आरंभीं पण दीर्घकालपर्यंत मनाच्या चंचलतेचा त्याला फार त्रास होतो. अगदीं निराश व्हावे, आपल्याला कांहीच साधणार नाहीं, कधींच साधणार नाहीं, सोडून द्यावा हा प्रयत्न, असें वाटावे–इतकी उग्रता या चंचलतेमुळें होणाऱ्या त्रासाला असते. कसोटीची वेळ असते ती याच क्षणीं. निष्ठेची परीक्षा याच प्रकारानें होऊन जाते.

मनाचें सातत्य टिकविण्याचा एक विलक्षण मार्ग शास्त्रकारांनीं सांगितला आहे. अंत:करण चंचल होतें तें कामक्रोधमदादि विकारांनीं. ते विकारच परमेश्वरार्पण करावेत असें भक्तिशास्त्र सांगतें. त्यामुळेंहि मन ईश्वरार्पण होण्यास सहाय्य होऊं शकतें.

असें सांगतात कीं एक गृहस्थ एका सत्पुरुषाकडे गेला आणि म्हणाला-देव दयाळू आहे, तो माझें काम करील या भावनेनें मी त्याची पुष्कळ प्रार्थना केली

पण मला त्याचें कांहीं फळ मिळालें नाहीं. त्यामुळें मला देवाविषयीं तिटकारा आला आहे. तेव्हां ते सत्पुरुष हांसले आणि म्हणाले ठीक आहे–देव फार निष्ठुर आहे, आणि तो माझें कांहीं काम करणार नाहीं असें सारखे म्हणत जा. देवमंदिरावरून चुकून कधीं गेलास तर मी याला नमस्कार करणार नाहीं असें म्हणत जा. गृहस्थ म्हणाला कीं ठीक आहे पण त्याची ही ईश्वरविषयक क्रोधाची भावना लवकरच नकळत खऱ्या प्रेमांत परिणत झाली. अनेक प्रेम प्रकरणें संघर्षांतून, भांडणांतून जन्माला आलीं आहेत असें व्यवहारांतहि अनेक वेळां आढळतें. वाङ्मयानें याची आवर्जून नोंद घेतली आहे. तेव्हां कोणत्याहि भावनेनें ईश्वराचें स्मरण घडणें हें महत्त्वाचें आहे; उपयुक्त आहे, हें यावरून लक्षांत येईल. 'सर्व चांचल्य दीजे' हें म्हणण्यामध्यें हाच भाव आहे.

अंत:करण भगवदर्पण करण्याचा आरंभ कसाहि करावा पण प्रयत्न सोडूं नये. **'तमसो मा ज्योतिर्गमय, मृत्योर्मा अमृतं गमय'** याच भावनेनें साधनेंत दृढ राहावें. साधकानें कंटाळा येऊं देतां कामा नये. तोच घातक आहे. आपण भजनपूजन नामस्मरणाला कंटाळतो कारण तेंच तेंच वारंवार करावयास नको वाटतें. पण माणसानें गंभीरपणें विचार करावा कीं जर हृदय स्पंदनाला कंटाळलें, फुफ्फुसें श्वासोच्छ्वासाला कंटाळलीं तर देहाची काय दशा होईल? नामस्मरणादि साधनांचें तसेंच आहे. म्हणून न कंटाळतां जसें असेल त्या स्थितींत मन परमेश्वरचरणीं ठेवण्याचा प्रयत्न करीत राहिलें पाहिजे.

**मना पाविजे सर्व ही सूख जेथें ।**
**अती आदरें ठेविजे लक्ष तेथें ।।**
**विवेकें कुडी कल्पना पालटीजे ।**
**मना सज्जना राघवीं वस्ति कीजे ।।४०।।**

सर्व सुख परमार्थांत आहे. परमेश्वराच्या चरणीं आहे, अशी सर्व संत पुरुषांची धारणा आहे **''सर्व सुखाचें आगर । बाप रखुमादेवीवर ।'' ''तुझें पायीं सुख सर्व आहे.'' ''सुखालागीं करिशी तळमळ । तरी तूं पंढरिसी जाई एक वेळ । मग तूं अवघाचि सुखरूप होशी । जन्मोजन्मींचे दुख विसरशी ।''** अशीं वचनें संतवाङ्मयामध्यें किती तरी आढळतात. समर्थांचीहि धारणा तीच आहे.

माणसाला सुख हवे असतें. तें निरापद, विपुल आणि सातत्यानें मिळालें पाहिजे अशीहि भावना त्याचे ठिकाणीं असते. पण त्याची सुखाची कल्पना बहुधा इंद्रियांना होणाऱ्या अनुकूल संवेदनेपुरतीच मर्यादित असते. शास्त्राची दृष्टी इतकी संकुचित नाहीं आणि म्हणून भगवंतांनीं सुखाची व्याख्या करतांनाच म्हटलें आहे



कीं, **''यत्तदग्रे विषमिव परिणामेऽमृतोपमम् । तत् सुखं सात्त्विकं प्रोक्तं आत्मबुद्धिप्रसादजम् ।''** (भ. १८।३७) जें आरंभी विषासारखें नको वाटतें, त्रासदायक होतें, ज्याची ओळख आत्म्यामध्यें स्थिर झालेल्या बुद्धीच्या निर्मलतेमुळें पटते, तें खरें सुख होय. सात्त्विक सुख म्हणून त्यालाच ओळखावें. इतर सुखें ही आडनांवाची सुखें असून राजस-तामस गुणांच्या प्रभावानें वास्तविक सुखकर नसलेल्या गोष्टीहि सुखकर वाटाव्या असें त्याचें स्वरूप असतें.

खऱ्या सुखाच्या म्हणजेच हिताच्या गोष्टी आरंभीं तरी सुखाच्या वाटत नाहींत. असा परमार्थांतला काय पण व्यवहारांतलाहि अनुभव आहे. सकाळीं लौकर उठणें, नियमितपणें वागणें, व्यायाम करणें, राहणी साधी ठेवणें, जेवणांतील मीठ-मसाले कमी करणें, तंबाखूसारखी व्यसनें नसणें, स्वच्छता व टापटीप पाळणें, या गोष्टी उपयुक्त आहेत, हिताच्या आहेत. हें कळण्यासाठीं कांहीं वेदान्तशास्त्राची आवश्यकता लागत नाहीं. पण त्यांचें आचरण तरी किती माणसें किती प्रमाणांत करतात? इंद्रियलोलुपता हेंच त्याचें कारण आहे. व्यवहारांतील आरोग्यादि गोष्टींतसुद्धां जी लोलुपता विरोधक ठरते तीच परमार्थालाहि विरोधक ठरेल यांत कांहींच नवल नाहीं.

थोडेसे सुख ज्यांत असतें अशा गोष्टीच्या प्राप्तीसाठीं सुद्धा कितीतरी कष्ट पडतात. दक्षता, प्रयत्न, कौशल्य, यांत उणें पडतां कामा नये अशी स्थिती असते. मग सर्व सुख जिथें एकवटलेलें आहे तो परमार्थ मिळविणें हें काम आरामखुर्चीत बसून डोलण्याइतकें सोपें कसें असेल? खरीं सुखें प्रयत्नपूर्वक मिळवावी लागतात इतकेंच नाहीं तर त्या सुखांची गोडी प्रयत्नपूर्वक लावून घ्यावी लागते. सात्त्विक सुखाच्या संदर्भात भगवंतांनींच हें स्पष्टपणें सांगितले आहे. **अभ्यासाद्रमते यत्र दुःखान्तं च निगच्छति ।** (भ. १८।३६) सात्त्विक सुखामधें मन रमण्यासाठीं सुद्धां दीर्घकालीन अभ्यासाची आवश्यकता असते आणि मग त्याचा परिणाम म्हणून मनुष्य दुःखांतून मुक्त होतो. यासाठीं समर्थांनीं ज्या परमार्थामध्यें सर्व सुख समाविष्ट आहे, त्या परमार्थावरच आदरपूर्वक सर्व लक्ष केंद्रित करावें असा आदेश दिला आहे.

माणसें परमार्थ करीतच नाहींत असें नाहीं पण तीं लक्षपूर्वक आणि आदरपूर्वक करीत नाहींत. परमार्थाविषयीं खरी आस्था, खरा जिव्हाळा, पोटांतून नसतो आणि मग जें होते ते पुरवणी सारखें होते वा गतानुगतिक भावनेनें होतें. याचें महत्त्वाचें कारण असें कीं परमार्थांमध्यें सर्व सुख आहे हेंच मुळीं मनाला पटत नाहीं. सत्ता-संपत्ति ऐश्वर्य, लोकप्रियता, विलासाची वा खाण्यापिण्याची रंगेल साधनें यांची विपुलता हीच सुखावह आहे असें मनाला वाटत असते. मग

त्यांच्या प्राप्तीसाठीं अपार कष्ट करण्याची आणि नीतिनियम गुंडाळून ठेवण्याचीहि मनुष्याची सिद्धता असते. माणसाचें हे विचार योग्य नव्हेत–समर्थ कुडी कल्पना म्हणतात ती यालाच. शास्त्राचा अभ्यास, सद्ग्रंथांचें वाचन, श्रवण, मनन, सत्पुरुषांचा सहवास, सज्जनांची संगति, ईश्वराची प्रार्थना, भजन, पूजन, नामस्मरण, सद्गुरूची सेवा, अहंकार, काम, क्रोध इत्यादि विकारांना आवरणें, या माध्यमांतून आपल्या अंत:करणामध्यें जे वाईट विचार असतात–त्यांचा वाईटपणा, कुडेपणा हा कळत जातो. चांगल्या वाईटाचा विवेक करण्याची शक्ति क्रमाक्रमानें वाढत जाते. वाईट आहे हें ठामपणें कळलें कीं मग तें सुटणें वा सोडणें हें शक्य होऊं लागते. त्यादृष्टीनें माणसानें प्रयत्नशील असलें पाहिजे.

माणसाच्या अंत:करणांत ज्या कल्पना येतात त्या सगळ्याच चांगल्या असतात किंवा सगळ्याच वाईट असतात असें कधींच नसतें. चांगल्यावाईटाचें मिश्रण कमी अधिक प्रमाणांत प्रत्येकाच्याच अंत:करणांत असतें. त्यांतील दैवी संपत्तीचे अंश कोणते आणि आसुरी संपत्तीचें अंश कोणतें याचा प्रामाणिकपणें विचार करून आसुरी दुर्गुण टाकून दिले पाहिजेत आणि दैवी सद्गुण वाढवीत राहिले पाहिजे. हें सोपें नसते. तांदळांतले खडे काढणें हें आधीं अवघड. त्यांतल्यात्यांत पांढऱ्या रंगाच्या तांदुळांतील काळ्या रंगाचे खडे काढणें हें त्यामानानें सोपें. पण जेव्हां पांढरेच खडे तांदळांत मिसळलेले असतात, तेव्हां पुष्कळवेळां निवडणें पुरत नाहीं, तर घोळणें आणि रोळणेंहि करावें लागतें आणि हें सर्व फार दक्षतेनें, प्रयत्नपूर्वक करावें लागतें. दुर्गुणांच्या संबंधांत तसेंच आहे. मुळांत दुर्गुण म्हणून त्याज्य असला तरी इंद्रियांच्या आणि मनाच्या कुड्या धारणेप्रमाणें तो दुर्गुण, दुर्गुण म्हणून जाणवत नाहीं हा तांदळांत पांढरा खडा. फार प्रयत्न करावे लागतात ते यासाठींच. पांढरा खडा दातांखाली जाणवतो तसें दुर्गुणाचें वर्तन अस्वास्थ्य निर्माण करतें. यास्तव प्रयत्नपूर्वक रामचंद्राच्या चरणांशीं सतत राहिलें पाहिजे. ज्या पातळीवर शक्य असेल त्या पातळीवर शरीर, मन, बुद्धि परमार्थांतच स्थिरावेल असा उद्योग केला पाहिजे ''मना सज्जना राघवीं वस्ति कीजे'' असें पुन्हां पुन्हां सांगितलें आहे तें यासाठींच.

**बहू हिंडतां सौख्य होणार नाही ।**
**सिणावें परी नातुडे हीत कांही ।।**
**विचारें बरें अंतरा बोधवीजे ।**
**मना सज्जना राघवीं वस्ति कीजे ।।४१।।**

चांगलें व्हावें, चांगलें मिळावें या इच्छेनें मनुष्य प्रयत्नच करीत नाही असें नाहीं, पण त्याच्या प्रयत्नाची दिशा वा ध्येयवाद हा एकरूप राहत नाहीं. विहीर खोदायची असेल तर एके ठिकाणींच दहा-वीस हात खोल खोदावी लागेल. कदाचित् अधिकहि खोदावी लागेल. पण ३-४ हाताचे अनेक खड्डे सगळ्या शेतभर खोदले तरी व्यर्थ श्रमाशिवाय पदरीं कांहींहि पडण्याची शक्यता नाहीं. कुठेंतरी स्थिर राहून, निष्ठा ठेवून, प्रयत्नपूर्वक साधना केली पाहिजे. केव्हांतरी लग्न केलेच पाहिजे ना! नुसतेंच वरसंशोधन किती दिवस चालणार? देवाधर्माचें, श्रवणादि साधनांचें तसेंच आहे. विद्वत्ता संपादनासाठीं ग्रंथवाचन आणि अनुभवासाठीं ग्रंथवाचन, यांत अंतर आहे हें ओळखलेंच पाहिजे. साधनेच्या आरंभीं जरी नाना प्रकारच्या तीर्थयात्रा, विविध देवतांचें दर्शन, अनेक वक्त्यांचीं प्रवचनें, अनेक ग्रंथांचीं पारायणें, नाना प्रकारचीं व्रतवैकल्यें, विविध प्रकारच्या पूजा-होमादि उपासना यांचा, मनाला ओढ निर्माण होण्यासाठीं, बुद्धीचा निश्चय दृढावण्यासाठीं, आवडीच्या निवडीला अवसर मिळण्यासाठीं, कांहीं प्रमाणांत उपयोग होत असला तरी तेंच, तसेंच, वरवरपणें, वर्षानुवर्षें करीत राहणें हें करमणुकीचें वा वेळ घालविण्याचें साधन बनलें तरी साधना म्हणून त्याचा कांहीं उपयोग होत नाहीं.



अभ्यासक्रमांत सुद्धां शालांत परीक्षेला जितके विषय असतात तितके पदवी परीक्षेला नसतात. पदव्युत्तर परीक्षेला त्याहीपेक्षां कमी असतात, आणि पांडित्याच्या पदवीसाठीं तर एखादाच विषय प्रबंधासाठीं निवडून, त्यांतच खोल शिरून विवेचन करावें लागते. फार हिंडून सुखाचा लाभ होणार नाहीं असें समर्थ म्हणतात तें यासाठींच. ज्ञानेश्वरांनी व्यभिचारी भक्तीच्या नांवाखालीं या प्रकारच्या चंचलतेचा तीव्र शब्दांनीं उपहास केला आहे. सोमवारी महादेव, मंगळवारी देवी, बुधवारी पांडुरंग, गुरुवारी दत्त, शनिवारी मारुती, रविवारी खंडोबा अशा हिंडणाऱ्या पुरुषाला ज्ञानेश्वर भक्त म्हणत नाहींत. देवाची मूर्ति घराच्या कोपऱ्यांत ठेवावयाची आणि नवसाला पावतो म्हणून कुठल्यातरी दूरच्या देवाला खेटे घालावयाचें या वृत्तीला ज्ञानोबांसारख्या माऊलीचें अंत:करण असलेल्या सौजन्यशील महात्म्यांनीहि वेशीवर पाल मांडून बसलेल्या वेश्येची उपमा दिली आहे; (ज्ञा. १३।८१०-८२१) त्यांतला तिखट उपहास साधकानें लक्षांत घेतलेला बरा.

आदर सगळ्यांचाच असावा. द्वेष कुणाचाच करूं नये. पण निष्ठा कोठेंतरी एके ठिकाणीं स्थिरावली पाहिजे. फार वाचल्यानें, अनेक ग्रंथ धांडोळल्यानें, अनेकांचे विचार सतत ऐकत राहिल्याने लाभ होतो, हें खरें नाहीं. **नानुध्यायात् बहून शब्दान् वाचो विग्लापनं हि तत्।** असें शास्त्रवचन आहे, तें यादृष्टीने लक्षांत घेतलें पाहिजे. समर्थहि फार भटकण्याचा परिणाम केवळ शीण पदरीं पडतो, हातीं कांहींच लागत नाहीं असें सांगतात. यासाठीं विचार करून विवेकपूर्वक

वागून, नाविन्याची ओढ असणाऱ्या चंचल अंत:करणाला, बरें काय, चांगलें काय, हिताचें काय, तें नीट समजावून दिलें पाहिजे. एक टाकून दुसरें घ्यावें लागतें, पण त्यांत कांही सोय, लाभ असेल तर, उपयुक्तता आढळून येईल तर. केवळ वेगळेपणा, निराळेपणा म्हणून आकर्षण, हें अप्रगल्भतेचें लक्षण आहे. तो काळाचा, वेळेचा, संपत्तीचा अपव्यय आहे.

घाण्याचा बैल त्याच त्याच वर्तुळांत फेऱ्या घालीत राहतो पण त्यांत कुणी प्रगति मानीत नाहीं. यासाठीं नुसते हिंडणें, पुष्कळ हिंडणें हें उपयोगाचें नाहीं हें लक्षांत घेतलें पाहिजे. "**ठायीच बैसोनि करा एकचित्त। आवडी अनंत आळवावा।।**" हें वाक्य साधकांनीं विचारांत घेण्यासाठीं आहे. त्या वचनांतील प्रत्येक पद महत्त्वाचें आहे हें लक्षांत घ्यावें. रामचंद्राच्या ठिकाणीं वसती करावी असें समर्थ सांगतात त्यांतील 'वसती करावी' या शब्दप्रयोगानें मनाचें तें निवासस्थान व्हावें, स्थिर राहण्याचें स्थल व्हावें, असेंच त्यांना सुचवावयाचें आहे.

**बहूतांपरीं हे चि आतां धरावें ।**
**रघूनायेका आपुलेंसें करावें ।।**
**दिनानाथ हें तोडरीं ब्रीद गाजे ।**
**मना सज्जना राघवीं वस्ति कीजे ।।४२।।**

३८ व्या श्लोकापासून आरंभ झालेल्या 'मना सज्जना राघवीं वस्ति कीजे' या मनोबोधातील एका अर्थगंभीर पंचकाचा उपसंहार क्रमानें ४२ व्या व पंचकाच्या ५ व्या श्लोकानें, समर्थ करीत आहेत. समर्थ म्हणतात, हे मना! अनेक प्रकारानें सांगितलें तरी लक्षांत ठेवण्यासारखी एकच गोष्ट आहे आणि ती म्हणजे रामचंद्राला, रघुनाथाला तूं आपलेंसें केलें पाहिजेस. परमेश्वराला आपलेंसें करण्याचे साधनच या श्लोकपंचकांत गोंवून दिलेलें आहे, उत्कटभक्तीनें साधना करावी (३८), चंचलतेचा त्याग करावा (३९), वाईट कल्पना सोडून द्याव्या (४०), निष्ठा, एकाग्रता साधावी. (४१), आणि हें सर्व करीत असतांना परमेश्वर दीनांचा, अनाथांचा, अगतिक झालेल्यांचा, अनन्यभावानें शरण आलेल्यांचा, रक्षणकर्ता आहे हा विश्वास बाळगावा असें या ५ व्या श्लोकांत समर्थांनी प्रभावीपणें सांगितलें आहे. दीन शब्दानें येथें दुबळा, दरिद्री, व्याधिग्रस्त, संकटाने पीडलेला असा कोणी मनुष्य अपेक्षित नाहीं. तशीं माणसें पुष्कळ असतात. पण तीं कांही परमेश्वराची भक्त नसतात व देवानें त्यांना आपलेंसें म्हटलें आहे, त्यांचा स्वीकार केला आहे असेंहि कोठें दिसत नाही.

दीन मनुष्य देवाला आवडतो, ईश्वर दैन्यप्रिय आहे असें नारदांनीं आपल्या



भक्तिसूत्रांत म्हटलें आहे. पण त्या सूत्रांत या दैन्यप्रियत्वाचें स्पष्टीकरणहि नारद करतात, तें लक्षांत घेतलें नाहीं तर दैन्यप्रियत्वामुळे ईश्वराची निष्ठुरता, क्रूरताच सिद्ध व्हावयाची. म्हणून नारद दीन कोण तें सूत्राच्या पूर्वार्धांत सांगत आहेत. **ईश्वरस्याप्यभिमानद्वेषित्वात् दैन्यप्रियत्वात् च''** ज्याचा अभिमान गळून पडला, अहंकार गेला, तो येथें दीन शब्दानें अभिप्रेत आहे. खरी आर्तता त्याविना उत्पन्नच होत नाहीं. आणि आर्ताचें संरक्षण करणें हें तर परमेश्वराचें ब्रीदच आहे. रक्षणकर्ता हे त्याचें ब्रीद पावलोपावलीं गाजतें आहे! जणूं तें त्याच्या पायांतील तोडरावर, खळखळ वाजवणाऱ्या साखळ्यांवर, नुपूरांवर कोरलें आहे.

माणूस अभिमान टाकतो. निरहंकारी होतो, कृतकर्माच्या पश्चात्तापानें व्याकुळ होऊन आर्तभावानें परमेश्वराची करुणा भाकतो, तेव्हांच तो परमेश्वराच्या जवळ जाऊं शकतो, तो परमेश्वराचा होतो. परमेश्वर त्याला आपला म्हणतो. जीवाशिवाची भेट होते. जणूं **'एकपणाहि मिठी पडो सरते।'**. **'विभक्त नव्हे तो भक्त'** ही समर्थांनीं अन्यत्र केलेली भक्ताची व्याख्या येथें साक्षात्काराला येते. हें असें होणें म्हणजेच मनाची रामचंद्राच्या ठिकाणीं वस्ती होणें आहे. मन अमन होण्यानें साधणारी पूर्ण समाधि ती हीच. "पै आपुलेनि भेदेंविण। माझे जाणिजे जें एकपण। तयाचें नांव शरण। मज येणें गा। (ज्ञा. १८।१३९८) ही शरणागतीची ज्ञानेश्वरांनीं केलेली व्याख्या ज्ञाननिष्ठेला जवळची असली तरी आर्ततेलाही दूरची नाहीं. 'राघवीं वस्ति कीजे' या पालुपदाचा हाहि भाव लक्षांत घेण्याजोगा आहे.

**मना सज्जना येक जीवीं धरावें ।**
**जनीं आपुलें हीत तूंवां करावें ।।**
**रघूनायेकावीण बोलों नको हो ।**
**सदा मानसीं तो निजध्यास राहो ।।४३।।**

माणसानें लक्षांत घेण्यासारखी, अगदीं जीवाच्या ठिकाणीं धारण करण्यासारखी, एकच गोष्ट आहे, आणि ती म्हणजें स्वहित साधणें ही. माणसानें आपलें हित साधून घेतलें पाहिजें. प्रपंचांत असतांना, लौकिकांत वावरतांना, कुटुंबाचा भार वाहतांना, निरनिराळ्या प्रकारचीं व पातळीवरचीं कर्तव्यें पार पाडतांना सर्व लक्ष स्वत:चें हित साधण्याकडे असलें पाहिजे. शब्द हितसाधन असा आहे. स्वार्थसाधन-सुखसाधन असा नाहीं. हित हें पूर्णपणें साकार होतें तें परमार्थसाधनेंत, परमेश्वराच्या प्राप्तींत. आत्मलाभ तो हाच. त्याच्यासाठीं सर्वस्वाचा, कुटुंबाचा, धनाचाच काय पण पृथ्वीचाहि त्याग करण्याचा प्रसंग आला तरी मागें पाहूं नये, असें शास्त्र सांगतें. म्हणून समर्थ आग्रहानें सांगतात कीं परमार्थाविना, परमेश्वराविना, रामचंद्राविना

दुसरें कांहीं बोलूंसुद्धां नको. परमेश्वरप्राप्ति, परमेश्वराचें भजन, पूजन, परमेश्वराचें नामस्मरण हा एकच ध्यास माणसाच्या मनांत सदा सर्वदा जागृत असला पाहिजे. तो त्याचा निजध्यास झाला पाहिजे. ध्यासाला सातत्य आणि सहजता आली कीं, तो निजध्यास, माणसाचा श्वासोच्छ्वास, रुधिराभिसरण, पचनव्यापार हे जितक्या सहजतेनें, अकृत्रिमरीत्या, भार न वाटतां, श्रम न होतां, चाललेले असतात तसें परमार्थाविषयीं झालें पाहिजे.

**मना रे जनीं मौन्यमुद्रा धरावी ।**
**कथा आदरें राघवाची करावी ।।**
**नसे राम तें धाम सोडून द्यावें ।**
**सुखालागि आरण्य सेवीत जावें ।।४४।।**

मागच्या श्लोकांत समर्थांनी 'रघूनायकावीण बोलों नको हो' हा जो आदेश दिला आहे त्याचे स्पष्टीकरण या ४४ व्या श्लोकांत केलें आहे. मौन्यमुद्रा धारण करावी, मौन असावें, लोकांमध्यें वावरतांनाहि बोलूं नये, खरें म्हणजे आवश्यकतेपेक्षां अधिक बोलूं नये. कारण जनीं म्हणजे लोकांत वावरत असतांना १०० टक्के मौन बाळगणें ही गोष्ट फार कठीण आहे. पाटी घेऊन लिहीत बसणें किंवा खाणाखुणा करून स्वत: श्रमणें व दुसऱ्याला घोटाळ्यांत पाडणें हें कांहीं खऱ्या अर्थानें मौन पाळणें नाहीं. कारण तसें म्हटलें तर जेवढे मुके आहेत तेवढेच सगळे श्रेष्ठ प्रतीचे साधक आहेत असेंच म्हणावें लागेल. अधिक बोलण्याची प्रवृत्ति कमी करण्याच्या दृष्टीनें लिहिणें आणि खुणा करणें यांचा प्रारंभिक उपयोग होत असला तरी आवश्यकतेपेक्षां अधिक बोलण्याची इच्छाच न होणें हाच मौनाचा खरा अर्थ आहे. आणि ही आवश्यकता, संयम, त्याग, खरें वैराग्य, समाधान या पातळीवर ठरली पाहिजे. इंद्रियांची विषयलोलुपता वा मनाची आसक्ति हें आवश्यकता ठरविण्याचें गमक होऊं शकत नाहीं. वाणीचा संयम हा शरीर-मनाचें बळ वाढविण्याच्या दृष्टीने एक चांगला प्रयोग आहे. सामान्यत: बडबडीं माणसें कमी कार्यक्षम आढळतात. **'उथळ पाण्याला खळखळाट फार', 'गर्जेल तो पडेल काय?'** या म्हणी या दृष्टीनें लक्षांत घेण्यासारख्या आहेत. बोलण्याच्या निमित्तानें, व्यर्थ गप्पा मारीत बसण्यानें माणसाच्या शक्तीचा वा वेळेचा अपव्यय फार होतो आणि खऱ्या परमार्थाकरितां करावे लागणारे प्रयत्न मग सहजपणें व्हावे तितके होत नाहींत. यासाठीं शक्य तितकें मौन बाळगणें चांगलें. मौन म्हणजे वाणीचा संयम हें उपलक्षण मानून इतर कर्मेंद्रियांचा आणि क्रमानें ज्ञानेंद्रियांचाहि संयम येथें अभिप्रेत आहे असें समजावें.



वाणीला काम द्यावयाचेंच, बोलावयाचेंच तर तें रामचरित्राच्या गायनाचें असावें! त्यामुळें उगीच गप्पा-टप्पा करण्याचें, वेळ घालवण्याचें आकर्षण कमी होते. इतरहि इंद्रियांना संयमाची संवय लागू शकते आणि चित्तशुद्ध होऊन भक्ति दृढावत जाते.

भगवंताचें गुणानुवाद गाणें हें नवविधा भक्तींतील एक महत्त्वाचें साधन आहे.

ज्या विषयाचा परमार्थाशीं प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष संबंध नसेल अशा गोष्टी करण्याचें टाळावें इतका अर्थ "नसे राम तें धाम सोडून द्यावें" या चरणामध्यें आहे. आवश्यक तो व्यवहार करणें निराळें आणि सुखैश्वर्याच्या लालसेनें, प्रापंचिक व्यवहाराचे व्याप वरचेवर वाढवीत नेणें निराळें. या रीतीच्या उद्योगामुळेंच निरनिराळ्या प्रकारचे ताप सोसावे लागतात. सरळपणानें वागता येत नाहीं. वंचना, फसवणूक, नीतिनिर्बंध ओलांडून वागणें, लपवाछपवी करणें, दुसऱ्याला प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीत्या लुबाडणें, या सर्व गोष्टी जन्माला येतात. अहंकार बळावतो. कामक्रोधांची उग्रता वाढत जाते. लोभ-मत्सरांचें स्वरूप अधिकाधिक पीडाकर होत जातें. म्हणून ज्यांत परमार्थाचा संबंध नाहीं अशीं, भगवंतापासून दूर नेणारी, जीं कृत्यें असतील तीं सर्व सोडून द्यावींत. ज्याठिकाणी अशा परमार्थविरोधी भावनांचे पोषण होत असेल तें स्थलहि सोडून द्यावें.

खरोखरीच सुखाची अभिलाषा असेल तर लोकव्यवहारापासून दूर होऊन, निसर्गसौंदर्यानें नटलेल्या, वनश्रीनें डंवरलेल्या, वाहत्या जलप्रवाहाच्या खळखळत्या मंजुळ नादानें भारावलेल्या, अशा एखाद्या मनोहर स्थलाचा आश्रय करावा. जेथें कोणाचें मन सांभाळावें लागणार नाहीं, तिरस्कारानें, मत्सरानें, उपहासानें खोंचक बनलेलीं वाक्यें ऐकावी लागणार नाहींत, अहंकारानें फुललेले, स्वार्थानें बरबटलेले दुर्व्यवहार पहावे लागणार नाहींत, विषयासक्तींतून निर्माण झालेल्या संघर्षाचा ताण सोसावा लागणार नाहीं, असें तें स्थल असावें. जेथील वातावरण शांततेनें आणि प्रसन्नतेनें भरलेलें आहे, मंद वाऱ्याच्या झुळुकीवर पानें सळसळत आहेत, पक्षांची मधुर किलबिल त्याला साथ देत आहे, गगनचुंबी शिखरें, पाताळाची खोली मोजणाऱ्या दऱ्या, मेघांशीं हितगुज करणारे उंच वृक्ष, नाना रंगाची फुलें उधळणाऱ्या वेली, निर्भय मनानें वावरणारीं श्वापदें ज्याठिकाणीं मन वेधून घेत आहेत, अशा स्थळीं राहण्याचें भाग्य लाभलें, आणि तेथील एखाद्या लहानशा देवमंदिरांत ध्यान-सुख अनुभवितांना मन रंगून गेलें, वेळेचें भान उरलें नाहीं, शरीराला लागणाऱ्या आवश्यकतेचीहि फारशी ओढ उरली नाहीं, तर मग सुखाला पारावार नाहीं.

खरें म्हणजे असें झालें तरच अरण्य सुखाचें होतें. त्याकरितां शरीर काटक असावें लागतें. शीतोष्ण सहन करण्याची क्षमता असावी लागते. कोणत्याहि प्रसंगाला धैर्यानें तोंड देता येईल इतका निर्भयपणा वृत्तींत बाणावा लागतो. भूक तहान सोसता यावी लागते. कंटाळा येऊन चालत नाहीं असें असलें तरच अरण्यवास सुखाचा होऊं शकतो. ज्याला एकट्याला करमत नाहीं त्याला अरण्यवास हा सुखापेक्षां दु:खदायक होण्याचीच शक्यता जास्त. जें जसें असेल तें तसेंच चालवून घेण्याची, इतकेंच नव्हे तर गोड मानण्याची संवय लागलेली नसेल तर अरण्यवासानें श्रमसंतापांशिवाय दुसरें कांहीं पदरीं पडणार नाहीं. **''नाहीं तरी सुखें असावे संसारी । फजिती तिसरी करूं नये ।।''** असे संत म्हणतात तें यासाठींच. 'सुखालागि आरण्य सेवीत जावें' या वाक्यांतील आकर्षण निर्माण होण्यापूर्वी, स्वत:च्या पात्रतेचाहि विचार करणें आवश्यक आहे. शरीर मनाच्या आवश्यकता फार थोड्या नसतील आणि मन रमण्यासाठीं बाह्य उपाधि अपरिहार्य असतील तर अरण्यासारखें सुखसाधन नाहीं हें खरेंच आहे! कारण तेथें मनाला बळानें खेंचून वैतागांत पाडतील अशा गोष्टी फार थोड्या असतात आणि त्यामुळें मन शांत, स्थिर राहण्यास सहाय्य होते.

**जयाचेनि संगे समाधान भंगे ।**
**अहंता अकस्मात येऊनि लागे ।।**
**तये संगतीची जनीं कोण गोडी ।**
**जये संगतीनें मती राम सोडी ।।४५।।**

जेथें राम नाहीं तें धाम म्हणजे स्थल, कार्य, उद्योग सोडून अरण्यांत जावे म्हणजेच सुख लागतें असें जें सांगतात त्यामागील कारण परंपरेची एक दिशा समर्थ या ४५ व्या श्लोकांत सांगत आहेत.

माणसाच्या कल्याणासाठीं, त्याचें जन्माचें सार्थक होण्यासाठीं, हितसाधनासाठीं, त्याची बुद्धि परमार्थांत स्थिरावली पाहिजे. अंत:करणामध्यें परमेश्वराविषयीं निष्ठा दृढ राहिली पाहिजे. पण हें होत नाहीं. त्याला जीं कारणें आहेत–त्यांतील एक महत्त्वाचें कारण विरोधी गुण असलेल्या व्यक्तीची संगत. मनुष्य प्रपंचामध्यें रमतो, व्यवहार त्याला सोडावेसे वाटत नाहींत याच्यामागे संगति हें कारण फार महत्त्वाचें आहे.

समाधान कशानें मिळतें? तृप्तता, संयम, त्याग, सदाचरण, धर्मनिष्ठा या सर्व गोष्टी मनुष्याला खरें व टिकाऊ समाधान देणाऱ्या आहेत. पण भोंवती संगत असते ती अशा लोकांची कीं ज्यांच्या वागण्यांत आणि विचारांत संयमाला



कांहींहि महत्त्व नसतें. खावें, प्यावें, मजा करावी. ऐश्वर्यानें, विलासानें रंगेल जीवन जगावें. त्यासाठीं उदंड संपत्ति मिळवावी, उपभोगाचीं साधनें वाढवावींत, सत्तास्थानें जिंकावीत, त्या माध्यमांतून प्रतिष्ठा मिरवावी. मग त्याकरितां कांहींहि करावें लागलें, कसेंहि वागावें लागलें, तरी चालेल, अशी ज्यांची धारणा असते, तेच सभोंवती असतात.

मनुष्यानें महत्त्वाकांक्षी असले पाहिजे आणि महत्त्वाकांक्षा ही संपत्ति, सुखसाधनें, प्रतिष्ठा याच मापानें मोजली पाहिजे. याच्या आड येईल तें सर्व टाकलें पाहिजे. नीति-अनीति, धर्म-अधर्म, पाप-पुण्य, सदाचरण-दुराचरण या सर्व कल्पना मनुष्यानेंच निर्माण केलेल्या आहेत. आणि त्यांची उपयुक्तता देशकालपरिस्थितीवर अवलंबून आहे. तेव्हां पुण्यकल्पना, धर्माविषयीची निष्ठा या शब्दांना वस्तुत: कांहीं अर्थ नाहीं, असें गोंडस तत्त्वज्ञान विचारवंत म्हणविणारीं काहीं बुद्धिमान् माणसें समाजासमोर निर्माण करीत असतात, आणि अनेक श्रीमंत, सत्ताधारी, प्रतिष्ठित अशा व्यक्तींच्या जीवनामध्यें तें प्रत्यक्ष दिसूनहि येतें, त्यामुळें सामान्याला तोच आदर्श महत्त्वाचा वाटतो आणि मग जीवनाचें ध्येयहि तेंच ठरून आधीं सांगितलेल्या समाधानाच्या खऱ्या मार्गानें जाणें नको वाटतें.

अहंकार हा मनुष्याचा एक स्वाभाविक गुणधर्म आहे. भ्रांत महत्त्वाकांक्षेसंबंधीच्या या फसव्या तत्त्वज्ञानानें हा अहंकार पुष्ट होतो आणि मग ज्यामुळें अहंकार सुखावला जाईल अशाच गोष्टी हव्याहव्याशा वाटतात. शास्त्रानें कामक्रोधादि जे विकार षड्रिपु म्हणून सांगितले तेच या अहंतेमुळें मित्र आहेत असें वाटूं लागतें आणि त्या घातक विचारांचें समर्थनहि होऊं लागतें. समाजाच्या कल्याणाची तळमळ असलेलीं चांगलीं विद्वान् माणसेंहि, 'कामानें वंशसातत्य राखलें आहे, क्रोधामुळें दुष्टांना धाक बसतो, लोभानें ऐश्वर्य वाढतें, मोहामुळें अनेक गोष्टींत रस घेतां येतो, मदामुळें स्वाभिमान जागृत होतो, स्वसंरक्षण होतें, मनुष्याचा आत्मविश्वास वाढतो, मत्सरामुळें महत्त्वाकांक्षेला प्रेरणा मिळते,' इत्यादि इत्यादि प्रतिपादन करीत असतात.

जगाच्या पाठीवर समृद्धीच्या शिखरावर पोचलेलीं अनेक राष्ट्रें आहेत. पण त्या देशामधें सुख, स्वास्थ्य, शांतता असल्याचें मात्र आढळून येत नाहीं. त्यामुळें आपल्या दरिद्री आणि तथाकथित मागासलेल्या देशांत प्रगतीचें हें महत्त्वाकांक्षी तत्त्वज्ञान आकर्षक वाटलें तरी जाणत्यांनीं त्याचा फोलपणा समजून घेतला पाहिजे. म्हणून समर्थ म्हणतात ज्या तऱ्हेच्या संगतींतून समाधान नष्ट करणारे विचार मनांत येतात, अहंकार बळावतो आणि परिणामीं परमार्थच अप्रिय वाटूं लागतो ती संगतीच सोडली पाहिजे. शरीरमनबुद्धीला वाईट वळण लावणाऱ्या

या संगतीचें आकर्षण तरी वाटतां कामा नये. त्या प्रकारचें जीवन आदर्श तरी वाटतां कामा नये.

**मना जे घडी राघवेंवीण गेली ।**
**जनीं आपुली ते तुंवां हानि केली ।।**
**रघुनायेकावीण तो सीण आहे ।**
**जनीं दक्ष तो लक्ष लाऊनि पाहे ।।४६।।**

रामचंद्रांच्या चिंतनावांचून, परमार्थाच्या साधनावांचून जो वेळ वाया जाईल, तो आपल्या आयुष्याची हानि करणार आहे असें समजावें. आयुष्याचा प्रत्येक क्षण मोलाचा आहे आणि तो सत्कारणीं लावणें हे माणसानें तरी आपलें कर्तव्य समजलें पाहिजे. रामचंद्रांच्या स्मरणावांचून, परमार्थसाधनावांचून जें जें कांहीं केलें जातें, तें सर्व एक प्रकारें शीण देणारें, कष्ट वाढविणारें असेंच असतें. मनुष्य जागृत तो, सावध तो, कीं जो प्रत्येक गोष्ट लक्ष लावून पाहतो. नीट प्रकारें विचारांत घेतो, विवेक करतो, सार काय, असार काय तें समजून त्याप्रमाणें वागतो.

जो दक्ष नाहीं तो प्रपंचातहि वेंधळा ठरतो, त्याच्या हातून सांडलवंड होते, भांडी पडतात, फुटतात, व्यापार खालावतो, वेळ साधतां येत नाहीं, अपयश वाढतें. दक्षता, सावधपणा हा गुण सर्वत्र उपयोगीच आहे.

मनुष्य प्रत्येक गोष्टींत सावध राहिला, त्यानें नीट विचार केला, त्याची विवेकबुद्धि जागृत असली म्हणजे तो परमार्थसाधनेंतच दृढ राहील. दृढच राहील यांत शंका नाहीं. विवेकी माणसाचे सर्वच प्रयत्न शाश्वत सुखासाठीं असतील. परमेश्वरप्राप्ति हेंच त्याचें ध्येय असेल, उपासना हाच त्याचा उद्योग असेल. शरीररक्षणासाठीं, देह धारणेसाठीं तो कांहीं करणार नाहीं, असें मुळींच नाहीं पण त्याची शरीराची कल्पना मी म्हणजे शरीर नसून शरीर हें एक उच्चध्येयाच्या प्राप्तीचें साधन आहे, एवढीच असेल आणि त्यामुळें त्याचें लक्ष रामाच्या चरणकमलांपासून कधींच ढळणार नाहीं.

**मनीं लोचनीं श्रीहरि तो चि पाहे ।**
**जनीं जाणता भक्त होऊनि राहे ।।**
**गुणीं प्रीति राखे क्रमू साधनाचा ।**
**जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ।।४७।।**

हा श्लोक धरून पुढें दहा श्लोकांत समर्थांनीं परमेश्वराचा श्रेष्ठ भक्त कोण



ते सविस्तरपणें सांगितलें आहे. या सर्व वर्णनामध्यें व्यवहार आणि परमार्थ या दोन्ही क्षेत्रांत श्रेष्ठ पुरुष कसा वागतो त्याचा आदर्श समर्थांनीं उभा केला आहे.

श्रेष्ठ भक्तांचें महत्त्वाचें लक्षण सांगतांना समर्थ म्हणतात–तो मनानें आणि डोळ्यांनीहि एक परमेश्वराचेंच रूप काय तें पाहतो व अनुभवितो. बाहेर चर्मचक्षूनें त्याला परमेश्वराचें रूप न्याहाळणें आवडतें एवढेंच नव्हें तर त्याच्या अंतरंगांतहि सदा सर्वदा त्याच रूपाचा साक्षात्कार होत असतो. डोळ्यांनीं श्रीहरीचें बाह्यरूप पाहणें हें मंदिरांत विराजमान असणाऱ्या देवमूर्तीच्याच स्वरूपांत केवळ घडतें असें मानण्याचें कारण नाहीं. केवळ ध्यानांतच नव्हे तर चर्मचक्षूंनींहि भगवंताच्या अत्यंत रमणीय अशा सगुण, साकार रूपाचा दिव्य साक्षात्कार श्रेष्ठ भक्तास होत असतो असाहि अर्थ लोचनीं पाहे या पदांनी घेणें शक्य आहे. एका हिंदी सत्पुरुषानें यादृष्टीनें केलेलें वर्णन मोठें लक्षणीय आहे. **''अंतर जामिहि ते बड बाहर जामिहि राम जे नाम लिये ते । प्रगट भये प्रल्हादकू हूँ प्रभु पाहन ते न हियेते ।''**

ध्यानदर्शनापेक्षांहि हा प्रत्यक्ष नेत्रांनीं होणारा सगुणरूपाचा साक्षात्कार विशेष महत्त्वाचा मानला पाहिजे. मंदिरांतील देवदर्शनाचाहि आनंद संतांना उत्कृष्ट रीतीनें अनुभवितां येतो; कारण त्यांचें सर्वच अंतरंग परमेश्वराच्या सच्चिदानंदमयतेनें पूर्णपणें व्यापिलें गेलेलें असते. ''जनीं जाणता होऊनि भक्त राहे'' असाहि त्याचा अन्वय केला तर ज्ञानोत्तर भक्ति म्हणून ज्या अवस्थेचें वर्णन केलें जातें तीहि येथें अभिप्रेत आहे असें म्हणतां येईल. आणि पहिल्या चरणांतील मनीं लोचनीं ही दोन्ही पदें अधिक चांगल्या रीतीनें यथार्थ होतील, तसाच त्या त्या ओळींतील पुढचा 'च' कारहि अधिक अर्थवाही ठरेल.

अर्थ साधेपणानें घेतला तरी त्याहि अवस्थेंतील भक्ताचें महत्त्व सामान्य नाहीं. डोळ्यांनी परमेश्वराचें रूप पाहण्याची, मूर्तीचें दर्शन घेण्याची, तिच्या पूजाअर्चेत रंगून जाण्याची आवड, श्रद्धावंतांना, भाविकांना असतेच पण ती पुष्कळ वेळां वरवरचीहि राहूं शकते. देवदेवतांची महापूजा बांधणाऱ्याची वृत्ति याच प्रकारची असते. अभिषेकाचें वेळी चंद्रिकाधवल दुधाचे आणि दह्याचे ओघळ काळ्या सांवळ्या मूर्तीच्या मस्तकापासून सर्व शरीरभर वाहूं लागलें कीं, मूर्तीच्या दर्शनांतील आकर्षकता वाढते. आपण देवासाठीं कांही चांगलें केलें असें समाधानहि मग त्यांतून माणसास मिळतें. चांगल्या सुंदर वस्त्रांनीं, बहुमोल अलंकारांनीं, सुगंधित रमणीय पुष्पांनी मूर्ति सजविलेली असली कीं त्या दर्शनानें सुखावणाऱ्या भाविकांची संख्या पुष्कळच मोठी असते.

जे मनानें श्रीहरीच्या रूपाचें दर्शन घेतात त्यांना या स्थूल उपचारांनीं,

दर्शनाच्या आनंदांत विशेष भर पडली असें कधीं वाटत नाहीं. मन रमणें, एकाग्र होणें, दर्शनानें अष्टसात्त्विक भाव दाटून येणें, देहभाव विसरणें, बाह्य जगताची वा परिस्थितीची जाणीव न उरणें, रूप-दर्शनानें तल्लीन होऊन जाणें, आणि त्यामुळें जणू आनंदसागरामध्यें विहार करीत आहे अशी प्रसन्नता अनुभवास येणें इत्यादि लक्षणें मनानें श्रीहरीचें रूप पाहूं शकणाऱ्या भक्ताच्या ठिकाणीं थोड्याशा बाह्य निमित्तानें किंवा त्यावांचूनहि प्रगट होत असतात. घटघटाच्याठिकाणीं अंतर्बाह्य परमात्मा व्यापून राहिला आहे हें ज्ञानच त्याच्या ह्या दिव्य अनुभवास आधारभूत असतें. समर्थांनीं भक्ताला जाणता हे विशेषण दिलें आहे तें याच भावनेनें.

भक्ताला जाणता हें दिलेलें विशेषण आणखीहि एका दृष्टीनें लक्षांत घेण्यासारखें आहे. परमार्थमार्गामध्यें मनुष्य साधा, सरळ, श्रद्धावान्, निष्कपट असा लागतो यांत संशय नाहीं. पण त्यावरून जो एक सोयीस्कर अपसमज पसरला आहे तो मात्र दूरान्वयानेहि खरा नाहीं. साधा सरळ म्हणजे वेडा, खुळा, बावळा, व्यवहारशून्य, सहज फसला जाणारा असा नव्हे. कपटी म्हणजे चतुर नव्हे, बावळा म्हणजे सरळ नव्हे. गबाळा म्हणजे साधा नव्हे. साधा-सरळ या दोन्हीं गुणांची गल्लत करणें हें अडाणीपणाचें लक्षण आहे. कदाचित् स्वार्थी धूर्तांनीं आपल्या उभयविध सोयीसाठीं हीं नकोत तीं लक्षणें पारमार्थिकावर लादलीं असण्याचीहि शक्यता आहे. समर्थ भक्ताला जाणता म्हणतात– ते हें गबाळे बावळेपण नाकारण्यासाठींच. समर्थांनीं आपल्या सर्व वाङ्मयामध्यें या दुर्गुणाचा ठायीं ठायीं तिरस्कार केला आहे. प्रयत्नाची, दक्षतेची, चातुर्याची, स्तुतीहि केली आहे. तेव्हां जाणता भक्त म्हणजे ज्ञानी, श्रद्धावान्, प्रयत्नशील, साक्षेपी, विवेकी, चतुर असा भक्त. मागच्या श्लोकांतील शेवटच्या ओळीतील दक्ष शब्द या विवरणाला पोषक असाच आहे.

तिसऱ्या ओळीचा अन्वय करतांना 'राखे' शब्द, 'गुणीं प्रीति राखे' आणि 'साधनांचा क्रमू राखे' असा दोनदां घेतला पाहिजे. आधीं प्रगतीच्या दृष्टीनें आणि नंतर लोकसंग्रहाच्या दृष्टीनें या चरणांतील विचार फार महत्त्वाचा आहे. परमार्थामुळें प्राप्त होणाऱ्या प्रसन्नता, समाधान, आनंद, शांति या गुणांवर किंवा परमेश्वराचे ठिकाणीं शास्त्रांनीं वा संतमहात्म्यांनी सर्वज्ञता, सर्वशक्तिता, कृपावत्सलता, न्यायीपणा, औदार्य, सौंदर्य इत्यादि इत्यादि गुण सांगितले आहेत. त्यावर कोणाहि माणसाचें प्रेम बसणें, ते गुण आवडणें, त्याचा लाभ आपल्याला व्हावा असें वाटणें हें अगदीं स्वाभाविक आहे. यांची अपेक्षा ठेवूनच तर माणूस बहुधा परमार्थाला लागतो. थोर भक्तहि या गुणांविषयीं प्रीतीच बाळगतो. पण त्याचें मोठेंपण साधनांचा क्रम न विसरण्यामध्यें, साधनांचा क्रम राखण्यामध्यें आहे.



परमेश्वराची सर्वसमर्थता, सर्वशक्तिमत्त्व मान्य करतांना त्याचें सर्वज्ञत्वहि लक्षांत ठेवलें पाहिजे. ईश्वर भक्तवत्सल आहे, दयाळू आहे हें खरेंच, पण तो न्यायी आहे हेंहि विसरतां कामा नये. समाधान, शांतता, आनंद हीं सर्वांनाच हवीं असतात पण त्यासाठीं त्याग, तप, संयम याविषयींचे दृढ प्रयत्न आवश्यक असतात हे विसरून चालत नाहीं. माणूस बहुधा आपल्या सोयीचें म्हणून पहिलें लक्षांत ठेवतो व दुसरें सोयीस्करपणें विसरतो. तें चालत नाहीं. ध्येय निश्चित असलें तरी ध्येयाकडे जाणारा मार्ग क्रमाक्रमानेंच चालावयाचा असतो आणि ही वाटचाल सातत्यानें, निष्ठेनें, ओझें न वाटूं देतां, न कंटाळतां, धीरानें करावयाची असते. साधनांचा क्रम राखतो म्हणण्यामध्यें इतका सर्व भाव अभिप्रेत आहे. हीं अशीं लक्षणें ज्या व्यक्तीच्या ठिकाणीं दिसतात तोच परमेश्वराचा धन्य भक्त होय असें समर्थ सांगतात.

**सदा देवकाजीं झिजे देह याचा ।**
**सदा रामनामें वदे नित्य वाचा ।।**
**स्वधर्में चि चाले सदा उत्तमाचा ।**
**जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ।।४८।।**

जो आपलें शरीर न कंटाळतां, न थकतां, ईश्वराच्या सेवेंत सदैव राबवीत असतो तो रामचंद्राचा भक्त धन्य होय. येथेंहि देवाची सेवा, देवाचें काम हे शब्द समजून घेतले पाहिजेत. देवाचें काम असो कीं देवाची सेवा असो. ही देवाला आवडणारी वस्तु असली पाहिजे. देव पत्र, पुष्पफलांचाहि स्वीकार करतो, पण अर्पण करणाराच्या अंत:करणांतील उत्कट भक्तीसाठीं. पानाफुलांची त्याला आवड असते म्हणून नाहीं. तेव्हां देवाचें काम कोणतें, त्याचें स्वरूप काय, त्याचे आचरण कसे करावें हें जाणणें फार महत्त्वाचें आहे. त्यांतहि पुन्हा समर्थांनी येथें देवाची सेवा असा शब्दप्रयोग न करतां देवाचें कार्य शब्द वापरले आहेत.

भगवंतांनीं आपलें काम काय तें गीतेमध्यें स्पष्ट सांगितलें आहे. **''परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम् । धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ।।''** (भ. ४।८) हें भगवंतांनीं आपल्या अवताराचें प्रयोजन सांगितलें आहे, आणि ईश्वर काम करणार नाहीं तर काय स्थिति होईल तेंहि भगवंत– **''उत्सीदेयुरिमे लोका न कुर्यां कर्मं चेदहम् । संकरस्य च कर्ता स्याम् उपहन्यामिमाः प्रजाः ।''** (भ. ३।२४) तेव्हां जो स्वत:ला देवभक्त म्हणवितो त्यानें आपल्या शक्तिबुद्ध्यनुसार हें जें देवाचें कार्य आहे, तेंच न कंटाळतां, न थकतां करीत राहिले पाहिजे.

या प्रयत्नाचें व्यावहारिक बाह्य स्वरूप प्रकृतिभेदानें वेगवेगळें असूं शकेल, पण लोकांना सन्मार्गी लावून सुखी करणें आणि दुराचरण, दैन्य, दु:ख यांपासून सोडविणें हें धार्मिक म्हणविणाऱ्या प्रत्येक मनुष्याचें कर्तव्य आहे आणि तें त्यानें यथाशक्ति सातत्यानें करीत राहिलें पाहिजे. भजन, पूजन, कीर्तन, प्रवचन, यज्ञयाग, उत्सवमहोत्सव, अनाथअपंगांची सेवा, दु:खितांना सुखविणें, दलितांचा उद्धार करणें, संकटग्रस्तांना सोडविणें, अडाण्यांना शिकविणें, निराधारांना आधार देणें इत्यादि इत्यादि सर्व कृतींमागचा ध्येयवाद, शेवटीं परमेश्वराचें काम करणें हा आहे.

वैयक्तिक पूजा अर्चा करूं नये किंवा ती व्यर्थ आहे असें म्हणण्याचा उद्देश मुळींच नाहीं. श्रमांचा परिहार व्हावा, धीर लाभावा, विश्वास वाढावा, मनोबल प्राप्त व्हावें म्हणून व्यक्तिश: केलेल्या पूजा प्रार्थनेचाहि फार उपयोग होतो यांत शंका नाहीं. पण पूजाप्रार्थनेव्यतिरिक्तचें एरवीचें जीवन जर देवकार्यांत वेंचलें जात नसेल, देवाच्या कामाला अनुकूल नसेल किंवा विरोधी असेल तर ही पूजाप्रार्थना कांहीं उपयोगाची नाहीं. ती आत्मवंचना तरी आहे वा दंभ तरी आहे. समर्थांना सदा शब्दानें दिवसाकांठी तास दोन तास चालणारे धार्मिक विधि अभिप्रेत नाहीत हें निश्चित. कोणताहि धार्मिक विधि नित्य चालेल पण सदा चालूं शकणार नाहीं. सदा शब्दानें जीवनाची सर्व घडणच समर्थांना अभिप्रेत आहे हें लक्षांत घेतलें पाहिजे.

या कामांतली उत्कटता लक्षांत यावी म्हणून समर्थ **'देवकार्यीं देह झिजे'** असा शब्दप्रयोग करतात. यथाशक्तीच्या ढालीखालीं केलेली देहाची थोडीशी हालचाल येथें समर्थांना अभिप्रेत नाहीं. देवाचें काम करणें ही एक तपस्या आहे. वत्सल आई मुलासाठीं, सुगृहिणी कुटुंबासाठीं, पतिव्रता पतीसाठीं, स्वामिभक्त धन्यासाठीं, खरा देशभक्त राष्ट्रासाठीं, योगी ध्येयासाठीं, मांत्रिक सिद्धीसाठीं, धनलोलुप संपत्तीसाठीं जितके आणि ज्या प्रकारचे कष्ट करीत राहतो तसें करीत राहणें म्हणजे देह झिजवणें आहे. अतिश्रमानें कदाचित् थकवा येईल पण कंटाळा येणार नाहीं. देवकार्यामध्यें उत्साह सतत टिकून राहिला पाहिजे. आपण समजतो त्यापेक्षां शरीराची कार्यक्षमता कितीतरी पटीनें अधिक असते. जेथें आवड असते, उत्साह असतो, तेथें ती प्रत्ययालाहि येते. तेव्हां देवाचें काम करणें हें वेठ सारण्यासारखें नसावें. शारीरिक कष्टाची क्षिती न बाळगतां तें केलेलें असावें आणि असें ज्यांचे जीवन देवकार्यांत लागलेलें असतें तो परमेश्वराचा भक्त धन्य होय असें समर्थ म्हणतात.

जो आपल्या वाणीनें प्रतिदिनीं आणि सातत्यानें, अखंडपणें देवाचें नांव घेत असतो, तो परमेश्वराचा भक्त धन्य होय. रामनामें हा बहुवचनी प्रयोग लक्षणीय



आहे. त्यामुळें समर्थांच्या ठिकाणीं सांप्रदायिक आग्रह नाहीं ही गोष्ट लक्षांत येते आणि याच भावनेनें समर्थ श्रीहरि या शब्दाचाहि रामाच्या जोडीनें अनेक ठिकाणीं उल्लेख करतात. तुम्हांला आवडेल तें देवाचें कोणतेंहि नांव प्रेमानें घ्या, प्रतिदिनीं घ्या, वरचेवर, सदैव घ्या असें समर्थांना सुचवावयाचें आहे.

सर्व संतांच्या जीवनांतून त्यांची ही नामस्मरणाची, नामोच्चारणाची आवड, खरें म्हटले तर व्यसन, नियमानें प्रगट झालेली आहे. तुझें नाम माझ्या वाणीवर सदैव राहो हे मागणें, कदाचित् एकमात्र मागणें, संतांनीं देवाजवळ मागितलें आहे.

सृष्टीच्या आरंभीं शब्द होता व त्यांतून हें सर्व निर्माण झाले आहे असें शास्त्र सांगतें. त्याचप्रमाणें परमार्थाची सर्व प्रगति नामस्मरणानें होऊं शकतें, होतें, असा महात्म्यांचा अनुभवहि आहे आणि हा प्रभाव इतका महत्त्वाचा आहे कीं सर्व साधनांचे फळ नामस्मरणांतून क्रमाक्रमानें प्राप्त होत जातें. विषयांकडची ओढ उणावते, इंद्रियांना संयम येतो, चित्त शुद्ध होतें, बुद्धि स्थिरावते, जीव परमार्थांत रमतो. तेव्हा नित्य आणि सदा या दोन शब्दांवर लक्ष ठेवून होईल तितका अधिक वेळ आणि प्रतिदिनीं नियमानें भगवंताचें नांव देशकालपरिस्थितीप्रमाणें उच्चारीत राहावे ते परमार्थप्राप्तीचें एक श्रेष्ठ साधन आहे हें नि:संशय. व्यवहारांत वावरत असतांना, शरीराचे कोणतेहि व्यापार चालू असले तरी त्यावेळीं देवाचें नांव घेणें सहज शक्य आहे आणि त्यामुळे नामस्मरणांतील सातत्य अनायासें टिकतें. त्याला इतर साधनसंभार लागत नाहीं. आणि श्रमहि होत नाहींत. हेंच नामस्मरण जेव्हां प्रेमानें हृदयाच्या स्पंदनासारखें सहज होऊन जाते तेव्हां तो भक्त धन्यतेस प्राप्त होतो.

जो केवळ स्वधर्माचेंच पालन सदैव उत्तम प्रकारानें करतो, तोहि परमेश्वराचा श्रेष्ठ भक्त आहे.

फार फार पूर्वीच्या काळीं स्वधर्माचा विचार वर्णाश्रमभेदानें केला जात असे आणि तींच व्यवस्था समाजस्वास्थ्याच्या दृष्टीनें एक चांगली व्यवस्था होती. दुर्दैवानें आजं तरी आपण त्या आदर्श व्यवस्थेपासून फार दुरावलेले आहोंत. आजहि एकाद्या दुसऱ्या व्यक्तीच्या संबंधांत तें अशक्य नाहीं पण तो आदर्श लाखांत एखाद्यालाच पूर्णपणानें पाळणें शक्य होणार आहे. इतरांच्यासाठीं स्वधर्म शब्दाचा व्यावहारिकदृष्टीनें निराळा अर्थ केला पाहिजे. वर्णाश्रमव्यवस्था ही उत्तम व्यवस्था होती, आहे. समाजाचा विकास उन्नति, प्रगति पूर्ण होऊन सर्वच्या सर्व समाज सुख, स्वास्थ्य समाधानांत पूर्णपणें नांदावा हा आदर्श वर्णाश्रमव्यवस्था आपल्या मूळ शुद्ध स्वरूपांत प्रस्थापित झाली तरच शक्य आहे हेहि लक्षांत ठेवलें पाहिजे. आज हें बोलणेंहि धोक्याचें झालें आहे, पण तें सत्य आहे आणि

दीर्घकाळाच्या प्रयत्नानें शक्यहि आहे. तरीहि सध्या आपणांस त्याविषयींचा विचार कर्तव्य नाहीं. कारण समर्थांच्या काळींहि वर्णाश्रमधर्म हा शुद्ध स्वरूपांत अस्तित्वांत नव्हता, त्यावेळीं इतस्ततः विखुरलेले वर्णाश्रमधर्माचे कांहीं अवशेषच उरलेले होते आणि त्यामुळें होणारें दुःखहि समर्थांनीं अनेक रीतीनें प्रगट केलें आहे. यास्तव स्वधर्मशब्दाचा कांहीं वेगळा विचार आपणांस केला पाहिजे.

स्वधर्म शब्द हा आपण आनंदानें स्वीकारलेली वा परिस्थितीशीं जुळवून घेण्यासाठीं उघड्या डोळ्यांनीं पत्करलेली जी जीवनपद्धति तिचा वाचक समजावा. तो वर्णाश्रमाच्या मूलभूत पद्धतीशीं जितका मिळता जुळता असेल तितका चांगलाच. पण एकदां स्वीकारल्यानंतर जें स्वीकारलें तें स्वधर्म मानून चालणें हेंहि श्रेयस्करच आहे. हेंहि पुन्हां कुलवतीच्या लग्नासारखें आहे. वरसंशोधन करतांना वराविषयींच्या अनेक अपेक्षा असूं शकतात आणि त्यादृष्टीनें त्यांच्याशीं अधिकाधिक मिळता जुळता वर निश्चित केला जातो पण त्याच्याशीं एकदां विधिपूर्वक विवाह झाला कीं मग मात्र निष्ठेमध्यें पर्याय असून चालत नाहीं. तीच गोष्ट स्वधर्माचीहि आहे, एखादा उद्योग, एकादे क्षेत्र, एकादा व्यवसाय समाज विघातक नाही याचा विचार करून स्वीकारावा आणि मग स्वीकारलेला व्यवसाय आपल्या सर्व निष्ठेनिशीं पार पाडावा. जीव न ओततां, अप्रामाणिकपणें कशीतरीं निरुपायानें स्वीकारलेंली कामे करीत राहणें ही गोष्ट सज्जनाला शोभणारी नाहीं. समर्थ 'उत्तमाचा चाले' म्हणतात ते यासाठींच. कार्यक्षेत्र निवडताना कुलशीलपरंपरेचा आणि मग प्रकृति-प्रवृत्ति-परिस्थितीचा चांगला विचार करावा व क्षेत्र निवडावें, पण जें निवडले वा पत्करावे लागलें तेथें अप्रमाणिकपणा करून चालणार नाहीं. चिकित्सक (डॉक्टर) व्हावयाचें होतें, शिल्पज्ञ (इंजिनिअर) व्हावयाचें होते पण चांगला अभ्यास न केल्यामुळे किंवा पुरेसा होऊं न शकल्यामुळें शेवटीं लेखनिक व्हावें लागलें, पण म्हणून त्यानें कामाच्या वेळीं कार्यालयात मासिके वाचावीं किंवा उपहारगृहामध्यें अधिक वेळ घालवावा हें योग्य ठरत नाहीं. तुम्ही कष्टकरी वा उद्योगपति कुणीहि असूं शकता पण जें काम करीत असाल तें प्रामाणिकपणें करीत राहणें ही भगवंताची सेवाच आहे. भगवंताला फुलें आवडतात पण तीं झाडावर फुललेली नव्हे, तर प्रामाणिकतेचा सुगंध आणि कौशल्याचें सौंदर्य असलेली स्वकर्मपुष्पे. समर्थांच्या उत्तम शब्दातून हीं प्रामाणिकता व कौशल्य हेंच अभिप्रेत आहे. ही पूजा हेंच ईश्वराचें मनोगत आहे असे ज्ञानेश्वर महाराज म्हणतात. अशा रीतीनें तिसरी ओळ पहिल्या ओळीशीं जोडली जाते व दुसरी ओळ त्याचा सेतू होतो. हें स्वधर्माचरण जो निष्ठेनें पार पाडतो तोच परमेश्वराचा सेवक आणि तोच धन्य होय.



**सदा बोलण्यासारिखें चालताहे ।**
**अनेकीं सदा येंक देवासि पाहे ।।**
**सगूणीं भजे लेश नाहीं भ्रमाचा ।**
**जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ।।४९।।**

''**बोले तैसा चाले त्याचीं वंदावीं पाऊलें**'' असें संतवचन प्रसिद्ध आहे आणि हें वागणें कधीं तरी प्रसंगाविशेषीं किंवा देखाव्यापुरतें असून चालत नाही तर तें नित्याच्या जीवनाचा एक आवश्यक भाग म्हणून असावें लागतें. दिलेले वचन वा दिलेला शब्द पाळणें एवढा मर्यादित अर्थ या चरणाचा नाही. चांगलें वागण्यासंबंधींच्या आपल्या कांहीं धारणा असतात, आणि आपण त्या बोलून दाखवित असतो, किंवा विद्वत्तेच्या, अनुभवाच्या व वडिलकीच्या नात्यानें आपण कांही प्रसंगानें वा कांहीं प्रसंग नसतांहि दुसऱ्यास शिकवीत असतो. हें असें मला आवडत नाहीं, हें असें मी कधीं करणार नाहीं अशी प्रौढीहि मनुष्य सहजपणें मिरवीत असतो पण तसें वागण्याचा प्रत्यक्ष प्रसंग उभा राहिला म्हणजे मात्र ज्याप्रकारचें बोलणें आपण केलें होते तदनुरूप वागणें माणसाच्या हातून घडत नाहीं. ''**परोपदेशे पांडित्यं सर्वथा सुकरं नृणां। धर्मे स्वीयमनुष्ठानं कस्यचित् सुमहात्मनः।।**'' असें सुभाषित आहे ते यासाठींच. बोलणें नेहमीच सोपें, तें कृतीत आणणें हें येरागबाळाचें काम नोहे. पण सत्पुरुषांच्या विषयांत मात्र हें सहज असतें. सर्वसामान्य माणसाच्या उक्ति-वृत्ति-कृतींत मेळ नसतो पण सत्पुरुषाच्या मात्र जें बोलण्यांत तेंच मनांत व जें मनांत तेंच कृतींत दिसतें, म्हणून समर्थ त्याला धन्य असें म्हणतात.

आपले तत्त्वज्ञान सांगतें कीं सृष्टिनिर्मितीच्या प्रक्रियेत एकच सद्वस्तु अनेक रूपांनीं नटतें वा नानाविध प्रकारांनीं भासते. त्यामुळें त्या विविधतेमधें नांव, आकार, गुण आणि रंगहि अनेक प्रकारचे असतात. पण तरीसुद्धा त्याच्या मुळाशीं असलेलें तत्त्व एकरूपच असतें आणि हा सिद्धांत जाणत्या माणसाला ठाऊक असल्याने विविधता त्याच्या वृत्तीला विचलित करूं शकत नाहीं.

''यच्चकिंचित् जगत् सर्वं दृश्यते श्रूयतेऽपि वा ।
अंतर्बहिश्च तत् सर्वं व्याप्य नारायणः स्थितः ।।

हा वैदिक सिद्धांत सर्व संतमहंतांच्या अनुभवास आलेला असतो आणि त्यामुळें प्रकृतिभेदाला अनुसरून असलेला संप्रदायभेद व तदंतर्गत देवताभेद व उपासनाभेद त्यांचे ठिकाणीं उपेक्षेची वा द्वेषाची भावना निर्माण करूं शकत नाहीं. अनेक संप्रदायांत त्याला एकच धर्म दिसतो. अनेक नामरूपें असलेल्या मूर्तींच्या

आकारात तो एकच देव पाहतो. त्यामुळें सर्वांभूतीं भगवद्भाव हा त्याचा सहजस्वभाव होतो. त्याच्या अंत:करणांत द्वेष राहत नाहीं. आणि केवळ वेगळेंपणामुळें त्याचें कुणाशीं भांडण होत नाहीं. माझ्यासारखा वागशील तर मी तुला मानीन असा एकरूपतेचा (Uniformity) तो कधीं आग्रह धरीत नाहीं, आणि तरी सर्वत्र एकता (Unity) भरून राहिली आहे हीच त्याची धारणा असते.

हिंदु संस्कृतीनें याच भावनेचा परिपोष तत्त्वज्ञानांतून आणि आचार-विचारांतूनहि केलेला आहे. जें जिथें जसें आहे तें तिथें तसें वस्तुत: भगवद्रूपच आहे हा अनुभव ज्याच्या जीवनांत ओतप्रोत भरलेला असतो आणि त्यामुळें आपले सोडण्याची, दुसऱ्यांचे स्वीकारण्याची वा आहे तें पालटण्याची आवश्यकताच ज्याला उरलेली नाहीं तो परमेश्वराचा भक्त धन्य होय.

वेदान्तशास्त्र सांगतें कीं मूलभूत ब्रह्म हें निर्गुण, निराकार, अनिर्वाच्य, मनबुद्धीला अगोचर 'केवल' असें आहे. असें असलें तरी साधकाला उपासनेसाठीं कोणत्या तरी गुणाचा अवलंब करावाच लागतो. इतकेंच नव्हे तर कोणत्याहि अवस्थेंत साधना सोडतां येत नाहीं. यावद्देह साधना ही करावीच लागते. पूर्ण झाल्यावर साधना सुटते हें कितीहि खरें असले तरी पूर्णतेची जाणीव होणें हें अपूर्णतेचें महत्त्वाचें लक्षण शास्त्रानें सांगितलें आहे; त्यामुळें साधना कधीं सोडतां येत नाही. ती कदाचित् सुटेलहि पण सुटणें आणि सोडणें यांतील अंतर आकाश-पाताळा इतकें आहे. साधना म्हटलें कीं तिला गुणांचा आश्रय असावाच लागतो. सत्पुरुष साधनेचा कधीं त्याग करीत नाहीं आणि स्वभावत:च मग सगुण-भजनाचा त्याला कधीं कंटाळा येत नाहीं. परमेश्वर शरणागतवत्सल असल्यामुळें भक्तासाठीं तो लीलेनें सगुण साकाररूप धारण करतो आणि तें त्याच्या निर्गुण निराकार रूपाइतकेंच श्रेष्ठ असतें. पूर्णताप्राप्त ज्ञानीहि आपल्या संतत्वाला जागून लोककल्याणासाठीं या सगुण साकार उपासनेचाच आवडीनें पुरस्कार करीत असतो. संतांची ती वृत्तीहि आहे आणि कर्तव्यहि आहे. तुकाराम-ज्ञानेशादि इतर संतांप्रमाणेंच समर्थांनींहि या सगुणोपासनेचा निष्ठेनें पुरस्कार केलेला आहे. पण असें असलें तरी ब्रह्म आपल्या मूळ रूपांत केवळ निर्गुणच आहे याविषयी संतांच्या अंत:करणांत कोणताहि संदेह नसतो आणि म्हणून लोकसंग्रहासाठीं सगुण-भजनाचा अवलंब करीत असतांनाहि त्यांच्या अंत:करणांत ज्ञानभक्ति ही अंततोगत्वा एकरूपच असते आणि ब्रह्म हें अवाङ्मनसगोचर असून केवळ सत्तामात्र आहे आणि या ब्रह्माव्यतिरिक्त कांहींहि, कोठेंहि, कधींहि अस्तित्वांत नव्हतें, नाहीं व येणारहि नाहीं याविषयी संत पूर्णपणें नि:शंक असतात. असा जो महापुरुष आहे तो परमेश्वराचा भक्त धन्य होय.



**नसे अंतरीं कामकारी विकारी ।**
**उदासीन जो तापसी ब्रह्मच्यारी ।।**
**निवाला मनीं लेश नाहीं तमाचा ।**
**जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ।।५०।।**

थोर सत्पुरुष हा अंत:करणामध्यें कामानें भारलेल्या विकारांनीं युक्त नसतो हें सर्वांनीं समजून घेतलें पाहिजे. सत्पुरुषाच्या अंत:करणांत, जीवनांत किंवा कृतींत कोणत्याहि स्वरूपाचा विकार नसतो असें नाहीं. कारण विकार शब्द आपण समजतो त्या अर्थी संपूर्ण वाईट नाहीं. ती एक निसर्गक्रमानें प्राप्त होणारी अवस्था असते आणि कांहीं वेळा, कांहीं प्रमाणांत ती आवश्यक, इष्ट किंवा उपयुक्त असते. बाल्य, तारुण्य, वार्धक्य हे जीवनाचे विकारच आहेत. साय, तूप, लोणी, दही, ताक यांना शास्त्रीय भाषेंत दुग्धविकृति म्हणजे दुधाचे विकार असेंच म्हणतात. दागिने हा सोन्याचा विकारच आहे. तेव्हां विकार म्हटलें कीं तो त्याज्य हें मानणें योग्य नव्हे. विकाराची त्याज्यता, अनिष्टता लक्षांत यावी म्हणून समर्थांनी विकाराला कामकारी असें विशेषण दिलेलें आहे.

एका प्रकारचे विकार जसें इष्ट, उपयुक्त अपरिहार्य असतात तसे दुसऱ्या प्रकारचे नसतात. दूध नासणें आणि दुधाचें दही होणें यांची प्रक्रिया सारखीच असते. त्यामुळें ते दोन्हींहि दुधाचें विकारच होत; पण नासलेलें दूध हें त्याज्य आहे. दही आवडीनें खाल्लें जातें. तसेंच माणसाच्या अंत:करणांतील विकारांचे आहे. स्वरूप, प्रमाण आणि देशकालपरिस्थिति याप्रमाणें हे विकार इष्ट वा अनिष्ट असूं शकतात. आपण ढोबळ दृष्टीनें वरवर विचार करतो तेव्हां दोन्हीं सारखेच दिसते. पण तें खरें नव्हे. अश्वत्थाम्याच्या अधमपणामुळें मृत झालेल्या उत्तरेच्या मुलाला जिवंत करतांना मी असत्य बोललों नसेन, अधर्मानें वागलों नसेन, रणांगणातून पळालों नसेन, तर हा बालक जिवंत होवो इत्यादि इत्यादि प्रतिज्ञा भगवान् श्रीकृष्णांनीं केल्या होत्या, आणि ते बालक जिवंत झालें असें वर्णन महाभारतांत आहे. आता वरवरच्या अर्थानें नैतिक वर्तनाच्या या कसोट्या श्रीकृष्णाच्या चरित्राला लावण्याची सोय आहे कां? द्रोणवधाच्या प्रसंगीं त्यांनें सांगितलेली युक्ति, जरासंधाच्या आक्रमणाच्या वेळीं शेवटच्या वेळेला मथुरेहून केलेलें पलायन, सोळा हजार एकशें आठ स्त्रियांचा केलेला स्वीकार इत्यादि सर्व वरवर विचार करता त्याच्या प्रतिज्ञेशी विसंगत आहे असे दिसते. श्रीकृष्णाच्या बाललीलांत तर 'मी माती खाल्ली नाहीं.' असे त्याच्या खोटें बोलण्याचे प्रकार सूरदासादि संतांनीं गायिले आहेत. यावरून हें लक्षांत येईल कीं श्रीकृष्णाचा अवतार हा धर्मरक्षणासाठीं

असल्यानें त्याची प्रत्येक कृति शुद्ध नि:स्वार्थ भावनेनें लोकसंग्रहासाठीं लोककल्याणासाठीं केलेली होती. आणि त्यामुळें ती श्रेष्ठ, पवित्र, आदरणीय अशीच होती आणि ती तशीच मानली पाहिजे.

व्यासवसिष्ठादि प्रज्ञावंत महर्षींना, ज्ञानेश्वरादि संतांना, छत्रपती शिवाजी, लोकमान्य इत्यादि राष्ट्रपुरुषांना जन्म देणारा काम हा इष्टच असतो. ''नाठाळाचें माथीं काठी मारणाऱ्या'' तुकारामांसारख्या भगवद् भक्तांच्या अंत:करणांतील क्रोध वंदनीय असतो, आवश्यक असतो. आई प्रेमभरानें बालकाचें चुंबन घेते त्यापेक्षां हित व्हावें म्हणून, मुलाला चांगलें वळण लावण्यासाठीं, संतापून थोबाडींत देते तेव्हां तिचें वात्सल्य अधिक उत्कटतेनें अनुभवास येतें, असेंच जाणत्यांना वाटतें.

केवळ विकारी आणि कामकारी विकारी यांतील अंतर आतां लक्षांत येईल.

श्रीगोंदवलेकर महाराज संपत्तीच्या वाटणीच्या निमित्तानें भाऊबंदांशीं भांडत असत, अपशब्द उच्चारीत, असें वर्णन त्यांच्या चरित्रांत आहे. कारण व्यवहारांत तें आवश्यक होतें. महाराजांचें मोठेंपण असें कीं असलें भांडण त्यांच्या डोक्यावर बसलें नाहीं, डोक्यांत चढलें नाहीं. असे कामकारी नसलेले विकार कोठें दिसले तर ते त्याज्य मानण्याचें कारण नाहीं. कच्ची कैरी पिकून आंबा होतो हाहि विकारच, आणि पिकलेला आंबा सडतो हाहि विकारच; दोन्ही सारखेच त्याज्य नसतात. साय, दही, लोणी, तूप यांना दुधाचे विकार (दुग्धविकृति) असेच म्हणतात. त्यांचा उपयोग चांगलाच असतो. विकार जेव्हां पूर्णपणें नियंत्रित असतो, व्यक्तीच्या स्वाधीन असतो, धर्माच्या मर्यादा पाळून असतो, हेतुत: शुद्ध असतो, खऱ्या अर्थानें संरक्षण, प्रगति, विकास यांना पोषक असतो तेव्हां तो इष्ट असतो, आवश्यक असतो. थोर भगवद्भक्तांचे विकार असलेच तर असे असतात. ते कामकारी कधींच नसतात. ते **'कामु करवी ते करिती।'** असे कधींच नसतात. म्हणून ते धन्य होत.

ही सर्व त्याच्या अंत:करणाची प्रवृत्ति आहे. ती बाहेरून ओळखतां येईलच असें नाहीं. सत्पुरुष बाहेरून कसा दिसेल तें सांगता येणार नाहीं. कावीळ झालेल्या माणसाला जसें सगळेंच पिवळें दिसतें त्याप्रमाणें धनेषणेंत, दारेषणेंत गुंतलेल्या सामान्य माणसांना निरिच्छ, निरपेक्ष संतहि विषयासक्त किंवा प्रसिद्धिलोलुप आहेत असें वाटतें. अंतरंग शोधण्याची पात्रता सर्वांनाच नसते आणि संतत्व ओळखणें हा तर अंतरंगाचा विषय आहे. रत्नांचा परीक्षक विरळा तसे संत ओळखणाराहि विरळाच. समर्थांनीं अंतरीं शब्दाचा उपयोग केला आहे तो या दृष्टीनेंच.



बाहेरून संत कदाचित् विकारीहि दिसेल पण अंतरीं-आंतून-तो कामकारी नसेल. कारण तो–या श्लोकाच्या दुसऱ्याच ओळींत सांगितल्याप्रमाणें–वस्तुत: उदासीन, तापसी आणि ब्रह्मचारी असा असतो. उदासीन म्हणजे अलिप्त, तटस्थ, निर्मम, औत्सुक्य नसलेला. उदासीन म्हणजे माणूसघाणा नव्हे, तुसडा नव्हे, गर्विष्ठ तर नव्हेच नव्हे. उदासीन म्हणजे रड्या नव्हे. ज्याची स्थिति सर्वप्रकारच्या त्याज्य विकारांपासून, कामक्रोधादि षड्विकारांपासून, मायाममतेपासून वेगळी असते, वरची असते, विकार खाली असतात, जो त्यांपासून वर असतो, तो उदासीन. विकार त्याच्यापर्यंत पोंचूं शकत नाहींत आणि म्हणून ते त्याला त्याच्या स्थानापासून भ्रष्टहि करूं शकत नाहींत.

तापसी म्हणजे तपस्वी, तप करणारा, तितिक्षा असणारा, कष्टाला न कंटाळणारा, सोशिक. परमार्थांतील हा एक फार महत्त्वाचा सद्‌गुण आहे. सामान्य माणसाला कांहीं सोसत नाहीं, कोणाचें बोलणें सोसत नाहीं, कोणाचें वागणें सोसत नाहीं. उन्हाळ्यांत ऊन, पावसाळ्यांत पाऊस, थंडीत थंडी हें सर्व बाधतें. त्यांतील कांहीं सोसत नाहीं. शारीरिक, मानसिक पातळीवर संयमाची संवय नसते, आणि त्यामुळें जें जें काही घडतें तें पीडाकर ठरतें. क्षोभ निर्माण करणारें ठरतें. तापसी हें सर्व सहन करतो. क्रियेशी प्रतिक्रिया असें त्याच्या ठिकाणी घडत नाही. कारण त्याच्या ठिकाणी तितिक्षा असते, क्षमाशीलता असते, सोशिकपणा असतो. आणि हें सर्व घडतें तें उदासीनतेतून घडते. तापसी अगतिक नसतो, दुर्बल नसतो. कित्येकवेळां माणसे प्रतिकूल परिस्थितींत गप्प बसलेली दिसतात, पण आंतून वेदनेनें तळमळत असतात. रागानें त्यांचा जळफळाट झालेला असतो. हें खरें तप नव्हे. तितिक्षा असावी लागते. तें खरें तप. ''आली ऊर्मि साहे, तुका म्हणे थोडे आहे'' असें म्हणून तुकोबारायांनीं साधकाला उत्कृष्ट मार्गदर्शन केलें आहे.

संत हा उदासीन असतो. म्हणून तापसी असतो आणि म्हणूनच ब्रह्मचारीहि राहूं शकतो, राहतो. उदासीनता ही संताची सहजप्रवृत्ति आहे, तापसी ही परिस्थितिवशात् अनुभवास येणारी अवस्था आहे, आणि ब्रह्मचारी हा या दोहींचा आचरणामध्येंहि दिसून येणारा स्वाभाविक परिणाम आहे. ब्रह्मचारी शब्दाचा मूळ अर्थ 'ब्रह्मणि चरति,' 'ब्रह्मणे चरति,' ब्रह्मांत राहणारा, ब्रह्माकरितां जगणारा, ब्रह्माच्या प्राप्तीसाठी प्रयत्नशील असा आहे. यासाठी त्याला बहिर्मुखता सोडून अंतर्मुख व्हावे लागतें, विषयासक्ति सोडून ध्यानमग्न व्हावें लागतें. आणि मग त्याचा परिणाम लौकिकार्थानेहि ब्रह्मचर्यपालनात होतो. मनांत उत्पन्न होणाऱ्या अनेक प्रकारच्या वृत्तींवर आणि मग इंद्रियांवरहि संतांचें पूर्ण स्वामित्व असतें.

इंद्रियें त्यांच्या स्वाधीन असतात म्हणून त्यांना वशी म्हणतात. इंद्रियें त्यांची सेवक होतात म्हणून त्यांना गोस्वामी म्हणतात. ऋषीकेश शब्दाचा अर्थहि तोच आहे– ''वशे हि यस्येंद्रियाणि'' कारण हृषीक शब्दाचा अर्थ इंद्रिय असा आहे. आपण हें विशेषण परमेश्वरासाठी वापरतो. देवभक्त एकरूप होत असल्यानें भक्तहि देवाप्रमाणें इंद्रियांचे स्वामी असतात. ब्रह्मचारी शब्दांतील अर्थाची व्यापकता मोठी आहे. स्थूल शारीरिक क्रियेपुरता त्याचा अर्थ मर्यादित करणें हें चुकीचें आहे. तेवढाच अर्थ करून वागण्यामधें शारीरिक, मानसिक विकृतीहि निर्माण होते आणि मग तथाकथित बुद्धिवादी, ब्रह्मचर्य हें दोषास्पद ठरविण्याचा प्रयत्न करतात. ब्रह्मचारी शब्दाचा खरा अर्थ आणि त्यामागील व्यापकता लक्षांत यावी म्हणून समर्थ उदासीन, तापसी आणि ब्रह्मचारी हे शब्द एकाच संदर्भांत, संतत्वाच्या संदर्भांत, एकत्र वापरतात. हे तिन्ही भाव परस्परपूरक आणि एकमेकांना आधारभूत असे आहेत, ते तसे असतील तरच सुख, समाधान, प्रसन्नता देणारे होतात. संतांच्या ठिकाणीं हे तिन्ही भाव जणूं एकरूपतेनें असतात आणि म्हणून ते धन्य होत.

संतांच्या ठिकाणी कामकारी विकार नसतात, ते उदासीन असतात, तापसी असतात, ब्रह्मचारीहि असतात आणि याचा परिणाम म्हणून ते मनामध्यें निवलेले असतात. शांत असतात. त्यांचें अंत:करण प्रसन्न असतें. आनंदी असतें. आपण आपल्या सोयीसाठीं ईश्वराच्या भक्तांवर संकटें येतच नाहीत असें समजतो. कांहीं संतवचनांमुळें ईश्वर भक्तांना सर्व संकटांतून तारून नेतो अशी आपली समजूत झालेली असते. मर्यादित अर्थानें तसें घडतेंहि. पण तें आपण समजतो तितकें व तसें खरें नसते. सर्व थोर संत-महंतांच्या, ईश्वराशी जवळिक साधली आहे अशा महात्म्यांच्या, महापुरुष म्हणून जे विख्यात आहेत अशा थोर व्यक्तींच्या, जीवनाचाच जर आपण विचार केला तर अनेक प्रकारचीं संकटें, आपत्ती, त्यांच्यावर कोसळलीं होतीं असेंच आढळून येते. स्वत: भगवान् रामचंद्र, धर्मराज युधिष्ठिर, ज्ञानेश्वर, तुकोबाराय, भगवद्‌भक्त मीरा, संतसखू, रामकृष्ण परमहंस, रमणमहर्षि या सर्व थोरांच्या जीवनामध्यें कोणत्या ना कोणत्या प्रकारचीं संकटें उग्र स्वरूपात आलेलीं होतीं असें दिसतें. ज्या संकटांच्या आघातांनीं सामान्य माणूस खचून गेला असता, पार मातीला मिळाला असता अशीं संकटें या महात्म्यांनी भोगलीं. व्यावहारिक अर्थानें आपण ज्याला हाल, अपेष्टा, दु:ख, ताप, व्याधि मानतो त्यांतून हे कोणी सुटलेले नव्हते. संतांची थोरवी-संकटें न येण्यांत नाहीं; आपत्तींतहि प्रसन्नचित्त राहण्यांत आहे. त्यांच्या अंत:करणांतून रजोगुण आणि तमोगुण यांचें प्राबल्य पार नाहींसे झालेलें असते. ही थोर मंडळी नित्यसत्त्वस्थ असतात आणि



म्हणून त्यांचे समाधान कधीं ढळत नाहीं, प्रसन्नता कधीं मळत नाहीं.

काम, क्रोध हीं रजोगुणाचीं अपत्यें खरीं पण तीं तमानें जणूं दत्तक घेतलीं आहेत. तमोगुणांचें काम, क्रोध या आपल्या पुतण्यांच्यावर प्रेम फार. आणि म्हणून त्यानें आपली मोहप्रमादादि संपत्ति त्यांना देऊन टाकली आहे, असें वर्णन श्रीज्ञानेश्वरमहाराजांनींहि केलें आहे. तेव्हां तमोगुण नाहींसा झाला कीं कामक्रोधांचें स्वरूपहि कामकारी राहत नाहीं. ते विकार त्याज्य या अवस्थेंत नष्ट होतात आणि त्याचा परिणाम म्हणूनच उदासीनतादि लक्षणें प्रगट होतात. अंत:करण शांत, प्रसन्न, समाधानी राहतें. सत्पुरुषाला ही स्थिति प्राप्त झालेली असते म्हणूनच त्याला सत्पुरुष म्हणावयाचे. असा हा ईश्वरभक्त धन्य होय.

**मदें मछरें सांडिला स्वार्थबुद्धि ।**
**प्रपंचीक नाहीं जयातें उपाधी ।।**
**सदा बोलणें नम्र वाचा सुवाचा ।**
**जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ।।५१।।**

लेश नाहीं तमाचा या संदर्भांत समर्थ त्या धन्य महात्म्याचें वर्णन करीत आहेत. वर्णनाची शैली मोठी गंमतीदार आहे. मदमत्सर, स्वार्थ यांनीच त्याला सोडलें आहे. एखादा प्रसाधनवस्तूचा प्रचारक वयोवृद्ध पतिव्रतेकडे यावा, आपल्या वस्तू तिथें खपविण्याचा त्यानें खूप प्रयत्न करावा पण त्याच्या लाघवी, आर्जवी, कुशल शब्दांचाहि कांही प्रभाव पडूं नये आणि मग त्यानें निराश होऊन निघून जावें तसें संतांपुढें या मदमत्सरस्वार्थाचें होतें. मद स्वाभिमानाचें रूप घेऊन येतो आणि म्हणतो स्वत्वरक्षणासाठी माझा स्वीकार केलाच पाहिजे. मत्सर महत्त्वाकांक्षेचा वेष परिधान करतो आणि सांगतो इतरांसारखे सामान्य, उपेक्षित, दीन, जीवन जगण्यांत काय अर्थ आहे. स्वार्थबुद्धि म्हणते जगावयाचें आहे ना! कुटुंबसंरक्षण हें कर्तव्य टाळून चालतें काय? समाजात राहावेंच लागतें ना? मग प्रपंचाला आवश्यक तें घेतलेंच पाहिजे, त्याचा संग्रह केलाच पाहिजे. पण हें सारें केवळ समर्थन आहे. यापेक्षां संतांचें वैशिष्ट्य असते. संतांना प्रपंच असूं शकतो, प्रकृतिभेद, प्रारब्धभेद, कार्यभेद, यामुळें हा प्रपंचहि निरनिराळ्या स्वरूपाचा असतो. कधी तेथें दारिद्र्य दिसेल तर कधी ऐश्वर्य दिसेल. पण त्याची उपाधि त्यांना जडलेली नसेल. त्यांनी लोककल्याणासाठी, लोकसंग्रहासाठी जडवून घेतली असली तरी ती परमार्थांतील उपाधि. त्या स्थितीस उपाधि म्हणणें हें केवळ वरवरच्या अर्थानेंच असते; खरें नसतें.

सामान्य माणसें प्रापंचिक उपाधि वाढवितात. त्यांना ती गोष्ट आवश्यक

वाटते आणि हें कशाला म्हणून परमार्थाकरितां कराव्या लागणाऱ्या गोष्टीचा कंटाळा करतात. तेथें त्यांना साधेपणाचें महत्त्व पटत असतें. प्रपंचांतल्या उपाधि ह्या माणसाला दिवसेंदिवस मोहग्रस्त करून घोटाळ्यांत पाडतात. आणि मग सुखदु:खाच्या भोंवऱ्यांत गिरक्या घेत तो अधिकाधिक खोलांत जात राहातो. परमार्थातील उपाधि ह्या साधकदशेंत प्रगतीसाठीं आरंभीं स्वीकाराव्या लागल्या तरी पुढें पुढें त्यांची आवश्यकता कमी होऊन त्या सुटून जातात. पोहावयास शिकणाऱ्या माणसानें, भोपळा बांधून घेण्यासारखें हें आहे. 'भोपळा तरी बांधतांच ना! मग आमचें गांठोडें असूं द्या' हे म्हणण्यांत कांही अर्थ नसतो. प्रपंचांतल्या उपाधि या गांठोड्यासारख्या आहेत. तरून जाण्याच्या दृष्टीनें तो अडथळा आहे. अलीकडे घरांत देव्हारा नसतो पण ड्रेसिंग टेबल मात्र अपरिहार्य झालेलें आहे. संध्या करतो म्हटलें तर झारी, ताम्हन वा पळी-पंचपात्री मिळत नाहीं. पण लेमनसेट आणि टी सेंट यांनी कांचेच्या कपाटांना शोभा आणलेली असते. ध्यान धारणा तर जाऊं द्या पण संध्येलाहि वेळ नसतो. पण कपड्यांना इस्त्री, बुटांना पॉलिश, नेकटायची गांठ चांगली मारण्यासाठीं प्रयत्न करणें यांत कितीतरी वेळ जातो. तो कारणीं लागल्यासारखा वाटतो. सोवळ्यांत चालणारें रेशमी वस्त्र घरांत मिळणार नाहीं. पण कपड्याच्या ढिगानीं कपाटें ओसंडलेलीं असतील. संत जेवत नाहीं, उघडा हिंडतो, झाडाखालीं राहतो असें नसतें. पण प्रपंचाच्या उपाधींत तो गुरफटलेला राहत नाहीं. साधनें म्हणून कांहीं गोष्टी त्याच्याहि संसारांत असतील. लौकिकांत वावरावयाचें तर असा संग्रह करावाहि लागतो. परंतु आवश्यक उपयुक्तता निराळी आणि ऐश्वर्याची हौस निराळी. पहिली गोष्ट साधन आहे. दुसरीला उपाधि म्हटलें पाहिजे. संताजवळ ती नसते, म्हणून सामान्यापेक्षां तो वेगळा उमटून दिसतो. आणि साहजिकच धन्यतेस पात्र होतो.

संतांच्या अंत:करणामध्यें मदमत्सराला वाव नसल्यानें त्यांचें बोलणें हें चांगलें असतें, चांगल्या संबंधी असते, चांगल्याकरितां असते. आणि जें सांगावयाचें तें ते सर्व वेळीं नम्रतेनें, हळुवारपणें, सौजन्यानें, मधुर शब्दांत सांगतात असें समर्थ म्हणतात.

सत्पुरुषाचें बोलणें कसें असते याचें उत्कृष्ट वर्णन ज्ञानेश्वर महाराजांनी केलें आहे. ''**मग प्रार्थिला विपाये। जरि लोभें बोलों जाये। तरि परिसे तया होये। मायबापु।। कां नादब्रह्मचि मुसे आले। कीं गंगापय असळले। की पतिव्रते आलें। वार्धक्य जैसे।। तैसे साच आणि मवाळ। मितळे परि सरळ। बोल जैसे कल्लोळ। अमृताचे।। विरोधु वादबळु। प्रणितापढाळु। उपहासु छलु। वर्मस्पर्शु।। आटु वेगु विंदाणु आशा शंका प्रतारणु। हे संन्यसिले अवगुणु। जिया वाचा।।** (ज्ञा. १३।२६७-७१) आधीं सत्पुरुषाला बोलण्याची फारशी हौस नसते पण जिज्ञासु साधकाने विनवणी केल्यावर त्याच्यावरील प्रेमानें बोलावयास लागेल आणि तें बोलणें स्नेहानें, कृपावात्सल्यानें असें ओथंबलेलें असेल कीं आपल्याला जणु मायबाप भेटले असेंच ऐकणाराला वाटेल. त्याचे शब्द नादब्रह्म साकार झाल्याप्रमाणें मंजुळ असतील. त्यांना खळखळून वाहणाऱ्या गंगेंचें पावित्र्य असेल. त्यांतील निरपेक्षता वृद्ध झालेल्या पतिव्रतेलाहि मागें सारण्याइतकी उत्कट असेल. तें सत्याला धरून असलें तरी कठोर नसेल. बोलणें सरळ असेल त्यांत फापटपसारा नसेल आणि शब्दांचें माधुर्य जणूं अमृतावर तरंग उठावेत असें लोभनीय वाटेल. संतांच्या बोलण्यामध्यें उपरोध, भांडणतंट्यास उत्तेजन, टिंगल, तिरस्कार, मर्मभेदकपणा, हट्ट, कपट, आवेश, वंचकता, भ्रमोत्पादकता, पापाकडे प्रवृत्त करील अशी मादकता इत्यादि दुर्गुणांचा लवलेशहि नसेल. समर्थ सुवाचा आणि नम्रवाचा असें म्हणतात तें यासाठींच. पण हें बोलणें हे मायबापाचें बोलणें आहे हे लक्षांत ठेवलें पाहिजे. कारण यांतील कोमलता, नादमाधुर्य हे गुण केवळ बाह्यार्थानें विचारांत घेतले तर मग श्रीतुकाराम महाराज आणि समर्थ रामदासस्वामी हेच त्याला पुष्कळ प्रसंगीं अपवाद ठरायचे आणि मतें मिळविण्यासाठीं पुढारी ज्या पद्धतीनें निवडणुकीच्या वेळीं आपल्या मतदार संघाशीं जसें वागतो, बोलतो तोच नम्रतेचा आदर्श ठरावयाचा. खरें म्हणजे अहंकारी उर्मटतेनें सोयीसाठी नम्रतेचा हा मुखवटा त्या पुढाऱ्यांनी धारण केलेला असतो. ज्ञानेश्वरींत मार्दव आहे. गाथ्यांत सांपडणार नाही, पण त्याची आवश्यकताहि नाही. आई संतापते, अत्यंत तापून 'मर मेल्या'हि म्हणते पण तिच्या तोंडातील 'मर मेल्या' हाच 'चिरंजीव भव' साठी अत्युत्कृष्ट आशीर्वाद असतो आणि म्हणून संतांच्या नम्र वाचेचा अर्थहि मातेच्या वात्सल्याच्या मापानें लक्षांत ठेवला पाहिजे. वाणीचे हे गुण ज्या महापुरुषाच्या ठिकाणी असतात तो परमेश्वराचा भक्त धन्य होय.



**क्रमी वेळ जो तत्वचिंतानुवादें ।**
**न लिंपे कदा दंभ वादें वेवादें ।।**
**करी सूखसंवाद जो ऊगमाचा ।**
**जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ।।५२।।**

परमेश्वराचा खरा भक्त कोण, धन्यता कोणती या अर्थाचें जें प्रकरण चालू आहे त्याचा मूळ उद्देश, संतांची लक्षणें सांगून त्यांची स्तुति करणें हा नाहीं, तर मनुष्य म्हणून जगावयास योग्य होण्यासाठीं कोणत्या गुणांची आवश्यकता असते ते या वर्णनाच्या निमित्तानें सांगितलें जात आहे. आपण नेहमी ज्याला धन्य

म्हणतो ते निराळे आणि खरी धन्यता असते अशी अवस्था निराळी. श्रीमत्शंकराचार्यांनींसुद्धां धन्य कोण त्याचें वर्णन केलेलें आहे. ते असें

शान्तैरनन्यमतिभिर्मधुरस्वभावै ।
रेकत्वनिश्चितमनोभिरपेतमोहैः ॥
साकं वनेषु विदितात्मपदस्वरूपं ।
तद्वस्तु सम्यगनिशं विमृशन्ति धन्याः ॥

शान्त, परमेश्वराच्या ठिकाणीं ज्यांची बुद्धि अनन्य झाली आहे, ज्यांच्या स्वभावांत गोडवा आहे, हें सर्व एकरूपच आहे, अद्वैतच आहे असा ज्यांच्या मनाचा निश्चय झालेला आहे, ज्यांना कशाचा मोह म्हणून उरलेला नाही, अशा सत्पुरुषांच्या संगतीत अरण्यांतील एकांतांत राहून आत्म्याविषयी वा सद्वस्तूच्या स्वरूपाविषयी वा ते आत्मस्वरूप अनुभवास कसें येईल याविषयीं जे परस्पर संवाद करतात ते धन्य होत. मनोबोधांतील या प्रकरणींच्या अनेक श्लोकांत त्याचा स्पर्श दिसेल. या ५२ व्या श्लोकांत विशेष रीतीनें हा प्रत्यय येतो.

सत्पुरुष मिळालेला मोकळा वेळ कसा घालवितो ते समर्थ सांगत आहेत. सद्भक्त आपला वेळ तत्वाचें चिंतन करण्यांत व त्याचा अनुवाद करण्यांत घालवितो. मिळालेला मोकळा वेळ माणसानें परमार्थ, अध्यात्म, तत्त्वज्ञान, सद्भक्ति, सद्धर्म, मोक्षसाधना यांच्या विचारांत घालवावा आणि त्यासाठीं उपनिषदें, रामायण, महाभारत, संतांचीं चरित्रें, दासबोध, गाथा, ज्ञानेश्वरी यांच्या पठणांत किंवा मननांत आणि तत्संबंधीच्या चिंतनांत मग्न असावे. आणि आपल्याला काय समजलें तें पुन्हां एकदां बोलावें, सांगावें, मांडावें. हा त्या केलेल्या तत्त्वचिंतनाचा अनुवाद. या दोन्हीं गोष्टीं माणसाने करणें आवश्यक आहे. नुसतें श्रवण वा वाचन कधीं उपयोगी पडत नाहीं, श्रवण-पठणाच्या मागोमाग चिंतन, मनन, निदिध्यासन आणि आचरण या गोष्टी क्रमाक्रमानें यथाशक्ति, यथामति, यथापरिस्थिति चढत्या वाढत्या क्रमानें प्रयत्नपूर्वक कराव्या लागतात. तत्त्वज्ञान हा परीक्षेसाठीं अभ्यासावयाचा विषय नसून तें आचरणांत उतरवावें लागतें. तो जीवनाचा सहज भाग झाला पाहिजे. आपल्याला समजतें तें नेमकें सत्य किती? मूळ सत्यापासून आपण किती जवळ वा दूर आहोंत? जें सत्य म्हणून आपल्याला पटलें, मानवलें तें आचरणात कसें उतरवावें? त्यासाठीं कोणत्या मार्गानें चालावें, साधनें काय? प्रगति कशी होत जाते? अडचणी कोणत्या येतात? त्यांतून पार कसें पडावें? हे सर्व चिंतन-मननांतून आणि काय समजलें तें निश्चित होण्यासाठीं केलेल्या अनुवादांतून स्पष्ट होत जात असतें. प्राचीन काळच्या अभ्यासपद्धतीत चिंतनिका म्हणून एक भाग असे. अनुवाद म्हणताना समर्थांना तोच अभिप्रेत असावा.



अनुवाद शब्दानेंहि नुसती पुनरावृत्ति अभिप्रेत नसून, तत्त्व आचरणांत आणणें असाहि अर्थ तत्त्वानुवाद या शब्दांचा करणें शक्य आहे. कारण बहुतेक सर्व शब्द गतिवाचक आहेत असें आपलें शास्त्र सांगतें, बारीक सारीक गोष्टींचा साधक बाधक विचार करावा लागतो, तो त्या गोष्टी आचरणांत आणण्यासाठींच. श्रवणाच्या मागोमाग चिंतन, मनन, निदिध्यासन असावें लागतें तें यादृष्टीनेंच महत्त्वाचें आहे.

या श्लोकाच्या पहिल्या ओळींत वेळ कसा घालवावा तें सांगून झाल्यानंतर समर्थ वेळ कसा घालवूं नये तें दुसऱ्या ओळींत सांगत आहेत. सज्जनाचें अंतःकरण दंभानें व विवादानें कधीहि लिप्त होत नाहीं असें समर्थ सांगतात. वादविवाद हा बहुधा स्वतःचा मोठेपणा दाखविण्यासाठीं, स्वतःची प्रतिष्ठा टिकविण्यासाठीं केला जातो. दुसऱ्याचें म्हणणें खरें असलें तरी येन केन प्रकारेण तें अमान्य करावयाचें. त्यासाठीं वितंडेचाहि आश्रय करावयाचा. आपलें योग्य कसें तें सांगावयाचेंच नाहीं. तुझें कसें चुकलें तेंच आग्रहानें मांडावयाचें. बोलण्यामागची ही भूमिका वेळेचा अपव्यय करणारी आहे. वादविवाद हा तत्त्वजिज्ञासेच्या भावनेनें केला जावा. त्यांत प्रामाणिकपणा असावा. दंभ वा दुराग्रह नसावा. बोलण्याचें स्वरूप आणखी एका प्रकारानें कसें असते ते समर्थ तिसऱ्या चरणांत सांगत आहेत, उगमासंबंधीं-मूलतत्त्व काय आहे. सृष्टीचा आरंभ कसा झाला? जीव, जगत्, जगदीश्वर यांचा परस्पर संबंध काय? कोणत्याहि प्रतिपादनाच्या मुळाशीं सत्य काय आहे? याचा विचार तो करतो आणि हें समजून घेण्यासाठीं जाणत्यांच्या सवें मनमोकळेंपणानें चर्चाहि करीत असतो हाच सुखसंवाद.

'काय आहे' तें समजून घेण्याच्या पाठीमागे मुळाशीं जाऊन पाहण्याची प्रवृत्ति जर नसेल तर जें लिहिलें गेलें, मांडले तेंच खरें मानून तसेंच आपलेंही मत बनण्याचा दुर्धर प्रसंग ओढवतो. आजकालच्या बऱ्याच लेखकांच्या महाभारतविषयक लेखनामुळें सामान्याचेंच काय पण न्यायाधीशाच्या पदावरून काम करणाऱ्या सुशिक्षितांचेहि अपसमज कसें झालेले असतात तें मी अनुभविलें आहे. यासाठीं मुळाशीं जाऊन पाहण्याची प्रवृत्ति जिज्ञासूमध्यें असली पाहिजे.

जिव्हाळ्याची मंडळी भेटली की त्यांच्याशी चर्चा करणें हे घडतेंच पण त्याचें स्वरूप वर्तमानपत्रीं नसावें. समोरच्याची स्तुति आणि अनुपस्थिताची निंदा हें गप्पागोष्टींतून होऊं नये. माणसानें बोलावें पण त्याचा संबंध पुरुषार्थाशी असावा. मग त्यांत अर्थ-कामांची, शास्त्रीय चर्चा आली तरी चालेल. वात्सायनासारख्या ऋषीनीं कामशास्त्र लिहिलें आहे आणि तो अभ्यासाचा विषय आहे. या शास्त्राच्या अभ्यासानें जितेंद्रियत्व प्राप्त होतें असें वात्सायन ऋषि म्हणतात. कोणत्यही विषयाचें विवेचन जेव्हा शास्त्रपातळीवर होतें तेव्हां तें मूलगामी ठरतें. प्रगतीचा

एक महत्त्वाचा टप्पा म्हणून उपयोगी पडतें. माणसानें असा सुखसंवाद करावा. आपण आपला वेळ कोणत्या तऱ्हेच्या गप्पागोष्टींत घालवितो याचा विचार माणसांनीं, समर्थांनीं सांगितलेल्या या सत्पुरुष लक्षणांच्या माध्यमांतून केला पाहिजे.

**सदा आर्जवी प्रीय जो सर्व लोकीं ।**
**सदा सर्वदा सत्यवादी विवेकी ।।**
**न बोले कदा मिथ्य वाचा त्रिवाचा ।**
**जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ।।५३।।**

आपण मराठी भाषेंत सामान्यत: आर्जवी शब्दाचा अर्थ गोड बोलणारा, नम्रपणें बोलणारा, असा करतो. मुळांत आर्जव हा शब्द ऋजु म्हणजे सरळ या शब्दावरून आला आहे. तेव्हां आर्जव म्हणजे सरळपणा. त्याच्यावरून आर्जवी हा मराठी शब्द बनला. आर्जवी बोलणें हे लाळघोटेपणाचें बोलणें नव्हे. सभेंतील मानपत्राच्या वेळचे, वाढदिवसाच्या वेळचे, वा सत्कारसमारंभाच्या वेळचें हें बोलणें नव्हे. तीं बोलणी तोंडदेखली, तोंडपूजेपणाची, दांभिक अशीं असतात. ज्याला माघारी शिव्या दिल्या जातात त्याच्याच ओव्या व्यासपीठावर गायिल्या जातात. सरळ बोलणें हें सौजन्याचें व शिष्टाचाराचें असूं शकतें. परंतु ती दीनता, खोटी नम्रता, लाचारी म्हणजे आर्जव नव्हे. पुढच्या दोन ओळींतील आशय लक्षांत घेतला म्हणजे समर्थांना आर्जव शब्दानें काय अभिप्रेत आहे तें कळतें.

उलट दिशेने पाहतां आर्जव म्हणजे सरळपणा पण सरळपणा म्हणजे फटकळपणा वा तुसडेपणाहि नव्हे. वाईटाला वाईट म्हणतांना अपशब्द वापरलेच पाहिजेत असें नाहीं. स्पष्ट सरळ बोलणें हे शिष्टाचार संभाळूनहि करतां येते आणि तेंच समर्थांना अभिप्रेत असल्याने आपल्या आर्जवी बोलण्यानें लोकांमध्यें तो प्रिय असतो असे रामदास म्हणतात.

सत्पुरुषाविषयींची समर्थांची ही अपेक्षा कितपत फलद्रूप झाली असेल वा होईल हें सांगणें कठीण आहे. **'अप्रियस्य च पथ्यस्य वक्ता श्रोता च दुर्लभः'** अशीच स्थिति सामान्यत: समाजांत पाहावयास मिळते. कारण जें जें पथ्याचें आहे तें तें बहुधा अप्रियच असतें. औषध आणि चवीला गोड ही स्थिति अपवादात्मकच. अलीकडे गोळ्यांना वरून साखरी पाक चढवतात पण बोलण्याच्या बाबतीत तसें करूं असें म्हटलें तर दांभिकता वा वंचकता यांचा अवलंब करावा लागतो. निजकल्याणाची इच्छा असेल तर माणसानेंच जें हिताचें आहे, पथ्याचें आहे, तें गोड मानून घेण्यास शिकलें पाहिजे. आपत्ति येऊन कोसळल्यावर मग माणसें



पथ्य स्वीकारतात. कडू गोळ्याहि मग निरुपायानें गिळतात. पण तें खरें श्रेयस्कर नव्हे. रोग होऊंच नये म्हणून आहार विहार नियंत्रित करणें चांगलें, पण त्यासाठीं आवडी निवडी नेमस्त कराव्या लागतात. आणि तेंच माणसाला भावत नाहीं व त्यामुळेंच सरळ स्पष्टवक्ता माणूस लोकप्रिय होण्याची शक्यता फार थोडी. म्हणून सत्पुरुषाच्या संदर्भात सरळपणा हेंच गमक मानलें पाहिजे, लोकप्रियता हें गमक मानणें योग्य नाहीं.

जीं माणसें स्वभावत: सज्जन असतील, ज्यांचा अहंकार उग्र नसेल, ज्यांच्या आचार-विचारांना विवेकाचें अधिष्ठान असेल आणि निदान ध्येयवाद म्हणून तरी ज्यांना हिताची नीट कल्पना आलेली असेल, तीच संभावित माणसें स्पष्ट सरळ भाषणावर प्रेम करूं शकतील. अशी माणसें जेव्हां समाजांत बहुसंख्येनें असतील तेव्हांच संतांचें मार्गदर्शन प्रत्यक्ष परिणामाच्या दृष्टीनें यशस्वी होऊं शकते.

केवळ अनुयायांची दाटी हेंच संतत्वाचें गमक मानलें तर अनाचाराला स्पष्टपणें उत्तेजन देणारी आणि मुक्ततेच्या भूमिकेवर स्वैर स्वातंत्र्याचा पुरस्कार करणारी व्यक्ति, भगवान् म्हणून मिरवते, तीच आदर्श म्हणावी लागेल. पण त्याकरितांच मग स्वतंत्र मनोबोध लिहिला पाहिजे, व तेंहि काम अनेक पुस्तकांच्या रूपानें चालूं झालेलें आहेच. आपल्या भारतीय परंपरेचा आणि अर्थातच तुकाराम-रामदासादि संत सत्पुरुषांचा स्वैराचाराला पूर्ण विरोध आहे. त्यांनीं संयमाचें आणि सदाचरणाचेंच तत्त्वज्ञान प्रतिपादिलें आहे आणि वस्तुत: तेंच समाजाच्या हिताचें आहे. हें न कळणें आणि आकर्षक व्यक्तिमत्वाला व रसाळ वक्तृत्वाला मोहून, भ्रांत तत्वज्ञानाला बळी पडून, वहावत जाणें हेंच माणसाचें दुर्दैव आहे. संतांच्या जीवनांतील सरळपणा महत्त्वाचा, लोकप्रियता महत्त्वाची नाहीं असें म्हणतों तें यासाठींच.

माणसाला सरळ आणि स्पष्टपणाचेच आकर्षण वाटलें पाहिजे. विचारी माणसाला तें आवडतेंहि आणि म्हणूनच तुकोबारायांचे अभंग आदरानें, प्रेमानें वाचले जातात, गायिले जातात.

सत्पुरुष हा सरळ वृत्तीचा असल्यानें सदा सर्वदा सत्यवादी असणें हा त्याचा स्वभावच आहे. त्यांतून विवेक हाहि त्याचा महत्त्वाचा सद्गुण आहे आणि त्यामुळें त्याची बुद्धि समतोल राहते. ती भरकटतहि नाहीं आणि भडकतहि नाहीं. त्याचें बोलणें या विवेकाच्या चाळणींतून चाळून घेतलेलें असल्यानें तें **''सक्तुमिव तितउना पुनन्तो यत्र धीरा मनसा वाचमक्रता। अत्रा सखाय: सख्यानि जानते यद्रैषा लक्ष्मीर्निहि ताधि वाचि।'** या वेदवचनाला धरून असतें आणि त्यामुळें वरवर दिसावयास तें कसेंहि वाटलें तरी शेवटीं मैत्रीच्या आणि हिताच्या कसोटीला

उतरणारेच असते. याचें कारण तें कधींहि असत्य नसतें. मिथ्या बोलणें संतांच्या बाबतींत कधीं घडत नाहीं. कारण आत्यंतिक हित हीच सत्यत्वाची व्यावहारिक कसोटी आहे. आणि म्हणून संत जें बोलतील तें त्रिवार सत्यच असते. पूर्ण नि:स्वार्थी आणि 'सर्वभूतहिते रत' असे असल्यानें मिथ्यत्वाचा स्पर्श त्यांच्या वाणीला कधीं होत नाहीं. असें सदा सर्वदा सत्यवादी असलेले लोकच परमेश्वराचे श्रेष्ठ भक्त होत. आणि तेच धन्य होत.

**सदा सेवि आरण्य तारूण्यकाळीं ।**
**मिळेना कदा कल्पनेचेनि मेळीं ।।**
**चळेना मनीं निश्चयो दृढ ज्याच्या ।**
**जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ।।५४।।**

मागें ४४ व्या श्लोकांत समर्थांनीं सुख पाहिजे असेल तर अरण्यांत जावें असें सांगितलें आहे. त्यावरून समर्थांना कोणत्या तऱ्हेच्या सुखाची अपेक्षा आहे तें स्पष्ट होतें. अरण्यांत मिळणारें सुख हें वैषयिक सुख नाहीं. अर्थातच इंद्रियांच्या द्वारा त्याची प्राप्ति होणार नाहीं. रंगेल विलासी जीवनाला चटावलेल्या माणसाला अरण्यांतील सुखाची कल्पना येणार नाहीं. तेथें सुखसोयी नाहींत. खाण्यापिण्याची हवी तशी व्यवस्था होणार नाहीं. वातावरणाचा भरवंसा नाही. थंडी, ऊन, वारा, पाऊस यांना केव्हां तोंड द्यावे लागेल याचा नेम नाही. त्याच्या प्रतिकाराचें साधनहि उपलब्ध नाहीं. शरीर कष्टाला कंटाळून चालत नाही. जेवण्या-झोपण्याची वेळ सांभाळतां येत नाही. असा सर्व नन्नाचा पाढा अरण्यांत असतो. तेव्हां अरण्यांतील सुख हें केवळ शरीराच्या पातळीवरचें सुख नाहीं ही गोष्ट निश्चितच आहे. तें सुख शरीराच्या पातळीपेक्षां वरच्या पातळीवर भोगावयाचें सुख आहे. लौकिकांत, संसारांत वावरत असतांना शरीराचे चोंचले पुरवले जातात. पण मनाविरुद्ध घडणाऱ्या गोष्टी पदोंपदीं घडत असतात व त्यामुळें एरवी बाहेरून सुखी वाटणारे जीवनहि आंतून वैतागलेलें असते. सर्व नातेसंबंध, सर्व स्नेहसंबंध हे शेवटी स्वार्थाशी केंद्रित असल्यानें सौजन्य, समंजसपणा, औदार्य या गोष्टींचा अभाव तेथें वारंवार जाणवतो. जरा खोल जाऊन पाहिलें तर निश्चितपणें तो प्रत्ययास येतो. आणि मग शरीराच्या पातळीवर मिळत असलेलें सुखहि सुख आहे असें मनस्वी माणसाला कधी वाटत नाही. सुखाच्या संबंधी त्याची धारणा चुकली आहे असें त्याच्या लक्षांत येतें आणि मग समर्थांसारखे संत साधकाच्या या विशिष्ट अवस्थेचा विचार करून त्याला ''सुखालागि आरण्य सेवीत जावें'' असा आदेश देतात. **''विविक्तदेशसेवित्वं अरतिर्जनसंसदि''** (भ. १३।१०) हे जें गीतेनें सांगितलेलें



ज्ञानलक्षण, त्याचेंहि तात्पर्य हेंच आहे. प्रांपचिक आघातानें वैतागलेल्या माणसाला तें कधीं कधीं पटतेंहिं. पण बहुधा तेव्हां फार उशीर झालेला असतो. **''अङ्गं गलितं पलितं मुंडं''** अशी दीन अवस्था प्राप्त झाल्यानंतर मग अरण्यांत गेला तर त्याचा कांहीं उपयोग होतो असें नाहीं. एक तर थकल्या भागल्या शरीराला रानावनांत राहण्यामुळें उत्पन्न होणारे अनेक प्रकारचे कष्ट मुळींच सोसत नाहींत आणि त्या कष्टांमुळें उत्पन्न होणारी शारीरिक व्यथा सहन करण्याची शक्तीहि पूर्वींच्या संवयींमुळें व फार झालेल्या वयामुळें उरलेली नसते. आणि त्यामुळें ''सुखालागि आरण्य सेवीत जावें'' हें विधानच असत्य वाटूं लागतें. यासाठीं समर्थ अरण्यांत जाण्याचे वय कोणते त्याचा आदर्श या श्लोकामधें सांगत आहेत.

हें जें अरण्यांत जाणें आहे, तें कांहीं निसर्गसौंदर्य पाहण्यासाठीं नव्हे किंवा मृगयेसाठींहि नव्हे. तर पारमार्थिक साधनेचा तो एक भाग आहे, विवेक शक्तींवरची दडपणें व आवरणें जाऊन सूक्ष्म विचारांना वा चिंतनाला वाव मिळावा, मनाची एकाग्रता व्हावी, सदाचार वाढावा, संयम साधावा, लोभ कमी व्हावा, आपल्याला हव्या हव्या वाटणाऱ्या सुखाच्या गोष्टी नैसर्गिक आवश्यकतेच्या पातळीवर उतराव्या, शरीराचा सोशिकपणा वाढावा, ध्यानाची संवय लागावी, कोणी सहाय्यास येण्याची शक्यता नसल्यानें स्वावलंबन सहज घडावें, वृत्ति निर्भय व्हावी इत्यादि उद्देश अरण्यांत जाण्याच्या मागें असतात. आणि हें सर्व साधावयाचें तर शरीर चांगलें कार्यक्षम असावें लागते आणि म्हणून समर्थ तरुणपणांतच अरण्यांत जाणें चांगलें असें सांगतात. प्रपंचाकरितां इंद्रियांची कार्यक्षमता असावी लागते हें सगळ्यांनाच पटतें पण परमार्थ साधनेसाठीं त्याहूनहि अधिक कार्यक्षम शरीराची आवश्यकता आहे हें मात्र सहसा लक्षांत घेतलें जात नाहीं. मनाला वळण लागण्याच्या आधीं शरीराला वळण लागावें लागतें. मनाचे विषय सुटावें असें वाटत असेल तर आधीं शरीराचे विषय सोडावे लागतात वा संयमानें घ्यावे लागतात आणि ही शक्यता तरुणपणींच अधिक असते. फार प्राचीनकाळीं ब्रह्मचर्याश्रम, कठोर व्रतनियमांनीं युक्त असलेल्या अवस्थेंत, कटाक्षानें पाळला जात होता आणि त्यामुळें वार्धक्य आल्यानंतर गृहस्थाश्रमानंतर घेतलेला वानप्रस्थहि सुखावह असे. वर्णाश्रमव्यवस्था विच्छिन्न झालेल्या या काळांत तें शक्य नाहीं. आणि म्हणून सर्व प्रकारच्या साधनांची जोड तरुणपणांतच मिळवून ठेवावी लागते. मुळींच न करण्यापेक्षां उशिरा करणेंहि चांगलें असें म्हणतात. पण तो आदर्श होऊ शकत नाहीं. ''वार्धक्ये तीर्थयात्रां कर्तुमिच्छन्ति मूढा:'' या सुभाषितांत एक बारीक श्लेष आहे तो लक्षांत घेतला पाहिजे. ''वार्धक्ये तीर्थयात्रां कुर्वन्ति मूढा:'' असें सुभाषितकार म्हणत नाहीं. 'कर्तुं इच्छन्ति' असें म्हणतो याचा अर्थ पूर्वीं होऊं शकल्या

नसतील, केल्या नसतील तर म्हातारपणीं तीर्थयात्रा करूंच नये असें नाहीं. पण तारुण्य आणि संधि असतांना, करूं म्हातारपणीं तीर्थयात्रा, असें म्हणून केवळ विलासांत जीवन घालविणाऱ्या तरुणांना येथें मूढ म्हटलें आहे. बायकामुलांना घरांत नकोसा झाल्यानंतर किंवा दुबळ्या इंद्रियांनीं आतां सुखें भोगता येत नाहींत अशी अवस्था प्राप्त झाल्यानंतर मग देवधर्माला लागण्याचा विचार केला जातो. सेवानिवृत्त झाल्यानंतरच 'ज्ञानेश्वरी, ही काय भानगड आहे पाहूं या', म्हणतो. त्याच्या पदरांत परमार्थ कितीसा पडणार? इंद्रियांनीं मिळणारीं सुखें प्राप्त करून घेणें हें तसें सोपें आहे. पण स्थिर बुद्धि, शांत वृत्ति, प्रसन्नता, निरुपाधिक असा आनंद मिळविणें, हें काही तसें सोपें नाहीं. यासाठीं फार प्रयत्न करावे लागतात. फार कष्ट घ्यावे लागतात. बराच वेळ द्यावा लागतो. सातत्य टिकवावें लागते आणि यांतील वेळेव्यतिरिक्त कोणतीहि गोष्ट म्हातारपणीं मिळणारी नाहीं. त्या वयांत मिळालेला रिकामा वेळहि पूर्वी संवय नसल्यामुळें कारणी लावतां येत नाहीं व मग तो खायला उठतो. जीवन भकास, दीन आणि दु:खी होतें. यासाठी साधनेला लागावयाचें तें तरुणपणांतच लागले पाहिजे. दुर्दैवानें त्यावेळीं तें सुचत नाहीं, सुचविलें तरी कळत नाही, कळले तरी वळत नाही. आणि मग उशीरा, व्हावा तसा उपयोग होत नाहीं. जीं माणसें संतपदाला पोंचलीं असें आपण पाहतों, त्यांनीं पुष्कळ वेळां अगदीं बालवयांतच किंवा तारुण्य बहराला आलेलें असतांनाच साधना केली आहे असें दिसते. जन्मजन्म जेथें पुरे पडत नाहींत असें शास्त्र सांगतें, तेथें रोगग्रस्त अशा थकलेल्या शरीराच्या पांच-दहा वर्षांनीं काय होणार? म्हणून समर्थ स्वत:च्या अनुभवानें सांगतात–तरुणपणांतच अरण्यांत जाणें चांगलें कारण त्यामुळेंच धन्यता प्राप्त होऊं शकते.

इथें अरण्य एक उपलक्षण आहे. एकान्तास न कंटाळणें हें मुख्य व त्यासाठीं एकान्ताची संवय असणें व आवड निर्माण होणें हें साधन. त्यादृष्टीनें हा चरण फार महत्त्वाचा आहे.

आपल्या संस्कृतीनें १०० वर्षांचें पूर्णायुष्य मानलेलें आहे. तें मिळावें म्हणून प्रार्थना केली आहे. हें जीवन कण्हत, कुथत स्वत:ला कंटाळा येत व इतरांना कंटाळा आणीत जगण्याचें नसून तें दृढ शरीराचें, कार्यक्षम शरीराचें मागितलें आहे. पण या दीर्घायुष्याचा उपयोग सुखविलासासाठीं नसून देवाच्या सेवेसाठीं आहे. हीहि जाणीव आपल्या संस्कृतीनें ठेवली आहे. तसेंच जीवनाचा भरंवसा नाहीं, अशी चेतावणी देऊन ''कौमारआचरेत् प्राज्ञः धर्मान् भागवतानिह।'' असा आदेशहि दिला आहे. दीर्घसूत्रीपणा कामाचा नाहीं हें तर सर्वांनाच पटतें म्हणून समर्थ सांगतात कीं अरण्यवास तारुण्यांतच साधला पाहिजे.



शरीर थकलें म्हणजे येणारी निवृत्ति फार केवलवाणी निवृत्ति आहे. मनाचा मोह सुटत नाहीं आणि शरीर हालूं शकत नाहीं. ही स्थिति फार वाईट. खरें म्हणजे शरीर चांगलें समर्थ आहे पण मनालाच मोह नसल्यामुळें माणूस शांत राहतो. अर्थात् प्रसन्नहि राहतो. हें कसें साधावें यासाठीं पुढच्या दोन ओळी समर्थ सांगतात, ''मिळेना कदा कल्पनेचेनि मेळीं।''

आपण जी सुखदु:खें भोगतो त्या दोन्हीतहि प्रत्यक्ष अनुभवाचें प्रमाण फार थोडें असते. त्यांतील कल्पनेचा वाटाच फार मोठा असतो. मनुष्याचें हें वैशिष्ट्यच आहे. पण त्यावरील त्याचें नियंत्रण सुटलें तर दु:ख आणि अस्वास्थ्य यांशिवाय पदरांत कांहीं पडत नाहीं. म्हणून माणसानें सुखदु:खें हीं जेवढ्यास तेवढीं ठेवावींत. त्यांत आपल्या कल्पनेची भर घालू नये. व्यवहारांत अशा मनुष्याला तुसडा, अरसिक इत्यादि मानलें जाते पण असा मनुष्य निरस नसतो. त्याला कशाचा व कोणाचाहि तिटकारा असत नाहीं. तो अलिप्त, खऱ्या अर्थानें उदासीन असतो. म्हणून कोणत्याहि प्रकारचा गोंधळ त्याच्या मनांत कधीं निर्माण होत नाहीं. मानापमानाच्या, निंदास्तुतीच्या, यशापयशाच्या, अहंकारी अतिशयोक्तीनें त्याच्या मनाचें स्वास्थ्य कधीं ढळत नाहीं. त्याच्या शरीराच्या वेदनाहि कांहीं असल्याच तर त्या शरीराच्याच पातळीवर राहतात. सामान्य माणसाचें असें होत नाहीं. त्याचें कांहीं दुखलें-खुपलें किंवा मनाच्या पातळीवर कांहीं बिघडलें कीं त्याच्या सर्व क्रिया ह्या अस्वास्थ्यानें विकृत होऊन जातात. गुडघे दुखत असतांना चालतां येणार नाहीं हें ठीक, वाचवत नाहीं असें म्हणण्याचा प्रसंग कां यावा? खरोखरीच कल्पनेनें आपण अधिक दु:खी होतों. संत कशाशीच चिकटला नसल्यानें तो सुखदु:खाचें मोजमापहि अलिप्ततेनें करूं शकतो आणि कल्पनांच्या पसाऱ्यांत तो कधीं गुंतत नाहीं.

ही गोष्ट सत्पुरुषाला साधूं शकते याचें कारण हें कीं तो आपल्या निश्चयावर नेहमीं स्थिर असतो. त्याचें ध्येय, त्याच्या धारणा, त्याच्या श्रद्धा, त्याचा विश्वास हे दृढ असतात. आणि त्यामुळें त्याच्या मनाला कधीं चंचलता येत नाहीं. काय करावयाचें आहे, काय साधावयाचें आहे हें त्याचें निश्चित ठरलेलें असतें. शास्त्राच्या, संतांच्या वचनांवर त्याची दृढ श्रद्धा असते आणि या विश्वासाच्या बळावर त्याचें मार्गक्रमण सातत्यानें होत राहते आणि मग ध्येयसिद्धीमध्यें जो कांहीं विलंब असतो तो असलाच तर फक्त काळाचा असतो. ध्येयसिद्धि दुरावते ती निश्चयाच्या शिथिलतेनें. ओलें शेण पेटतच नाहीं. ओलें लाकूड धुमसत राहतें पण कापूर चटकन् पेटतो. निश्चयी माणसाच्या मनाचें तसेंच होते. सामान्यांची स्थिति याच्या उलट आहे. चांगल्या साधनेनें सुद्धां ती पेटत नाहींत. फार तर धुमसत राहतात;

आणि मग तो धूर असह्य होऊन ''नाहीं तरी सुखी असावें संसारीं। फजिती तिसरी करूं नये।'' असें म्हणण्याचा प्रसंग ओढवतो.

दृढनिश्चयी माणसावर संकटें येतच नाहींत, दु:ख कोंसळतच नाहीं असें होत नाहीं. तो आपल्या ध्येयापासून च्युत होत नाहीं एवढेंच. ''फुटो हें मस्तक तुटो हें शरीर। नामाचा गजर सोडूं नये।'' अशी त्याची धारणा असते. आणि अशी ज्याची धारणा असते तो संतपदावर त्वरित चढतो आणि धन्य होतो.

**नसे मानसीं नष्ट आशा दुराशा ।**
**वसे अंतरी प्रेम पाशा पिपाशा ।।**
**ऋणी देव हा भक्तिभावें जयाचा ।**
**जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ।।५५।।**

परमेश्वराचा जो श्रेष्ठ भक्त आहे त्याच्या अंत:करणांत माणसाच्या जीवनांतील सुखस्वास्थ्य नष्ट करणारी दुष्ट आशा नसतें. त्याला धन, धान्य, ऐश्वर्य, संपत्ति यांची आसक्ति नसते. स्त्रीपुत्रादींचा मोह नसतो. प्रपंचांतील आप्तस्वकीय, बायका-मुलें यांचा आणि याचा संबंध हा जणुं झाडाखालीं सावलींत बसलेल्या गुरांविषयीं झाडाला जसें वाटेल तसा असतो असें वर्णन श्रीज्ञानेश्वरमहाराजांनीं केलें आहे. सत्ता-कीर्तीची लालसा यानें मी मी म्हणणाऱ्यांचेंहि जीवन व्यापलेलें असतें. संतांना त्याविषयींचा लोभ तर चुकूनहि वाटत नाही. सर्वसामान्य माणसें ज्याबाबतींत अतिशय सावध, दक्ष, जागरूक असतात त्या सर्व लौकिक विषयांमध्यें संताला कांहीं रस नसतो. ''यस्यां जाग्रति भूतानि सा निशा पश्यतो मुने:।।'' (भ. २।६९) असें गीतेंत म्हटलें आहे तें यासाठींच. या सगळ्या गोष्टी जणू त्यानें प्रारब्धावर सोडलेल्या असतात. पण याचा अर्थ तो कोरडा, रूक्ष असतो असा मात्र नाहीं. निसर्गाचा असा नियम आहे कीं कुठें पोकळी राहू शकत नाहीं. भक्ताचें अंत:करणहि असें पोकळ, कोरडें राहूं शकत नाहीं. त्यालाहि तहान असते ती भगवंताच्या प्रेमाची. प्रेमाच्या बंधनांनी देवाला बांधावें किंवा आपण त्याच्याशी बांधलें जावें हीच एक अतिशय उत्कट इच्छा भक्ताच्या अंत:करणांत असते. भक्ति आणि प्रेम समानार्थक आहेत. अतिशय उत्कट अशा प्रेमालाच भक्ति म्हटलें जाते. हें प्रेम देवाकडून कांहीं मागत नाहीं. त्याची अभिलाषा एकच ''सदा माझे डोळा जडो तुझी मूर्ति।'' किंवा ''ऐसे करी विठाबाई तुझे पाय माझे डोई।।'' भगवंताचें स्मरण होतांच वा त्याचें नाम उच्चारतांच कंठ गहिंवरून यावा, नेत्रांतून अश्रू ओघळावे, अंगावर रोमांच दाटावेत, अशा उत्कटतेचा अनुभव मिळावा एवढीच त्याची इच्छा असते. या भक्तिसुखासाठी मग भक्त मोक्षालाहि तुच्छ लेखतो, अद्वैतालाहि रूक्ष मानतो. समर्थांनीं पिपासा, तहान असा जो शब्द वापरला आहे तो या उत्कटतेच्या प्रतीकासाठीं. माणसाच्या अंत:करणामध्यें अशा आकांक्षा उत्कटतेनें रहाव्या हें खरें पण त्या प्रपंचांतील ऐश्वर्यासंबंधीं नसाव्या तर परमार्थासाठीं असाव्या, आध्यात्मिक उन्नतीसाठीं असाव्या.



कांहींतरी मिळविण्याची इच्छा ही केवळ इच्छा म्हणून ताज्य किंवा वाईट नाहीं. तिचा विनियोग कुणी, कुठें, कशाकरितां करावा एवढाच प्रश्न आहे. ज्ञानेश्वर-तुकारामादि संत म्हणतात तुमची सर्व महत्त्वाकांक्षा, धडपड, प्रयत्न, आशा, इच्छा या परमार्थप्राप्तीसाठीं असूं देत. आम्हीं त्यांचें ऐकत नाहीं. आम्हांला मार्क्स आणि फ्रॉईड मार्गदर्शक म्हणून मान्य आहेत. त्यांचे विचार ५०-७५ वर्षांतच उलटे पालटे झाले. प्रत्यक्ष फ्रॉइडच्या शिष्यानेंच त्याच्या अतिरेकी मताचें खंडन केलें. रशियानेच मार्क्स गुंडाळून ठेवला. संतांनीं प्रस्थापित केलेलें तत्त्वज्ञान उपनिषदांतील प्राचीन ऋषींपासून ते रमणमहर्षींपर्यंत अव्याहतपणें टिकून राहिलें आहे. कारण तें तत्त्वज्ञान स्वत: शाश्वत आहे, आणि शाश्वत आनंद प्राप्त करून देणारें आहे. म्हणूनच तें स्वीकारलें पाहिजे.

भक्ताच्या अंत:करणांतील ईश्वराविषयीचें प्रेम इतकें उत्कट असतें कीं त्याच्या त्या भक्तिभावानें ईश्वर त्याचा ऋणी होतो. जणूं भक्ताचेंच उपकार ईश्वराच्या माथ्यावर चढतात आणि त्यातून उतराई होण्यासाठीं मग देवच भक्तासाठीं वाटेल ते करावयास तयार असतो. भगवंतांनीं अर्जुनाचे घोडें धुतले. धर्मराजाच्या यज्ञांत उष्टीं काढली. जनबाईचें दळण दळलें इत्यादि इत्यादि कथा त्यादृष्टीनें प्रसिद्ध आहेत.

या ऋणी केलेल्या देवाला मग भक्त, एखाद्या सावकारानें आपल्या कुळाला दटावावें तसेंहि दटावू शकतो आणि ईश्वराला तेच गोड वाटतें. उदगयनाचार्यांनी जगन्नाथाला असें रागावून विचारल्याचें प्रसिद्ध आहे. नामदेवासारखे लडिवाळ भक्तहि देवाची खरड काढताना दिसतात. या कथा नुसत्या ऐकतानाहि अंत:करण उचंबळून येते अशी भावोत्कटता त्यांत आहे. परमेश्वर असा ज्यांचा ऋणी होतो ते सर्वोत्तमाचें दास खरोखरींच धन्य होत.

**दिनाचा दयाळु मनाचा मवाळु ।**
**स्नेहाळु कृपाळु जनीं दास पाळु ।।**
**तया अंतरी क्रोध संताप कैचा ।**
**जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ।।५६।।**

भक्त हा व्यवहारात कसा असतो तें समर्थ या श्लोकांत सांगत आहेत. संत, परमेश्वराचे भक्त, सत्पुरुष हें दीनजनांविषयीं दया बाळगणारे असतात. रंजल्या

गांजल्या जनाविषयी त्यांचे अंत:करण दयेनें भरलेंलें असतें. आईच्या अंत:करणात आपल्या बालकाविषयीं जीं माया असतें, कोमलता असतें, तीच संतांच्या अंत:करणांत भूतमात्राविषयी असते. अज्ञानपंकांत रुतलेलें लोक संतांना बघवत नाहींत. त्यांच्या अंत:करणातील निष्काम स्नेह त्यांना स्वस्थ बसू देत नाहीं. दु:खितांना, मोहग्रस्तांना पाहून त्यांचें मन कनवळ्यानें भरून येतें. मनुष्यमात्राचें पालन करण्यासाठीं वैकुंठसुखाचा त्याग करून संत अवतीर्ण होत असतात. पतिताविषयीं त्यांच्या अंत:करणांत कधींहि चीड, द्वेष वा तिरस्काराची भावना जागृत होत नाहीं. कोणी कसाहि वागला तरी त्यांच्या मनाचा कधीं जळफळाट होत नाहीं. उलट अपार करुणेनें त्यांचे अंत:करण भरून येतें. न ऐकणाऱ्या उर्मटाविषयींहि त्यांना केवळ कींवच वाटत असतें असें गौरवानें म्हणावें लागते. ईश्वर जशाशी तसा वागतो, संत कोणाशीहि अगदी नीच, दुष्ट, उर्मटाशीहि, आपुलकीनें, जिव्हाळ्यानें, मैत्रीच्या नात्यानेंच वागणार. म्हणून गीतेनेंहि भक्ताच्या वर्णनांत ''मैत्र: करुण एव च'' अशीं लक्षणें आवर्जून सांगितलेलीं आहेत. म्हणून तर समाजकल्याणाची इच्छा असलेल्या थोर पुरुषांनीं माणसानें संतांचे पाय धरावेत असा आदेश दिला आहे. ''धरावे तें पाय आधीं आधीं.''

असा हा जगत्कल्याणासाठीं दयाक्षमादि गुणांनी संपन्न असलेला सर्वोत्तमाचा दास खरोखरींच धन्य होय.

हें धन्य-दशक या ५६ व्या श्लोकानें संपत आहे. गीतेनें जीं स्थितप्रज्ञादि आदर्श पुरुषांची लक्षणें सांगितलीं आहेत त्यांच्याशी येथील वर्णन ताडून पाहण्यासारखें आहे. तेथील महत्त्वाचे सर्व गुण येथें सांगितले आहेतच. पण तो आदर्श साधकाच्या उपयोगी यावा या दृष्टिनेंहि समर्थ उपदेश करतात तें फार महत्त्वाचें आहे. या लक्षणांत कोठेंहि, कोणत्याहि, प्रकारच्या सिद्धींचें वा चमत्कार करण्याचें सामर्थ्य असल्याचें वर्णन नाहीं. गीतेनें सांगितलेल्या स्थितप्रज्ञादि आदर्श पुरुषांच्या लक्षणांतहि तें नाहीं. कारण कोणत्याहि प्रकारच्या सिद्धींचा उपयोग पारमार्थिकदृष्ट्या शून्यच असतो. श्रद्धा दृढ होण्यासाठीं अगदीं क्वचित् त्याचा उपयोग झाल्यासारखें दिसलें तरी अशा कृत्रिम उपायांनीं निर्माण झालेली श्रद्धाहि पोकळच असते. सिद्धी ही वासना अहंकाराला वाढवणारी असते, ती परमार्थाची हानीच करते. म्हणून गीतेसारख्या शास्त्रानें काय किंवा समर्थ रामदासस्वामींनी काय, आदर्श पुरुषाच्या लक्षणांत सिद्धींचा संबंध येऊं दिला नाहीं. दुर्दैवानें आपण मात्र अमानित्वादि लक्षणांनीं युक्त असणाऱ्यापेक्षां चमत्कार करणारालाच श्रेष्ठ पुरुष समजत राहतो.

वर्णन करीत असतांना पुढची व्यक्ती ही एकच असली तरी तिला संबोधितांना समर्थ भक्त, संत, महात्मा, योगी, सिद्ध अशीं विशेषणें न वापरतां दास म्हणतात, सर्वोत्तमाचा दास म्हणतात. हें फार महत्त्वाचें आहे. थोड्याशा सिद्धी प्राप्त असलेले किंवा लोकांना आकर्षून घेईल असें वक्तृत्व असलेले या मार्गांतले तथाकथित महंत स्वत:ला परमेश्वर, ब्रह्मरूप, भगवान्, सच्चिदानंद इत्यादि इत्यादि म्हणवून घेत असतात व तींच भूषणें, बिरुदें मिरवीत असतात. त्यांच्या त्या अहंकाराला थारा मिळूं नये म्हणून समर्थांनीं दास शब्दाची योजना केली आहे. शिष्यानें आपल्या गुरूला आदरभावानें आणि प्रामाणिक निष्ठेनें कितीहि श्रेष्ठ, अगदीं ब्रह्म, परब्रह्महि मानावें; पण गुरूनें स्वत:ला काय समजावें आणि काय मानून मिरवावें तें लक्षांत रहावें म्हणून समर्थ दास शब्दाचा उपयोग करीत आहेत. ''अहंकाराचा वारा न लागो राजसा। माझिया विष्णुदासा भाविकासी।'' अशी या थोर पुरुषाची धारणा आहे. अहंकार हा अज्ञानापेक्षां ज्ञान्याच्याच मागे हात धुवून लागतो, अगदीं गळ्यांत पडतो असें ज्ञानेश्वर महाराजांनीं वर्णन केलें आहे. त्या अहंकाराला बळ मिळू नये म्हणून दास शब्द वापरलेला असावा.



तत्त्वज्ञानाच्या दृष्टीनेहि एक भूमिका हा 'दास' शब्द व्यक्त करीत असतो. एकमात्र मूलभूत सत्याच्या दृष्टीनें म्हणजेच पूर्णपणें पारमार्थिक दृष्ट्या वा आपल्याला समजावून घेण्याच्या भाषेंत परमोच्च स्थितींत, अद्वैत हीच केवळ वस्तुस्थिति असली, ब्रह्माव्यतिरिक्त, आत्म्याव्यतिरिक्त इतर सर्व मिथ्या असलें, 'अगा जें झालेंचि नाहीं। त्याची वार्ता पुससि कायी।' अशीच त्याची अवस्था असली, तरी समजून घेण्याच्या पातळीवर ज्ञानमार्गामध्यें ब्रह्म, ईश्वर, जीव, देह आणि जगत् यांचा विचार करणें अपरिहार्य असते आणि त्यामुळें विचारापुरतें तरी त्यांचे प्रचितीला येणें हें सत्य मानून चालल्याविना गति नसते. सर्व तत्त्वज्ञानांची उभारणी या पांचांच्या विचारावरच आधारलेली असते. त्यांचे संबंध कसे लावावेत व त्यांचें स्वरूप कोणत्या भाषेनें समजून घ्यावें यावर तत्त्वज्ञानाचा वेगळेपणा अवलंबून असतो. स्थूलमानानें भारतीय तत्त्वज्ञान तीन गटांत समाविष्ट करतां येतें. शंकराचार्यांचें अद्वैत हा एक गट, रामानुजाचार्य, वल्लभाचार्य, निंबार्क यांनीं प्रतिपादिलेलें विशिष्ट, शुद्ध आणि द्वैताद्वैत हा दुसरा गट आणि मध्वाचार्यांनीं पुरस्कारिलेलें द्वैत हा तिसरा गट. श्रीमारुतीरायांनी या तिन्हीं गटांतील तत्त्वज्ञानाचा एके ठिकाणीं फार उत्कृष्ट रीतीनें समन्वय साधला आहे. भगवान् रामचंद्रांची प्रार्थना करताना मारुतराय म्हणतात–

देहबुद्ध्या तु दासोऽहं जीवबुद्ध्या त्वदंशक: ।
आत्मबुद्ध्या त्वमेवाहं इति मे निश्चिता मति: ।।

तेव्हां जिवंत माणूस हा कितीही, केवढ्याहि योग्यतेचा श्रेष्ठ पुरुष असला तरी तो शरीर धारण करीत आहे तोपर्यंत परमेश्वराच्या संबंधांतील त्याचा दासभाव

कधीं नाहींसा होत नाहीं. देह धारण करीत आहे तोपर्यंत कोणत्या ना कोणत्या तरी अंशांत देहभाव जागृत असतोच असतो. कळून न कळून ठेवावाच लागतो. आहार, निद्रा व निवाऱ्याची सोय यांची कांहीं ना कांहींतरी व्यवस्था करावीच लागते. अपरिग्रहाच्या वा वैराग्याच्या उत्कट धारणेनें दिगंबर म्हणजे संपूर्ण नग्न राहणारी माणसें कोणत्या ना कोणत्या स्वरूपाचे अंथरूण, पांघरूण वा झोंपडी यांचा स्वीकार करतातच. अयाचित वृत्तीनें वा दोन घरीं तरी माधुकरी मागून त्यांना जगावे लागतें. अन्न-पाणी घ्यावें लागतें. मलमूत्र विसर्जन करावें लागतें. व्याधी झाल्या म्हणजे वेदनाहि जाणवतात, शीतोष्णादि स्पर्श कळतात. ज्ञानेंद्रियांना आपापल्या विषयांचें ज्ञान होते. कर्मेंद्रियें आपापलीं कर्में-उचित रीतीनें असेल पण-करीत राहतात आणि त्यामुळे कोणत्या ना कोणत्या तरी स्वरूपात कितीहि मोठ्या माणसाच्या ठिकाणीं देहभाव हा अल्पांशानें असेल, निरुपद्रवीपणाने असेल, पण जागृत असतोच आणि ही वस्तुस्थिति सर्व मनुष्यदेहधारी व्यक्तींना जिवंत असेपर्यंत लागू आहे. त्यामुळे तत्त्वज्ञानाच्या परमोच्च पातळीवर पोंचलेलीं थोर माणसेंहि देहदृष्टिनें परमेश्वराचीं दास असतात. आणि त्या व्यक्तींनींहि आपली नम्रता कधीं सोडलेली नसते. भावावेशानें आलेल्या समाधि अवस्थेला उद्देशून किंवा तत्त्वज्ञानानें प्राप्त होणाऱ्या साक्षात्काराचें वर्णन गौरवानें करीत असताना देहासकट ब्रह्म झालो अशा अर्थाचे उद्गार त्यांनी क्वचित काढले तरी 'सेवकैः बाणे' याच वृत्तीनें ते आपलें जीवन जगत असतात. आणि हे सर्व लक्षांत घेऊनच समर्थ अशा परमपदाला पोंचलेल्या थोर महात्म्यांचाहि उल्लेख ''जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा'' असा विशेषरीतीनें करीत आहेत. साधकाने हें लक्षांत ठेवणें फार महत्त्वाचें आहे. साधकानें सुखासीन होऊ नये. शरीरकष्टाला कंटाळू नये, आळसाला थारा देऊ नये, हेंहि या दास शब्दातून व्यक्त होतें.

समर्थांचें आराध्य दैवत भगवान् रामचंद्र असले तरी त्यांचे ठिकाणीं सांप्रदायिक दुराग्रहाचा लवलेशहि नाहीं. हेंच येथील रामचंद्रांच्या, ईश्वराच्या संदर्भांत वापरलेल्या सर्वोत्तम या शब्दानें व्यक्त होतें.

**जगीं होईजे धन्य या रामनामें ।**
**क्रिया भक्ति ऊपासना नित्य नेमें ।।**
**उदासीनता तत्त्वता सार आहे ।**
**सदा सर्वदा मोकळी वृत्ति राहे ।।५७।।**

मागील दहा श्लोकांमध्यें धन्य कोणास म्हणावे त्याचें उत्कृष्ट वर्णन समर्थांनी केलें आहे. जिज्ञासू साधकापुढें, मुमुक्षू भाविकापुढें श्रेष्ठतेचा हा एक आदर्श



समर्थांनीं उभा केला आहे. परमेश्वराचा श्रेष्ठ भक्त धन्य होय हा तो आदर्श. स्वाभाविकच ही धन्यता आपणासहि प्राप्त व्हावी असे विवेकी माणसाला वाटणारच. त्याचा उपाय समर्थ या ५७ व्या श्लोकांत सांगत आहेत. ते म्हणतात, रामनामानें मनुष्याला जगामध्यें धन्यता प्राप्त होते. अर्थात् हा दृष्टिकोन संतांचा आहे. सामान्य माणसापुढें या तऱ्हेची धन्यता बहुधा कधीं नसते. सत्ता, संपत्ति, ऐश्वर्य, कीर्ति हींच त्याच्यापुढें धन्यतेचीं लक्षणें म्हणून उभी असतात, आणि मग ती कोणत्याहि मार्गानें मिळविली तरी चालेल असें त्याला त्याच्यापुढें असलेल्या अनेक व्यक्तींच्या उदाहरणांवरून वाटूं लागतें. आणि याच विचारसरणीनें परमार्थ तर दूर राहतोच पण ऐहिक जीवनहि दुःखमय होऊन जातें. ऐश्वर्यादि गोष्टी प्राप्त असलेली एखादी व्यक्ति ऐहिकदृष्ट्या पूर्ण सुखी आहे असें गृहीत धरलें तरी त्यानें अवलंबिलेला मार्ग जर न्यायाचा नसेल तर तें सुख इतर अनेकांना दुःखी करूनच जन्माला आलेलें असतें हें निश्चित. आणि मग हें असें सुखी जीवन माणसाला न शोभणारें आहे. हा धोका टाळण्यासाठींच संतांनीं धन्यतेचा आदर्श सत्पुरुषाच्या लक्षणांनी उभा केला आहे. आणि ही धन्यता हीच खरी धन्यता आहे कारण यांतूनच मनाची प्रसन्नता, समाधान, संतोष, आनंदमयता ही शाश्वतरीतीनें प्राप्त होत असते. अर्थातच या धन्यताप्राप्तीचें साधन विषयोपभोग किंवा संपत्ति आणि सत्ता होऊं शकत नाहीं. परमेश्वराचें नाम हेंच त्याचें अत्यंत सुलभ आणि म्हणूनच एकमात्र साधन आहे. तें जितक्या प्रेमानें, जितक्या सातत्यानें घ्यावें तितक्या प्रमाणांत शरीर, मन, बुद्धि यांमध्यें क्रमाक्रमानें पण निश्चितपणें सुधारणा होत जाते.

त्याच्या जोडीला नित्यनेमानें भक्ति, उपासनेसाठी कांहीं क्रिया निष्ठेनें केल्या पाहिजेत. समर्थांनीं क्रिया, भक्ति, उपासना असा क्रम सांगितला आहे, तोहि फार महत्त्वाचा आहे. कोणत्याहि गोष्टीच्या प्राप्तीसाठीं नित्यनेमाला फार महत्त्व असतें. मग या लाभाचें क्षेत्र कोणतेंहि असो. व्यावहारिक क्षेत्रांतहि याचा अनुभव येतो. कोणतेहि तांत्रिक कौशल्य, व्यवस्थापन वा संशोधन हें– अगदीं ऐहिकांतलें– विचारांत घेतलें तरी त्यासाठीं नित्यनेमाचें महत्त्व आहेच. तेव्हां हाच नियम परमार्थालाहि लागू असणारच. क्रियेचें स्वरूप पालटेल इतकेंच जपादि अनुष्ठानें, तीर्थयात्रा, पारायणें, भजनें, कीर्तनें, श्रवण वा सप्ताहादि कार्यक्रम हीं सगळीं क्रियेचींच स्वरूपें आहेत व त्यांतूनच उपासना पद्धति साकारते. मात्र हें सर्व भक्तीनें झालें पाहिजे श्लोकांतील शब्दांच्या अनुरोधानें आपण फार तर असें म्हणूया कीं नित्यनेमानें कोणतीहि क्रिया भक्तीनें केली, प्रेमानें केली, आवडीनें केली, कीं तीच उपासना होऊन इष्ट फळें देते.

ही क्रियाहि शरीराकडून घडणारी व मनाकडून घडणारी अशी दोन प्रकारची असते. यांत ध्यान, चिंतन, स्मरणादि मानसिक क्रिया आणि श्रवण, पठन, पूजनादि शारीरिक क्रिया यांचा समावेश आहे. प्रेमभक्ति हा अंतरात्म्याचा विषय आहे. मनाच्या माध्यमानें त्याचा अनुभव येऊं शकतो. कोणतीहि क्रिया फलद्रूप होण्यासाठी प्रेमभक्तीची नितांत आवश्यकता आहे हें कितीहि खरें असले तरी प्रेमभक्ति उत्पन्न करणें ही गोष्ट माणसाच्या स्वाधीनची नाहीं. देहमनाची शुद्धता आणि भगवत्कृपा यांचा तो परिणाम आहे. ही अंतरंग भक्ति सोपी असती तर 'भक्ति तो कठीण सुळावरील पोळी। निवडे तो बळी विरळा शूर।' असे भक्तीच्या प्रसारासाठीं बद्धपरिकर झालेल्या सत्पुरुषानेंहि म्हटलें नसतें. तेव्हां प्रेमभक्ति उत्पन्न होईल आणि मग साधना करूं असें म्हणून जर कोणी स्वस्थ बसला तर त्याला कांहींच साधावयाचें नाहीं. म्हणून समर्थांनी क्रिया शब्दाचा उपयोग प्रारंभीं केला आहे.

मनाची एकाग्रता, मनाची शांतता, मनाची स्थिरता, मनाची प्रसन्नता या गोष्टी उत्तम आणि आवश्यक खऱ्या पण हें मनावर बळानें लादतां येत नाहीं. माणसाचें मन हें सर्वतंत्र स्वतंत्र आहे. अर्जुनासारख्या थोर संयमी पुरुषालाहि मनाचा हा नाठाळ हट्टीपणा चांगलाच जाणवला आहे. तेव्हां मनाच्या प्रसन्नतेच्या फारसे नादीं न लागतां शरीराकरवीं कांहीं गोष्टी व्रत म्हणून नियमानें करीत राहावे. ठराविक वेळीं, ठराविक प्रमाणांत, ठराविक पद्धतीनें, शास्त्राज्ञेनुसार, आपल्या रुचीप्रमाणें किंवा संतांनीं, गुरूंनीं, सांगितलेल्या पद्धतीनें क्रिया करीत राहावे. त्याचाहि हळूहळूं परिणाम होतो. मुळांत सात्त्विक असलेलें मन राजस किंवा तामस बनते. बाह्य क्रियांच्या संस्कारांतून, सातत्याच्या प्रयत्नानें हे राजस, तामस गुण ओहोटीला लागून मनाची मूलभूत सात्त्विकता पुन्हां प्रगट होऊं शकते. प्रकृतिभेदानें कोणाला हें लवकर साधेल, कोणाला त्यामानानें फार दीर्घकाल प्रयत्न करावा लागेल. पण धैर्याचा आणि तितिक्षेचा अवलंब करून दीर्घ कालाचें हें आव्हान साधकानें स्वीकारलेंच पाहिजे.

मन कितीहि नाठाळ असलें तरी 'देखलिया गोडीच्या ठाया सोके' हाहि एक त्याचा गुण आहे. त्यामुळें कधींकाळीं एकादें निमिष जरी प्रसन्नता त्याला साधनकाळांत लाभली तरी मनाला वळण लागण्याच्या दृष्टीनें ती उपयोगी ठरते म्हणून केवळ शारीरिक पातळीवरच्या क्रियाहि प्राथमिक अवस्थेंत उपयोगी पडतात. त्या आचरीत असतांना प्रेम आणि प्रसन्नता उत्पन्न झाली पाहिजे. ती अद्याप झाली नाहीं एवढी जाणीव ठेवून साधक नित्यनेम आचरूं लागला तरी त्याला लाभ होईल. आरंभीं न जाणवण्याइतकी मंद गतीची प्रगतीहि पुढें त्वरेनें होऊं लागेल, म्हणून नित्यनेमानें



चढत्या वाढत्या पद्धतीनें साधना करीत राहावें असें समर्थांना सांगावयाचें आहे.

हे सर्व ऐकलें, वाचलें म्हणजे माणूस एक प्रश्न विचारतो कीं मग प्रपंच केव्हां करावा? खरें म्हणजे हा प्रश्न प्रामाणिक नसतो परमार्थाचें खरें आकर्षण नसते आणि विषयोपभोगाचा लोभ सुटत नाहीं. अशा परिस्थितींत स्वत:च्या वागण्याच्या समर्थनासाठीं असे प्रश्न विचारले जातात. व्यावहारिक क्षेत्रामध्येंहि सेवेचें म्हणून कांहीं नियम असतात. चतुर्थश्रेणीच्या सेवकापासून ते श्रेष्ठ पातळीवरच्या अधिकाऱ्यापर्यंत शासकीय क्षेत्रें, कार्यालयें, उद्योगशाळा, सेना, विद्यासंस्था इत्यादि क्षेत्रांत माणसें कामें करीत असतात. कांहीं संस्थांमध्यें आजीव सेवक असेंहि एक कार्याचें स्वरूप असते. आणि या सर्व कार्यक्षेत्रांचे विशिष्ट असे नियम असतात. सैन्यामध्यें तर हे नियम अधिक कडक असतात व त्यांचें पालनहि कांटेकोरपणें करावें असें अनुशासन असतें. आतां हें सर्व करीत असतांना खाणे पिणें, बायकांमुलें, हौस, करमणूक या गोष्टी नियमाचें पालन प्रामाणिकपणें करणारा मनुष्य करूं शकत नाहीं असें आहे काय? व कोणत्याहि सेवकानें हे कांहीं करूं नये अशी अपेक्षा नियम घालणाराची असते काय?

अगदीं कर्तव्यदक्ष, प्रामाणिक सेवकहि बायकामुलांच्यामध्यें रंगू, रमूं शकतो. खाणें पिणें तर जीवनाकरितां अपरिहार्य गोष्ट असते. त्यांतहि त्यांचा कांहीं वेळ जातो. मन रमविण्यासाठीं तो कांहींहि करीत नाहीं असेंहि नाहीं. आणि हें केल्यामुळे त्याच्या कर्तव्यदक्षतेंत व प्रामाणिकपणांत अंतर येतें असेंहि नाहीं. केव्हां तरी कसोटीचे क्षण उभे राहतात आणि मग प्रामाणिक निष्ठेची परीक्षा होऊन जाते. 'आधीं लग्न कोंडाण्याचें आणि मग रायबाचें' असें वीरवर तानाजी मालुसरे म्हणाले. दुर्दैवानें ही कसोटी फार कठोर ठरली. तरी तानाजीने माघार घेतली नाहीं. पण तानाजीलाहि बायकामुलें होती. घर-कारभार होताच. तेव्हां प्रपंचाला वेळ कुठला काढावा हें म्हणणें व्यर्थ आहे.

देवानें डोळे दिले आहेत तर पाहूं नये, नाक आहे तर वास घेऊं नये असें कोण म्हणतो? पण पाहिलें कीं ते हवें वाटतें, मलाच पाहिजे असें वाटतें, आणि इतरांच्यापेक्षां वेगळेपण सिद्ध करण्यासाठीं तें केवळ माझ्याजवळच असावें, दुसऱ्या कोणाजवळ नसावें असें वाटतें. आणि याचाच आग्रह निर्माण झाला कीं मग तें मिळविण्याच्या मार्गांतली न्यायनीति पार लयाला जाते, शक्तीच्या आणि परिस्थितीच्या अनुकूलतेच्या प्रमाणांत हें घडतें आणि पुरेशी शक्ति नसेल व परिस्थिति प्रतिकूल असेल तर मनाचा जळफळाट होतो. परमार्थाला केवळ प्रपंच बाधत नाहीं तर आसक्तीमुळें निर्माण होणाऱ्या या गोष्टी बाधतात. ममत्व, आसक्ति हे भाव कार्याला कदाचित् प्रेरणा देत असतीलहि पण त्यामुळें कौशल्याचा

घात होतो हे निश्चित. अत्यंत कुशल शस्त्रवैद्यहि आपल्या मुलावर वा पत्नीवर शस्त्रकर्म करण्याचें टाळतो यावरून ममत्व हे कौशल्याला कसें बाधक असतें हें लक्षांत येईल. म्हणून समर्थ तिसऱ्या ओळींत तत्त्वत: उदासीनता हीच सार आहे असें सांगतात. उदासीनता म्हणजे अलिप्तता, तटस्थता. ही खऱ्या अर्थानें प्राप्त करून घेणें हेंच परमार्थाचें श्रेष्ठ साधन आहे. मनुष्य प्रापंचिक गोष्टींविषयीं जों जों अनासक्त होत जाईल, तों तों परमार्थाविषयीची त्याची भक्ति वाढत जाईल. आसक्ति, ममता उणावली कीं, मन मोकळें होईल आणि मग जें जें साधन तो करीत असेल, वा जी जी कृति तो आचरीत असेल त्याचें ओझें त्याला वाटणार नाहीं. दडपण बहुधा कृतीचें नसतें. दडपण असतें ते आसक्तीचें. आणि म्हणून समर्थ उदासीन व्हावें, अनासक्त व्हावें, अलिप्त व्हावें, निर्मम व्हावें, म्हणजे मन मोकळें होतें असें सांगतात.

**नको वासना वीषयीं वृत्तिरूपे ।**
**पदार्थीं जडे कामना पूर्व पापें ।।**
**सदा राम नि:काम चिंतीत जावा ।**
**मना कल्पना लेश तो ही नसावा ।।५८।।**

मन मोकळें होण्यासाठीं उदासीनता साधावी असें मागील श्लोकांत सांगितलें आहे. उदासीनता साधण्याचा उपाय समर्थ या श्लोकामध्यें दाखवीत आहेत. विषयाचा प्रत्यक्ष उपभोग मनुष्य सातत्यानें फार काळ घेऊं शकत नाहीं. इंद्रियांना तें सामर्थ्यहि नाहीं. सातत्यानें उपस्थित असतात त्या वासना किंवा विषयाकारवृत्ति. त्यांचा त्याग करावा, उपभोगलालसा सोडावी, उपभोगकालीं झालेल्या सुखाचें जें स्मरण चित्ताला चिकटून असतें त्यातूनच पुन्हां पुन्हां वृत्ति तदाकार होते व वासना उत्कट होऊन शरीराच्या पातळीवर उतरतात म्हणून वृत्तीचा त्याग करावा. पूर्वी घडलेल्या पापांतून म्हणजे अनवश्यक आणि अनिष्ट क्रियेंतून मनामध्यें विषयासंबंधी कामना उत्पन्न होतात. पूर्वीं घडून गेलें आहे तें जन्मजन्मांतरीचें असेल किंवा या जन्मींचें असेल पण कांहीं झालें तरी कामना-निर्मितीच्यापूर्वी कोणत्या ना कोणत्या स्वरूपाचा क्रियात्मक संस्कार असावाच लागतो आणि असें आहे म्हणून तर योग्य त्या पद्धतीच्या क्रियांच्या अभ्यासानें मनाला आवरणें वा वळण लावणें शक्य कोटींत येऊं शकते. यासाठीं रामाचें चिंतन निष्काम भावनेनें करावे. नामस्मरण-पूजापाठादि उपासनांच्या मागें कोणतीहि कामना नसावी. उपासनेचें रूप नवसाचे नसावें किंवा त्याकरितां केल्या जाणाऱ्या प्रयत्नांचें पूरक म्हणूनहि तें असूं नये. अगदीं पहिल्याच पायरीवर पूर्ण निष्कामता शक्य वाटली नाहीं तरी



इच्छा करतांना अधिकाधिक उन्नत, उदात्त अशा गोष्टींच्या प्राप्तीची करीत जावी आणि शेवटीं शेवटीं तर कांहीं पुण्य लागावें, कांहीं साक्षात्कार घडावा, कांहीं प्रसन्नता चित्ताला प्राप्त व्हावी हीहि अभिलाषा सोडून द्यावी. तसें झालें नाहीं तर त्या कामवासनांची उतरती भांजणी सुरूं होते. यासाठीं कल्पनेचा लेशहि कोणत्याहि प्रकारच्या कामना, वासना, अभिलाषा यांचा लहानसा अंशहि मनामध्यें येणार नाहीं असें व्हावें. कल्पना ही कोणत्या ना कोणत्या स्वरूपांत असें व्हावें वा असें होऊं नये या प्रकारचीच असते. जें जें होईल तें तें अलिप्ततेनें, केवळ साक्षीभावानें पाहत राहिलें कीं निर्ममता, तटस्थता, उदासीनता साधूं लागते.

या प्रगतीचा वा विकासाचा निश्चित क्रम गणितागत पद्धतीनें सांगतां येणार नाहीं. एकदा मोठा दगड फोडण्यासाठी घातलेले घणाचे घाव प्रत्येक आघातानिशीं परिणाम करीत असले तरी दगड फुटण्याची क्रिया ही शेवटच्या घावानें एकदम घडल्यासारखे दिसते. तसेंच या साधनेतही होते. केव्हां तरी हवें नको एकदम संपून जातें. अस्वास्थ्य गळून पडतें. प्रसन्नतेची उषा आपल्या सर्व सौंदर्यानिशीं अंत:करणाच्या क्षितिजावर अचानक डोकावते, जीवन साधनेनें, संतोषानें उजळून निघते.

विषयोपभोगाचे ज्याचें चिंतन सुटलें त्याला मग कोणत्याहि परिस्थितींत आनंदी राहता येते. त्याच्या डोक्यावर कोणतेंहि ओझें नसतें, मनावर कोणतेंहि दडपण नसतें, कोणताहि भार त्याला वाहावा लागत नाही आणि अशा स्थितींत तो क्वचित शरीरानें श्रमला तरी मनाने कष्टत नाहीं. समर्थ कल्पनालेशहि नसावा म्हणतात तें यासाठींच.

**मना कल्पना कल्पितां कल्पकोटी ।**
**नव्हे रे नव्हे सर्वथा रामभेटी ।।**
**मनीं कामना राम नाही जयाला ।**
**अती आदरें प्रीति नाही तयाला ।।५९।।**

प्रत्यक्ष साधन काहीहि न करतां, मनाला परमार्थाची ओढ लागलेली नसताना, नुसत्या कल्पना करीत बसून ईश्वरप्राप्ति होणार नाहीं. जप-पूजा-अनुष्ठानादि कांहीं क्रिया, इंद्रियांचा संयम, कामक्रोधादि विकारांचा आवर, श्रद्धा, प्रेम-भक्तीची वाढती उत्कटता, धैर्य, तितिक्षा आणि या सर्वासाठीं अवश्य असणारी निष्ठा व सातत्य यांचा अवलंब केला तरच परमार्थमार्गामध्ये पाऊले पुढे पडत जातात. हें करीन, तें करीन असे नुसतें म्हणत राहणें वा उलट बाजूनें याचा काय उपयोग, त्याचा काय उपयोग म्हणणे; हे दोन्हींहि कल्पनेचेच भाग होत. प्रत्यक्ष आचरणापासून मनुष्य त्यामुळें दुरावतो आणि मग कितीहि काळ लोटला तरी

परमार्थ साधत नाहीं. ईश्वराची भेट होत नाहीं. ''केल्यानें होत आहे रे। आधी केलेंचि पाहिजे।।'' हेंच शेवटीं एकमात्र साधन आहें. प्रयत्नालाच परमेश्वर समजावे आणि अंत:करणामध्यें कांहींतरी चांगलें धरून उद्योगास लागावें तरच प्रगतीची आशा आहे. अन्यथा जन्मामागून जन्म आणि युगामागून युगें लोटलीं तरी मनुष्याचा उद्धार होत नाहीं. त्याला कल्याण लाभत नाहीं. तेव्हा परमार्थ साधावा, ईश्वराचा साक्षात्कार व्हावा, मनाची प्रसन्नता वाढावी असें वाटत असेल तर शेखमहंमदी कल्पनांचा त्याग करून प्रत्यक्ष आचरण करावयास लागले पाहिजे.

शास्त्रनिष्ठा न सोडताहि माणसाला आपल्या प्रकृतीप्रमाणें आणि आवडीप्रमाणें साधना स्वीकारणें शक्य आहे. त्या शक्यतों सात्त्विक असाव्या एवढीच काळजी घ्यावी. साधनेचा उद्देश सात्त्विक नसेल तर साधनही सात्त्विक राहत नाही आणि माणूस मग मनोरथपूर्तीच्या वा सिद्धींच्या पाशांत सांपडून तंत्रमार्गाचा अवलंब करतो, वाममार्गास लागतो. त्यांतून कदाचित् कांहीं सिद्धी, कांहीं चमत्कार करण्याचें सामर्थ्य प्राप्त होईलहि, कामनापूर्तीच्या या रस्त्याने खरा अध्यात्मिक लाभ होणार नाही. महंती वाढेल पण रामाची भेट होणार नाही. ईश्वरी साक्षात्कार लाभणार नाहीं. मनामध्यें काम आणि राम एकत्र राहूं शकणार नाहींत. अंत:करणांत कामना धरून व्रताचरण करणाऱ्या माणसाचें प्रेम, जें मिळवावयाचे आहे त्याच्यावर म्हणजेच पर्यायानें स्वत:च्या स्वार्थावर असते; तो त्याच्या अहंकाराचाच एक आविष्कार असतो; आणि मग ईश्वरालाहि तो कामपूर्तीचें साधन मानतो. परमार्थमार्गामध्यें जें प्रेम असावें लागतें तें निष्काम असावें लागतें. ज्याचें ईश्वरावर प्रेम असतें, ईश्वराविषयीं ज्याच्या मनांत खरोखरीच आदरभाव असतो, त्याला स्वार्थासाठी ईश्वराला वेठीला धरणें कधीहि मानवत नाहीं. प्रेम आणि स्वार्थ या दोन भावना उजेड आणि अंधाराइतक्या परस्परविरुद्ध आहेत. ईश्वराला वश करतां येते तें प्रेमाच्या बळावर. ईश्वराला ओढ असते ती शुद्ध प्रेमाची. तें प्रेम ज्याच्या अंत:करणांत नाहीं, अर्थातच जें अंत:करण कामनांनी बरबटलेलें आहे, तें ईश्वरभेटीला पात्र होऊंच शकत नाहीं.

**मना राम कल्पतरू कामधेनु ।**
**निधी सार चिंतामणी काय वानूं ।।**
**जयाचेनि योगें घडे सर्व सत्ता ।**
**तया साम्यता कायसी कोण आतां ।।६०।।**

कल्पनेचा निरास केला पाहिजे, कामनांचा त्याग केला पाहिजे, हें सर्वार्थानें साधावयाचें तर त्यासाठीं कांहीं आलंबन स्वीकारावें लागतें. खरी पतिव्रता निष्काम होते, पतीवर केवळ जीवाभावानें प्रेम करते, कोणतीहि अपेक्षा न ठेवता त्याच्यासाठीं केवळ सर्वभावानें राबत राहण्यांत तिला सार्थक वाटतें. पण हें घडावयासहि आधीं लग्न व्हावें लागतें, पति वरावा लागतो, आणि त्यांतहि तो समर्थ आणि सद्‌गुणी लाभला कीं शालीन कुलवतीला पातिव्रत्याचा महिमा प्राप्त करून घेणें अधिक सोपें जातें. समर्थ त्या दृष्टीनें रामचंद्राची भक्ति करा असें सांगत असतांना, निष्काम भावनेनें ईश्वरोपासना करा असा आदेश देत असतांना, प्रेमादरानें भक्तिमार्गाला लागा असें उपदेशीत असतांना ज्याची उपासना करावयाची तो रामचंद्र, परमेश्वर, किती थोर आहे ते या श्लोकांत सांगत आहेत.



कामना ठेवूं नका असें सांगत असतांनाच रामचंद्र कसा भक्तकामकल्पद्रुम आहे तें समर्थ सांगतात. यामध्यें कोणतीहि विसंगति नाहीं. येणाराचें आतिथ्य करावें अशी शक्ति गृहस्थामध्यें असलीच पाहिजे. पण चांगलें आतिथ्य होतें म्हणूनच कोणी येत राहील तर संपन्न गृहस्थाची भावना काय होईल तें लक्षांत घेतलें म्हणजे रामभक्तींत कामना नसावी आणि राम भक्तकामकल्पद्रुम आहे या गोष्टी सांगण्यामध्ये विरोध वा विसंगति कशी नाहीं हे लक्षांत येऊं शकेल. पतिव्रतेने पतिसेवेत कोणतीहि कामना धरूं नये तरच ती पतिव्रता असें जें सांगितलें जातें तें खऱ्या पातिव्रत्याच्या आदर्शासाठीं. पति हा सर्वप्रकारानें दुबळा असतो म्हणून नव्हे. धर्मशास्त्रानें, ज्याला वरावयाचें तो कोणत्याहि प्रकारानें दुबळा असणार नाही याची काळजी घ्यावी, असें आवर्जून सांगितलें आहे. विवाहसंबंध जोडतांना ती एक महत्त्वाची अट आहे. तोच नियम परमार्थमार्गांतहि लागू आहे.

ईश्वराची समर्थता सांगतांना रामदासस्वामी म्हणतात 'राम हा कल्पतरु आहे, कामधेनु आहे, चिंतामणि आहे, अपार ऐश्वर्याचा साठा आहे आणि त्याचें स्वरूप सर्वात महत्त्वाचे, सर्वात श्रेष्ठ असें आहे.' जें जें कांहीं घडतें, जें जें काहीं प्रत्ययाला येतें तें तें सर्व ईश्वरी सत्तेमुळेंच होतें. तेव्हां आता सर्वभावानें त्यालाच शरण जावें हेंच श्रेयस्कर नाहीं काय? निरनिराळ्या इच्छांच्या पूर्तीसाठीं, निरनिराळीं माध्यमें हुडकीत जाणें याची आता काय आवश्यकता आहे? एका ईश्वरोपासनेंतच हीं सर्व माध्यमें, साधनें समाविष्ट आहेत. ईश्वराच्या योग्यतेचें, रामचंद्राशी ज्याची तुलना करतां येईल, असें कोणतेंहि माध्यम त्रिभुवनांत नाहीं. ईश्वराच्या प्राप्तीनेंच जर सर्व सुखें सर्वकाळ भोगतां येत असतील तर मग निरनिराळ्या सुखांच्या कल्पनेनें त्यांच्या प्राप्तीसाठीं इकडे तिकडे धांवाधांव करण्यांत काय अर्थ आहे? सुख मिळेल या कल्पनेनें सत्ता, संपत्ति, कीर्तीच्या मागे लागून प्रसन्नतेच्यादृष्टीनें अपयशाशिवाय दुसरे कांहींहि पदरांत पडत नाहीं. याचा अनेकवेळां अनुभव

प्रपंचामध्ये येत असतो. यांतील आपलें कोणी नाहीं, कसोटीच्या वेळीं कुणी टिकत नाहीं, असेंहि वारंवार अनुभवास येतें. विषयासंबंधींच्या इच्छा पूर्ण झाल्या तर त्या विषयोपभोगांतून अहंकार आणि आसक्ति वाढते. विषयोपभोग मिळाला नाहीं तर त्यामुळें संताप वाढतो आणि खिन्नता येते. यांत पुन्हां विविधतेचें आकर्षण भर घालतें तें निराळेंच. या सर्व आपत्तींतून सुटण्यासाठीं एका रामचंद्रालाच शरण जाणें हेंच उत्तम.

**उभा कल्पवृक्षातळीं दुख वाहे ।**
**तया अंतरीं सर्वदा तें चि आहे ।।**
**जनीं सज्जनीं वाद हा वाढवावा ।**
**पुढें मागुतां शोक जीवीं धरावा ।।६१।।**

जें जें मनांत येईल तें तें जो पुरवितो त्या वृक्षाला कल्पवृक्ष असें म्हणतात. त्याच्यातळीं उभा राहून जर कुणी दु:खाची कल्पना करील तर त्याला सतत दु:खच भोगावें लागेल. दुसरें काय होणार? एक लोककथा आहे कीं अरण्यांतून जाणारा एक वाटसरू पुष्कळ चालण्याच्या श्रमानें थकून एका झाडाखालीं विसावला. त्याला वाटलें या ओबडधोबड जमिनीवर आडवे होण्यापेक्षां छानसें अंथरूण असतें तर आंबलेल्या अंगाला अधिक विश्रांति मिळाली असती. असें त्याच्या मनांत आलें तोंच त्या कल्पवृक्षाच्या प्रभावानें तेथें एक उत्कृष्ट, सुसज्ज पलंग घातला गेला. वाटसरू त्यावर झोंपला. मग त्याला वाटलें चालण्याचा शीण गेला, आतां पोटभर सुग्रास जेवण मिळेल तर किती बरें होईल? त्याच्या या इच्छेसरशी त्याच्यापुढें पंचपक्वान्नांनीं भरलेलें ताट, कुणी आणून ठेवल्यासारखें, प्रगट झालें. वाटसरू चकित झाला आणि धास्तावलाहि. त्याला वाटलें–हें आपोआप कसें घडतें आहे? कांहीं भूताटकी तर नाहीं? लगेच भूत समोर उभें राहिलें. अरे बापरे! खरेंच भूत!! हें मला छळणार की काय? असें वाटसरूला वाटतांच त्याचा छळ होऊं लागला.

प्रपंचांत असेंच होत नाहीं काय? आपल्याला व्हावेसे वाटते आणि होत नाहीं असें खरोखरींच कितीदां होते? अगदीं आवश्यक तेंहि माणसाला मिळत नाहीं असें बहुधा कधीं घडत नाहीं. जीं माणसें याहि पातळीच्या खालीं असतील त्यांच्याकरितां परमार्थाचा उपदेश नाहींच म्हटलें तरी चालेल. ज्यांची दोन वेळच्या जेवणाची सोय नाहीं, लज्जारक्षणाइतकेहि वस्त्र जे वापरूं शकत नाहींत आणि निवाऱ्याची सोय नाहीं, अशा माणसांनीं उपजीविकेचाच विचार करावा. शास्त्र त्यांच्याकडून परमार्थाची अपेक्षा करीत नाहीं. उलट त्यांना 'आधी प्रपंच करावा नेटका' असेंच संत सांगतात. **जयांचें ऐहिक धड नाहीं। तयांचें परत्र पुससी कायी।''** (ज्ञा. ४।१५५) अशीच वस्तुस्थिति आहे. तेव्हां दोन प्रहरचीहि ज्यांना भ्रांत आहे त्यांचा विचार प्रस्तुत संदर्भात करण्याचें कारण नाहीं, प्रश्न आहे, तो-ही सोय ज्यांची चांगली झाली आहे-त्यांचें काय हा! ज्यांची तशी उत्तम सोय आहे तीहि माणसें परमार्थाला लागत नाहींत, खरा परमार्थ करीत नाहींत हीच तर खरी अडचण आहे. ती एक सामाजिक आपत्तीहि आहे. ज्यांची पुरेशी सोय झालेली आहे त्यांची वाढती हांव इतर अनेक बापड्यांच्या भयानक दारिद्र्यास कारणीभूत होत असते. पर्यायानें संघर्ष निर्माण होतो. स्वास्थ्य हरपतें आणि मग सर्वांनाच नाना प्रकारचे ताप आणि तज्जन्य दु:खें भोगावीं लागतात. म्हणजें सगळें चांगलें असतांना आपलीं दु:खें आपण वाढविण्यासारखेंच हें नाहीं काय? मिळालें तें सुख विसरून जावें आणि प्राप्त झालेलीं दु:खें घोळींत राहावें, हाच माणसाचा स्वभाव आहे. ज्याच्यामुळें सुख वाटावें अशी परिस्थिति भोंवती अगदींच नसते असें नाहीं. कांहीं थोड्या उणीवा असतील पण परिस्थिति सर्वथैव प्रतिकूल असेल असें दुर्दैव ज्यांच्या वाट्याला येते त्या व्यक्ती केवळ अपवादात्मक गणाव्या लागतील. एरवीं स्वत:च्या अंत:करणाची क्षुद्रता, आपला घायकुतेंपणा, हळवा स्वभाव, हेंच दु:खाचें खरें कारण आहे. पण माणसें मात्र सर्वदा परिस्थितीच्या नांवानें ओरडत राहतात. हें कल्पवृक्षाखालीं बसून दु:खाची कल्पना करण्यासारखेंच आहे.

मिळालें तें स्वत:च्या कर्तृत्वानें आणि मिळालें नाहीं तें दुसऱ्याच्या दोषामुळें ही माणसाची धारणा असते. पण तीं क्वचितच खरी असतें. आपलें बरें झालें हें आपल्या कर्तृत्वानें, हा माणसाचा शुद्ध अहंकार आहे. कुटुंब, समाज, देश आणि ईश्वरी कृपा यांची अनुकूलताच प्रगतीच्या, उन्नतीच्या मार्गात सहाय्यक असते आणि ही परिस्थिती बहुधा सर्वांना सामान्य अशीच असते. क्वचित् एखादा अपवाद आढळतो. हळव्या आणि छिद्रान्वेषी मनाला तो उत्कटतेनें जाणवतो, पण अपवादच असतो. त्यानें नियमाला बाध येत नाहीं आणि म्हणून त्याचें भांडवल करण्यांत अर्थ नाहीं. पण माणसें यशप्राप्तीच्या वेळीं हें लक्षांत ठेवीत नाहींत, तीं अहंकारानें स्वत:च्या कर्तृत्वाचा टेंभा मिरवितात.

एका पुढाऱ्याला एका पत्रकारानें विचारलें कीं तुम्हीं इतके मोठें कसे झालांत? हा म्हणाला– कोणाचेहि साह्य नसतांना, सर्व प्रकारच्या प्रतिकूल परिस्थितीवर मात करून, माझ्या गुणांनीं मी हें स्थान मिळविलें आहे. पत्रकार महाखवट होता. तो म्हणाला–बरें झालें, तुम्हीं हें सांगितलेंत, माझ्या लेखीं एका मोठ्या आरोपांतून ईश्वराची आणि समाजाची सुटका झाली.

माणसाला त्याच्या योग्यतेपेक्षां खरोखरीच अधिक मिळत असते. त्याचे श्रम वाया जात नाहींत, त्यांतून अधिकच लाभत असतें. एक दाणा पेरावा आणि शंभर घ्यावे हा निसर्गाचा नियम ईश्वरी औदार्याचा द्योतक आहे. तो सृष्टींतील सर्व कर्माला, निदान चेतन सृष्टींतील कर्माला सारखाच व्यापून आहे. मग सजीवांतील सर्वश्रेष्ठ असा जो बुद्धिमान मानव, तो एकटाच अपवाद कसा असणार? ईश्वर उदार आहे, कनवाळूहि आहे. सर्वसमर्थ आहे, ऐश्वर्य संपन्न आहे. तो कोणाला दु:खी काय म्हणून करील?

मनुष्य स्वत:ला दु:खी समजतो वा दु:खी होतो यांत जी वस्तुस्थिति असते तिचेंहि कारण तो स्वत:च असतो. मिळालेल्या साधनाचा, प्राप्त असलेल्या अनुकूलतेचा, तो घ्यावा तसा उपयोग करून घेत नाहीं. शासनानें विहीर खोदण्याकरितां धन द्यावें, नाममात्र व्याजानें द्यावें आणि शेतकऱ्यानें तें पोरीच्या लग्नांत, लौकिकाच्या लोभानें, जेवणावळीच्या थाटासाठीं उडवावें आणि शेतीच्या व्यवसायाच्या नावानें कांगावा करावा, तसेंच माणसाचें होतें.

प्रतिकूल वाटणारीं बारीक-सारीक कारणें कुठें तरी घडत असतात पण त्यांच्याच नावानें गवगवा केला जातो. नसते वाद वाढविले जातात. नकोत त्या कल्पना पोसल्या जातात. ज्या घटनांना, ज्या विकारांना, ज्या अपघातांना उपेक्षेनें मारावें त्यांनाच हट्टानें प्रमुखस्थान दिलें जातें. खुनाच्या वार्तेला भडक मथळे द्यावे आणि एकाद्या महापंडिताच्या सत्काराला कोपऱ्यांतहि जागा मिळूं नये वा कोपऱ्यांतच मिळावी, असेंच होत राहतें आणि त्यामुळें ज्यांची उपेक्षा करावी ते विषय वादाचें रण घालतात आणि अस्वास्थ्यांत परिणत होणारें, संघर्षाचें युद्ध पेटवितात. आश्चर्याची गोष्ट अशी कीं भलीं माणसेंच हें करीत असतात. पण या वृत्तीनें चांगलें कांहींच साधत नाहीं. दलितांचा उद्धार होत नाहीं, पीडितांच्या वेदना टळत नाहींत, उलट सर्वांची परिणति शोकामध्यें, खिन्नतेमध्यें, अस्वास्थ्यामध्यें होते.

शस्त्रकर्म करतांना, सडलेले अवयव निष्ठुरपणें कापून टाकावे लागतात हें कितीहि खरें असलें तरी, न सडलेल्या शरीरावयवांची संख्या फार मोठी असते म्हणून शस्त्रकर्म यशस्वी होतें, आणि जीवन सुखावह होतें, हेंहि लक्षांत ठेवलें पाहिजे. सडकें कापतांना आंधळेपणानें, अनवधानानें किंवा भ्रमानें, सुस्थितींत असलेल्या अवयवांनाहि धक्का लागला तर संकट ओढवतें. व्याधि मर्मस्थानीं असेल तर मरण कोसळतें. शस्त्रकर्म करणाराला हें लक्षांत ठेवावे लागतें. म्हणून शस्त्रकर्म करणारा तज्ज्ञ असावा, अनुभवी असावा, त्यानें तसें योग्य तें प्रशस्तिपत्रक मिळवलेलें असावें, अशा अटी घातल्या जातात आणि त्या पाळाव्याहि लागतात.



पण साहित्यिकांना आणि पुढाऱ्यांना अशा कांहीं अटी वा बंधनें नसल्यामुळें ते स्वार्थापोटीं नसलेले वाद वाढवितात, असलेले भडकवितात. जें चांगलें आहे त्याचा विचार करीत नाहींत आणि मग शोक, उद्विग्नता यांच्याविना दुसरे कांहीं पदरीं येत नाहीं.

माणसाची ही वृत्तीच खरी घातक आहे. या वृत्तीनें आपल्या हातानें तो हानी करून घेत असतो. समर्थ आतां अशा स्वहितविघातक व्यक्तींचें निरनिराळ्या प्रकारांनीं वर्णन करीत आहेत. 'जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा' या पालुपदाच्या श्लोकसमुच्चयानें भाग्यवान पुरुषांचीं लक्षणें समर्थांनी सांगितलीं. आता माणसाचें करंटेपण कसें आहे तें समर्थ सांगत आहेत. दोष काढून टाकण्यासाठी त्यांचें वर्णन करावें लागतेंच.

**निजध्यास तो सर्व तुटोनि गेला ।**
**बळें अंतरीं शोक संताप ठेला ।।**
**सुखानंद आनंद भेदें बुडाला ।।**
**मनीं निश्चयो सर्व खेदें उडाला ।।६२।।**

प्रपंचांतील दु:खें आहेत त्यापेक्षां अनेकपटीनें वाढतात, त्याचें कारण असें कीं माणसें जें लक्षांत ठेवावयाचें, ज्याचा ध्यास घ्यावयाचा, तें सोडून इतर वासना, कामना, कल्पना, पोकळ चर्चा, नसते वादविवाद, याचाच विचार करीत राहतात, आणि जें करावयाचें तें सर्व सोडून देतात. समर्थांनीं येथें वापरलेला निजध्यास हा शब्द निदिध्यास या उपनिषदांतील अतिप्राचीन शब्दाचें प्राकृत रूपहि असेल किंवा निजध्यास म्हणजे आपला म्हणजे आत्म्याचा ध्यास असाहि अर्थ असेल. पहिला अर्थ साधनाच्या दृष्टीनें आणि दुसरा अर्थ साध्याच्या दृष्टीनें अधिक महत्त्वाचा आहे. आपण साधकांनीं दोन्हीं अर्थ विचारांत घेणें उपयोगाचें आहे.

श्रवणापासून लाभ होतो. श्रवण ही पहिली भक्ति आहे. म्हणून चांगलें ऐकावें, सदाचार, सद्वासना, ईश्वरनिष्ठा यांना प्रेरणा लाभेल असें ऐकावें. दासबोध, गाथा, ज्ञानेश्वरी, गीता, उपनिषदें, भारत, भागवत, रामायण यांचें वाचन करावें. चांगल्या विषयावरचीं, शक्य तर चांगल्या व्यक्तींनीं केलेलीं कीर्तनें, प्रवचनें ऐकावीं. ऐकतांना विद्वत्ता, वक्तृत्व, आणि रंजकता, यापेक्षां विषयाची ओढ ठेवावी. जे श्रवण करतो म्हणतात ते हा विचार करीत नाहींत. त्यांना व्यक्तित्त्वाचें किंवा वक्तृत्वाचें आकर्षण असतें. शास्त्रानें आस्वाद हा श्रोत्याचा गुण सांगितला आहे. तो कुणी लक्षांत घेत नाहीं. ऐकल्यानंतर, त्याचें मनन, निदिध्यासन करावयाचें असतें हें तर जणूं माहीतहि

नसल्यासारखें लोक वागतात. वस्तुत: मनन-निदिध्यासनांवांचून केलेलें श्रवण हें व्यर्थ आहे. भोजनाचा लाभ नुसत्या अन्न खाण्यानें होत नाहीं; तें पुढें पचावें लागतें. मग अंगी लागावें लागतें. तसें झालें नाहीं तर भोजन हें शल्यरूप होतें. जाणवत नसलें तरीं श्रवणाचेंहि तसेच होतें. उगीच शंका येत राहणें, धड निश्चयच न होणें, हेंहि खरें आणि तेंहि खरें–असें झोके मनाला बसणें, वादविवादाची आवड वाटणें, हीं सर्व श्रवण न पचल्याचींच लक्षणें आहेत. न पचलेलें श्रवण हा मस्तकाला दिलेला व्यर्थ शीण आहे. यासाठीं मनन आणि निदिध्यासन याचा अवलंब निष्ठेनें करीत राहिलें पाहिजे. श्रवणाचा विवेकानें स्वीकार करणें म्हणजे मनन, आणि तें अंगीं लागणें, म्हणजे त्यांतील उपयुक्त ग्राह्य भाग आचरणांत उतरणें हें निदिध्यासन. हा निदिध्यास जर तुटला तर त्याचे परिणाम शोकसंतापादि मानसिक विकारांत होणें अगदीं स्वाभाविक असतें. म्हणून निदिध्यास तुटणार नाहीं याची काळजी घेतली पाहिजे.

निजध्यास म्हणजे सदैव आत्मचिंतन, मनाची ओढ सारखी ईश्वराकडे लागलेली असणें. प्रापंचिक दु:खांतून उत्पन्न होणाऱ्या शोकमोहसंतापांपासून दूर राहण्यासाठीं या ध्यासाचा फार उपयोग होतो. रस्ता कितीहि खडबडीत असला तरी ज्या गाडीनें जातो तिच्या स्प्रिंग्ज चांगल्या असल्या आणि बैठकीच्या गाद्या गुबगुबीत असल्या कीं रस्त्यांतील खड्डे, गोटे यामुळें बसणारे धक्के यात्रिकाला जाणवत नाहींत आणि त्याचा प्रवास सुखावह होतो. जीवनाच्या प्रवासांत निजध्यासानेंहि तसेंच होते. तत्त्वाचा अभ्यास, तत्त्वज्ञान, अध्यात्म हे अगदीं स्थूलदृष्ट्या विचारांत घ्यावयाचे ठरले तरी ते चांगल्यापैकी 'शॉक ॲबसॉर्बर' (Shock absorber) आहेत हें तरी निश्चितच. थोड्याशा प्रयत्नानें मिळणारा हा लाभ अगदीं प्राथमिक अवस्थेंतहि अनुभवितां येतो. वाहनाच्या स्प्रिंग्ज आणि गाद्या काढून टाकल्या म्हणजे जे हाल वाट्याला येतात, उघड्या खटाऱ्यांत बसून ओबड धोबड रस्त्यानें जातांना जें भोगावें लागतें, तेंच निजध्यास तुटला म्हणजेहि वांट्यास येते. बाहेरचा रस्ता यदाकदाचित् शासन वा पालिका ठाकठीक करील पण या कलियुगांत तरी प्रपंच सुरळीत होण्याची शक्यता नाहीं. त्यांतील व्याधिमरणादि प्रसंग, सत्तासंपत्तीची, कीर्तीची हानी, परिवारातील व्यक्तींचे आग्रही अहंकारी स्वभाव, आप्तेष्टांचे स्वार्थ, उलटसुलट रागद्वेष, यांचे आघात होत नाहींत असा दिवस- ज्यांचा संसार त्यांतल्या त्यांत बरा आहे असें मानलें जातें– त्यांच्या तरी आयुष्यांत कितीदां उगवतो कुणास ठाऊक? तेव्हां रस्ता दुरुस्त होईल ही धारणा साधकानें करण्यांत अर्थ नाहीं. त्यानें आपल्या वाहनाच्या गाद्या गुबगुबीत करून घेणें एवढेंच शक्य आहे. निजध्यासानें तेंच साधतें. हा ज्याचा तुटला त्याच्या



अंत:करणांमध्यें शोक, संताप, त्याची इच्छा असो नसो, बलात्कारानें ठाण मांडतात आणि माणसाच्या दुर्दशेला पार राहत नाहीं. दु:खानें, विषादानें, संतापानें त्याचें हृदय भरून जातें. आत्महत्येचे विचारहि त्याच्या मनांत डोकावतात. कांहींच चांगलें वाटत नाहीं. कुठेंच सुख लागत नाहीं. सगळीकडे सर्वकाळ एक अस्वास्थ्यच वाट्याला येतें. निजध्यास तुटल्याचाच हा घोर परिणाम आहे.

निजध्यास तुटल्यामुळें भेदबुद्धि वाढत जाते, दुरावा वाढत जातो, आपलेपणा नष्ट होतो आणि मग घृणेला, तिरस्काराला, द्वेषाला अधिकाधिक धार येत जाते व त्यामुळें एरवीं खरोखरच सुखावह आनंददायक असणाऱ्या गोष्टी त्याला सुखी किंवा आनंदी करूं शकत नाहींत. त्याला कुठें चांगलें दिसत नाहीं, कुठेंच अनुभवाला येत नाहीं. तो छिद्रान्वेषी होतो. दुसऱ्याच्या ठिकाणीं दोष-हुडकतो, पराचा कावळा करतो. प्रत्यक्ष सूड उगवतां आला नाहीं तर निंदा तरी करीत राहतो. त्यामुळें एक विलक्षण खिन्नता त्याला प्राप्त होते, कोणत्याहि चांगल्या गोष्टींविषयीं त्याला उत्साह वाटत नाहीं, वाटला तरी टिकत नाहीं. पूजापाठादि धार्मिक गोष्टी त्याला कंटाळा आणतात. सदाचरणाविषयींचे निश्चय डळमळूं लागतात, नष्टहि होतात. यासाठीं आत्मविषयक चिंतन माणसानें सुटूं देतां कामा नये.

निजध्यास साधून प्रपंचांत कसें वावरतां येईल अशी एक शंका माणसाच्या मनात येते. पण आपण समजतो तेवढें हें अवघड नाहीं. थोडासा अभ्यास करावा लागेल पण तो साधण्यासारखा आहे. जे दुचाकी वापरतात त्यांच्या हें लक्षांत येण्यासारखें आहे. दुचाकी वापरावयाची म्हणजे तोल सांवरतां येणें महत्त्वाचें. जो दुचाकी चांगली चालवूं शकतो त्याला आतां तोल सावरण्यासाठीं वेगळे प्रयत्न करावे लागत नाहींत. वळणें घेणें, मित्रांशीं बोलणें, आवश्यक तेव्हां इकडे तिकडे पाहणें, समोरच्या अडथळ्याला चुकवणें, या सर्व गोष्टी तो सहज करूं शकतो. दुचाकीवर बसावयास शिकतांना मात्र यांतील प्रत्येक गोष्ट त्याचा तोल घालवणारी ठरली होती. आतां या सगळ्या गोष्टी त्याच्या मार्गक्रमणांत अडथळा आणीत नाहींत, त्याचा तोल घालवीत नाहींत आणि हें इतकें सहज होतें कीं तोल सांवरण्यासाठीं आपण कांहीं वेगळें केलें याची जाणीवहि राहत नाहीं. तोल सावरणें म्हणजेच निजध्यास आहे. निजध्यास म्हणजे तोल सांवरणेंच आहे. तेंच अभ्यासानें प्राप्त करून घेतलें पाहिजे व सावधपणें टिकवले पाहिजे.

**घरीं कामधेनु पुढें ताक मागे ।**
**हरीबोध सांडुनि वेवाद लागे ।।**
**करी सार चिंतामणी काचखंडें ।**
**तया मागता देत आहे उदंडें ।।६३।।**

सगळ्या इच्छा ज्याच्या आश्रयानें पुऱ्या करून घेतां येतील असा अंतरात्मा सर्वांच्या हृदयांत अक्षय्य वास करीत असतांना, निजध्यासानें त्याची कृपा संपादन करून घेण्याचें सोडून माणूस प्रापंचिक गोष्टींत विषयाच्या लाभांत, सुखसमाधान मिळविण्याची इच्छा करतो, हें किती विलक्षण आहे! श्रीज्ञानेश्वर महाराजांनींहि हें आश्चर्य प्रगट केलें आहे. **''हृदयामध्यें मी रामु। असतां सर्व सुखाचा आरामु। कां भ्रांतासी कामु। विषयावरीं।।** (ज्ञा. ९।६२) हेंच आश्चर्य समर्थांनींहि या श्लोकांत विशेष रीतीनें दर्शविलें आहे. सर्व मनोरथ पूर्ण करणारी कामधेनु घरच्या अंगणांत बांधलेली असावी आणि तिला न ओळखता एखाद्या अडाणी गृहस्थांनी शेजारी पाजारी कोरड्यास म्हणून ताकाची भीक मागावी तसेंच हें घडतें. माणसाला खरोखरीच सुख कोठें आहे, कसें आहे आणि कशानें मिळतें हें एकदां कळलेंच पाहिजे. जीवनामध्यें सर्वोत्कृष्ट आनंद देणारी वस्तु गाढ झोंप ही आहे. भले ललित वाङ्मयानें तिची उपेक्षा केलेली असो, पण ती वस्तुस्थिती आहे. माणसाला त्याच्या आवडीच्या एकेका विषयापासून आठआठ दिवस दूर ठेवावें आणि तसाच प्रयोग झोंपेच्या बाबतींतहि करावा. म्हणजे झोंपेचें काय महत्त्व आहे हें लक्षांत येईल. रात्रीं एकदां गाढ झोंपावें आणि मग दुसऱ्या दिवशीं प्रसन्नतेनें सर्व व्यवहार करावे. अध्यात्म आणि प्रपंचाचेंहि खरें असेंच आहे. गाढ झोंप लागण्याच्या प्रकृतीला मुकावे लागेल असे आहार-विहारादि व्यवहार करूं नयेत, तसेंच अध्यात्म दुरावेल असा प्रपंच करूं नये. पण परमार्थाचें हें महत्त्व लक्षांत न घेतां माणसें सुख जें काय आहे तें विषयोपभोगानेंच मिळेल या कल्पनेनें अहर्निश धडपडत राहतात. त्याचें हें वागणें कामधेनूची उपेक्षा करून ताक मागण्यासारखेंच आहे.

तात्त्विक चर्चेतून, निरनिराळ्या ग्रंथांच्या वाचनांतून वा विविध प्रकारच्या श्रवणांतून मनुष्याला वस्तुत: ईश्वरविषयक ज्ञान व्हावयास हवें. त्याची निष्ठा दृढ व्हावयास हवी. बोध या शब्दांतून इतका सर्व भाव व्यक्त होतो. श्रवणादि गोष्टींतून असा बोध मिळविण्याच्या ऐवजीं माणसें वादविवादाच्या, खंडन-मंडनाच्या नादीं लागतात. शब्द हे बोधाचें माध्यम होण्याच्या ऐवजी विद्वत्तेचें माध्यम होतात आणि शब्दांचा वाढता संग्रह, अहंकारास पुष्ट करून, आपलें मत प्रस्थापित करणें व इतरांचें खोडून काढणें यांतच संतोष मानावयास शिकवतो. शब्द हे ज्ञानाचे वाहक निश्चित आहेत. पण त्यांचा आचाराशी वा अनुभवाशीं संबंध राहिला नाहीं, तर मात्र शब्द हे माणसाच्या प्रगतीच्या मार्गांतील मोठा अडथळा होऊं शकतात आणि व्यर्थ वादाचें रणांगण त्यामुळें माजतें. लो. टिळकांचें 'गीतारहस्य' प्रसिद्ध झालें त्यावेळीं हा अनुभव आला. टिळकांनीं गीतेचा अर्थ



कर्मयोगपर लावला आणि शंकराचार्यांच्या नांवानें प्रसिद्ध असलेल्या संन्यासपरतेचें खंडण केलें. त्याची प्रतिक्रियाहि उग्र रूपांत उसळली आणि मग कांहीं वर्षें तरी तोच एक वाद विद्वत्तेच्या क्षेत्रांत धुमाकूळ घालीत होता. टिळकभक्त आणि शंकराचार्यभक्त असे जणू युद्धच चालू होतें. स्वत: लो. टिळक त्यांत फारसे पडले नाहींत. शंकराचार्य तर भूतकालांतील व्यक्तिमत्त्व होतें. पण त्यांचे भक्त मात्र हमरीतुमरीवर येऊन नित्य आवेशानें परस्परांवर तुटून पडत होते. कोणी टिळकभक्त टिळकांसारखा कर्मयोगी नव्हता कीं कोणी शंकरभक्त आचार्यांसारखा विरक्त नव्हता. बोधापासून दूर गेलें कीं असेंच होतें. तत्त्ववेत्ता आणि प्रचारक, साक्षात्कारी आणि सांप्रदायी यांच्यांतील भेद हा बोधाचाच भेद आहे. हें न समजल्यामुळेंच व्यर्थ वादविवाद रंगत जातात आणि या काथ्याकुटांतून, शुष्क चर्चेतून, कंठशोष आणि शिर:शूल पदरांत पडतो. बोध सोडावा आणि वाद घालावा हेंहि कामधेनु घरी असतांना ताक मागण्यासारखेंच आहे. ज्याला मागितलें तर वाटेल तें मिळेल असा चिंतामणि हातीं आला असतांना कुणी कांच समजून त्याला जर फेंकून दिला तर या करंटेपणाला त्याचा तोच उत्तरादायी नाहीं काय? चिंतामणि म्हणजे इच्छिलेलें सर्व पूर्ण करणारें रत्न. त्याच्या जवळ आपणास काय हवें तें देण्याचे उदंड सामर्थ्य आहे. असें असताना त्यालाच जर कुणी कांचेचा तुकडा समजले तर तो दोष तसे समजणाऱ्याचाच आहे.

**अती मूढ त्या दृढ बुद्धी असेना ।**
**अती काम त्या राम चित्तीं वसेना ।।**
**अती लोभ त्या क्षोभ होईल जाणा ।**
**अती वीषयी सर्वदा दैन्यवाणा ।।६४।।**

ज्याला कांहीं समजत नाहीं तो मूढ आणि ज्याला आपणांस समजत नाहीं हेंहि समजत नाहीं तो अतिमूढ. अज्ञान मूढता नव्हे. म्हणजे अज्ञानामध्यें ज्ञान नसतें, ज्ञानाचा अभाव असतो, हें खरें असलें तरी अज्ञान्याच्या ठिकाणीं सांगितलें तर समजून घेण्याची, ऐकलें तर कळण्याची, पात्रता असूं शकते. मूर्ख तो, मूढ तो कीं ज्याच्या ठिकाणीं ही समजून घेण्याची पात्रताच उरलेली नसते; त्यामुळें त्याला त्याच्या हिताचें म्हणून कांहींहि चांगलें सांगूं जावें तर तें ऐकून घ्यावें या मन:स्थितींत तो नसतो. मूढ कधीं ऐकतच नाहीं, चांगलें काय, श्रेष्ठ काय हिताचें काय, हें न समजल्यामुळें तें आचरणांत आणण्याचा प्रश्नहि उत्पन्न होत नाहीं. चांगल्या वस्तूसंबंधी बुद्धीचा एकदां निश्चय झालेला असला की मग चंचल स्वभावाचें मनहि अभ्यासानें, कांहीं प्रयत्नानें त्या हिताच्या ठिकाणीं एकाग्र करता

येतें, स्थिर ठेवता येते. मनाला आवर घालणें, योग्य मार्गाकडे वळवणें हें काम बुद्धीचेंच आहे. त्या बुद्धीला जर चांगलें काय तें कळून घेण्याची इच्छा नसली तर चौफेर उधळलेल्या नाठाळ घोड्याच्या पाठीवर बसून भरकटत असतांना, घोड्याचा लगामहि तुटून जावा तसें होतें. आतां कोसळणें एवढेंच शिल्लक राहते म्हणून सावध राहिलें पाहिजे. या अतिमूढतेच्या मुळाशी सुद्धां कोठें तरी आसक्तीचा अतिरेक हें कारण असतें, त्याचाच उल्लेख समर्थ पुढच्या चरणांत करीत आहेत.

ज्याच्या अंत:करणांत अतिकाम विषयोपभोगाची अत्यंत आसक्ति असते, त्याच्या मनामध्यें रामाला स्थान असत नाहीं. हिताचा विचार, चांगल्याचा विचार, परमार्थाचा विचार त्याच्या मनांत कधीं उत्पन्न होत नाहीं. आवश्यकता आणि चैन या गोष्टी मुळांत एक नाहींत. आवश्यकता निसर्गत: असते, स्वभावत: असते, मुळांत असते; पण चैन कृत्रिमच आहे, उपरी आहे. चैनीची आवश्यकता वाटूं लागली कीं नैसर्गिक इच्छेची मर्यादा संपून ती अतिक्रमण करूं लागली आहे असें समजावें. काम हें अतिक्रमणाचेंच स्वरूप आहे. त्याचीहि मर्यादा संपली कीं त्याचा अतियोग होतो, मग या कामाच्या अतियोगानें विवेकभ्रष्टता वाढूं लागते, आणि परमार्थाविषयीचें प्रेम, ईश्वराविषयीची भक्ति, सदाचरणाची आस्था, हीं जीं रामाचा निवास अंत:करणांत आहे असें सूचित करणारी लक्षणें आहेत, तीं त्याच्या ठिकाणीं मुळीं दिसेनाशीच होतात. लोभ ही पूर्ण झालेल्या कामाची प्रजा आहे. तोहि जेव्हां मर्यादेबाहेर जातो, तेव्हां त्यांतून सर्व प्रकारचे संघर्ष, क्षोभ, अस्वास्थ्य, हे समाजाचा सर्वनाश करणारे विकार उत्पन्न होतात. दुर्योधन, रावण, औरंगझेब हे या अतिलोभाचेच बळी आहेत. त्यांचा स्वत:चा तर नाश झालाच पण त्यांनीं सर्व समाजाला जो उपद्रव दिला त्याचे परिणाम फार भयंकर झाले.

यासाठीं माणसानें कामाला मर्यादा घालण्यास शिकलें पाहिजे. पचेल तेवढेंच खाल्लें पाहिजे. सोसेल तेवढेंच भोगलें पाहिजे. खाण्याभोगण्याचा आनंद हा त्याच्या प्रमाणांत नसून तें शरीराला मानवण्यांत असतो. हें सर्व दृष्टीनें, सर्व क्षेत्रांत लक्षांत ठेवलें पाहिजे. पण बुद्धिमान् अशा माणसाचें दुर्दैव असें कीं हें समजून घेण्याची इच्छाहि त्याचें ठिकाणीं उत्पन्न होत नाहीं व याचा परिणाम म्हणून तो स्वैराचारी बनतो. फार मोठे आघात झाले, दुष्परिणाम भोगावे लागले, म्हणजे हें कधीं कधीं लक्षांत येतें. पण तेव्हां फार उशीर झालेला असतो. प्रयत्न करण्याकरितां आवश्यक असणारा धीरहि त्यावेळीं ठेवता येत नाहीं, शरीर-मन-बुद्धीची कार्यक्षमताहि संपुष्टांत आलेली असते आणि मग दीनवाणें, केविलवाणें, जीवन वाट्यास येतें. ही दीनता म्हणजे जिवंतपणीं भोगावा लागणारा एक नरकवासच आहे. सभोंवतीच्या लोकांनीं हेटाळणी करावी, तिरस्कार करावा



आणि त्यांचेकडून अवहेलना, अपमान वाट्यास येत असतांना याला केविलवाणेंपणानें, लाचार जीवन जगावें लागावें, यापेक्षां अधिक दु:खदायक तें काय आहे? म्हणून विषयोपभोगाविषयींची इच्छा आसक्तींत परिणत होणार नाहीं याची दक्षता माणसानें सतत घेतली पाहिजे व त्या दृष्टीनें आपलें डोकें ताळ्यावर ठेवलें पाहिजे.

**नको दैन्यवाणें जिणे भक्तिऊणें ।**
**अती मूर्ख त्या सर्वदा दु:ख दूणें ।।**
**धरी रे मना आदरें प्रीति रामीं ।**
**नको वासना हेमधामीं विरामीं ।।६५।।**

मागच्या श्लोकांत सांगितल्याप्रमाणें दैन्यवाणें जिणें वाट्यास येऊ नये असें वाटत असेल तर काय करावें तें समर्थ या श्लोकांत सांगत आहेत. ज्याच्या अंत:करणांत भक्ति नाहीं, ज्याच्या जीवनांत श्रद्धा नाहीं त्याची दैन्य भोगण्याशिवाय सुटका नाहीं. अतिबुद्धिवादाच्या नादीं लागून मूर्खपणा केला कीं मग श्रद्धा, भक्ति हे जीवनाचें खरे आधार तुटून जातात आणि जीवन दु:खानें भरून जातें. म्हणून हृदयामध्यें श्रद्धा असणें, भक्ति असणें, निष्ठा असणें, हेंच जीवनाचें ऐश्वर्य आहे. हे भाव नसणें, हेंच दैन्य होय.

आपण मात्र हें समजून घेत नाहीं. आपण सत्ता, संपत्ति, संतति यालाच ऐश्वर्य समजतो. श्रीमंतीमुळें कांहीं सुखसाधनें उपलब्ध होतात हें खरें, पण आरोग्य आणि प्रसन्नता यांचा लाभ सुखसाधनांनीं वा तीं साधनें पुरविणाऱ्या श्रीमंतीनें होतो असें क्वचित्‌च आढळतें.

आपण ज्याला ऐश्वर्य समजतो, तें ज्ञानेश्वर, तुकाराम, रामदास यांच्या वाट्यास कधीं आलेंच नव्हतें. तुकारामांचा संसार दरिद्री म्हणतां येईल इतका सामान्य होता. त्यांनी आपल्या अनेक अभंगांतून या लौकिक दारिद्र्याचें वर्णन केलेलें आहे. या दारिद्र्याकडेहि ते विनोदबुद्धीनें पाहतात असें दिसतें, ज्यांतला कांहीं भाग वाट्यास आला असतां तरी माणसानें तीनदां आत्महत्या केली असती अशा दारिद्र्य रेषेखालील, तळींच्या प्रपंचातहि हे संतमहात्मे 'अवघाचि संसार सुखाचा करीन। आनंदे भरीन तिन्ही लोक।' असें आत्मविश्वासाने म्हणतात हें केवढें आश्चर्य आहे. चांगला संसार करण्याची पात्रता संतांच्या ठिकाणीं नव्हती असें मानणें ही बुद्धिवादाची विकृति आहे. ज्याचा परमार्थ संपन्न होतो त्याला ऐहिक संपन्नता मिळविणें मुळींच अशक्य नसते पण तो तें करीत नाहीं. केवळ अध्यात्माच्या प्राप्तीसाठींच आपलें सर्वस्व पणाला लावतो. यांतच त्याची थोरवी असते. त्यामुळें ऐहिकांतील निदां, अपयश, दारिद्र्य भरपूर प्रमाणांत वांट्यास

येऊनहि संतांच्या जीवनांत दैन्य कधीं डोकावतहि नाहीं. कारण एकच. त्यांचें अंत:करण ईश्वरभक्तीनें भरून गेलेलें असतें. आनंद, समाधान, प्रसन्नता यांची संतांच्या ठायीं कधीं उणीव नसते. आपण मात्र ऐहिकाच्या नादीं लागून संतांना लाभलेल्या या सुखसागरांतील शिंपलाभर सुखहि मिळवूं शकत नाहीं, याचें कारण खरें सुख कशांत आहे हें न समजण्याचा मूर्खपणा हें आहे.

ज्याच्या अंत:करणांत कोणत्या ना कोणत्या प्रकारची निष्ठा, भक्ति नांदत असते त्याला भयंकरांतील भयंकर आपत्तीचेंहि भय वाटत नाहीं. शेंकडो क्रांतिकारक जणूं बोहल्यावर चढावे अशा हर्षानें फांसावर लटकले. हजारोंनीं रक्ताच्या चिळकांड्या उडविणारे फटके पाठीवर बसत असतांना ''वन्देमातरम्''चा घोष उल्हासानें केला. मुलाचें लग्न बाजूस सारून तानाजी सिंहगडावर धांवले. शरीरांतून रक्ताचें पाट वाहत असतांना, शत्रु-शस्त्राच्या आघातांनीं शरीराचे तुकडे उडत असतांना ''तोफे आधीं न मरे बाजी सांगा मृत्यूला'' असें बाजीप्रभूनें यमदूतालाच ठणकावले. हें पाहिलें, ऐकलें म्हणजे बुद्धि आश्चर्यचकित होते, कल्पनाहि स्तिमित होते! हें धैर्य, ही उभारी कोठून आली? हिचा उगम देशभक्तींतून आहे, कर्तव्यनिष्ठेंतून आहे. आपत्ति निश्चितच आहे, कारण ती परिस्थितिजन्य आणि दैवाधीन गोष्ट आहे; तो प्रारब्धाचा भाग आहे. माणसाच्या कर्तृत्वाला तिच्यामुळें बंधन पडण्याचे कारण नाहीं. मनोवृत्तीला दैन्य येण्याची आवश्यकता नाहीं. पतिव्रता दारिद्र्यांतहि समाधानी असते. आणि विलासिनी ऐश्वर्यातहि व्यभिचारास प्रवृत्त होते आणि परिणामी दैन्यदशेला पोंचते कारण भक्तिप्रेमाचा अभाव.

म्हणून समर्थ दैन्यांतून, दु:खांतून सुटका होण्यासाठीं शहाणपणाचा मार्ग सांगत आहेत कीं बाबा! तूं रामचंद्रांविषयीं प्रेम आणि आदर ठेव. प्रेमामध्यें ओढ आहे, जिव्हाळा आहे, आत्मीयता आहे, सहवाससंगतीचें सुख आहे. आदरामध्यें श्रेष्ठतेची, मोठेपणाची जाणीव आहे. प्रेम आणि आदर हे दोन्ही असले म्हणजे भक्ति साकारते. निष्ठा आणि श्रद्धा ही तिचीच अंगोपांगें आहेत. तीं ज्याच्या अंत:करणांत राहतात त्याला विश्वास आणि धैर्य यांची जाणीव कधीं भासत नाहीं; आणि म्हणूनच त्याचें समाधान कधीं भंग पावत नाहीं.

स्वार्थासाठीं रोज एकमेकांशी भांडणाऱ्या, सत्तेच्या स्पर्धेसाठीं देशहिताचा विचार एकीकडे सारून एकमेकांचे पाय ओढणाऱ्या, पांच वर्षे तरी आसन टिकेल कीं नाहीं अशी शंका असणाऱ्या, पुढाऱ्याने दिलेल्या आश्वासनावर आपण विश्वास ठेवतों आणि त्या विश्वासानें जगतों. वारांगनेपेक्षांहि चंचल असणाऱ्या राजसत्तेनें दिलेलें I promise to pay the bearer हें वचन विश्वासार्ह मानून कागदाचे तुकडे गोळा करून ठेवतों व त्या बळावर स्वत:ला श्रीमंत समजतों. मग ''योगक्षेमं वहाम्यहम्'' अशी प्रतिज्ञा करणाऱ्या भगवंतावर भरवसून संतमंडळीं समाधानाचें जीवन जगत असतील तर आश्चर्य वाटण्याचें काय कारण आहे.



या ईश्वरभक्तीचें महत्त्व आपणास पटत नाहीं याचें कारण आपल्या अंत:करणांतील मूर्खपणाची, भौतिक सत्तासंपत्तीची अभिलाषा हेंच आहे! श्रीमंतींतून विषयोपभोग मिळत असतील, मिळतीलहि. पण त्यामुळें सुख, संतोष, समाधान निर्माण होतें असा अनुभव नाहीं. संपत्तीच्या मागोमाग ईर्ष्या, द्वेष, अहंकार, कृपणता, संताप, तडफड, अस्वास्थ्य, संघर्ष हेच उत्पन्न होत असतात. मोकळेपणा जातो. वृत्ति संकुचित होते, शरीराला आणि मनाला सहनशीलता राहत नाहीं. दुसऱ्याकडे क्षमाशीलतेने पहावे हें औदार्य दुरावतें आणि या सर्वांचा परिणाम म्हणून ऐश्वर्यांत लोळत असतांना मन दु:खाने, वैतागानें भरून गेलेलें राहतें, स्वभाव त्रासिक, चिडचिडा आणि चमत्कारिक बनतो, अशी व्यक्ति स्वत:हि सुखी होऊं शकत नाहीं आणि दुसऱ्यालाहि सुखी करूं शकत नाहीं. म्हणून समर्थ म्हणतात, बाबा रे! तुझी ओढ, आसक्ति, रामाकडे, ईश्वराकडे असूं दे. कर्तव्यभावनेनें संसार कर. केलाच पाहिजे. पण ऐश्वर्याची ओढ ठेवूं नकोस. इतकी संपत्ति मिळाली पाहिजे, घर असें असें पाहिजे, इतका इतका आराम मिळाला पाहिजे, शरीराचे कष्ट शक्य तेवढ्या प्रमाणांत कमी झाले पाहिजेत अशी आसक्ति ठेवूं नकोस. शरीराला शिणवूं नये, इंद्रियांना पीडा देऊं नये, हें खरेंच आहे, पण शरीर राबवले नाहीं तर तें कार्यक्षम राहत नाहीं हें त्याहून खरें. म्हणून अवश्यक तेवढी विश्रांती घ्यावी पण मऊ मऊ आसनावर लोळत पडण्यात सुख आहे असें मानण्याचा मूर्खपणा करू नये.

भौतिक प्रगतीनें अनेक प्रकारचीं साधनें निर्माण केलीं आहेत व तीं ज्यांना कोणत्या ना कोणत्या तरी मार्गानें उपलब्ध आहेत त्यांना शरीराला कष्टविण्याचें कारण उरलेलें नाहीं. परिणामीं शरीराची कार्यक्षमता उणावली आणि ऐश्वर्याचें सुख भोगण्याचें त्राणहि त्यांच्या शरीरांत राहिलें नाहीं. हें दुबळेंपण येऊं नये म्हणून समर्थ म्हणतात कीं विरामीं वासना नसावी.

शरीराला कष्ट न देणें म्हणजे श्रीमंती ही कल्पना पूर्वी-अलीकडे दिसते तशी-नव्हती. या दृष्टीनें आमचे दादा एक गोष्ट सांगत असत. वऱ्हाडचा एक श्रीमंत सावकार पैठणच्या एका सावकाराला मुलगी सांगून गेला. पंचक्रोशीच्या बाहेर सोयरीक न करण्याची पद्धति त्याकाळी होती. तेव्हां पैठणच्या सावकारांनी विचारलें, आपण इतक्या लांब कां आलांत? उत्तर-आपण फार श्रीमंत आहांत. मीहि श्रीमंत आहे. माझी मुलगी लाडांत वाढलेली आहे. माझ्या तोडीचें श्रीमंत स्थळ जवळपास नाहीं. आपल्या गजान्त लक्ष्मीचा गौरव मी इतक्यां दूरहि ऐकला

आहे. मुलगी आपल्या घरीं पडली तर तिला कष्ट पडणार नाहींत, ती सुखांत नांदेल, म्हणून मी येथें आलों. पैठणचा सावकार म्हणाला, आपली हीच कल्पना असेल तर मुलगी माझ्या घरीं देण्याचा प्रयत्न करू नका. आपण म्हणतां तसें सुख, मी श्रीमंत असलों तरी माझ्या घरीं मिळणार नाहीं. नोकरांनीं सगळीं कामें करावींत आणि मालकांनी केवळ गादीवर लोळावें अशी पद्धत माझ्या घरीं नाहीं. माझी सून २४ तास पैठणी नेसून वावरली तर तिला मी दर दोन महिन्यानीं नवी पैठणी घेऊन देईन, पण तिनें पैठणी नेसूनहि सडासारवण हें रोज केलेंच पाहिजे. मी श्रीमंत म्हणून तिला सोन्याची घागर देईन, पण तिनें नदीवरून रोज पाणी आणलेंच पाहिजे. बहुधा तें लग्न झालें नसावें. लग्न हुंड्यांत मोडलें नाहीं तर कष्टाच्या भयानें मोडलें. शरीरानें करण्यासारखें कांहीं काम नसलें कीं उरलेला रिकामा वेळ मनाच्या दृष्टीनें फार वाईट परिणाम करणारा ठरतो. हाहि शरीराच्या सुखासीनतेचा आणखी एक दोष आहे. योग्य प्रकारें योग्य त्या कामांत राबणाऱ्या शरीरासह मनहि गुंतून राहते आणि मग स्वैर कल्पना करण्याची आणि उगीच इकडे तिकडे धांवण्याची त्याची खोडहि सहजपणे मर्यादित होते. शरीराला काम नसलें कीं रिकामें मन पिशाच्च्याची रंगभूमि होतें. म्हणूनहि समर्थ म्हणतात– विरामीं वासना नको. अंत:करणांत प्रेम-निष्ठा असली, आदर आणि भक्ति असली कीं रिकामपणाचें दैन्य शरीराला व मनाला कधींच येत नाहीं. सर्व जीवन संतोष, समाधानानें भरून जातें. आणि या स्थितीला पुरुष प्राप्त झाला कीं **"यं लब्ध्वा चापरं लाभं मन्यते नाधिकं ततः। यस्मिन् स्थितो न दुःखेन गुरुणापि विचाल्यते।** (भ. ६।२२) अशी त्याची स्थिति होते. आतां त्याच्या जीवनांत दैन्य-दु:खाचें नांव तरी उरेल काय?

**नव्हे सार संसार हा घोर आहे ।**
**मना सज्जना सत्य शोधूनि पाहें ।।**
**जनीं वीष खातां पुढें सूख कैचें ।**
**करी रे मना ध्यान या राघवाचें ।।६६।।**

सर्व संतमंडळींत रामदासस्वामी हे प्रवृत्तिपर विचारांचे, संसाराचा पुरस्कार करणारे, प्रपंचविज्ञान आग्रहानें मांडणारे आहेत, असें मानलें जातें. आणि त्यासाठींच इतर सर्व संतांना 'संताळे' असें म्हणून केवळ रामदासस्वामींची तेवढी राष्ट्रसंत, कर्मयोगी, जनकल्याणतत्पर अशा विशेषणांनी स्तुतीहि करण्यांत येते. आधुनिक बुद्धिवाद्यांचा हा विचार वारकरी नि रामदासी यांच्यांत जो दुजाभाव दिसतो तो निर्माण करणाऱ्या कारणांपैकीं एक आहे. वस्तुत: रामदासस्वामी आणि महाराष्ट्रातील



इतर ज्ञानदेवादि संत यांच्यांत, सिद्धांत आणि साधन यादृष्टीनें, तत्त्वज्ञानाचें म्हणून कांहींहि अंतर नाहीं. सगळेच अद्वैती आहेत, सगळ्यांनाच सगुणोपासना प्रिय आहे. सगळेच भक्तिमार्गाला व नामस्मरणाला श्रेष्ठ समजणारे आहेत. संसार सोडावा असेंहि कुणी सांगत नाहीं. आणि वैराग्य गुंडाळून संसारांत आसक्त होऊन राहावें असाहि विचार कुणी मांडलेला नाहीं. संसारासंबंधींच्या श्रीतुकाराम- महाराजांच्या व श्रीसमर्थ रामदासांच्या विचारसरणींत कांहींहि अंतर नाहीं. मांडण्याच्या पद्धतींत थोडा भेद असतो पण तो कोणाहि दोन संतांच्या वाङ्मयाच्या आधारें दाखवितां येईल. तात्पर्याच्या दृष्टीनें, सिद्धांताच्या दृष्टीनें, बोधाच्या दृष्टीनें, श्रीज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम, रामदास एकरूपच आहेत. 'संत दिसती वेगळाले। परी ते स्वरूपीं मिळाले।।' हीच वस्तुस्थिति आहे.

समर्थ प्रपंच नेटका करावयास सांगतात हें खरेंच आहे. कारण 'ज्याचें ऐहिक धड नाहीं। त्याचें परत्र पुससी कायी।।' इहलोकींचा संसारादि व्यवहार हाहि ज्याला धडपणें करतां येत नाहीं त्याला परलोकींचीं म्हणजे प्रपंचाबाहेरचीं, केवळ शरीरभोगापलीकडचीं मोक्षप्राप्ति, ईश्वरभक्ति इत्यादि सुखें कशीं लाभणार? संसार करणें न करणें वेगळें. न करतां येणें वेगळें. हें न करतां येण्याचें दुबळेपण ज्याचें ठिकाणीं आहे तो परमार्थहि योग्य रीतीनें साधूं शकत नाहीं असेंच श्रीज्ञानेश्वर महाराजांना म्हणावयाचें आहे. नपुंसकाला जसें कोणी नैष्ठिक ब्रह्मचारी मानीत नाहीं, तसेंच हें समजावें. परमार्थासाठींहि चांगली बुद्धि, प्रयत्नशीलता, धैर्य, कार्यक्षमता, कौशल्य, दृढनिश्चय, शरीरस्वास्थ्य या सर्वांचीच अवस्थाभेदानें उणी-अधिक आवश्यकता असते. प्रपंच नेटका करण्यांत या सर्व गुणांची थोडी फार कसोटी लागत असते. दुबळेंपण पुष्कळ वेळां वैराग्याच्या नांवावर खपविलें जातें, तें फार अनिष्ट ठरतें. प्रपंच नेटका करा असें सांगण्यामागची भूमिका ही अशी. प्रपंच नेटका करणें हें त्याच्याविषयींची आसक्ति उणावण्याच्या दृष्टीनेंहि उपयोगी पडतें. 'प्रपंच मूळचाच नासका। म्हणोनि करावा नेटका। नेटका करतां फिका। होत जातो।।' असें समर्थ सांगतात. त्याकडे नीट लक्ष देऊन पाहिले म्हणजे कांहीं आधुनिक बुद्धिवादी समजतात त्याप्रमाणें समर्थ हे इतर संतांच्यापेक्षां वेगळे असे प्रवृत्तिवादी नाहींत, त्यांचें प्रपंचविज्ञानहि संसारोन्मुख नाहीं हें लक्षांत येईल.

समर्थांचा संसारविषयक दृष्टिकोन या श्लोकांतून चांगला स्पष्ट झाला आहे. संसार हा असार आहे. त्यांत सारभाग असा कांहींच नाहीं. म्हणून त्यांत रस घेऊं नये. त्यांत रस घेण्याची वृत्ति ठेवली, मनुष्य आसक्त झाला तर तो घोर आहे, हें प्रत्ययास येतें. घोर म्हणजे भयंकर भीतिदायक. संसाराच्या आसक्तीनें अनेक

प्रकारच्या चिंताहि पाठीमागे लागतात आणि आसक्तीमुळें संसार एकदां मागें लागला कीं मग त्यांतून सुटकाहि होत नाहीं. मुंज, लग्न, गर्भारपण, बाळंतपण, रोगांत शुश्रूषा हें चक्र एकदां सुरूं झालें कीं आपलें, मुलांचें, नातवांचें अशा गतीनें फिरत राहतें. हें एवढें कार्य झालें कीं मी मोकळा होईन हें म्हणणें खोटें ठरतें. चाकाच्या पट्ट्यांत सांपडल्यासारखी माणसाची स्थिति होते. तो तळमळतो, ओरडतो. पण तुटल्याशिवाय सुटूं शकत नाही. संसाराला घोर म्हटलें आहे तें यामुळेंच. पण हें स्पष्टपणें खरें सांगणें माणसाला आवडत नाहीं. लोक रागवतात. **''अप्रियस्य च पथ्यस्य वक्ता श्रोता च दुर्लभः''** असें म्हटलें जाते तें यासाठींच. विषयसुखाविषयींच्या आसक्तीनें संसाराचें खरें स्वरूप काय तें सांगणें हें ऐकायला जरी नको वाटलें तरी तो घोर आहे हें सत्यच आहे. बहुतेक सगळ्यांचा अनुभव तोच असतो. कुणी तें लक्षांत घेतो कुणी घेत नाहीं. लक्षांत घेणाराहि लक्षांत ठेवीत नाहीं. आणि लक्षांत राहिला तर सोयीचें नसतें म्हणून त्यावर चिंतन करीत नाहीं. संसाराच्या घोरपणाविषयीं इतर कोणाच्या साक्षीची कांहींच आवश्यकता नाहीं. स्वतःच्या जीवनांत जरा डोकावलें, जरा लक्षपूर्वक खोलवर डोकावलें तर संसाराचें हें सत्यस्वरूप सहज उघडकीला येईल.

संसार घोर आहे हें खरेंच पण तो टाकतांहि येत नाहीं. संसाराच्या स्वरूपाची व्यापकता इतकी विशाल आहे कीं बायको टाकली, घर सोडलें, रानांत गेला, यादृष्टीनें संसार सुटला असें समजणें खुळेपणाचें ठरतें. तो कोणत्या ना कोणत्या तरी रूपांत भोंवती असतो. बायकामुलांचा संसार ज्यांना नसतो त्यांनाहि संसाराचा ताप असतोच. मठपती महंतांचीहि त्यांतून सुटका होत नाहीं.

खऱ्या अधिकारानें युक्त असलेल्या गुरूंचे शिष्यहि सत्ता-सन्मान-ऐश्वर्यादि भौतिक संपत्तीसाठीं गुरूच्या माघारीं सोडा पण गुरूसमोरहि भांडल्याची ऐतिहासिक उदाहरणें आहेत. यासाठीं संसारांत सार नाहीं हें जाणून घेण्यास शिकलें पाहिजे.

संसार असार आहे हें सत्यच आहे. तसाच तो घोरहि आहे. पण हें सत्य प्रयत्नपूर्वक जाणून घेतलें पाहिजे. म्हणून समर्थ सांगतात–संसार असार आहे हें सत्य आहे पण तें तू शोधून पहा. सत्य हें व्यापक आहे. त्रिकालाबाधित आहे. हें कितीहि खरें असलें तरी सूक्ष्म आहे. रस्त्यावर पडलेली वस्तू सहज उचलून घ्यावी तसें स्वरूप सत्याचें नसते. बागेंत जाऊन फुलें वेंचावींत तसें सत्य सहजपणें सांपडत नाहीं. सर्व चांगलीं साधनें जन्माला आलीं तीं सत्याच्या शोधासाठींच. माणसाला त्यासाठींच दीर्घकालपर्यंत आपल्या सर्वशक्तीनिशी, निष्ठेनें आणि सातत्यानें अथक प्रयास करावे लागतात. माणसाला स्वतःच्या ठिकाणीं असलेल्या उणीवांमुळें अनेक प्रकारें सत्याचा आभास होत असतो. त्या



परिस्थितींत तेवढ्यापुरतें तें खरें वाटतें पण तो भ्रम असतो. आपल्या कल्पना, आपले विचार विवेकानें पुन्हां पुन्हां शोधून पहावे लागतात. या सातत्याच्या प्रयत्नांचा शीण येतो. माणसाला तो सोसत नाहीं. मग तो बुद्धिवादाचेंच पांघरूण डोक्यावरून घेऊन मुरगुट मारून झोंपतो. प्रकृत्या भित्री असणारी माणसें तोंडावर पांघरूण घेऊन पडतात. स्वतःला सुरक्षित समजण्याचा त्यांचा तो एक भाबडा प्रयत्न असतो.

स्वतःच्या कल्पना कितीहि योग्य वाटल्या तरी त्यांचें पांघरूण घेऊन पडणें हा सत्यशोधनाच्या मार्गांतील सर्वांत मोठा अडथळा ठरतो. जें चकचकीत दिसतें तें सर्व जसें सोने नसतें तसेंच जें आकर्षक वाटतें तें सर्व सत्यहि नसतें. आपला आळस, आपल्या वासना, आपल्या संवयी, आपलें दौर्बल्य यांचा एकत्र वा सुटा परिणाम म्हणून, आकर्षक म्हणून नको त्या गोष्टीविषयीं आकर्षण निर्माण होणें आणि तें नाहीसें करणें पुष्कळ वेळां आपल्या हातांतीलहि राहत नाहीं आणि मग भगवंताची प्रार्थना करावी लागते कीं हे भगवान् **हिरण्मयेण पात्रेण सत्यस्यापिहितं मुखम्। तत्त्वम् पूषन् अपावृणु सत्यधर्माय दृष्टये।।** सोन्यासारख्या आकर्षक वाटणाऱ्या चकचकीत झांकणानें सत्याचें स्वरूप झाकलेलें आहे. हें नारायणा! जगद्रक्षका! सूर्यदेवा! कृपा करून तें आपणच दूर करा म्हणजेच सत्यदर्शनाची ओढ असलेल्या मला सत्याचें यथार्थरूप दिसेल.

हें सर्व होण्यासाठीं, वाटण्यासाठीं, संसाराची असारता केव्हां ना केव्हां तरी माणसाच्या अनुभवास यावी लागते. संसारी जीवनांत तसे प्रसंग अगदींच येत नाहींत असें नाहीं. पण माणूस आपल्या सोयीसाठीं तो अनुभव म्हणजे संसाराचा स्वभावच आहे असें न मानतां तो त्या विशिष्ट प्रसंगाचें वा त्या विशिष्ट घटनेचें स्वरूप आहे असें मानतो. व त्यामुळें निराळ्या वेळीं निराळ्या प्रसंगात पुन्हां सुख अनुभवास येईल, आतां नाहीं तरी दुसऱ्यावेळीं मनासारखें घडेल या मोहानें माणूस प्रपंचांत गुरफटून राहतो. आणि मग त्याला तंबाखू, दारू, अफू इत्यादि भयंकर पदार्थांचें व्यसन जडावें तसें होतें. या व्यसनामुळें दुष्परिणाम प्रगट होऊ लागतात, तरी संवयी मोडतां येत नाहींत. दमा, खोकला यानें हैराण झालेला रोगी विडी सोडत नाहीं. यकृत बिघडून अंथरूणाला खिळलेला रोगीहि दारूचा त्याग करू शकत नाहीं. समर्थांनीं विषाचें उदाहरण देऊनच हा प्रश्न विचारला आहे. सुख हवें असेल तर विषाचें सेवन करीत राहणें कसें योग्य ठरेल? **जनीं विष खातां पुढें सुख कैचे?** हाच प्रश्न ते विचारतात.

द्रव्य म्हणून कोणतेंहि विष वर्ज्य नाहीं. वैद्याच्या हातांत तर त्यांतील कांहीं अमृताचें काम करतात. पण तरी विष, विषच आहे. गहूं, तांदूळ, वा दूध, तूप

यांच्यासारखा त्याचा उपयोग करणें प्राणघातक ठरणारें असतें. संसाराचें स्वरूपहि या विषासारखेंच आहे, हें माणूस लक्षांत घेत नाहीं. विषाचा स्वभावहि मोठा विचित्र आहे. हितकर असें जें दूध त्याचें व्यसन माणसाला लागत नाहीं. पण चहाचें मात्र व्यसन लागतें. दारूसारख्या इतर विषांविषयीं तर बोलावयासच नको. दारूडे परिवारासकट सर्व जीवनाची धूळधाण उघड्या डोळ्यानें पाहतात. आणि तरी दारू सोडीत नाहींत. संसाराच्या आसक्तीचें तसेंच आहे. आसक्तीने संसारांत जों जों अधिक रममाण होत जावें तों तों दु:खदैन्याशिवाय दुसरें कांहींहि वांट्यास येत नाहीं. आसक्ति जों जों उत्कट तों तों दु:खदैन्याचे आघातहि बलवान् असेंच घडत जातें. संसारामध्यें आपण ज्यांना आपले म्हणतो त्यांतला खऱ्या अर्थानें आपला कुणी नसतो. सगळे स्वार्थकेंद्रित असतात आणि स्वार्थसाधनाच्यादृष्टीनें सोयीचे म्हणून संबंधात येतात–राहतात. त्यावेळीं वाटणारा गोडवा, दिसणारा जिव्हाळा बहुतांशी वरवरचा असतो, कसोटीला तो टिकत नाहीं, हें लक्षांत घेऊन परिवारांत वावरलें पाहिजे. म्हणून संसारांत राहावयाचें तें कर्तव्यभावनेनें, आसक्तीनें नव्हें.

धर्मराजानें म्हणे नारदांना एकदा प्रश्न विचारला कीं संसारांत राहून सुख कसें मिळेल? त्यावर नारद म्हणाले–**मातरः पितरः पुत्राः बान्धवाः सुहृदश्च ये। यत् कुर्वन्ति यदिच्छन्ति चानुमोदेत निर्ममः।।** आईबाप, घरांतील वडिलधारीं माणसें, मुलें, बायको, इतर आप्तसंबंधी व इष्ट मित्र जें करतील, जसें वागतील, जें म्हणतील, जें मानतील त्या सर्वाला ठीक आहे असेंच म्हणत राहावें, पण तें निर्मम भावनेनें म्हणावें. करा काय हवें तें असें वैतागून म्हणूं नये. कित्येक वेळा परिवारांतील व्यक्तीचें एकादें वर्तन आपल्या विचाराप्रमाणें अत्यंत अनिष्ट असेंहि असूं शकतें. त्यावेळीं ठीक आहे हें म्हणणें आपल्या विचारांच्या प्रामाणिकतेच्या दृष्टीनें दांभिकहि ठरूं शकतें. अशा वेळीं फार तर कोणताहि आग्रह न धरतां आपला निषेध नोंदवावा. पण ज्याचें हित त्याला कळतें, कळलें पाहिजे, या विवेकानें 'मी म्हणतों तसेंच वागलें पाहिजे' असा हट्ट मात्र धरूं नये. व आपल्या मनाचा तोल ढळू देऊं नये. हीहि निर्ममताच आहे. हें असें निर्मम भावनेनें वागता आलें कीं मग संसाराचा घोर, घोर राहत नाहीं. तो भयप्रदहि नसतो आणि चिंताजनकहि नसतो. बायका-मुलांपासून शरीरापर्यंत असलेला सर्व पातळीवरचा संसार हा मग एक साधन उरतो, सोय म्हणून राहतो आणि परमार्थाला त्याचा अडथळा राहत नाहीं.

संसारांतील आसक्ती सुटणें हेंच महत्त्वाचें आहे. बाह्यस्वरूपांतील संसार हा कधीं सुटतहि नाही व कधीं सोडावयाचाहि नसतो. वानप्रस्थ किंवा संन्यासीहि



संसारांतून सुटलेले असतात असें मानणें चुकीचें आहे. त्या अवस्थेंत महंती असेल तर प्रश्नच नाहीं पण महंती नसली तरीसुद्धां शरीर-रक्षण, शरीर-धारण, तर टाकतांच येत नाहीं, तेव्हां संन्याशालाहि संसार असतोच. संन्यासाश्रम हाहि साधनमार्गावरील एक टप्पा असल्यानें त्याचे बाह्योपचार गृहस्थापेक्षा वेगळे असले तरी व्यापाचा विचार करतां तो संसारच असतो. म्हणून संसाराची आसक्ति सोडणें, आसक्ति सुटणें, हें महत्त्वाचें आहे व सारे प्रयत्न करावे लागतात ते त्यादृष्टीनेंच.

संसाराची आसक्ति सुटावी आणि परमार्थाची जवळीक घडावी यासाठीं, समर्थ एक श्रेष्ठ साधन चौथ्या चरणांत सांगत आहेत. **'करी रे मना ध्यान या राघवाचें'** ईश्वराचें ध्यान हा सर्व प्रकारच्या बाधक आसक्तीवरचा एक चांगला उपाय आहे. योगमार्गांत सांगितलेल्या क्रमानें ध्यान ही साधना, फार श्रेष्ठ प्रतीची आहे. समाधीच्या अगदीं अलीकडची अशी ती अवस्था आहे. पण त्या ध्यानसाधनेचा उपयोग विशिष्ट प्रमाणांत, विशिष्ट पद्धतीनें, परमार्थमार्गाच्या अगदीं आरंभींहि करतां येतो. त्याठिकाणीं थोडीशी स्थिरता, चिंतन, एकाग्रता, असें त्याचें स्वरूप असतें. माणसानें दिवसाकांठीं थोडासा तरी वेळ यासाठीं काढला पाहिजे. वेळ शक्यतों ठराविक असावा. स्थानहि शक्यतों समतल, स्वच्छ, निवांत आणि पवित्र असावें. तेंहि ठराविक असेल तर फार चांगलें. स्वच्छता आणि पावित्र्य यादृष्टीनें तें अधिक उपयुक्त ठरतें. ध्यान करणें व तें ठराविक वेळीं आणि ठराविक स्थानीं करणें हें 'अधिकस्य अधिकं फलम्' या दृष्टिनें कितीहि महत्त्वाचें असलें तरी वेळेचा आणि स्थानाचा आग्रह 'ध्यानच करीत नाहीं' अशा स्थितींत परिणत होऊ नये. नेसेन तर पैठणी नाहींतर उघडीच राहीन असें जसें म्हणू नये, तुपाशी खाणें शक्य नसलें तरी उपाशीं राहू नये, असें जसें म्हणतात, तसेंच ध्यानाचेंहि जाणावें. ध्यानासाठीं वापरावयाचें आसन आपलें आपलें स्वतंत्र असावें. तें स्वच्छ असावें. दर्भाची गवताची चटई, मृगाजिन, धूतवस्त्र असा क्रम असावा. घोंगडीसारखें लोकरीचें वस्त्रहि उत्तम; त्यांतहि पांढरी घोंगडी अधिक चांगली.

या आसनावर पद्मासन, सहजासन, स्वस्तिकासन, किंवा इष्ट तर सिद्धासन घालूनहि बसावे. पाठीचा कणा गीतेनें सांगितल्याप्रमाणें 'समं कायशिरोग्रीवं धारयन्नचलं स्थिर:।' (भ.६।१३) अशा स्थितींत सरळ असावा. खांदे सरळ आडव्या रेषेंत स्थिर ठेवावेत. दृष्टीसमोर आपल्या इष्ट देवतेचें, संतांचें वा गुरुचें चित्र असावें. प्रतिमा असावी किंवा ॐ, श्री, 卐, जाडरेषेनें एकांत एक काढलेलीं वर्तुळें, असें कांहींतरी प्रतीक समोर ठेवावें. मात्र दृष्टीसमोर म्हणजे सरळ ताठ बसून डोळे ज्या पातळींत येतात त्या त्या पातळींत हें प्रतीक नसावें. तें सामान्यत:

हृदयाच्या पातळीवर स्वत:पासून १॥-२ हात अंतरावर असावें. प्रकाश मंद असावा. तुपाच्या निरांजनाचा प्रकाश अधिक लाभदायक ठरतो. या कामीं तज्ज्ञांचें मार्गदर्शन शक्य तर घ्यावें. व्यक्ति विशेषाच्या दृष्टीनें नेमकेपणा येण्यास त्याचा उपयोग होतो. नंतर मनामध्यें आपल्या इष्ट देवतेचें स्वरूप वा तिचें नाम याच्याशिवाय दुसरें कांहीं येणार नाहीं या दृष्टीनें हळूहळूं अभ्यास करावा. मनाची एकाग्रता साधण्यासाठीं शैथिल्य आणि हट्ट दोन्हीं टोकें वर्ज्य समजावीं. सातत्य आणि क्रमानें वाढत जाणारा वेळ हें महत्त्वाचें समजावें.

शरीराचें आरोग्य चांगलें असलें, आसनें, व्यायाम, प्राणायाम, (दीर्घश्वसन) यांचा अभ्यास ठेवला, ज्याच्यामुळें शरीर मनाचा क्षोभ निर्माण न होईल असें वर्तन ठेवलें, आहार-विहार साधे, सात्त्विक ठेवले, म्हणजे ध्यानांतील एकाग्रतेचा लाभ हा कमी श्रमांत अधिकाधिक मिळत जातो. मानवी जीवनांत कोणतीहि गोष्ट एकदम साधत नाहीं. परमार्थाचा प्रवास हा हिमालयांतील यात्रेसारखा आहे. सर्व दिशांनीं उंच सखल वळणें घेत जाणारा असा किंवा गोल जिन्यानें चढण्यासारखा असतो. तेव्हां घाई न करतां उपयुक्त त्या सर्व गोष्टी क्रमाक्रमानें साधत जावें व सातत्य ठेवावें. ईश्वराविषयींची भक्ति अंत:करणांत जितक्या उत्कट प्रमाणांत असेल त्या प्रमाणांत साधनेचें फल विपुल आणि लौकर मिळतें. पण **''तुका म्हणे येथें। नाही चालत तांतडी।''** या वचनाप्रमाणें धीर न सोडतां सातत्य सांभाळावें म्हणजे हळूंहळूं संसाराविषयींची आसक्ति उणावत जाते, अलिप्त राहतां येते, आणि मग मनाची प्रसन्नता, अढळ होत जाते. ''करी रे मना ध्यान या राघवाचें'' या आदेशांत समर्थांना हेंच अभिप्रेत आहे.

**घनशाम हा राम लावण्यरूपीं ।**
**महां धीर गंभीर पूर्ण प्रतापी ।।**
**करी संकटीं सेवकाचा कुढावा ।**
**प्रभाते मनीं राम चिंतीत जावा ।।६७।।**

आतां या श्लोकापासून 'प्रभाते मनीं राम चिंतीत जावा' या पालुपदाचे दहा श्लोक क्रमानें येत आहेत. मागच्या ६६ व्या श्लोकाच्या अंतीं ''करी रे मना ध्यान या राघवाचें'' असें सांगितल्यानंतर ज्याचें ध्यान करावयाचें त्याचें स्वरूप आणि महत्त्व वर्णन करणें आवश्यकच आहे. ध्यानाचें एक महत्त्वाचें अंग असलेली एकाग्रता निर्माण व्हावयाची तर ज्याचें ध्यान करावयाचें त्याची थोरवी, त्याची योग्यता, मनोमन पटलेली असणें भाग आहे. समर्थ या श्लोकांनी ती पटविण्याचें काम करीत आहेत. जातां जातां ध्यानाचें महत्त्व व ध्यानाची अनुषंगिक



साधनेंहि समर्थ या दशश्लोकी प्रकरणांत सांगत आहेत. समर्थ येथें स्मरणापेक्षां वरच्या पायरीचा आणि ध्यानांत परिणत होणारा, ध्यानाचें अंग असलेला चिंतन हा शब्द वापरीत आहेत.

मनुष्याला स्वत:च्या उद्धारासाठीं ज्या अनेक गोष्टी करावयाच्या असतात त्यांत नामस्मरणाचें, ध्यानाचें आणि चिंतनाचें महत्त्व विलक्षण आहे. प्रापंचिक कर्मे चांगलीं व्हावींत, त्यांतील अधर्म उणावत जावा, अंत:करण शुद्ध व्हावें, विषयासक्ति सुटत जावी, या सर्वांसाठीं नामाचें महत्त्व आहे. ईश्वर आणि त्याचें नामरूप हे एकरूपच असल्यानें नामाच्या पोटांत परमार्थाचें सर्व कांहीं येऊन जातें.

जन्माला आल्यापासून संसार हा प्रत्येकाच्या मागें लागलेला आहेच. तो करावाहि लागतो. फार प्रयत्नानें, न कंटाळता आणि उत्साहानें करावा लागतो. त्यासाठीं आपलें मन, बुद्धि, शरीर हे सर्वदृष्टीनें पणाला लावावें लागतें. बहुतेक लोक प्रपंचाचा हा हलकल्लोळ करीत असतातच. अलीकडे या हलकल्लोळाला फारच उधाण आलेलें आहे. कर्मचारी, विद्यार्थी, शिक्षक, पत्रकार, पुढारी, राज्यकर्ते, अधिकारी सगळे स्वार्थासाठीं हलकल्लोळच करीत असतात. ग्रामपंचायती-नगरपालिकांपासून तें विधानसभा, लोकसभेपर्यंत सगळीकडे हा हलकल्लोळच चाललेला असतो. संघर्ष आणि अस्वास्थ्य यांच्या वादळांत समाज ढवळून निघतो. सुख, शांतता दुरावते. असें घडूं नये यासाठीं हलकल्लोळ करणारांना 'देव मस्तकीं धरावा।' असें संतांनीं सांगितलें आहे. पण तेवढें मात्र होत नाहीं.

'असेल माझा हरी। तरी मज देईल खाटल्यावरी।' या खुळेपणानें कोणी आळशी आणि निष्क्रिय राहतात तर कोणी ईश्वराला न मानतां केवळ स्वार्थाची कांस धरून महोद्यम करतात आणि परिणामी वैतागतात. दैव चांगलें कीं प्रयत्न चांगले या प्रश्नाला एकेरी उत्तर संभवत नाहीं. दोन्हीं परस्परपूरक आहेत. त्यांतील प्रयत्न आपल्या हातांत आहेत पण दैवाची जाणीव ठेवली पाहिजे. फलाच्या दृष्टीनें त्याचेंहि महत्त्व आहे. शेतीसाठीं केल्या जाणाऱ्या कष्टांना जशी पावसाची अपेक्षा असते तशीच प्रयत्नवादाला ईश्वरनिष्ठेचीहि असली पाहिजे. भारतीय संस्कृतींत ही गोष्ट सर्वांच्या लक्षांत राहावी यासाठीं ईश्वरचिंतनासाठीं कांहीं वेळां सुचविल्या आहेत. प्रभातकालीं झोंपेंतून जागें होतांच, स्नान झाल्यानंतर, जेवणास बसतांना, दिवस मावळतांना, रात्रीं झोंपण्यापूर्वी, देवाचें स्मरण प्रेमानें करावें, त्याचें नांव घ्यावें, प्रार्थना करावी, कांहीं स्तोत्रें म्हणावींत अशी आपली पद्धति आहे, होती म्हणू या. पण मन:स्वास्थ्य लाभण्याच्या दृष्टीनें या गोष्टीला फार महत्त्व आहे. प्रात:काळचा समय स्मरणचिंतन यादृष्टीनें उत्तम असतो. ती वेळ

साधावी असें समर्थांनीं मनोबोधाच्या अगदीं आरंभी तिसऱ्या श्लोकांतहि सांगितलें आहे आणि आताहि दहा वेळां त्याची पुनरावृत्ति करणार आहेत.

रामाचेंच चिंतन, रामाचेंच ध्यान कां करावें तें सांगतांना समर्थ म्हणतात माझा राम हा घनश्याम आहे, मेघनीळ आहे. आणि रूपानें लावण्ययुक्त आहे. सांवळेंपणा हा मेघाचें प्रतीक आहे. मेघ उदार, वर्षाजलानें भरलेला, असा दयार्द्र आणि समृद्धि देणारा, समृद्धि वाढविणारा, सृष्टीचें दैन्यदारिद्र्य नाहींसे करणारा असा असतो. जनसामान्याला हवेहवेसे वाटणारे तेच गुण ईश्वराचेहि ठिकाणीं आहेत. ईश्वर रूक्ष नाहीं, कोरडा नाहीं, दयार्द्र आहे, दैन्य घालविणारा आहे. सांवळा रंग हा संग्राहकहि आहे. ईश्वर सगळ्यांचा स्वीकार करतो, कोणास नाकारीत नाहीं. हेंहि या शाम शब्दानें सुचविलें जातें. ज्या ठिकाणीं मन रमतें तेथें एकाग्रता लौकर येऊं शकते. ईश्वराच्या रूपसौंदर्याचें वर्णन केलें जातें तें यासाठींच. पातिव्रत्याचा आग्रह धरावयाचा तर पति निवडतांना दक्षता घेतली पाहिजे असेंच शास्त्रानें सांगितलें आहे. अव्यंग, अपतित, दशदोषविवर्जित, असा वर निवडावा आणि मग पतिव्रताधर्मानें राहावें. ध्यानाचा विषय सुंदर असावा आणि मग एकाग्रता साधावी. त्यामुळें व्रत निभावणें सोपें जातें इतकेंच. लावण्य हा शब्दहि सौंदर्य शब्दापेक्षां अधिक उत्कट आणि मार्मिक आहे. लावण्य हा रेखीवपणा, अधिक आकर्षकता यांच्या एकीकरणातून प्रत्ययास येणारा गुण आहे. अंत:करणांतील भक्ति जशी वाढत जाईल तशी आराध्य देवतेच्या ठिकाणीं ही लावण्याची प्रतीति सार्वत्रिकपणें येत जाईल. श्रीमत्वल्लभाचार्य म्हणतात त्याप्रमाणें **''हसितं मधुरं रुदितं मधुरं। मधुराधिपतेरखिलं मधुरम्।।** अशीच भक्ताची अवस्था होते. समर्थांचे आराध्य दैवत श्रीराम हा केवळ दिसावयास चांगला, देखणा, आकर्षक आहे एवढेंच नाहीं तर तो महाधीर, गंभीर, पूर्णप्रतापी आहे. यांतील प्रत्येक शब्द, प्रत्येक विशेषण, प्रत्येक गुण, फार महत्त्वाचा आहे. धीर म्हणजे टिकून राहणारा, निश्चल. एकदा जें घेतलें, स्वीकारलें, मानलें तें न सोडणारा, दृढनिश्चयी धीर म्हणजे बुद्धिवादीहि, बुद्धिनिष्ठहि. असुरशब्दाप्रमाणें व्युत्पत्ति करून हा अर्थ सिद्ध करतां येतो. सोयीसाठीं बुद्धीनें पारखून घेऊन मग दृढ राहावें असेंहि तात्पर्य धीर शब्दांतून काढता येण्यासारखें आहे. एकूण विचार करतां निश्चलता महत्त्वाची आहे.

दुर्दैवानें स्थैर्य, निश्चय या गुणांचें आज हंसे झालें आहे. तो रजोगुणाचा प्रभाव आहे. सतत पालट परिवर्तन, हाच जणूं ध्येयवाद झाला आहे. खरें म्हणजे निश्चित स्वरूपाची ध्येयकल्पना, साध्यकल्पना स्थिर असल्यावांचून परिवर्तन, पालट, प्रगति या शब्दांना कांहींच अर्थ नाहीं. पण तें कुणी लक्षांत घेत नाहीं.



शिखरावर चढेपर्यंत टाकलीं जाणारीं पाऊलें यांना प्रगति म्हटलें तरी शिखरावर पोंचल्यानंतर टाकलीं जाणारीं पाऊलें हीं अध:पाताकडें नेणारींच असतात, हें लक्षांत ठेवलें पाहिजे. पंचवीशी-तिशीपर्यंत होते ती शरीराची खरी प्रगति. त्याच स्थितींत टिकून राहणें महत्त्वाचें. त्यापुढें होणारें शरीराचें परिवर्तन हें नको असणाऱ्या म्हातारपणाचें लक्षण होय. परिवर्तनवाद्यालाहि हा पालट हवासा असणार नाहीं. तेव्हां प्रगतीच्या विकासाचा एक अखेरचा टप्पा असतो तो टिकवून धरला पाहिजे, ठेवला पाहिजे. विरजलेलें दही अधिक आंबट होऊं नये म्हणून शीतकांत ठेवावें लागतें. मात्र ही स्थिरता सत्त्वगुणाची असावी, तमोगुणाची नसावी. हें स्थैर्य टिकवण्यासाठीं गांभीर्याची, खोलीची, पूर्णतेची, आवश्यकता आहे. म्हणून समर्थ त्या गुणाचा लगेच उल्लेख करीत आहेत. आपण गंभीर नसतो म्हणून चंचल असतो. घराच्या स्थैर्याच्या दृष्टीनें त्याचा पाया खोल आणि पक्का असावा लागतो. मुळें खोल जाण्यावर झाडाचा विस्तार आणि स्थैर्य अवलंबून असतें. विद्वत्ता ज्ञानाच्या खोलीनें मोजावी लागते. आज आपण हेंहि विसरलों आहोंत. तात्पुरतें, वरवरचें, काम-चलाऊ ज्ञान मिळालें कीं भागलें असें आपणांस वाटतें. त्यामुळेंच शिक्षणाला त्याचें खरें स्वरूप उरलेलें नाहीं. परिणाम, विद्यार्थी, विद्यार्थी न राहतां परीक्षार्थी आणि पोटार्थी झाला आहे. ज्ञानाला, विद्येला, गांभीर्य आलें असतें तर प्रत्येकाला तंत्रज्ञानासाठीं परकीयांच्या तोंडाकडे पहावें लागलें नसतें, परदेशांत जावें लागलें नसतें, परदेशांत शिकून येणारा पदवीधर आतां मी जें शिकून आलों आहे तें शिकण्यासाठीं परदेशांत कुणाला जावें लागणार नाहीं असें म्हणूं शकत नाहीं. राष्ट्रीय दृष्टिकोनांतून ही स्थिति मोठी दुर्दैवी आहे.

नीलकंठशास्त्री थत्ते म्हणून एक महापंडित पेशवाईच्या उत्तर कालांत आपल्या महाराष्ट्रांत होऊन गेले. ते मूळचे न्यायशास्त्राचे विद्वान नैय्यायिक. त्यावेळीं व्याकरणशास्त्र महाराष्ट्रात नव्हतें तें शिकण्यासाठीं काशीस जावें लागत असे. ही गोष्ट एकदां नीलकंठशास्त्रींना बोंचली. वयाच्या चाळीसाव्या वर्षीं ते व्याकरण शिकण्यासाठीं स्वत: काशीस गेले. तेथें राहून व्याकरणशास्त्राचें पूर्ण अध्ययन केलें. परत आल्यावर आत्मविश्वासानें त्यांनीं प्रगट केलें कीं आतां यापुढें व्याकरण शिकण्यासाठीं कोणालाहि काशीस जावयाचें कारण नाहीं. तेथे शिकावयास मिळेल तें सर्व मी येथें शिकवीन. तेव्हांपासून महाराष्ट्रांत व्याकरणाची परंपरा निर्माण झाली. मागच्या पिढींत होऊन गेलेले म.म.वासुदेवशास्त्री अभ्यंकर हे थोर विद्वान्, प्रसिद्ध वैय्याकरणी, श्री. नीलकंठशास्त्रींच्या परंपरेंतीलच होते. हा आग्रह प्रत्येक विद्यार्थ्यानें विद्या शिकतांना धरला पाहिजे. तरच देशाचें त्यांत कल्याण आहे.

गांभीर्य हा गुण विपुलतेचा आणि व्यापकतेचाहि द्योतक आहे. त्यामुळें एक प्रकारची परिपूर्णता त्यांतून सुचविली जाते. पण त्यामुळेंच ईश्वराच्या ठिकाणचा हा गुण आमच्यासारख्या भक्तांना थोडासा अडचणींत टाकणारा आहे. गांभीर्य ज्याच्याजवळ राहतें तो वरवरच्या देखाव्याला भाळत नाहीं, फसत नाहीं, आणि आमचा सगळा परमार्थ तर वरवरचा असतो. आमचें बोलणें ओठांतलें, तें पोटातलें नसतें. त्यामुळें गांभीर्यगुणानें युक्त असलेले रामचंद्र ते ऐकणारच नाहींत. इतर अनेक दोष ईश्वराजवळ चालतील पण अप्रामाणिकता, दंभ तेथें खपणार नाहीं. भक्त म्हणवितांना आपण किती सावध राहिलें पाहिजे तें यावरून लक्षांत येतें.

ईश्वर पूर्णप्रतापी आहे. हा गुण भक्ताच्या दृष्टीनें महत्त्वाचा आहे. शौर्य, पराक्रम, महोद्यमशीलता, कार्यक्षमता त्यांतून सुचविली जाते. त्यामुळें एकदां ईश्वराचे झाले वा ईश्वरानें आपले म्हटलें कीं भक्ताला मग कशाचीहि चिंता असण्याचें कारण नाहीं. ईश्वराचें सामर्थ्य अलौकिक आहे; तो पूर्णप्रतापी आहे. त्यामुळें अमुक एक प्रकारची आपत्ति आली तर काय करावें हा प्रश्न कधींहि उत्पन्न होण्यासारखा नाहीं. म्हणून समर्थ पुढच्या ओळींत स्पष्टच सांगतात, **'करी संकटीं सेवकाचा कुडावा.'** ईश्वर आपल्या दासाचें, सेवकाचें, संकटामध्यें रक्षण करतो. यासाठीं त्याचेवर पूर्ण विश्वास ठेवून रहावें. समर्थांना दास्यभक्ति प्रिय आहे. यासाठींच ते स्वत:ला रामदास म्हणवितात.

सर्व साधनांत नामस्मरण जसें सोपें तशी भक्तीच्या सर्व प्रकारांत दास्यभक्ति सोपी. दासाच्या योग्यतेचा, अधिकाराचा फारसा प्रश्न उत्पन्न होत नाहीं. निष्ठा आणि प्रामाणिकपणा तेवढा पुरतो. सख्य, आत्मनिवेदन हे प्रकार त्यामानानें अवघड आहेत. त्यासाठीं योग्यता असावी लागते. अधिकार फार मोठा असावा लागतो. परमार्थांत अहंकाराचें फार वावडें असतें. सेवक आणि दास या भावनेंत अहंकाराला मुळांतच वाव राहत नाहीं. यासाठीं हनुमंतासारख्या श्रेष्ठांनींहि दास्यभक्ति स्वीकारली. समर्थहि त्याच परंपरेंतले आहेत. जवळीक साधण्याच्या दृष्टीनें हा मार्ग फार चांगला. त्यानें सर्व कांहीं साधतें. दास्यभक्तीचें हें महत्त्व लक्षांत घेऊनच श्रीज्ञानेश्वर महाराजांनीं गुरुसेवेच्या निमित्तानें तिचें वर्णन विस्तृतपणें केलें आहे. त्यांतील उत्कटता मोठी विलोभनीय आहे. दास्यभक्ति आपापल्या पातळीवर कोणालाहि साधूं शकते. क्रमानें उन्नत व प्रगतहि होतां येते. सख्यभक्ति व कांतासक्ति तशी अवघड. आपण सांगून गेले तरी त्यानें पसंत करून पत्करले पाहिजे ना! **'सदा कैदाशिणीलाहि, हवा गोविंदसा पति।'** पण गोविंदानें कैदाशीण, पत्नी म्हणून काय म्हणून पत्करावी? राधेच्या आणि रुक्मिणीच्या



स्थानाचा मोह कुब्जेनें धरूं नये पण दास्य तिलाही करतां येते आणि मग तीहि प्रेम मिळवू शकते कीं जें राधेला आणि रुक्मिणीला मिळालें. म्हणून खरा भक्त दास्य, ही लाचारी समजत नाहीं, भूषण मानतो. तशी संधी मिळाली तर स्वत:ला भाग्यवान् समजतो. खऱ्या पतिव्रतेला पतीची दासी म्हणून घेण्यांत लज्जास्पद असें कांहीं वाटत नाहीं. म्हणून ईश्वराचें सेवक व्हावे, नम्रपणें दास व्हावे, प्रामाणिकपणें दास्य करावे; म्हणजे मग संकटकाळीं ईश्वर पाठींशी उभा राहून रक्षण करतो.

ईश्वर भक्तांचें रक्षण करतो हा अर्थवाद मानण्याचें कारण नाहीं. ते संपूर्णपणें सत्यच आहे. मात्र ईश्वर कोणत्या भक्ताचें रक्षण करतो ते समर्थांनीं **'अनन्यास रक्षीतसें च्यापपाणी।'** या मनोबोधाच्या ३५ व्या श्लोकांतील चरणानें स्पष्टपणें सांगितलेंच आहे. आमचें रक्षण होते असें आम्हांला विश्वासानें वाटत नाहीं. याचें कारण असें कीं आमच्या रक्षणाच्या कल्पना यथार्थ नसतात, योग्य त्या नसतात. ईश्वर सर्व समर्थ असला तरी सर्वज्ञ असल्यानें केवळ आमच्या इच्छेप्रमाणें वागत नाहीं. आमच्या हिताच्या दृष्टीनें योग्य तसें वागतो. आमच्या स्वार्थसंकुचित मापांत तें बसत नाहीं आणि मग ईश्वराने आमचें रक्षण केलें नाहीं असा कांगावा होतो. श्रीकृष्णानें पांडवांचें रक्षण केलें असें आपण म्हणतो. पांडवांचें सर्व जीवन नीटपणें पाहिलें म्हणजे मगच त्यांतील खरें मर्म लक्षांत येईल.

आपल्या अनन्यतेंत उणीव असते म्हणून आपला विश्वास डळमळतो. **'जो प्रभु किन्हों सो भल मानो।'** असें वाटणें हीच खरी सद्बुद्धि आहे. सत्पुरुषांच्या संगतींतून परमार्थाच्या निष्ठेंतून ती लाभते. ईश्वरचिंतनांतून ती दृढावते. नसली तर जन्माला येते. म्हणून समर्थ सांगत आहेत कीं **'प्रभाते मनीं राम चिंतीत जावा.'**

**बळे आगळा राम कोदंडधारी ।**
**महां काळ विक्राळ तो ही थरारी ।।**
**पुढें मानवा किंकरा कोण केवा ।**
**प्रभाते मनीं राम चिंतीत जावा ।।६८।।**

ईश्वर सर्व समर्थ आहे. आणि त्यासाठीं आवश्यक तीं शस्त्रेंहि त्याच्या हातांत आहेत. काय वाटेल तें झाले तरी मी शस्त्र धारण करणारच नाहीं असा गबाळा विचार ईश्वराचा नाहीं. ज्याला हित साधावयाचें आहे त्याला हा गबाळेपणा परवडणाराहि नाहीं. ईश्वराचें अत्यंत श्रेष्ठ असें जें विष्णुसहस्रनाम स्तोत्र त्याचा शेवट ''सर्वप्रहरणायुध:'' या नामानें झाला आहे. हिंदूंची सगळींच दैवतें शस्त्रधारीं आहेत. नुसतीच शस्त्रधारीं नाहींत तर सर्वशस्त्रभृतांवर आहेत. दत्त या दैवतानें

कोणाचा संहार केल्याचें उदाहरण नाहीं. पण तरी त्याच्या हातांत त्रिशूल आहे. ईश्वराचें सामर्थ्य कांहीं अलौकिक आहेच (बळें आगळा) पण तें सामर्थ्य निष्क्रिय नाहीं. केवळ तटस्थ नाहीं तर कार्योन्मुखहि आहे. कर्तव्यपरायणहि आहे.

आवश्यकता नसेल तर शस्त्र चालवू नये. शस्त्र ही जातां येतां सहज वापरण्याची वस्तु नव्हेच. शस्त्र वापरण्यापूर्वी सर्वांगीण विचार केलाच पाहिजे. शस्त्राच्या वापरामागें अविवेक असतां कामा नये हें खरेंच पण शस्त्र वापरणारच नाहीं आणि शस्त्र वापरण्याची इच्छा होऊं नये म्हणून शस्त्रच जवळ ठेवणार नाहीं, हें म्हणणें गबाळेपणाचें आहे.

ईश्वराला भक्ताचें रक्षण करावयाचें आहे म्हणून तो शस्त्रधारी आहे, कोदंडधारी आहे. हें कोदंड धारण केल्याचा परिणाम समर्थ पुढच्याच ओळींत सांगतात, कीं अशा कोदंडधारी रामाला पाहून अत्यंत अक्राळ-विक्राळ फार भयानक असा महाकाळहि भयभीत होतो, पोटांतून घाबरतो आणि भयानें थरथर कापूं लागतो. तेथें सामान्य माणसाची गोष्ट काय मोठी आहे? कळिकाळालाहि ज्याचें भय, त्याला आपल्या सेवकाचें रक्षण करणें मुळींच अवघड नाहीं. यासाठीं माणसानें ईश्वरावर विश्वास ठेवावा आणि प्रभातकाळीं त्याचें चिंतन करावें.

**सुखानंदकारी निवारी भयातें ।**
**जनीं भक्तिभावें भजावें तयातें ।।**
**विवेकें तजावा अनाचार हेवा ।**
**प्रभाते मनीं राम चिंतीत जावा ।।६९।।**

ज्याची भक्ति करावयाची आहे तो प्रभु रामचंद्र सुखकारी आणि आनंदकारी दोन्हींहि आहे असें समर्थ आवर्जून सांगत आहेत. सुख म्हणजे हवें वाटणाऱ्या विषयांच्या उपभोगांतून होणारी जाणीव आणि आनंद म्हणजे परिणामीं हितकर असलेल्या गोष्टींच्या स्वीकारानें होणारा लाभ. मनुष्य अपेक्षा कशाची करतो? त्याला सुखाची जाणीव असते, आनंदाची ओढ असते. आणि मग जीवनामध्यें अनेक प्रकारच्या चुका होत जातात. या चुकांचे परिणाम भीतिदायक असतात. त्यांतूनहि रामभक्तीमुळें सुटका होते हें लक्षांत आणून देण्यासाठीं समर्थ रामचंद्राचा ''निवारी भयातें'' हा तिसरा गुण सांगत आहेत. हें सामर्थ्य फार महत्त्वाचें असें आहे. भय हाहि माणसाचा भाव नैसर्गिक आहे. आहारनिद्रेप्रमाणेंच जीवनाच्या अगदी आरंभापासून माणसाच्या मनांत भय नांदत असतें. अनेक प्रकारांनी माणसाला तें भेडसावीत असतें. मृत्यु, रोग, दारिद्र्य, अपकीर्ति इत्यादि रूपानें तें जाणवत राहतें. भविष्यकाळ हें त्याचें अधिष्ठान असतें. परिवाराची चिंता



आणि परिस्थितीची प्रतिकूलता त्याला सहाय्यक होते. अशा वेळीं कोणाचा तरी आधार जीवाला हवासा वाटतो. अनिश्चितता त्याला भेडसावीत असते. विश्वास वाटावा असें आश्वासन मिळालें कीं धीर येतो. ईश्वराच्या ठिकाणीं हा विश्वास दृढ असण्याची शक्यता सर्वांत अधिक म्हणून समर्थ ईश्वराचा तोहि गूण सांगून भयग्रस्त जीवाला आश्वासन देत आहेत.

आतां हे सर्व प्रत्ययाला यावें यासाठीं जीवानें काय करावें याचें मार्गदर्शन करण्यासाठीं समर्थ सांगतात कीं या लोकामध्यें माणसानें आपल्या हृदयामध्यें उत्कट भक्तिभाव धारण करून ईश्वराला भजावें. माणसें स्वभावत: भजनशील असतात. पण अज्ञानाच्या प्रभावामुळें निर्माण झालेल्या संस्काराचा प्रभाव म्हणून हृदयांतल्या या सहजभावाचा मोहरा परमेश्वराकडे वळलेला राहत नाहीं. संपत्ति, विषयोपभोग, सत्ता, कीर्ति, कुटुंबपरिवार इत्यादींची प्रलोभनें हृदयांतील या नैसर्गिक भावशक्तिला स्वत:कडे खेंचून घेतात आणि मग माणूस, माणूस राहत नाहीं. त्याच्या वर्तनांत सरळपणा उरत नाहीं. जें करूं नये, जें टाळावें, तें केलें जातें. अभिलाषा वाढत जातात. हेवा, मत्सर, ईर्ष्या माणसाला अधिकाधिक अनाचारी बनवतात आणि मग जें भजन क्वचित् होतें तें भक्तिभावाचें राहत नाहीं.

हिंदुस्थानामध्यें अनेक तीर्थक्षेत्रें व देवस्थानें आहेत. आळंदी, देहू, शिर्डी, शेगांव अशीं संतांच्या महात्म्यानें पुनीत झालेलीं गांवे आहेत. याठिकाणीं सहस्त्रावधींच्या संख्येनें लोक जमत असतात. बुद्धिवादी नास्तिकांचा पराभव करून, पूजापाठ, दानधर्म अशीं कृत्यें आचरीत असतात. त्यासाठीं थोडे शरीरकष्टहि सहन करतात. संवयींना मुरड घालून नेहमींच्या व्यवहारातून बाहेर पडतात. द्रव्याचा व्यय अधिक होतो त्याची क्षिति बाळगीत नाहींत. पण तरी हें जें सर्व घडतें तें भक्तिभावाचें नसतें, गतानुगतिकतेचें असतें, किंवा सांसारिक वासनांच्या पूर्तीसाठीं तें अवलंबिलें जातें. ज्याला भक्ति साधावयाची आहे त्यानें हें टाळलें पाहिजे. माणसानें शक्य तर सोन्यामोत्याचे दागिने वापरावेत व मग त्यांचें भूषण मिरवावें, पण माणसें, भूषण मिरविण्यासाठीं सोनें, मोती नसून सोन्यामोत्याप्रमाणें दिसणाऱ्या हलक्या वस्तूंनाच जवळ करतात; तसेंच भजनाचें होतें. ज्याच्या मनांत मत्सर आणि वर्तनांत अनाचार राहतो, त्याचें भजन हें खरें भजन न ठरतां भजनाचें सोंग ठरतें. ज्या भजनाचें मागें सदाचाराचें अधिष्ठान नाहीं, चित्ताची शुद्धता नाहीं, वा त्या दिशेनें प्रयत्नहि केला जात नाहीं, तें भजन एक ढोंग ठरतें. म्हणून माणसानें विवेकानें वागावें. आणि आपलें वर्तन अधिकाधिक सदाचारी होत जाईल आणि मन शुद्ध, निर्मत्सर राहील असा प्रयत्न जाणून-बुजून करावा. त्याच्यासाठीं

क्रमाची, सातत्याची, दीर्घकालाची आवश्यकता असते. कितीहि टाकावें म्हटलें, तरी नको त्या गोष्टी एकदम सुटत नाहींत. तो यत्न पायरी-पायरीनेंच करावा लागतो. म्हणून समर्थ 'विवेकें तजावा' असें म्हणतात. या विवेकामुळें क्रमाचें भान सुटत नाहीं. सातत्य आणि धीर टिकतो. सकाळी लौकर उठून मन:पूर्वक केलेली प्रार्थना त्यादृष्टीनें उपयोगी पडते. म्हणून म्हटलें आहे कीं 'प्रभाते मनीं राम चिंतीत जावा.'

**सदा रामनामें वदा पूर्णकामें ।**
**कदा बाधिजेनापदा नित्यनेमें ।।**
**मदालस्य हा सर्व सोडोनि द्यावा ।**
**प्रभाते मनीं राम चिंतीत जावा ।।७०।।**

पूर्णकामें रामनामें सदा वदा किंवा रामनामें वदा, पूर्णकामें वदा, (या) नित्यनेमें आपदा कदा बाधिजेना असा या श्लोकांतील पहिल्या दोन ओळींचा अन्वय आहे. रामाचें नांव हें सर्व कामना, सर्व मनोरथ पूर्ण करणारें आहे. तें सदैव उच्चारा किंवा पूर्णकाम होऊन म्हणजे संसार-सुखाविषयीं तृप्त होऊन जेवढें मिळालें आहे आणि मिळतें आहे, तेवढें पुरेसें मानून, अधिक मिळविण्याची अपेक्षा न करतां, निष्काम भावनेनें सदैव नामस्मरण करा असें समर्थ सांगत आहेत. पहिल्या प्रकारच्या अर्थानें आर्त व अर्थार्थी लोकांची सोय होते. दुसरा अर्थ भाविकाला उन्नतीची दिशा दाखवतो. प्रामाणिक असेल तर आर्त, अर्थार्थी भक्तहि त्याज्य नाहीं. भगवंत स्वत:च **'उदारा: सर्व एवैते'** (भ. ७।१८) असें म्हणून त्याहि भक्तीला प्रतिष्ठा देतात, तीहि भक्ति स्वीकारतात आणि म्हणूनच समर्थांनीं नाम हें पूर्णकाम, कामना पूर्ण करणारें असें म्हटलें आहे आणि तें खरेंच आहे. जें मिळणें योग्य आहे तें नामाच्या प्रभावानें मिळतेंच मिळतें, पण राहवत नसेल तर मागावयासहि अडचण नाहीं. पण प्रामाणिकपणाची कसोटी लागते ती अपेक्षांची पूर्तता होत नाहीं तेव्हां.

मात्र कोणत्याहि भावानें जे नाम घ्यावें तें सदैव घेतलें पाहिजे, नित्यनेमानें घेतलें पाहिजे. नित्यनेम या शब्दानें एक प्रकारचें व्रताचरण सुचविलें जातें. निष्ठायुक्त आग्रह त्यांतून व्यक्त होतो. सदैव नित्यनेमानें असें नामस्मरण जेव्हां होतें तेव्हां आपदा म्हणजे संकटें बाधत नाहींत असें समर्थ सांगतात–संकटें येतच नाहींत असें समर्थ म्हणत नाहींत हें लक्षांत घेतलें पाहिजे. आपत्ती न येणें आणि आपत्ति न बाधणें यांत आकाशपाताळाचें अंतर आहे. आपत्ती येणें न येणें दैवाधीन आहे. दैव प्रबळ, दुर्बल असेल त्याप्रमाणें घडेल. पण आपत्ति न बाधणें



हें माणसाच्या स्वाधीनचें आहे. स्थितप्रज्ञ, भक्त, गुणातीत इत्यादींचीं लक्षणें आत्मसात करण्याचा प्रयत्न केला तर आपत्ती न बाधण्याची म्हणजेच संकटांतहि प्रसन्न राहण्याची सिद्धि प्राप्त होऊं शकते.

त्यासाठीं मद म्हणजे अहंकार आणि आलस्य म्हणजे कंटाळा हे दोन दुर्गुण सोडून दिले पाहिजेत. मदामुळें, अहंकारामुळें, साधनांचें महत्त्व पटत नाहीं. एवढ्यानें काय होईल, हे कशाला सोडायला पाहिजे, यानें काय बिघडतें, असें त्याला निरनिराळ्या प्रकारानें वाटत राहतें. आळसामुळें सातत्य टिकत नाहीं. नित्यनेम टिकत नाहीं. त्यामध्यें विलक्षण खंड पडतो. कांहीं व्यत्यय येऊन, निमित्त होऊन, नेम चुकतो. अर्थात् मग जें घडतें त्याचा विशेष उपयोग होत नाहीं; यासाठीं साधकानें सर्व प्रकारचा अहंकार आणि आळस यांचा त्याग करावा आणि नित्यनेमानें 'प्रभाते मनीं राम चिंतीत जावा.'

**जयाचेनि नामें महां दोष जाती ।**
**जयाचेनि नामें गती पाविजेती ।।**
**जयाचेनि नामें घडे पुण्यठेवा ।**
**प्रभाते मनीं राम चिंतीत जावा ।।७१।।**

रामनामाचें माहात्म्य सांगत असतांना व ते विशेषेंकरून प्रभातकाळीं घ्यावें असा आग्रह धरीत असतांना समर्थ म्हणतात कीं रामाचें नाम हें मनुष्याच्या ठिकाणीं असणाऱ्या अनेक प्रकारच्या मोठ्यामोठ्या दोषांना घालविणारें आहे आणि यासाठीं ज्यामुळें या दोषांचें पोषण होईल अशा गोष्टी सकाळीं उठून करण्याच्या ऐवजी परमेश्वराच्या नामाचें स्मरण करणें, चिंतन करणें हे, सर्व जीवन शुद्ध, निर्मळ होण्याच्या दृष्टीनें फार उपयुक्त असतें. याच्या उलट आपण शरीर-मनावरील ताण वाढतील, विशेषत: मनाला व्यग्रता येत राहील अशाच गोष्टी करीत राहतो. चहा आणि वर्तमानपत्रें यांच्यापासून दिवसाला आरंभ होतो. ज्या वर्तमानपत्रांमध्यें मनाला अस्वस्थता आणणाऱ्या वार्तांचीच भरमार असते. जगतामध्यें जणूं शुद्ध, सात्त्विक, प्रसन्नता वाढविणाऱ्या घटना घडतच नाहींत. हत्या, अपघात, बलात्कार यांचीं विस्तृत वर्णनें, नटनट्यांच्या जीवनांतील भानगडी, राजकारणी पुढाऱ्यांची परस्परांच्या निंदाद्वेषानें व स्वत:च्या प्रौढीनें भरलेलीं भाषणें, निरनिराळ्या प्रकारांनीं करमणूक करणारांचे सत्कार, याच्याच वार्ता असतात. जें जें चांगलें म्हणून मानलें असेल त्याचें वस्त्रहरण करण्याचाच विडा पत्रकारांनीं जणूं उचललेला असतो. या सर्वांतून मनाचें अस्वास्थ्य वाढत जातें. आधींच माणसाच्या मनांत कामक्रोधादि विकारांचीं बीजें किंवा रोपें तरारलीं असतात त्यांत

ही भर. भक्तीचें पोषण होण्यासाठीं महर्षि नारदांनीं निश्चितपणें एक नियम सांगितला आहे कीं, "**स्त्रीधन नास्तिकवैरिचरित्रं न श्रवणीयम्।** वृत्तपत्रें नेमकें तेवढेंच ऐकवतात. मग अस्वास्थ्य वाढेल नाहींतर काय होईल!

अनेक देशांतून भारताचा राजदूत म्हणून काम केलेल्या व्यक्तीनें जागतिक परिस्थितीचा आढावा घेतांना म्हटलें आहे कीं जगांतील माणसांचीं मनें भ्रांत झालीं आहेत. शांतता आणि समाधान कोठेंहि उरलेले नाहीं. हे उद्‌गार एका आधुनिक विद्याभूषित राजदूताचे आहेत. सनातनी परंपरेचा वृथा अभिमान बाळगणारे असे ज्यांना तथाकथित बुद्धिवादी म्हणतात त्या कीर्तनकार प्रवचनकाराचे हे उद्‌गार नाहींत. त्यामुळें ह्या बुद्धिवाद्यांनाहि ते यथार्थ असल्याचें मान्य करण्यास अडचण नाहीं. या सर्वदूर पसरलेल्या अस्वास्थ्याचीं कारणें शोधूं गेले म्हणजे लक्षांत येईल कीं भारतीय परंपरेनें आवर्जून सांगितलेल्या नामस्मरणादि मन:शांतीच्या उपायांपासून प्रगत आणि शिक्षित म्हणविणारे फार दूर गेले आहेत. सकाळीं, संध्याकाळीं, भोजनापूर्वीं, रात्रीं झोंपण्यापूर्वीं नामस्मरण केलें तर मन:शांतीच्या दृष्टीनें फार लाभ होतो. कारण माणसाच्या मनांतले मदमत्सरादि महादोष घालविण्याचें सामर्थ्य नामस्मरणांत असतें असें सर्व संतांनीं आग्रहपूर्वक सांगितलें आहे. तें अनुभवाला धरून असल्यानें वास्तव आहे. तो नुसता अर्थवाद नाहीं.

नाममहात्म्य गातांना पुराणांनीं तर म्हटलें आहे कीं थोडा वेळ केलेल्या नामोच्चाराच्या ठिकाणीं जितकीं पातकें घालविण्याचें सामर्थ्य आहे तितकीं पातकें कोणताहि माणूस करूं शकणार नाहीं.

नामस्मरणानें नुसतें महादोष जातात इतकेंच नव्हें तर त्यामुळें मनुष्याला प्रगतीचा, उद्धाराचा मार्ग स्पष्टपणें दिसू लागतो. त्या मार्गानें जाण्याची आवड निर्माण होते आणि त्या मार्गानें चालण्याची शक्तीहि प्राप्त होते. म्हणून समर्थ 'गती पाविजेति' असें म्हणतात. नामस्मरणाच्या नित्यनेमानें पुण्याचा सांठा वाढत जातो आणि त्याच्या बळावर माणसाला पाहिजे तसें सुख-समाधान लाभूं शकते. सुखाच्या लाभाचा, पुण्याच्या संचयाशीं निकटचा संबंध आहे, नव्हे पुण्यसंचय हेंच सुखाचें प्रमुख साधन आहे असेंहि म्हणतां येईल.

वाईट काय आहे तें कळलें, वाईटाला वाईट कां म्हणतात तें कळलें कीं मग वाईटाकडची प्रवृत्ति सहजपणें उणावत जाते. जाणीव जितकी उत्कट तितका त्यागहि त्वरेने घडतो. अन्नांत प्राणघातक विष मिसळलें आहे हें कळतांच मनुष्य जसा पंचपक्वान्नाचें ताट फेकून देतो तसेंच दुर्वर्तनाचेंहि होऊं शकतें. म्हणून नामस्मरण नित्यनेमानें केलें पाहिजे. निदान प्रभातकाळी तरी रामाचें चिंतन हटकून केलें पाहिजे. त्या योगानें चांगल्या-वाईटाचा विवेक वाढतो. सदाचरणास बळ लाभते.



**न वेंचे कदा ग्रंथिचें अर्थ कांहीं ।**
**मुखें नाम उच्चारितां कष्ट नाहीं ।।**
**महां घोर संसार शत्रु जिणावा ।**
**प्रभाते मनीं राम चिंतीत जावा ।।७२।।**

रामनामाची महती पटवून देतांना, रामनामाची सुलभता समर्थ आणखी एका प्रकारानें सांगत आहेत.

एखादी गोष्ट कर असें माणसाला सांगितलें, कीं तो तिचें मूल्यमापन करतो. ही गोष्ट कशाकरितां करावयाची? त्यामुळें प्रत्यक्ष लाभ काय होईल? ती गोष्ट करण्याकरितां किती श्रम होतील? किती कष्ट पडतील? पैसे किती वेंचावे लागतील असा विचार मनुष्य करतो. प्रत्येक माणूस धंद्यानें व्यापारी नसला तरी वृत्तीनें तसाच असतो. अर्धा पाऊणशेर भाजी घ्यायची असली तरी तास दीड तास हिंडून सारी मंडई शोधणारे लोक असतात.

माणूस तसा सर्वत्रच हिशोबी असता तर त्याची ही वृत्ति नैसर्गिक स्वभाव म्हणून क्षम्यहि मानतां आली असती, पण तसें नसतें. जी गोष्ट माणसाच्या आवडीची असते, जिचें त्याला व्यसन असतें, तिच्या संबंधांत तो वेळेचा, श्रमाचा वा पैशाचा थोडाहि विचार करीत नाहीं. धूम्रपानासारखें साधें सभ्य मानलें जाणारें व्यसन किंवा पत्ते खेळण्याचा नाद यांत पैशाचा आणि वेळेचा होणारा अपव्यय माणूस कधीं लक्षांत घेत नाही. पण त्याच्या आत्यंतिक हिताची एखादी पारमार्थिक गोष्ट करावयास सांगितली कीं त्याचा सर्व हिशेबीपणा जागृत होतो.

खरोखरीच रामाचें नांव घे म्हणून सांगतांना तें याप्रकारें पटवून देण्याचा प्रसंग समर्थांवर यावा या गोष्टीचीच माणसाला लाज वाटली पाहिजे, पण आहे ती वस्तुस्थिति नाकारण्यांत कांहीं अर्थ नसतो.

समर्थ म्हणतात–सकाळी उठून नित्यनेमानें परमेश्वराचें चिंतन कर; त्यांत तुझ्या पदरचा एक नवा पैसाहि खर्च होणार नाहीं, उलट भलत्यासलत्या गोष्टी करण्याची इच्छा कमी झाल्यामुळें विषयोपभोगासाठीं कळत न कळत होणाऱ्या वारेमाप उधळपट्टीला थोडा तरी आळा बसत जाईल.

एकदां एका गृहस्थानें एका चांगल्या प्रभावी कीर्तनकाराला सांगितलें कीं तुमचीं कीर्तनें ऐकण्याची गोडी लागल्यापासून माझा चित्रपट, नाटकें पाहण्याचा नाद उणावला. महिन्याकांठीं पांचदहा रुपये तरी वाचले. दासबोध, गाथा, ज्ञानेश्वरी वाचण्यांतहि आनंद आहे हें अनुभवास आलें आणि त्यामुळें पत्ते खेळण्याच्या नादामध्यें जाणारा वेळ वाचला. रामाचें नांव असें अगदीं व्यावहारिक दृष्टीनें

रुपये, आणे, पैच्या भाषेंतसुद्धां लाभदायक ठरूं शकेल.

दुसरी सोयीची गोष्ट म्हणजे देवाचें नांव घेण्यांत कांहीं कष्ट नाहींत, शरीर श्रमवावें लागत नाहीं, घाम येत नाहीं, असें हें विनाकष्टाचें साधन आहे.

येथें माणसाला एक विचित्र शंका येते. ज्याच्यासाठीं पैशाचा व्यय होत नाहीं, जें फुकट लाभतें आणि जी गोष्ट करतां-मिळवतांना कष्टहि होत नाहींत, ती वस्तु तुच्छ वा निरुपयोगीच असली पाहिजे. अशी शंका येऊं नये म्हणून समर्थ सांगतात–देवाचें नांव असें फुकटचें आणि सोपे असले तरी परिणामाच्या दृष्टीनें मोलाचें आहे, फार महत्त्वाचें आहे, अत्यंत उपयुक्त आहे. ते कुचकामाचें आहे असें वाटूं देऊं नका. रामनामाच्या प्रभावानें संसारासारखा माणसाच्या सतत मागें लागलेला महाभयंकर असा शत्रु सहजपणें जिंकता येतो. संसार हा शत्रु तर आहेच. अनेक चिंता, व्यथा, अस्वस्थता त्यामुळेंच माणसाच्या मागें लागतात. पण त्याला महाघोर, फार भयंकर, शत्रु असें जें म्हटलें आहे त्याचें कारण असें आहे कीं संसार मागें तर लागतो, मानगुटी तर बसतो, त्याचें ओझें वाहतां वाहतां मनुष्य थकून जातो, पण हें सर्व नको तें घडत असतांना संसार शत्रु आहे असें वाटत नाहीं. शत्रूचें शत्रुत्व लक्षांत न येणें हीच यांतील मोठी घातकता आहे. म्हणूनच तो भयंकर ठरतो. रामनामाच्या गोडीनें संसाराचें हें स्वरूप उघड होऊं लागते.

शत्रूचें शत्रुत्व लक्षांत आलें म्हणजे प्रतिकाराची क्षमता वाढते. सामर्थ्य वाढवितां येतें. तेव्हां हा संसारासारखा घातकी शत्रु जिंकण्यासाठीं रामाच्या नांवाचें चिंतन करावें.

**देहेदंडणेचें महां दुख आहे ।**
**महां दुख ते नाम घेतां न राहे ।।**
**सदाशीव चिंतीतसे देवदेवा ।**
**प्रभाते मनीं राम चिंतीत जावा ।।७३।।**

आपल्या कडील तत्त्वज्ञानाच्या प्रभावामुळें देह म्हणजेच मी असें कोणी सहसा मान्य करणार नाहीं. पण प्रत्यक्ष व्यवहारांत वागतांना मात्र बहुतेक माणसें देहात्मवादी वृत्तीनेंच वागत असतात. तें स्वाभाविकहि आहे आणि कांहीं प्रमाणांत तें उपयुक्तहि आहे. देह म्हणजे मी नाहीं हें पटण्यासाठीं अनुभवाचें क्षेत्र उंचावत जावें लागतें, व्यापक व्हावें लागतें. अनेक कारणांमुळें तें सगळ्यांना साधत नाहीं. सूर्य फिरत नाहीं, पृथ्वी फिरते हें कितीहि खरें असलें तरी सूर्याची गति डोळ्यानें दिसते, पृथ्वीची गति कधीं जाणवत नाहीं. अनुभव असतो तो देहाच्या मीपणाचाच



आणि त्यामुळेंच देहाला कष्ट देणें, देहाला श्रमविणें, माणसाला दुःखदायक वाटतें आणि तो तें टाळतो. शरीराची सुखासीनता तो शोधीत असतो. त्या दृष्टीनें तो प्रयत्न करीत असतो. प्रत्यक्ष सिद्ध अशा देहाच्याच आरोग्याच्या दृष्टीनेंहि ही सुखासीनता लाभदायक आहे कीं नाहीं याचाहि विचार मग माणूस करीत नाहीं. माणसाच्या या देहाला सुखविण्याच्या स्वभावाची पुरेशी कल्पना असल्याने समर्थ म्हणतात–

देहाला त्रास देणें, कष्ट देणें, हें तुला देहदंडासारखें आणि दुःखदायक वाटतें ना! रामाचें नांव घेतांना तें भय बाळगूं नको. त्याने शरीराला कष्ट तर कांहीं होणार नाहींतच पण इतर कांहीं कारणांनीं शरीराला व्यथा, वेदना, कष्ट जाणवत असतील तर तें दुःखहि या नामस्मरणाच्या नादांत निश्चितपणें नाहींसे होईल. प्रत्यक्ष भगवान् शंकरांना हा अनुभव आला आहे. समुद्रमंथनाच्या वेळीं निर्माण झालेलें महाभयंकर हलाहल विष श्रीशंकरांनी जगाच्या कल्याणासाठीं प्राशन केलें. त्या भयंकर विषाचा परिणाम त्यांनाहि भोगावा लागला. विषाच्या प्रभावानें त्यांचा कंठ काळानिळा झाला आणि त्यांच्या शरीराचा दाह होऊं लागला. अमृतमय चंद्राची कला मस्तकीं धारण केली. जे स्पर्शाला फार गार आहेत असें साप गळ्याभोंवती गुंडाळले, हिमालयाच्या बर्फाच्छादित शिखरावर वसती केली पण तिथल्या विलक्षण गारव्यानेंहि विषामुळे निर्माण झालेला दाह नाहींसा झाला नाहीं. शेवटीं नारदांच्या सांगण्यावरून त्यांनीं रामनामाचा जप आरंभिला आणि त्यांचा दाह नाहींसा झाला आणि तेव्हांपासून भगवान् शंकर हे अखंडपणें रामनामाचें चिंतन करीत असतात असा या रामनामाचा प्रभाव आहे.

मोठ्या माणसाचा अनुभव उद्धृत केला म्हणजे सामान्यांचा त्याच्यावर विश्वास बसतो. यासाठीं समर्थांनीं श्रीशंकराचें उदाहरण घेतलें आहे. शंकर ही फार थोर विभूति म्हणून आपल्या संस्कृतीमध्यें मान्यता पावलेली आहे. तथाकथित आधुनिक संशोधकांनीं त्यांना अनार्यांची मूलदेवता ठरविण्याचा प्रयत्न केला असला तरी विवेकी माणसानें त्यामुळें बुद्धिभेद होऊ देऊं नये. शंकर ही अनार्यांची देवता होऊं शकत नाहीं. रानटी माणसाच्या दैवतकल्पना कधीं उच्च पातळीवर गेलेल्या नसतात. शंकरांचें व्यक्तिमत्त्व हें लोकविलक्षण वाटलें तरी सर्व प्रकारच्या भव्यतेनें आणि उदात्ततेनें परिपूर्ण आहे. आपण त्यांना सर्व प्रकारच्या ज्ञानाचें उगमस्थान म्हणतो.

त्या त्या ऋषिमंडळींना प्राप्त झालेले सर्व प्रकारचें ज्ञान-विज्ञान हें भगवान् शंकरांच्या कृपेनें मिळालेलें आहे अशी नोंद आपल्या परंपरेमध्यें सर्वत्र आहे. त्यांच्या थोरवीविषयीं भारतीय मनांत थोडाहि संशय नाहीं. अगदीं अलीकडे

होऊन गेलेल्या एका बलदंड समाजवाद्यालाहि शंकरांच्या या महत्तेस मान्यता द्यावी लागली आहे. शंकरांची ही थोरवी लक्षांत घेऊन समर्थांनी त्यांचें उदाहरण दिलें आहे.

थोरांच्या अनुभवाचा प्रभाव पडणें हें मनुष्यस्वभावाला धरून आहे. आपल्या भारतीय परंपरेंतील थोरांची थोरवी जरी कांहीं आधुनिक सुशिक्षितांना मान्य होत नसली तरी आपल्या परंपरेंतील श्रेष्ठ तत्त्वांचे प्रतिपादन करीत असतांना नोबल पारितोषिक मिळविणाऱ्या कोण्या एका शास्त्रज्ञाचें उदाहरण दिलें कीं हे बुद्धिवादी म्हणविणारेहि एकाद्या श्रद्धावंत भाविकाच्या थाटांत हो हो! म्हणून मान डोलावून मान्यता दर्शवितात. अशांनीं तरी, आपल्या परंपरेंतील थोरांची नांवें आदरणीय मानणाऱ्यांना नांवें ठेवूं नयेत.

भगवान् शंकरांना ज्या नामाच्या प्रभावानें स्वस्थता लाभली तें रामनाम सकाळीं उठून नियमानें घ्यावे असें समर्थांचें आग्रहाचें सांगणें आहे.

**बहूतांपरीं संकटें साधनाचीं ।**
**व्रतें दान उद्यापनें तें धनाचीं ।**
**दिनाचा दयाळू मनीं आठवावा ।।**
**प्रभाते मनीं राम चिंतीत जावा ।।७४।।**

परमार्थमार्गांमध्यें प्रगतीसाठीं अनेक प्रकारचीं साधनें सांगितलीं जातात. अनेक प्रकारचे याग आहेत. तपश्चर्यादि अनुष्ठानें आहेत. तीर्थयात्रा आहेत. अनेक प्रकारच्या देवतांच्या निरनिराळ्या उपासना आहेत. वाममार्गी शाक्तांचा, कौलांचा व कापालिकांचा महाभयंकर असा वामाचार आहे आणि त्या त्या पद्धतींचा पुरस्कार करणारे संप्रदाय आहेत. त्या त्या पद्धतीचें आकर्षण असणाऱ्या प्रवृत्तीचे लोकहि आहेत. समर्थ या सर्वांचा नाना प्रकारच्या संकटांनीं भरलेलीं साधनें या स्वरूपांतच उल्लेख करतात. यामध्यें तंत्राचा कांटेकोरपणा फार, विधिनिषेधांचे नियम कडक, शरीरावर आणि मनावर ताण पडेल असें प्रसंग फार आणि थोडें चुकतांच सर्वनाश होण्याचें भय त्वरित सिद्धीच्या लाभाला भुलल्यामुळें या अशा पद्धतींच्या मागें लागून स्वत:चें नुकसान करून घेणारे साधक अनेक वेळां भेटतात. हातापायाला कांपरें भरणें, नाना प्रकारच्या वेदना होणें, वेड लागणें, परमार्थ बाजूला राहून केवळ स्वैर दुर्वर्तनानें जीवन व्यापलें जाणें अशा प्रकारचें कितीतरी धोके या मार्गानें जाणाऱ्यांना भोगावे लागतात. खरा लाभ एकीकडेच राहतो.

नाना प्रकारचीं व्रतें, उद्यापनें, अनुष्ठानें यांनीं चित्तशुद्धीचा कांहीं उपाय



करावा म्हटलें तर तेंहि कामीं येत नाहीं. एक तर याकरितां फार पैसे लागतात. सगळीं साधनें शास्त्रोक्तरीत्या जमविणें फारच महाग पडतें आणि कष्टाचेंहि ठरतें, स्वत:ला त्या व्रतादींचें पुरेसें ज्ञान असत नाहीं. त्यासाठीं लागणारे मंत्र येत नाहींत, तंत्र कळत नाहीं. कोण्या ब्राह्मणावर भरंवसावे तर तोहि धंदेवाईक असतो. त्याला व्रताच्या यथासांगतेपेक्षां त्यांतून स्वत:ला होणाऱ्या दक्षिणादि लाभांचेंच आकर्षण असतें. यजमानालाहि तितकी निष्ठा नसतें. त्यालाहि कांहींतरीं थातुरमातुर करून व्रतादि गोष्टी पार पाडल्याचें समाधान आणि धार्मिक म्हणून मिळणारा लौकिक तेवढाच बहुधा पाहिजे असतो. या निमित्तानें केलें जाणारें दानहि २५ पैशाच्या गोप्रदानाच्या स्वरूपाचें असतें. दानदक्षणेसंबंधींचा शास्त्रीय नियम असा आहे कीं त्यासाठीं होणारा व्यय हा यजमानाच्या श्रीमंतीला साजेसा असला पाहिजे. दक्षणा ही इतक्या कामाकरितां इतकी अशा स्वरूपाची मजुरी नाहीं. पण माणसाच्या स्वभावांतील सगळी काटकसर आणि भागवाभागवी या धार्मिक स्वरूपाच्या व्रतादींवरच कोंसळते. या व्रतदानाकरितां वेंचला जाणारा पैसाहि बहुधा उत्तम व्यवहारानें व न्याय मार्गानें मिळविलेला नसतो. अर्थातच व्रतादींचे तंत्रमंत्र संभाळले गेले तरी साधनें अशुद्ध असल्यानें त्याचें फल पाहिजे तसें मिळत नाही. म्हणून समर्थ म्हणतात–या भानगडींत पडतांच कशाला?

परमात्मा दीनाविषयीं दया बाळगणारा आहे. दीन म्हणजे अकिंचन, दुबळा, असमर्थ. ज्याला पडतील ते कष्ट उचलण्याइतकी शरीराची वा मनाची उभारी नाहीं किंवा आवश्यक तो खर्च करण्याइतकीहि संपत्तीची अनुकूलता नाहीं. तेवढी निष्ठा नाहीं. तेवढी उत्कटता नाही. इच्छा आहे, पण प्रयत्नांची क्षमता नाही. अशा दीन माणसांच्या उपयोगी पडणारें नामासारखें दुसरें साधन नाहीं.

भगवान् दयाळू आहे. माणसांतील उणीवांची त्याला चांगली जाणीव आहे. त्याच्या अंत:करणांत क्षमा राहते. तो संभाळून घेतो. साधकाकडे आपलेपणानें पाहतो. त्याचें औदार्य व्यापक आहे. तेव्हां माणसानें इतर अवघड साधनांच्या नादीं न लागतां मनानें, असेल तेवढ्या भावानें, नामस्मरण करावें.

**समस्तामधें सार साचार आहे ।**
**कळेना तरीं सर्व शोधून पाहें ।।**
**जिवा संशयो वाउगा तो तजावा ।**
**प्रभाते मनीं राम चिंतीत जावा ।।७५।।**

परमेश्वराचें नांव हें साराचें सार आहे. तें वरवर दिसावयाला अगदीं साधें; सोपें वाटत असल्यानें त्याचें खरें महत्त्व सहजासहजीं लक्षांत येत नाहीं. म्हणून

समर्थ आवर्जून सांगत आहेत कीं बाबा! सर्व साधनांमध्यें, परमेश्वराचें नांव हें सारभूत आहे. वेद-स्मृति-उपनिषदें-पुराणें-नाना प्रकारचीं शास्त्रें, संतांचीं वचनें या सर्वांचा धांडोळा घेतला असतांना खरें हातीं लागतें तें एक नाममहात्म्यच. समर्थांसारखे महात्मे सांगतात त्यावर विश्वास बसत नसेल तर स्वत:हि शोधून पाहण्यास हरकत नाहीं. शेवटीं सर्वांचें सार म्हणून हातीं लागतें तें देवाचें नांव. संतांनीं जें सांगितलें तें अनुभवांतीच सांगितलें आहे. त्याकरितां त्यांनीं स्वार्थत्यागपूर्वक दीर्घकालपर्यंत तपश्चर्या केल्या आहेत, देशस्थिति पाहिली आहे, साधनें धुंडाळलीं आहेत, बारीक सारीक अंशोपअंशावर पुष्कळ चिंतन केलें आहे आणि शेवटीं समाजाचा विचार करून निर्णय दिलेला आहे कीं सगळ्या साधनांमध्ये खरोखरींच नाम हेंच सार आहे. श्रीसद्‌गुरु तुकाराममहाराज तर स्पष्टपणेंच सांगतात–**''वेद अनंत बोलिला। अर्थ इतकाचि साधिला। विठोबासी शरण जावे। निजनिष्ठें नाम गावें।। सकल शास्त्रांचा विचार। अंती इतुकाचि निर्धार।। अठरा पुराणीं सिद्धांत। तुका म्हणे हाचि हेत।।''** पण इतकें जीव तोडून सांगितलें तरी माणसाला तें पटत नाहीं, त्याचा विश्वास बसत नाहीं, हें आश्चर्य आहे. भरमसाट जाहिरातीवर आणि आकर्षकपणें मांडलेल्या दुकानांतील शृंगारावर भुलून माणसें भोळेपणानें रुपयाची वस्तु पांच रुपयाला घेतात, आणि तींच माणसें संतवचनांचा विचार करतांना मात्र बुद्धिवादाचा आव आणतात.

संशय घेऊंच नये असें समर्थ म्हणत नाहीत. जें कांहीं ऐकलें, वाचलें, अनुभवास आलें, त्यावर चिंतन करीत असतांना विचारी माणसाच्या मनांत प्रश्न उत्पन्न होतातच. ते उत्पन्न झालेच पाहिजेत. ज्याला असें कां अशी शंका येत नाहीं, प्रश्न विचारावेसे वाटत नाहींत, त्यांची प्रगति खुंटल्यावांचून राहत नाहीं. म्हणून विचारी माणसानें जाणत्या व्यक्तीला प्रश्न विचारलेच पाहिजेत. अनेक प्रकारानें छेडलेंच पाहिजे. गबाळेपणें ऐकावें आणि भोळेपणानें मानावें हा बावळटपणा परमार्थांत चालत नाहीं.

उपनिषदांमध्यें एक फार बोधप्रद कथा आहे. आत्मज्ञानानें सर्व कामनांची तृप्ति होते आणि सर्व लोकांवर सत्ता प्रस्थापित होतें, असें ऐकून असुरांचा राजा विरोचन आणि देवांचा राजा इंद्र आत्म्याचें ज्ञान मिळविण्यासाठीं प्रजापतीकडे गेले. ब्रह्मचर्य पाळून ३२ वर्षेपर्यंत प्रजापतीची सेवा केली. प्रजापतीनें त्यांना पाण्यानें भरलेल्या पात्रांत डोकावून पाहण्यास सांगितलें आणि म्हटलें हें जें तुम्हांस पाण्यांत दिसतें आहे तोच आत्मा. प्रजापतीसारख्या गुरूनें सांगितलें म्हणून, हो म्हणून दोघेहि परतले. तें पाहून प्रजापतीला वाईट वाटलें. प्रजापति म्हणाला, कसे खुळे आहेत हे! मी जें सांगितले तेंच यांनीं कांहींहि विचार न करतां पत्करलें. आतां जीवनाचें खरें श्रेय यांना कसें लाभणार? यांचा पराभव होईल. विरोचनानें ''गुरूनें सांगितलें'' या वाक्याचा आधार घेऊन आपल्या सोयीचा देहात्मवाद पत्करला, इन्द्र मात्र जातां जातां गुरूंच्या वाक्यावर विचार करीत होता. प्रतिबिंब पडलें तें देहाचें व देहाला आत्मा मानणें त्याला योग्य वाटलें नाहीं. कारण आत्म्याच्या वर्णनांत अभय आणि अमृत अशीं लक्षणें सांगितलीं गेलीं होतीं. शरीराला अनेक प्रकारचीं भयें असतात. आणि तें अमरहि नसतें. तेव्हां इन्द्र परत आला. प्रजापतीनें विचारलें; अरे समाधान पावून गेला होतास. पुन्हां परत कां आलास? इन्द्रानें आपली शंका सांगितली आणि मग गुरूनें त्याला अनेक वेळां तप करावयास लावून पायरीपायरीनें आत्मज्ञानाचा उपदेश केला.



जिज्ञासू-भावानें शंका घ्याव्या आणि प्रश्न विचारावे ही वृत्ति अधिकारी पुरुषांनाहि अपेक्षितच असते. म्हणून परमार्थामध्ये संशयच घेऊं नये असें समर्थ म्हणत नाहींत. वावगा, नाठाळपणाचा, आपलेंच म्हणणें खरें करण्याच्या वितंडेचा, नि:स्वार्थी, तपस्वी, कनवाळू अशा पुरुषांचेंहि ऐकावयाचें नाहीं अशा दुराग्रहाचा, संशय नसावा, एवढीच समर्थांची अपेक्षा आहे. आम्ही कोणाचें ऐकत नाहीं, आम्ही कोणाचें मानीत नाहीं, आमच्या बुद्धीला पटतें तेंच आम्हीं खरें मानतों, असें म्हणणें बहुधा प्रामाणिकपणाचें नसतें. जें सत्य आहे त्याचा साक्षात्कार पूर्वीं कोणाला झाला नव्हता आणि माझ्याशिवाय कोणाला होणार नाहीं हा अहंकार व्यर्थ आहे. तो मूर्खपणा तरी आहे वा दंभ तरी आहे. म्हणून समर्थ म्हणतात–वावगे संशय टाका, आणि शोधून पहा. नाम हेंच सार आहे असें तुमच्या प्रत्ययास येईल. प्रयोगपद्धतीला, शोधून पाहण्याच्या प्रक्रियेला, कांहींतरी गृहीतकृत्य स्वीकारावेंच लागतें. वावग्या संशयाचा माणूस तेंहि पत्करीत नाहीं. त्यामुळें तो चालूच शकत नाहीं. पोंचायचें स्थान, मार्ग आक्रमिल्यानंतर मिळावयाचें असतें. जेथून निघावयाचें तेथून, पोंचावयाचें गांव कधीं दिसत नाहीं. मार्गदर्शकावर विश्वास ठेवूनच रस्ता चालावा लागतो. आणि मग एकेक खाणाखुणा पटत पटत रस्ता योग्य आहे कीं नाहीं तें कळूं लागते. आंधळेपणानें चालणें हें जसें चालणें नव्हे तसें डोळसपणा म्हणजे सगळें दिसलें तरच जाऊं असेंहि म्हणणें योग्य नाहीं.

**नव्हे कर्म ना धर्म ना योग कांहीं ।**
**नव्हे भोग ना त्याग ना सांग पाही ।।**
**म्हणे दास विश्वास नामीं धरावा ।**
**प्रभाते मनीं राम चिंतीत जावा ।।७६।।**

'प्रभाते मनीं राम चिंतीत जावा' हें मनोबोधांतील प्रकरण मोठें मधुर आहे, फार हितकर आहे आणि साधकाला धीर देणारें आहे. त्याचा शेवटचा श्लोक फार महत्त्वाचा आहे, ईशचिंतनाची अलौकिकता सांगणारा आहे.

माणूस सुखासाठीं, समाधान लाभावें म्हणून अनेक गोष्टी करीत असतो. त्यांत ऐहिक आणि पारमार्थिक दोन्हींचाहि भाग असतो. शंभर टक्के नास्तिक माणसें अजून जन्मास यावयाची आहेत म्हटलें तरी चालेल. कशावर तरी त्याचा विश्वास असतो. मानव्यावर, माणुसकीवर आमचा विश्वास नाहीं असें म्हणण्याचें धाडस आजच्या काळांत बुद्धिवादीहि करूं शकणार नाहींत. समाजाची सेवा, अपंगांना सहाय्य, दलितांचा उद्धार, सर्वोदय, अन्त्योदय यांतले कांहींतरी केल्यावांचून वा करतो असें दाखविल्यावांचून, निदान या अशा कार्याविषयीं सहानुभूति दाखविल्यावांचून, त्यांना प्रोत्साहन दिल्यावांचून, आजच्या बुद्धिवाद्यालाहि राहवत नाहीं. या गोष्टीहि कुणी प्रामाणिकपणें करीत असेल तर तोहि धार्मिकच आहे. ईश्वराची सेवाच करीत आहे असेंच मी मानतों. संतानींहि **''जे कां रंजले गांजले। त्यासी म्हणें जो आपुले। तोच साधू ओळखावा। देव तेथेंचि जाणावा।।''** असेंच म्हटलें आहें. समाजसेवेची अनेक अंगोपांगें आहेत. आपल्या संस्कृतीतील **पूर्त** या कल्पनेंत त्या सर्वांचा समावेश होतो. माणसानें इष्टासह तेंहि आचरावें असेंच आपला धर्म सांगतो. त्याकडे दुर्लक्ष झाले असेल, त्यालाहि कांहीं कारणें असतील पण समाजाच्या तें लक्षांत आणून देणें इष्टच ठरेल.

या कार्यक्षेत्रांत काम करणाऱ्या माणसांना तरी समाधान लाभतें कां? अनुभव तसा नाहीं. प्रामाणिक सहकार्याच्या अभावीं, सहकाऱ्याच्या स्वार्थलोलुपतेमुळें, ज्यांच्याकरितां कष्टावयाचे त्यांच्या उन्मत्तपणामुळें व अडाणीपणामुळें, वैतागलेले, विटलेले, नको, हें पुरें, हें असें वाटणारे अनेक सामाजिक कार्यकर्ते आहेत. वैयक्तिक सुखाचा त्याग करून त्यांनीं समाजसेवेचें व्रत घेतलें पण तेथेंहि दंभाचें दर्शन झालेंच. म्हणजे त्याच्या दृष्टीनें पूर्ण इहवादी असलेला हा त्यागहि सार्थकीं लागलाच नाहीं, सांग झालाच नाहीं.

कोणत्याहि त्यागाचें असेंच होतें. परिस्थितीची प्रतिकूलता, साधनांची अपूर्णता, शरीराचें दौर्बल्य, चित्ताची चंचलता, बुद्धीची अस्थिरता, कंटाळा, आळस इत्यादि इत्यादि कारणांनी जें जें कांहीं करू जावें तें तें सर्व अर्धवट होतें, यथासांग होत नाहीं. यशापयशाविषयींची तटस्थता न बाणल्यामुळें माणसे स्तुतीनें हुरळतात, निंदेनें खचतात, इतरांच्या दोषानें वैतागतात, त्यामुळें कुठेंच समाधान लाभत नाहीं. मग तें सामाजिक कार्य असो किंवा यज्ञादि कर्म, दानपूजादि धर्म, योगादींचा अभ्यास, नाना प्रकारचीं व्रतें वा तीर्थयात्रा असें धार्मिक, पारलौकिक समजलें



जाणारें कृत्य असो. कांहींहि यथासांग होत नाहीं.

यांतील कांहींच नको म्हणून पूर्ण देहात्मवादी बनून कुणी केवळ ऐहिक सुखोपभोगाच्या मागें लागतो म्हणेल तर तेथेंहि त्याला पूर्णता आणि तृप्ति लाभत नाहीं. भोग 'तृप्त' करीत नाहींत. साधनें पुरीं वाटत नाहींत, हांव वाढतच जाते आणि त्यामुळें इतरांच्या दृष्टीनें ऐश्वर्यांत असलेला माणूसहि असमाधानीच असतो. त्याच्या भोग भोगण्यांतहि पराक्रम नसतो, वैभव नसते, विलासी रसिकता नसते, तेथेंहि मिळमिळीतपणाचा राहतो. झोंकून दिल्यामुळें मिळणारें उत्कट सुख तेथेंहि मिळवतां येत नाहीं. कांहीं भोगांची तर केवळ कल्पनाच राहते. नुसतीं स्वप्नेंच ठरतात तीं! कांही म्हणजे कांहीं हातीं लागत नाहीं. भर्तृहरी वैतागून म्हणतो तसें– **''मातुः केवलमेव यौवनवनोच्छेदे कुठारा वयम्''** असेंच म्हणावेंसें वाटतें. भोगांत तरी सांगता आहे कुठें? दुबळ्या शरीरामुळें उपस्थित भोगांचाहि पुरेसा स्वाद घेतां येत नाहीं, असेंच होत राहतें.

आपल्या प्रकृतीप्रमाणें, आवडीप्रमाणें, परिस्थितीप्रमाणें, करावेंसे वाटेल तें अवश्य करीत राहावें, पण त्या सर्व गोष्टींची पूर्तता ईशस्मरणानें होतें हें विसरूं नये. माणसाचें कोणतेंहि ऐहिक किंवा पारलौकिक कृत्य **''स्मरणादेव तद्विष्णोः संपूर्ण स्यात् इति श्रुतिः''** विष्णूच्या स्मरणानेंच, ईशचिंतनानेंच संपूर्ण होतें असें वेदानेंच सांगितलें आहे. समर्थ म्हणतात–या वचनावर विश्वास ठेवावा. ईशस्मरणानें सर्व कृत्यांची सर्व कर्मांची, सर्व कर्तव्यांची उणीव दूर होऊन ती सांग होतात हें म्हणणें अगदीं यथार्थ आहे.

नामस्मरणामध्यें मन एकाग्र होत नाहीं, न होऊं दे. सकाळीं उठल्याबरोबर अर्धी घटका नित्यनेमानें नाम घ्यावें. दिवसाकांठीं मिळेल तो रिकामा वेळ नामस्मरणांत घालवावा. झोंपण्यापूर्वी शय्येवर शांतपणें सरळ बसून ईशचिंतन करावें. या नित्यनेमामुळें जीवन पालटतें आहे, मनाची प्रसन्नता वाढते आहे, असा अनुभव निश्चित येईल. लहान मुलें रोपांच्या बिया पेरतात आणि उगवलें कां म्हणून पुन्हां पुन्हां उकरून पाहतात. तशी अधीरता मात्र नसावी. विश्वास ठेवावा, धीर धरावा, आळस करूं नये, सातत्य सोडूं नये, प्रकृति-परिस्थितीमुळें काळ थोडा उणा-अधिक होईल इतकेंच. पण त्याचा विचार करूं नये–आणि चढत्या वाढत्या प्रेमानें नामस्मरण करीत असावें. मनामध्यें ईश्वराचें स्वरूप सांठवावें. त्याने माणसाचें कल्याण झाल्याशिवाय राहणार नाहीं असें आश्वासन समर्थ रामदासांसारख्या थोर महात्म्यांनीं दिलेलें आहे म्हणून ''म्हणे दास विश्वास नामीं धरावा। प्रभाते मनीं राम चिंतीत जावा।।''

**करी काम निःकाम या राघवाचें ।**
**करी रूप स्वरूप सर्वां जिवांचें ।।**
**करी छेद निर्द्वंद्व हे गूण गातां ।**
**हरिकीर्तनीं वृत्तिविश्वास होतां ।।७७।।**

माणूस जिथें आहे आणि जिथें जाऊन पोंचावयाचा आहे. त्या दोन स्थानांमध्यें बरेंच अंतर असतें. तें अधिकाराप्रमाणें लांब-जवळ, उणें-अधिक असेल पण असतें हें निश्चित. आपण जवळ येतांच पांखरें भयानें उडून गेलीं या गोष्टीची खंत श्रीतुकाराममहाराजांना वाटली. आपला निर्वैर भाव अजून पूर्णतेला गेला नाहीं अशी त्यांची धारणा झाली व त्याकरितां त्यांनीं साधना केली असें म्हणतात. सामान्य जीवाच्या मार्गदर्शनासाठी ही लीला कदाचित् महाराजांनीं केली असेल. श्रीशंकराचार्यांनीहि, आपल्या अंगावर पक्ष्यांनीं घरटीं बांधावींत, अशी इच्छा एके ठिकाणी व्यक्त केली आहे.

जेथें जावयाचें तें मूलठिकाण शरीर, इंद्रियें, मन आणि बुद्धि, यांच्या पलीकडचें असले, अंतिम अवस्थेंत साधन म्हणून त्या कशाचाहि उपयोग होत नसला तरी, प्राथमिक अवस्थेंत या शरीरादींची उपेक्षा करून चालत नाहीं. **आज मात्र एक महंत फसवें तत्त्वज्ञान आपल्या आकर्षक वक्तृत्वाच्या बळावर प्रचारीत आहेत.** ते म्हणतात, ''परमार्थ ही अंतर्यात्रा आहे. त्यासाठीं कांहींच करावयाचें नसतें. कांहीं करणें हा अडथळा असतो. शून्य व्हा. रिकामें व्हा. तसें होणें म्हणजेच पोचणें आहे. येथें कांहीं व्हावयाचें नाहीं, मिळवावयाचें नाहीं, जें आहेच त्याचा अनुभव घ्यावयाचा आहे. तुमचें कांहीं करणें हाच त्या अनुभवाच्या वाटेंतला अडथळा आहे. सगळे धर्म, सगळे पंथ, सगळे गुरु, तुम्हाला नाना प्रकारचीं साधनें करावयास सांगून फसवीत आहेत. पूजापाठ, नामजप, तीर्थयात्रा, व्रतेवैकल्यें, दानधर्म हे सर्व निरुपयोगी आहे. गेल्या दहा हजार वर्षांत त्यानें कोणाचें कल्याण झालेलें नाहीं. तुम्हीं प्रगतीच्या, उन्नतीच्या मोहानें अनेक गोष्टी लादून घेतल्या आहेत. तुम्हीं कांहींतरी आदर्श डोळ्यापुढें ठेवून त्यासारखे होऊं इच्छिता आणि केवळ त्यामुळेंच वैतागता. सत्यापासून दूर जाता. कोणासारखें होऊं नका. तुमचे तुम्हींच राहा. जसे आहांत तसेच स्वतःला स्वीकारा. हीच तुमची खरी मुक्ति आहे. तेंच परमेश्वराचें रूप आहे. सत्य आहे तें एवढेंच.'' इत्यादि **इत्यादि विवेचन माणसाला मोठें आकर्षक वाटतें. पण तें खरें नाहीं. ती एक प्रकारची आत्मवंचना आहे.**

अंतिम स्थितींत जें अनुभवास येतें, तें आरंभींहि तसेंच मानणें हें योग्य नाहीं.



श्रेष्ठ प्रकारचे अनुभव ज्या थोर महात्म्यांनीं घेतले आहेत त्यांनीं आपली अनुभूति ''मी मला सांपडलों.'' ''साधनें गळून पडलीं.'' ''आता करणें म्हणून कांहीं उरलें नाहीं.'' ''सदा सर्वत्र एक आनंदच भरून राहिला आहे.'' असें म्हणून व्यक्त केली आहे हे खरें, पण ही सिद्धावस्था झाली. साधकानें तसेंच मानणें धोक्याचें आहे.

पंचपक्वान्नें जेवून तृप्त झालेला मनुष्य प्रसन्नपणें वामकुक्षी करीत असतो, तेव्हां त्याला कांहीं करावयाचें आहे असें उरत नाहीं. पण त्याचेकडे पाहून भुकेला मनुष्यहि तसेंच वागूं म्हणेल तर चालेल काय? भुकेलेल्याला लाकडें कोळसे जमविण्यापासून, अन्न शिजविण्यापर्यंतची सर्व खटपट करावी लागते, भीक तरी मागावी लागते किंवा सर्व आयतें मिळेल असें स्नेहसंबंध तरी जोडून ठेवावे लागतात. म्हणजे कोणत्या ना कोणत्या स्वरूपाचे प्रयत्न करावेच लागतात. पद्धति स्वीकारावीच लागते. कांहींच करायचें नाहीं असें आरंभींच म्हणून चालत नाहीं आणि हें जें कांहीं करावें लागतें, त्याला इंद्रिय-मन-बुद्धीचेंच माध्यम असतें. पूर्णतेच्या परमोच्च शिखरावर पोंचलेल्या रामदासांसारख्या थोर संतांना याची पूर्ण जाणीव असते, कारण जनसामान्यांच्या कल्याणाची त्यांच्या हृदयांतील तळमळ ही अतिशय उत्कट आणि फार प्रामाणिक असते. म्हणून ते साधनें नाकारीत नाहींत. प्रकृति, प्रवृत्ति, परिस्थिति यांचा विचार करून संत तीं सांगत असतात.

माणसाला शेवटीं जी स्थिति प्राप्त करून घ्यावयाची असते, जी खरोखरीच मुळांत त्याची वस्तुस्थिति असते. तिचें वर्णन करावयाचें झालें तर निष्काम, निर्द्वंद्व, स्वरूपावस्थित या शब्दांनींच त्यांतल्या त्यांत करतां येतें. पण या लक्षणांचा अनुभव येण्यासाठीं आपापल्या योग्यतेप्रमाणें पुष्कळ वाटचाल करावी लागते. समर्थ त्यासाठीं दिशा दाखवीत आहेत.

मनुष्याच्या अंतःकरणामध्यें रूपाविषयींची ओढ, विषयासंबंधींच्या इच्छा आणि निरनिराळ्या द्वंद्वाविषयींचा हवें-नकोचा नाद उण्या-अधिक प्रमाणांत स्वभावतः असतो. समर्थ म्हणतात–ही जी मनाची स्वाभाविक वृत्ति आहे, ती नष्ट करतां येणें शक्य नाहीं आणि इष्टहि नाहीं. ती तशी असते हें मान्य करून तिचा स्वीकार केलाच पाहिजे. पण या वृत्तीचा प्रवाह जो भर वेगानें अगदीं एखादा प्रचंड धबधबा कोंसळावा तसा केवळ ऐहिक विषयांकडेच वाहत असतो, तो रामाकडे वळवा. या नैसर्गिक बाह्यविषयगामी वृत्तींना ईश्वरोन्मुख करा म्हणजे तुम्हांस जें मिळवावयाचें आहे, साधावयाचें आहे तें निश्चितपणें लाभेल. मृगजळाच्या पाठीमागें धावण्याची, केवळ शीणच वाढविणारी वणवण थांबेल आणि शांत, प्रसन्न, आणि पवित्र, भव्य, दिव्य अशा मानससरोवराच्या अंतर्यात्रेचा आरंभ होईल. या अंतर्यात्रेंतील

पावलापावलागणिक सुखसमाधान वाढत जाईल. आनंदाची कारंजी नाचूं लागतील. विकसित होणाऱ्या प्रेमपुष्पांचा सुगंध तुम्हाला समाधि अवस्थेत धुंद करून टाकील, बाह्यजगताची जणूं जाणीवच राहणार नाही. कबीर म्हणतात तसें– **''हमन हैं इश्क मस्ताना हमनको होशियारी क्या। रहे आजाद या जगमो हमन दुनियासे यारी क्या।''** माणसाला अस्वस्थ करणारे, दु:ख देणारे, असे बाह्य जगताचे सगळे संबंध जणू गळून पडतील, आणि ईश्वराच्या एकरूपतेच्या साक्षात्कारांत म्हणजे स्वस्वरूपात माणूस लीन होऊन जाईल. हें सहजपणानें घडावे अशी भक्तीमार्गातली ही सोपी युक्ति आहे. जी इच्छा, जी वासना, जो काम प्रतिबंध करतो तोच त्या परमपुरुषाला अर्पण करून टाकावयाचा म्हणजे क्रमाक्रमानें वासनांचें निरसन होत जातें. जों जों भगवान् रामचंद्रांसारख्या आराध्यदेवतेचें नयनमनोहर असें परममंगल रूप चित्तामध्यें ठसावेल तों तों सागरांत मिसळलेल्या नदीप्रमाणें जीवाला स्वस्वरूपाची अनुभूति येत जाईल आणि मग अर्थातच बाह्यविषयांचे आकर्षण उरणार नाहीं. ईश्वराच्या लीला ऐकाव्या. ईश्वराच्या लीला गाव्या. सच्चरित्राच्या श्रवणमननांत रंगून जावें. ईश्वराचें सर्वसमर्थत्व, सर्वज्ञत्व परमकारुणिकत्व, औदार्य, अखिल ब्रह्मांडांना लीलेनें धारण करणारें परमऐश्वर्य, इत्यादि गुण आठवितांना मन जों जों आनंदानें भरून जाईल, जो जो या गुणानुवादाचें व्यसन लागेल तो तो सुखदु:ख, मानापमान, यशापयश इत्यादि द्वंद्वें मनुष्याच्या मन-बुद्धीची जी निष्ठुर ओढाताण करतात तें घडूंच शकणार नाहीं. मात्र त्यासाठीं हरिकीर्तनाविषयीं अंत:करणाच्या वृत्तींना विश्वास वाटला पाहिजे.

परमेश्वराच्या लीलावतारी चरित्रांत स्वभावत:च एक विलक्षण आकर्षण आहे. काशीच्या एका प्रसिद्ध प्रवचनकार पंडितांनीं आपला अनुभव एकदां सांगितला. ते म्हणाले– ''काशीला एक संन्याशांचा मठ आहे. तेथें मी उपनिषदावर प्रवचन करीत होतों. एकदां केव्हां तरी ओघाओघानें कृष्णचरित्रांतील एक प्रसंग सांगितला आणि आयुष्यभर उपनिषदांचा अभ्यास आणि 'तत्त्वमसि'चा विचार करणारें ते संन्यासी त्या प्रसंगांत इतके रंगले कीं सर्वजण म्हणाले– 'उपनिषदें राहूं द्या. आतां कांहीं दिवस तरी प्रत्यहीं कृष्णकथाच सांगा.' तत्त्वज्ञानाच्या शुष्क काथ्याकुटांतून स्वरूपसाक्षात्कार व्हावा आणि वृत्तींना तल्लीनता यावी त्यापेक्षां हरिगुणलीला ऐकतांना रंगून जाणाऱ्या वृत्तीला तो साक्षात्कार फार लौकर होईल असा विश्वास आम्हांला वाटूं लागला आहे आणि मग शास्त्रीबुवांनीं तेथें जवळजवळ वर्षभर कृष्णकथाच सांगितली.

हरिकीर्तनाचें हें सामर्थ्य अलौकिक आहे. स्वत:ला पूर्णपणें झोंकून देण्याइतका विश्वास हवा. ईश्वरलीलांच्या प्रवाहांत या वा त्या कोण्याहि किनाऱ्याला लागण्याचा



मोह न धरतां सुखानें वाहत रहावें. साधनमार्गातल्या साऱ्या पायऱ्या आपोआप ओलांडल्या जातील. कांहीं करावें न लागतां सर्व होत राहील. पण त्यासाठीं अंत:करणांत विश्वास असला पाहिजे. तरच हें लाभेल.

**अहो ज्यां नरां रामविश्वास नाहीं ।**
**तया पामरा बाधिजे सर्व कांहीं ।।**
**महाराज तो स्वामि कैवल्यदाता ।**
**वृथा वाहणें देहेसंसारचिंता ।।७८।।**

ज्याला आपलें हित कशांत आहे तें सांगितलें तरी कळत नाहीं, ईश्वर सर्वसमर्थ आहे, सर्वज्ञ आहे, तो योग्य तेंच करील हें ज्याला पटत नाहीं, म्हणजेच ज्याचा रामावर विश्वास नाहीं, त्याला समर्थ पामर म्हणतात. पामर म्हणजे क्षुद्र, ज्याची कींव करावी असा. माझ्या मतानें माणसाला दिलेली ही सगळ्यांत वाईट शिवी आहे. पुरुषाला नपुंसक म्हणण्यासारखें हें आहे. स्वाभिमानी माणसाला लाचार म्हणण्यासारखें हें आहे. कल्याण करण्याकरितां धडपडणारें अंत:करण निराशेनें पिळवटून गेल्यावांचून अशी शिवी तोंडावाटें येणार नाहीं. कोणत्याहि लाभावांचून प्रीतीचा कळवळा असलेलें अंत:करणच हें म्हणूं शकतें.

समर्थ म्हणतात– संसारांतल्या सर्व गोष्टी बाधतात त्या, त्या पामराला कीं ज्याचा रामावर विश्वास नाहीं. ज्याचा कशावरच विश्वास नाहीं, त्याला वेड तरी लागेल नाहींतर तो हिप्पी तरी होईल. गांजाचा अर्क खाऊन धुंदींत पडल्यावांचून जीवनांत तो दुसरें कांहींच करूं शकणार नाहीं.

गवताचा पुंजका सोसाट्याच्या वाऱ्यानें भरकटत राहावा, तशी दशा माणसाची होईल. अंत:करणांत विश्वास असल्यावांचून कोणत्याहि प्रतिकूलतेला तोंड देणें माणसाला शक्य नाहीं. माणसें उभारी धरूं शकतात तीं विश्वासाच्या बळावर. आपत्तींतहि स्थिर राहूं शकतात तीं याच बळावर. आपण त्याला पाहिजे तर आत्मविश्वास म्हणा. पण शेवटीं तो विश्वासच आहे, श्रद्धाच आहे. आणि कोणत्याहि स्वरूपाच्या विश्वासाचा आणि श्रद्धेचा संबंध प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष किंवा दूरान्वयानें ईश्वराशींच पोंचतो. कोणत्या ना कोणत्या स्वरूपाचा विश्वास असेल तर ईश्वर नाकारण्याचा अडाणीपणा करणें योग्य नाहीं. शास्त्रपूत दृष्टीनें ईश्वराच्या अस्तित्वाला मान देणें हेंच मग शहाणपणाचें ठरणारें आहे. बुद्धिमत्तेचें तेंच खरें लक्षण आहे. समर्थ म्हणतात–अरे जो ईश्वर सर्वसमर्थ आहे (महाराज), ब्रह्मांडाचा, सृष्टीच्या सर्व व्यापाराचा नियामक आहे (स्वामी), कैवल्यासारखी अत्यंत दुर्लभ, सर्वश्रेष्ठ वस्तु आपल्या भक्ताला सहजपणें देण्याइतका उदार आहे; त्याचे झाल्यावर,

त्याला आपला म्हटल्यावर, त्याच्यावर विश्वास टाकल्यावर, त्याला निष्ठा अर्पण केल्यानंतर, तुला तुझ्या एवढ्याशा साडेतीन हात देहाची आणि एक बायको, दोन पोरांच्या चिमुकल्या संसाराची चिंता वाहण्याचें कारणच काय?

**मना पावना भावना राघवाची ।**
**धरीं अंतरीं सोडिं चिंता भवाची ।।**
**भवाची जिवा मानवा भूलि ठेली ।**
**नसे वस्तुची धारणा वेर्थ गेली ।।७९।।**

रामचंद्राविषयींची आदराची, आपुलकीची भावना ही जरी मानसिक वृत्ति असली तरी या मानसिक वृत्तीचें स्वरूप अन्यवृत्तींप्रमाणें विषयांची आसक्ति वाढवून, चित्ताला मलिन करणारें नाही. उलट मनाला विषयांच्या ओढीपासून दूर नेऊन शुद्ध करणारे, पवित्र करणारें आहे. तेव्हां अंतरंगामध्यें ही रामचंद्रांविषयींची भक्तिभावनाच सदैव दृढ राहील असें पहावें. त्यामुळें संसाराविषयींची अनेक प्रकारची चिंता सुटत जाईल. या दोन्हीं गोष्टी जणूं परस्परावलंबी आहेत. संसाराची चिंता सुटत जाईल तसें तसें अंतःकरण ईश्वरभक्तींत रमेल, आणि जों जों ईश्वराची ओढ लागेल तों तों सांसारिक गोष्टींविषयीं चिंता करावी असें वाटणार नाहीं; याचें कारण असें कीं ज्याला आपण संसार संसार असें मानीत असतो तीच एक माया आहे. तो एक भ्रम आहे. नसलेल्या गोष्टी आपण कल्पिल्या आहेत. आणि आपणच निर्माण केलेल्या या मोहजालांत जीव उगीचच गुरफटून गेला आहे. शरीर-मनाच्या नैसर्गिक आवश्यकतेपलीकडे जें हवें-नको वाटतें तें तर सगळ्यादृष्टीनें केवळ भ्रमात्मकच आहे. खरा जिव्हाळा, खरी आपुलकी त्यांत कोठेंहि नसते. साऱ्या आशा आकांक्षा खुळेपणानें जोपासलेल्या असतात. जें मुळांत सुखावह नाहीं, संतोषप्रद नाहीं, तत्त्वतः तर ज्याला अस्तित्वहि नाही, त्याच्याविषयींच्या आपणच लादलेल्या नाना प्रकारच्या धारणा जर व्यर्थ गेल्या, निरुपयोगी ठरल्या तर आश्चर्य वाटूं नये. दोरीवर साप पहावा आणि घाबरावें, एखाद्या चमकणाऱ्या वस्तूला सोनें, चांदी वा रत्न समजून उचलण्यासाठीं धांवावें, तसेंच संसारातल्या सुखदुःखाच्या कल्पनांसंबंधी असतें. त्यांतली बहुतेक सर्व सुखदुःखें हा माणसाच्या कल्पनांसंबंधी असतें. त्यांतली बहुतेक सर्व सुखदुःखें हा माणसाच्या मनाचा खेळ असतो. दीर्घकालीन वासनांच्या संस्कारानें तो खरा असल्याचा भास दृढावत जातो आणि मग खऱ्या हिताचा परमार्थच उपरा ठरतो. म्हणून समर्थ म्हणतात–ईश्वराविषयीं भक्तिभाव बाळगा. त्याची पवित्रता तुम्हांला या अपवित्र भ्रमापासून दूर करील.



**धरा श्रीवरा त्या हरा अंतरातें ।**
**तरा दुस्तरा त्या परा सागरातें ।।**
**सरा वीसरा त्या भरा दुर्भरातें ।**
**करा नीकरा त्या खरा मछरातें ।।८०।।**

अनुप्रासयुक्त शब्द असलेल्या या श्लोकाचीं रचना अर्थ लावण्याच्या दृष्टीनें थोडी अवघड आहे. एकेका पदाचें वा पदसंहतीचें वेगवेगळे अर्थ केले आहेत. मी माझ्या कल्पनेंप्रमाणें सांगणार आहे. आपल्याला कसें रुचतें तें पहा. समर्थ म्हणतात–लक्ष्मीपति परमात्म्याला दृढ धरा. त्याचे व्हा. त्याला आपलेसें करा. जीव आणि ईश्वर यांच्यामध्यें मायेनें जें अंतर पडलें आहे तें ज्ञान-ध्यान-भक्ति-योग यांचा यथाशक्ति अवलंब करून नाहीसें करा.

''हरा अंतरातें''चा अर्थ शंकरांच्या अंतःकरणांत ज्याचा निवास आहे म्हणजेच भगवान् शंकरांनींहि ज्या रामचंद्राला स्वतःच्या हृदयांत धरून ठेवलें आहे, त्याला तुम्हींहि तसेंच धरून ठेवा किंवा ज्ञानयोगाच्या परिभाषेप्रमाणें अंतर असें जें मन तेंच नाहींसे करा. मनाला अमन करा म्हणजे त्या उन्मनी अवस्थेंतच स्वरूपसाक्षात्कार होईल. हा असा साक्षात्कार होणेंच, श्रीवराला, परमेश्वराला धरून ठेवणें आहे.

परमेश्वराला असें धरलेत, भक्तिभावानें त्याला पकडलेंत, त्याला आपलेसे केलेत म्हणजे एरवी तरून जाण्यासाठीं अत्यंत दुस्तर, फार अवघड असा जो अतिविशाल मायासागर तो तुम्हीं सहज तरून जाल. ज्या मायेंतून तरून जाण्यासाठीं केलेले सर्व प्रकारचे प्रयत्न अयशस्वी होतात असें श्रीज्ञानेश्वरांसारख्या थोर महात्म्यांनीं सांगितलें आहे, ती माया सोपी होऊन जाते. श्रीशंकराचार्य म्हणतात–पांडुरंगाच्या भक्ताला एरवीं अत्यंत खोल वाटणारा भवसागरहि तसा उरत नाही. भक्ताला त्याची खोली जास्तींत जास्त कमरेइतकी राहते. तसें सुचविण्यासाठीं तर विठ्ठलानें आपलें हात कमरेवर ठेवले आहेत.' श्रीज्ञानेश्वर महाराज म्हणतात–अनेक प्रकारच्या साधनांनींहि तरून जाण्यास दुस्तर असलेली ही माया भगवद्भक्ताला ऐलीच थडी आटून नाहींशीं झाल्यासारखी होते. तिच्यांतून तरून जाणें, हें आतां कष्टाचें, धोक्याचें, पोहणें उरतच नाहीं. तर कोरड्या पात्रांतून चालत जाण्याइतकें सोपें होतें. ''श्रीवरा धरा'' आणि ''दुस्तरा तरा'' हें म्हणण्यांत समर्थांचा तोच भाव आहे. श्रीवराला धरावें तें कसें? तर ज्याला धरणें दुर्भर आहे, ज्याची पूर्तता करणे, तृप्ति करणें दुर्घट आहे, फार अवघड आहे त्या पोटाला, उपलक्षणेनें कामाला विसरून. पोटाची चिंता करूं नका, कामतृप्तीच्या मागें लागूं नका. त्यांचा व्याप आपल्या मागें लागला आहे हेंहि विसरून जा. चला, त्या दृष्टीनें पुढें सरा. प्रयत्नाला लागा. पोट कधीं भरत नाहीं. काम कधीं

तृप्त होत नाहीं. एका सुभाषितकारानें **''जकाराः पंच दुर्भराः''** अशी मुळीं नोंदच केली आहे. तो म्हणतो– **''जामाता जठरं जाया जातवेदो जलाशयः। पूरिता नैव पूर्यन्ते जकाराः पंच दुर्भराः।।''** यांना पूर्ण करण्याचा, तृप्त करण्याचा कितीहि प्रयत्न करा, त्याला यश म्हणून यावयाचेंच नाहीं. त्यांना विसरून जाणें, त्यांच्यापासून दूर सरणें हाच कामाची पूर्तता करण्याचा चांगला आणि सोपा मार्ग आहे. पण या कामाशीं प्रत्यक्ष लढणें, त्याला जिंकणें, तसें सोपें नाहीं. कामाचां विस्तार क्रोधलोभाच्या मार्गानें मत्सरापर्यंत झालेला असतो. मत्सर हा शुद्ध गाढवपणा आहे. मला मिळावेसें वाटणें हें एक वेळ समजूं शकते. पण मला न मिळतां दुसऱ्याला मिळालें वा मला मिळूनहि दुसऱ्याला मिळालें तर माझा जो जळफळाट होतो तो होणें म्हणजे शुद्ध गाढवपणाच नाहीं कां? यासाठींच समर्थांनीं मत्सराला खरं म्हणजे गाढव म्हटलें आहे. प्रत्यक्ष माझी निंदा-स्तुति कोणी करील तर मला वाईट वाटेल किंवा सुख होईल हें समजू शकते, पण दुसऱ्या कोणा लेखकाला, विद्वानाला, गृहस्थाला चांगलें म्हटलें तर मला वाईट वाटावें किंवा त्याला वाईट म्हटलें तर मला बरें वाटावें, किंवा माझी प्रतिष्ठा वाढावी म्हणून मी दुसऱ्याची निंदा करावी या मत्सरीवृत्तीचें समर्थन कसें करणार? असें वाटणें हा मूर्खपणाच आहे. कामक्रोधांची ही मत्सररूपीं संतति गाढवासारखीं मूर्ख खरी पण फार बळकट आहे. म्हणून ती नष्ट करण्यासाठीं तिच्याशीं नेटानें झुंज घ्यावी लागते. निकरा करावा लागतो.

मला मिळावेसें वाटणें, न मिळालें तर दुःख होणें, हें नाहींसे व्हावें लागतें; पण तें साधण्यासाठीं दुसऱ्याला मिळालें तर वाईट न वाटणें एवढें तरी साधावें लागतें. दुर्भर असलेल्या कामाच्या बुंध्यावर वाढलेला, क्रोधादींच्या फांद्यांनीं विस्तारलेला संसाराचा हा महाप्रचंड वृक्ष एकदम बुंध्यावरच घाव घालून तोडणें शक्य असलें तरी सोपें वा सोयीचें नसतें. त्याच्या फांद्यांचा विस्तार आधीं कमी करावा व मगच बुंध्यांवर घाव घालावा हें बरें म्हणून समर्थ म्हणतात. मत्सराशीं निकरानें झुंज द्या. तो नाहींसा करा म्हणजे दुर्भर अशा कामालाहि विसरणें सोपें जाईल. बळ संपलेल्या शत्रूकडे दुर्लक्ष करणें सोपें असतें.

**मना मछरें नाम सांडूं नको हो ।**
**अती आदरे हा निजध्यास राहो ।।**
**समस्तामधें नाम हें सार आहे ।**
**दुजी तूळणा तूळितां ही न साहे ।।८१।।**

आतां या श्लोकापासून पुढें वीस-बावीस श्लोकांत समर्थांनीं नाममहात्म्य सांगितलें आहे. मागच्या श्लोकांतील मत्सराचा संबंध पुन्हा येथें आल्यानें मागील



प्रकरणाशीं तें जणूं जोडलें गेलें आहे.

मनामध्यें मत्सर ठेवून नाम घेणें सोडूं नये असें जें सांगितलें आहे तें नीट समजून घेतलें पाहिजे. मत्सर शब्दानें एकाद्याविषयींची तुच्छताबुद्धि सांगितली जाते. गीतेनें मत्सर हें आसुरी संपत्तीचें लक्षण सांगितलें आहे, आणि श्रीज्ञानेश्वर महाराजांनीं त्याचा अर्थ करतांना संत, ईश्वराचे भक्त, महात्मे, यांची निंदा करण्याची वृत्ति असा अर्थ केला आहे. पुढें १८ व्या अध्यायांत गीता कोणाला सांगू नये त्याचें वर्णन करतांना ''माझ्याविषयीं ज्याच्या मनांत असूया आहे त्याला गीता सांगू नये'' असें भगवंतांनीं म्हटलें आहे आणि श्रीज्ञानेश्वरमहाराजांनीं हा दोष भयंकर असल्याचें निरनिराळ्या उपमांतून सुचविलें आहे. शरीर सुंदर आणि तरुण असावें, दागदागिन्यांनीं शृंगारलेलेहि असावें पण त्या शरीरांत प्राण मात्र नसावा, रात्रीच्या वेळी पणतीमध्यें तेलवात असावी पण ज्योत नसावी, एकाद्या वैभवशाली प्रशस्त घराकडे आश्रयासाठीं म्हणून जावें तों तेथें विषारी नागीण दारांत बसलेली असावी, पंचपक्वान्नांनीं भरलेल्या ताटांत विष कालवलेलें असावें किंवा एकाद्यानें पोटामध्यें कपट ठेवून वरवर मैत्री दाखवावी तसें इतर सगळे गुण असतांना मनामध्यें मत्सर (असूया) असला म्हणजे समजावें असें श्रीज्ञानेश्वर महाराज म्हणतात (ज्ञा. १८।१५०१-३.) मत्सरानें अंतःकरण भरलेलीं माणसें इतरांचें कांहीं ऐकून घेण्याच्या मनःस्थितींतच नसतात आणि मग त्यांना घोर अधःपात सोसावा लागतो. गीतेच्या तिसऱ्या अध्यायामध्यें, ''असूयेनें माझें मत स्वीकारीत नाहींत, अशी अंतःकरणहीन माणसें सर्वज्ञानविमूढ असून नष्ट असतात असें समज,'' असें श्रीभगवान् म्हणतात. **''ये त्वेतदभ्यसूयन्तो नानुतिष्ठन्ति मे मतम्। सर्वज्ञानविमूढांस्तान् विद्धि नष्टानचेतसः।।''** (भ. ३।३२.) यावर भाष्य करतांना मत्सरीवृत्तीची भूमिका श्रीज्ञानेश्वर महाराजांनीं सूक्ष्मपणे स्पष्ट केली आहे. **''नातरी प्रकृतिमंतु होऊनि। इंद्रियां लळा देऊनी। जे हें मत माझें अव्हेरुनि। ओसंडिती।। जे सामान्यत्वें लेखिती। अवज्ञा करून देखिती। कां हा अर्थवादु म्हणती। वाचाळपणें।।''** (ज्ञां.३/१९४-५)

१८ व्या अध्यायांतहि असूयेचा अर्थ करतांना ''तरी गीताशास्त्र निर्मिता। जो मी सकललोकशास्ता। तया मातें सामान्यता। बोलेल जो।'' (ज्ञा.१८/१४९८) असेंच म्हटले आहे.

अत्यंत श्रेष्ठ, सोपें आणि प्रभावी असलेलें ईश्वराचें नाम घ्यावेंसे वाटत नाहीं, त्यामागें हीच सामान्यपणाची, तुच्छतेची, भावना असते. नाममहात्म्य हा अर्थवाद वाटतो. तें, केवळ गौरवाचें, पोकळ बोलणें वाटतें, व्याजस्तुति वाटते आणि मग स्वाभाविकपणेंच नाम घेतलें जात नाहीं, निदान त्या नामस्मरणाच्या

मागें असावी तितकी श्रद्धा नसते. असें होऊं नये म्हणून पुढच्याच ओळीमध्यें समर्थ रामनामाचा निजध्यास असावा, तें सातत्यानें लक्षपूर्वक घ्यावें, पण ते घेतांना मनामध्यें नामाविषयीं अत्यंत आदराची भावना ठेवावी, असें आवर्जून सांगत आहेत. कारण नाम हें मनुष्याच्या उद्धाराचीं जेवढीं साधनें असूं शकतात, त्या सर्व साधनांमध्यें, अगदीं सारभूत असें आहे. त्याच्याशीं तुलना करता येईल असें दुसरें कोणतेंहि साधन उपलब्ध नाहीं. वामनपंडितांनीं नामाची वस्तुतंत्रता मोठ्या प्रभावीपणें सांगितली आहे. ते म्हणतात– **''अजित नाम वदो भलत्या मिसें। सकल पातक भस्म करीतसे। न कळतां पद अग्निवरी पडे। न करि दाह असें न कधीं घडे।''** यासाठीं नामाचा हा प्रभाव जाणून माणसाने नामाविषयीं उपेक्षाहि बाळगूं नये किंवा नाम घेण्याचा कंटाळाहि करूं नये.

**बहू नाम या रामानामीं तुळेना ।**
**अभाग्या नरा पामरा हें कळेना ।।**
**विषा औषध घेतलें पार्वतीशें ।**
**जिवा मानवां किंकरा कोण पुसे ।।८२।।**

भगवान् रामचंद्र हे समर्थांचें आराध्यदैवत. रामचंद्र हा त्यांच्या अनन्यनिष्ठेचा विषय. त्यामुळें राम या नामाविषयीं समर्थांना असाधारण प्रेम असणें स्वाभाविक आहे. त्यामुळें नाममहात्म्य गातांना समर्थ म्हणतात–देवदेवतांची सहस्त्रावधि नामें आहेत. पण त्यांतील कोणतेंहि नाम राम या नांवाशीं तुलना करण्याच्या योग्यतेचें नाहीं. नितांत श्रद्धेच्या दृष्टिकोनातून समर्थांची ही धारणा योग्यच आहे. प्रत्येक साधकाचीहि तशीच धारणा असली पाहिजे. शास्त्रदृष्टीनें आपल्या आराध्य देवतेच्या नांवाविषयीं असा विश्वास नसेल तर त्याला नामस्मरणाचें फल तितकेसें प्राप्त होणार नाहीं **''पतिव्रता नेणे आणिकांची स्तुति। सर्वभावें पति ध्यानीं मनीं।।''** असेंच प्रत्येकाला आपल्या आराध्यदेवतेविषयीं वाटलें पाहिजें; या वास्तविक श्रेष्ठ श्रद्धेच्या अनुषंगानें त्या त्या देवतेच्या नामाचें महत्त्व पटवून देणारी इतरहि कांहीं कारणें असूं शकतात; त्यांचाहि उल्लेख केला गेला तर सामान्याची श्रद्धा दृढ होण्यास सहाय्य होतें. थोर लोक जगत्‌कल्याणासाठी त्यांचाहि उपयोग करतात. रामरक्षेचा उपसंहार करतांना रामनामाचें महत्त्व वर्णिले आहे कीं **''राम रामेति रामेति रमे रामे मनोरमे। सहस्त्रनाम तत्तुल्यं रामनाम वरानने।।''** एकच रामनाम हें सहस्त्रनामाच्या तोडीचें आहे, असे भगवान श्रीशंकरांनी श्रीपार्वती देवीला सांगितले आहे. अलीकडे विज्ञानाच्या सहाय्यानें निरनिराळ्या मंत्रांच्या व मंत्रसामर्थ्यानें युक्त अशी धारणा असलेल्या वेगवेगळ्या शब्दांच्या उच्चारातून



निर्माण होणारे स्पंद, वेग, तरंग यांचे मापन केले जाते. आणि त्यावरून त्या मंत्राचे वा मंत्रमय शब्दाचें सामर्थ्य ठरविले जाते. आपला गायत्रीमंत्र जगांतील सर्व मंत्रांमध्ये या दृष्टीनें फार प्रभावी आणि म्हणूनच श्रेष्ठ आहे असे एका विद्वानांनी प्रसिद्ध केले आहे. एकेरी शब्दाच्या नामांत राम हें नांव असेंच शब्दोच्चार मापनाच्या दृष्टीने फार श्रेष्ठ आहे असें काशीच्या एका वृद्ध वैद्यांनी मला स्वत:लाच सांगितले होते. रक्तदाबादि अनेक विकारांवर स्पष्ट, दीर्घ, मंद अशा पद्धतीने रामनामाच्या जपाचा फार उपयोग होतो असेंहि त्यांनी मला सांगितले. निरनिराळ्या मंत्रांना, शब्दांना, प्रकृतिभेदानें असें सामर्थ्य असणें शक्य आहे. त्यासाठीं सर्वांना विश्वासार्ह वाटणाऱ्या विज्ञानाचीहि साक्ष निघूं शकते.

समर्थांचा तर रामनामाविषयींचा स्वत:चा अनुभवच आहे. म्हणून हें नाममहात्म्य ज्याला पटत नाहीं त्याला समर्थांनी अभागी, पामर, अशीं विशेषणें दिलीं आहेत. जे सोपें आहे, सर्वसुलभ आहे, अत्यंत श्रेष्ठ आहे, फार उपयोगाचें आहे तें नामहि घेण्याकडे कोणाची प्रवृत्ति नसेल तर त्याला अभागी, करंटा, दीन, तुच्छ असें त्याच्या हिताची कळकळ असणारांनीं म्हणणें स्वाभाविकच आहे.

रामनामाचे महत्त्व पटावे म्हणून समर्थ म्हणतात– अरे! समुद्रमंथनाच्या वेळीं विषप्राशनानें झालेला दाह नाहींसा होण्यासाठीं केलेलें सर्व उपाय निरुपयोगी ठरल्यानंतर भगवान् शंकरांनीहि हें रामनाम औषध म्हणून घेतले आणि त्यामुळे त्या पार्वतीपतीला विलक्षण लाभ झाला.

सामान्य मानवी जीवाच्या आपत्ति त्या काय? त्यांना असणाऱ्या वेदना किती? महाभयंकर अशा हालाहल विषाचेंहि दुष्परिणाम ज्या नामाच्या सामर्थ्यापुढें निष्प्रभ ठरले त्या रामनामाच्यासमोर या सामान्य व्यथा-वेदनांना काय मूल्य आहे? कोण विचारतो त्यांना?

मनाच्या श्लोकांत रामाचें वा रामनामाचें महात्म्य गातांना उदाहरण म्हणून अनेक वेळा शंकरांचा उल्लेख आलेला आहे. कारण आपल्या पुराणांतून, विशेषत: अध्यात्मरामायण व तुलसीरामायण या ग्रंथांतून शंकरांची ही रामभक्ति मोठ्या गौरवानें वर्णिलेली आढळते. शंकर हे दैवत फार व्यापक क्षेत्रांत लोकप्रिय असल्यानें त्या माध्यमानें रामनामाचा प्रचार अधिक होणें शक्य आहे. म्हणून समर्थ तसा उल्लेख पुन्हां पुन्हां करीत आहेत. सर्वमान्य असलेल्या उदाहरणांनी सामान्यांच्या मनावर अनुकूल परिणाम स्वाभाविकपणें घडतो. म्हणून समर्थ वारंवार शंकराचें उदाहरण देतात. पुढील २-३ श्लोकांत त्यांनीं हेंच उदाहरण पुन्हां पुन्हां दिलें आहे.

**जेणें जाळिला काम तो राम ध्यातो ।**
**उमेसीं अती आदरें गुण गातो ।।**
**बहू ज्ञान वैराग्य सामर्थ्य जेथें ।**
**परी अंतरी नामविश्वास तेथें ।।८३।।**

ज्यानें कामाला जाळून भस्म केलें, अत्यंत प्रबल, मी मी म्हणणाऱ्या थोर थोर तपस्व्यांनाहि अजिंक्य असलेला मदन, ज्यांच्या नुसत्या नेत्रकटाक्षानें जळून गेला, ज्यांना कशाचीहि आशा आकांक्षा उरली नाहीं, कोणत्याहि ऐहिक, पारलौकिक स्वरूपाचा मोह ज्यांच्या ठिकाणीं संभवत नाहीं, ते भगवान् शंकरहि रामाचें ध्यान करतात. त्यांनाहि रामनामाची ओढ आहे, तें त्यांना जिवाभावाने प्रिय आहे. आपल्या प्रिय पत्नीला, पार्वतीला त्यांनीं रामाचें श्रेष्ठत्व, रामनामाचें महत्त्व अनेक वेळां, अनेक प्रकारांनीं गौरवून सांगितलें आहे.

भगवान् शंकरांची योग्यता ही असामान्य कोटींतील आहे. ते देवाधिदेव आहेत, त्यांना महादेव म्हणतात. सर्व विश्वाचे ते धनी आहेत. म्हणून त्यांना विश्वनाथ म्हणतात. सर्व प्रकारचें ज्ञान त्यांचे ठिकाणीं आहे. व्याकरणापासून वेदान्तापर्यंत आणि शिल्पशास्त्रापासून ज्योतिषापर्यंत सर्वप्रकारच्या ज्ञानविज्ञानशाखांचे ते प्रवर्तक आहेत. भगवान् शंकरांच्या प्रसादानेंच तीं तीं शास्त्रें त्या त्या ऋषींना लाभलीं अशी आपली धारणा आहे. भगवान् शंकरांचे वैराग्य हें जाज्वल्य आहे. त्यांच्या त्या वैराग्याच्या तेजानेंच तर मदन जळाला. स्मशानांत राहणें, चिताभस्म लावणें, भिक्षाटन करणें, हीं त्या वैराग्याची अत्यंत बाह्य अशीं चिन्हें आहेत. या ज्ञानवैराग्यासमवेतच भगवान् शंकरांचे सामर्थ्यहि अलौकिक आहे. त्रिपुरासुराला ठार मारणें, कैलास पर्वत उचलूं पाहणाऱ्या रावणासारख्या अत्यंत बलिष्ठ राक्षसाला पायाच्या नुसत्या अंगठ्यानें सहज दडपून टाकणें, आशीर्वाद देऊन कुबेराला संपत्तीचा राजा करणें, हीं शंकरांच्या अलौकिक सामर्थ्याचीं कांहीं उदाहरणें आहेत. अशा ज्ञानवैराग्यसामर्थ्यानें संपन्न असलेले भगवान् शंकरहि रामाच्या नांवावर विश्वास ठेवतात. आपल्या अंतरंगामध्यें तोच एक ध्यास घेतात. त्या रामनामाविषयीं सर्वसामान्य माणसानें अविश्वास दाखवावा हें केवढें आश्चर्य आहे!

**विठोनें शिरीं वाहिला देवराणा ।**
**तया अंतरीं ध्यास रे त्यासि नेणा ।।**
**निवाला स्वयें तापसी चंद्रमौळी ।**
**जिवां सोडवी राम हा अंतकाळी ।।८४।।**



पंढरपूरच्या पांडुरंगाच्या मस्तकीं शिवलिंग आहे. ते ध्यानांत घेऊन समर्थ म्हणतात–विठ्ठलानें ज्यांना मस्तकीं धारण केले ते भगवान् शंकरहि रामाचें ध्यान करतात. शंकरांच्या अंत:करणांत तोच एक ध्यास असतो आणि रामाचें हें महत्त्व लोकांना पटत नाहीं याला काय म्हणावें? मस्तकीं चंद्र धारण करूनहि जी शांतता शंकरांना लाभली नाहीं–ती त्यांना रामनामानें लाभली. हा नि:संग तपस्वीहि रामनामानें निवला, शांत झाला. त्या रामनामाचा ध्यास आत्मकल्याणासाठीं सर्वांनीं घेतला पाहिजे. प्रत्येकानें यथाशक्ति रामनामाचा जप केला पाहिजे. अंतकाळीं दुसरें कोणी उपयोगी पडणारें नाहीं. काळ जेव्हां माणसावर झेप घेईल, झडप घालील, तेव्हां आप्त-इष्ट, सत्तासंपत्ति यांतील कुणीहि उपयोगी पडणारे नाहीं. कृतकर्माचें प्रायश्चित्त म्हणून भोगाव्या लागणाऱ्या इहपरलोकींच्या सर्व प्रकारच्या यातनांतून शेवटीं रामाचें नांव हेंच जीवाला सोडविणारें असते. म्हणून त्याचें विस्मरण होऊं देऊं नये.

**भजा राम विश्राम योगेश्वरांचा ।**
**जपू नेमिला नेम गौरीहराचा ।।**
**स्वयें नीववी तापसी चंद्रमौळी ।**
**तुम्हां सोडवी राम हा अंतकाळीं ।।८५।।**

एकच कल्पना समर्थ निरनिराळ्या शब्दांनीं आळवून सांगत आहेत. आपल्या आराध्यदेवतेविषयीं अत्युत्कट भक्तिभाव असला म्हणजे तीच तीच गोष्ट पुन्हां पुन्हां सांगावीशी वाटते. पतिव्रतेला आपल्या पतीचें असेंच कौतुक असतें. वत्सल माता आपल्या लेकरांच्या बाललीला अशाच गात असते. स्वामिभक्त सेवक आपल्या धन्याला आणि एकनिष्ठ शिष्य आपल्या गुरूला असेंच वाखाणीत असतो. पुनरुक्ति हा येथें दोष नाही. अंत:करणाच्या उत्कटतेचें तें एक प्रतीक आहे. आपण सामान्य माणसें स्वत:विषयीं असेंच बोलत असतो. आपलें महत्त्व लोकांस पटावें म्हणून स्वत:विषयींच्या त्याच त्याच गोष्टी पुन्हां पुन्हां आपण ऐकवीत असतो. आपलें हें अहंकारानें होते. संतांची स्थिति याच्या उलट असते. ते भक्तिभावानें आराध्यदेवतेचे गुण गातांना दमत नाहीत.

या श्लोकांत पुनरुक्ति वाटली तरी रामनामाचा एक फार महत्त्वाचा गुण समर्थ श्लोकाच्या पहिल्या चरणांत सुचवीत आहेत. ते म्हणतात राम हा योगेश्वरांचाहि विश्राम आहे. म्हणून त्याचें भजन करा. योगेश्वरांचा विश्राम म्हणणें हें फार अर्थपूर्ण आणि महत्त्वपूर्ण आहे. योगी मंडळींना अनेक प्रकारच्या सिद्धी प्राप्त होतात. दूरदर्शन, दूरश्रवण, भूतभविष्यज्ञान, दूरगमन, दुसऱ्याच्या मनांतील

ओळखणें, अन्नपाण्यावांचून राहणें, जमिनींत पुरून घेणें, पाण्यावरून चालत जाणें, अंतराळीं आसन बांधणें, निरनिराळ्या वस्तू काढून दाखविणें इत्यादि इत्यादि लहानमोठ्या सिद्धी योगादींच्या सामर्थ्यानें प्राप्त होतात. पण हे असे सिद्धी प्राप्त झालेले पुरुषहि असमाधानी असतात. कारण कामक्रोधादींचे त्यांचे वेगहि सामान्यासारखेच उत्कट असतात. इब्नवतूत या नांवाच्या एका अरबी प्रवाशाने लिहिलेले भारतांतील प्रवासाचें वर्णन प्रसिद्ध आहे. त्यांत त्यानें एका राजाच्या सभेंत अधर आसन लावणाऱ्या योग्याचा प्रसंग वर्णन केला आहे. चांगला मानसन्मान न झाल्यामुळें तो योगी रुष्ट होऊन निघून गेला असें वर्णन तेथें आहे. लग्नामध्यें मुलीच्या बापानें हवा तो मानपान दिला नाहीं म्हणून रुसणारी विहीण आणि हा योगी खरें तर एकाच जातीचे म्हटलें पाहिजेत.

योगानें चित्तवृत्तीचा निरोध होऊन चित्त स्थिर, शांत, प्रसन्न झालें पाहिजे. सर्व क्लेश मिटले पाहिजेत. सर्व द्वंद्वें शमलीं पाहिजेत. योग शब्दाचा तोच खरा अर्थ आहे. योगाचें तेंच ध्येय आहे. पण तेथें जणूं कुणी पोंचतच नाहीं. श्रीज्ञानेश्वर महाराज म्हणतात त्याप्रमाणें योगमार्गानें प्रगति होत असतांना वाटेंत सिद्धी भेटतात. त्यांच्या मोहाला गुंतून त्या तपस्व्यांची बुद्धि भ्रष्ट होते आणि मग ते कुठें तरी भरकटल्यासारखे होतात. मठमहंती, प्रतिष्ठा, नांवलौकिकांत गुंततात आणि मग सामान्य संसारी माणसाप्रमाणें तेहि अस्वास्थ्यानें घेरले जातात. ज्यांना मोठेमोठे मानलें जावें त्यांचेंहि असें होतें. त्यांच्या अंतःकरणांत खऱ्या भक्तीचा उदय झाला नाहीं तर त्यांनाहि जीवनांत विश्रांति म्हणून लाभत नाहीं. खऱ्या सुखासाठीं त्यांनाहि शेवटीं ईश्वरभक्तीचाच आश्रय करावा लागतो. म्हणून समर्थ रामाला योगेश्वरांचा विश्राम म्हणतात.

योगेश्वर म्हणजे शंकर असेंहि समजणें शक्य आहे. आणि रामनाम हें त्यांचें विश्रांतिस्थल झालें हें प्रसिद्धच आहे. रामनामाच्या उच्चारानें लाभलेल्या स्वास्थ्याचा विचार करून भगवान् शंकरांनींहि रामनामाचा जप करण्याचा नियम केला आहे. जणू त्यांनीं तें व्रत घेतलें आहे. विशिष्ट वेळीं, विशिष्ट पद्धतीनें, विशिष्ट प्रमाणांत, नामाचा उच्चार करणें याला जप वा नेम असें म्हणतात. तो नियम शंकरांनींहि स्वीकारला आहे. त्यामुळें ते स्वतः तर शांत झालेच, विषदाहाच्या व्यथेंतून मुक्त झालेच, शिवाय ते रामनामाचा उपदेश करून इतरहि संसारसंतप्त जीवांना निववितात, शांत करतात.

काशीचें महात्म्य वर्णन करतांना म्हटलें आहे कीं काशीमध्यें येऊन जो देहत्याग करतो त्याच्या अंतकाळीं स्वतः भगवान् शंकर त्या मरत्या जीवाला रामनामाचा उपदेश करतात त्यामुळें मग तो जीव मुक्त होतो. रामाच्या नामाचें



असें महत्त्व आहे.

योगेश्वर भगवान् शंकरांनींहि तें अनुभवलें आहे. अनेक कारणांनीं संत्रस्त झालेल्या इतर थोर व्यक्तींचाहि तोच अनुभव आहे. इतर कांहींहि उपयोगी पडणारें नाहीं. **''योगयागविधि येणें नोहे सिद्धी। वांयाचि उपाधि दंभ धर्म।।''** असें नामाव्यतिरिक्तच्या साधनांचा उल्लेख करतांना ज्ञानेश्वरांनीहि म्हटलें आहे. तेव्हां नामाविना आपल्याला कोणी तारक नाहीं; या विश्वासानें माणसानें नित्य नामस्मरण करावे.

**मुखीं राम विश्राम तेथें चि आहे ।**
**सदानंद आनंद सेऊनि राहे ।।**
**तयावीण तो सीण संदेहकारी ।**
**निजधाम हें नाम शोकापहारी ।।८६।।**

जो अतिशय प्रेमादरानें रामाचें नांव उच्चारीत असतो, रामनाम सतत ज्याच्या मुखामध्यें राहते, त्यालाच विश्राम लाभतो, विश्रांति लाभते, सुखसमाधान प्राप्त होतें, जीवनामध्यें अस्वास्थ्य उत्पन्न करणारें कोणत्याही प्रकारचे ताण त्याला बाधूं शकत नाहींत.

आमच्याकडचा एकादा अकिंचन शेतकरी, कामकरी पंढरपूरची वारी करतो, ज्ञानोबातुकारामांचें अभंग म्हणतो, दासबोध वाचतो, मनाचे श्लोक गुणगुणतो आणि गवताच्या पाख्याखालीं ओलें कोरडें खाऊन समाधानानें राहतो. उलट सर्व प्रकारचें ऐश्वर्य उशापायथ्याशीं असतांना, गोळ्या खाल्याशिवाय झोंप येत नाहीं असे लोक आहेत. परदेशांतील संपत्तीचा थाटमाट आपल्याला दिसतो पण कडेलोटाला पोंचलेलें तेथील सर्व प्रकारचें अस्वास्थ्य आपण लक्षांत घेत नाहीं. आज तिकडील सहस्रावधि तरुण मुलें ''हरेरामा हरेकृष्णा''ची धून लावून बसतात आणि हा संप्रदाय तिकडेहि वेगानें वाढतो आहे. त्यांतील सर्व अंगोपांगें मोठ्या शास्त्रीय पद्धतीनें विचारांत घेतलीं जात आहेत, असें म्हणतां येणार नाहीं. पण या नामचिंतनाचा कांहीं लाभ त्यांना होतो आहे आणि त्याचें कांहीं आकर्षण संपत्तीला विटलेल्या त्या समाजापुढें आहे हें नाकारतां येणार नाहीं.

प्रेमानें ईश्वराचें नाम घेणारीं माणसें खरोखरीच प्रतिकूल परिस्थितींतहि त्यामानानें पुष्कळच समाधानी असतात असें पहावयास मिळतें. तापानें फणफणलेल्या माणसाच्या अंगावरून देवाचें नांव घेत हळूंवारपणें हात फिरविला तर त्याला बरें वाटते असाहि अनुभव सांगणारे पुष्कळ आहेत.

रामाचें नांव हें असें आहे कीं त्याकरितां स्थलकालाचें बंधन नाहीं. घेणाराच्या

पात्रतेचा प्रश्न नाहीं. तें गुरूकडूनच घेतलें पाहिजे असा आग्रह नाहीं. असें सहजसुलभ असून त्याचें विश्रांति देण्याचे सामर्थ्य अलौकिक आहे. नाम स्वत:च सदानंद आहे. कारण तें ब्रह्मस्वरूप आहे. त्याचें सेवन जो भावानें करतो तो आनंद उपभोगीत राहतो यांत शंका नाहीं.

या नामस्मरणावांचून इतर कांही करूं जावें तर त्यानें शीण मात्र वाट्यास येतो. नामाच्या सुलभतेमुळें माणसास त्याच्या सामर्थ्याविषयीं संदेह वाटत असतो, आणि कटकटीचीं, अवघड अशीं इतर साधनें, अधिक समर्थ असतील या कल्पनेने माणूस तीं स्वीकारीत असतो. त्या अवघड साधनांवर तरी निष्ठा बसते वा टिकून राहते असें थोडेंच आहे? कांहींतरी वेंगळें केल्याचें समाधान थोडा वेळ मिळतें इतकेंच. परमार्थामध्यें आपण काय करतों यापेक्षां किती विश्वासानें करतो, त्यांत भाव किती, हें महत्त्वाचें असतें. सुखसमाधान लाभावयाचें असतें या भावामुळें, या विश्वासामुळें; ''**संशयात्मा विनश्यति**'' हें सगळीकडेच खरें आहे. परमार्थांत तर आहेच आहे. साध्या संसारांत सुद्धां संबंधितांचा एकमेकांवर पूर्ण विश्वास असला तरच तीं नातीं वा तो सहवास सुखाचा होतो. प्रत्येक गोष्टीचा, प्रत्येक घटनेचा, साऱ्याच कृतींचा पंचनामा करावयाचें ठरविलें तर जीवन दु:सह होईल. प्रत्येकाच्या प्रत्येक हालचालीवर पहारा ठेवला तर संसारांत काय होईल? सुखानें श्वास तरी घेतां येईल काय? व्यापारी विश्वासाला जपतात. तसें न केल्यास व्यापार होणारच नाहीं. लाखालाखाच्या उलाढाली नुसत्या शब्दाच्या भरंवशानें होतात. दक्ष असावें, सावध असावें, पण संशयीं असूं नये. श्रद्धा डोळस कां आंधळी हा वादविवाद व्यर्थ आहे. तें वाचारंभण आहे. आंधळ्याला सुद्धां कुणी अगदीं सहजपणें आंधळें म्हटलें तरी आवडत नाहीं. आंधळ्या माणसांच्या अगदीं बारीक सारीक हालचालीनें ते आंधळे आहेत असें दिसत असले तरी डोळ्याच्या खांचा दिसूं नयेत म्हणून अशीं माणसें उन्हाचा चष्मा घालून हिंडतात. तेव्हां श्रद्धेला मुद्दाम आंधळी हें विशेषण देण्याचें कारण काय? भाव समजून घेतला पाहिजे. बुद्धीचें कार्य संपलें, थांबलें म्हणजेच श्रद्धेचें आरंभतें. श्रद्धा ही महाराणी आहे. तिला जेथें वावरायचें आहे त्या स्थानाची स्वच्छता, टापटीप, नीटनेटकेंपणा ठेवण्याचें काम बुद्धीचें आहे, तें तिनें अवश्य करावें. बुद्धीनें श्रद्धेचें आसन मांडून ठेवावें, पण आपणच त्यावर बसूं नये. सेवकाची इतर अपूर्णता समजूं शकते. पण त्याचा उर्मटपणा असह्य असतो.

बुद्धीनें आपली मर्यादा ओळखावी. श्रद्धेला आणि विश्वासाला सहाय्य करावें पण त्यांना पदच्युत करूं नये. नाहींतर अराजक माजतें आणि मग सर्व जीवन अस्वास्थ्य, वैताग, विषण्णता, यांनीं भरून जातें. तेव्हां नाममहात्म्याविषयीं



उगीच शंका घेऊं नये. देणें घेणें कांहीं नसल्यानें मिळेल तो रिकामा वेळ नामस्मरणांत घालविण्यांत हानी कांहींच नाहीं. वस्तुत: नाम हें सर्व प्रकारच्या शोकाचें, संतापाचें विनाशक आहे. तें जीवनाचे निजधाम आहे, सासुरवास असलेल्या मुलीला माहेर जसें सुखाचें वाटतें तसें नामस्मरणानें चित्ताचें होतें. अनेक प्रकारच्या दडपणाखालीं वावरणारें संसारी मन नामस्मरणाच्या सहाय्यानें सुखाचा मोकळा वारा अनुभवूं शकतें, म्हणून कल्याण हवें असलेल्या साधकानें नामाची उपेक्षा करूं नये.

**मुखीं राम त्या काम बाधूं शकेना ।**
**गुणें इष्ट धारिष्ट त्याचें चुकेना ।।**
**हरीभक्त तो शक्त कामास मारी ।**
**जगीं धन्य तो मारुती ब्रह्मचारी ।।८७।।**

ज्याच्या मुखांत अहर्निश परमेश्वराच्या नामाचा जप असतो, त्याला काम बाधूं शकत नाहीं. त्यांच्या अंत:करणांत कोणत्याहि प्रकारचा काम उत्पन्नच होत नाहीं असा याचा अर्थ नाहीं. कामाचीहि धर्म्य आणि अधर्म्य अशीं दोन रूपें आहेत. गीतेच्या सातव्या अध्यायामध्यें धर्माच्या मर्यादेंत राहणाऱ्या कामाला भगवंताचें स्वरूप मानलें आहे, तर अधर्म्य कामाला 'महाशन', 'महापाप्मा' अशी विशेषणें देऊन गीतेनें तिसऱ्या अध्यायांत त्याला मनुष्यजातीचा वैरी म्हणून संबोधिलें आहे. सोळाव्या अध्यायात त्याला नरकाचें दार म्हटलें आहे.

गरज आणि चैन यामधलें अंतर ज्याला समजतें, त्याला हें समजूं शकेल. गरज बाधत नाहीं. चैन बाधते. असें बाधणारे रूप ''कामाला'' येत नाहीं हें नामाचें सामर्थ्य आहे. आणि हा गौरव नाहीं, अर्थवाद नाहीं, प्रचार नाहीं, प्रसिद्धीचें तंत्र नाहीं, तर ती वस्तुस्थिति आहे. सर्वसामान्य माणसाच्या मनामध्यें ज्या वृत्ति उमटतात, त्यांचे विशिष्ट स्पंद असतात. आजच्या प्रगत विज्ञानाच्या सहाय्यानें त्यांचे आलेखहि घेतां येतात असें म्हणतात. या वृत्तीमध्येंहि जीवनाला, आरोग्याला, प्रसन्नतेला अनुकूल ठरणाऱ्या आणि प्रतिकूल ठरणाऱ्या वृत्तींचे गट असतात. विशिष्ट विशिष्ट नामाचे विशिष्ट विशिष्ट स्पंद अंत:करण वृत्तींच्या स्पंदांना नियंत्रित करून, प्रतिकूल वृत्तींना अनुकूल वृत्ती बनवूं शकतात. नामजपाचें हे सामर्थ्य वस्तुतंत्र आहे. यालाच सद्‌भावाचें, पवित्र आचरणाचें, म्हणजेच सद्‌वर्तनाचें, सहाय्य लाभेल तर नामाचें हें हें वस्तुतंत्र सामर्थ्य अनेक पटीनें वाढेल. प्रामाणिक नामधारकाच्या वृत्तीमध्यें अनुकूल पालट निश्चयानें होतो. या विश्वासानें तर संतांनीं ''**चाल केलासी मोकळा। बोल विठ्ठल वेळोवेळां।।**''

असें आश्वासन दिलें आहे.

नामाच्या उच्चारामुळें इष्ट ते गुण साधकाला चढत्या वाढत्या प्रमाणांत, क्रमानें सहजपणानें लाभतात. नामस्मरण हें एक तंत्रविज्ञान आहे. तें आधिभौतिकाला 'अध्यात्माशीं' जोडून देतें. तें विज्ञान, अवगत असणारे कांहीं चमत्कारहि दाखवूं शकतात. कांहीं मर्यादित अर्थानें त्यांत थोडा अर्थहि असतो. खऱ्या पारमार्थिकांनीं त्याची उपेक्षा करावी हें बरें. यासाठींच तुकाराममहाराजांनीं त्यांचा उपहासहि केला आहे.

**तुका म्हणे भोग सारे। गुणा येताती अंगारे।**

कांहीं थोडे चमत्कार घडत असले तरी तें नामाचें खरें महात्म्य नाहीं. मांत्रिकांनीं, तांत्रिकांनीं, व्यवसायाच्या हेतूनें केलेला नामाचा तो दुरुपयोगच आहे. साधकानें त्या मोहाला बळी न पडणेंच चांगलें. सर्व प्रकारच्या आपत्तींना तोंड देण्यास धैर्यानें उभें राहावें, असें धारिष्ट्य नामधारकास लाभतें हेंच नामाचें खरें सामर्थ्य.

सतत अनुकूलच घडावे, प्रतिकूल म्हणून कांहीं घडूंच नये, सुखोपभोगांत व्यत्यय येऊं नये, रंगविलासांत कशाचीहि उणीव पडूं नये, असें माणसास सुखासीनपणें वाटत राहतें. पण या सुखासीनतेमुळें शरीराचें आरोग्य तर नाहींसें होतेंच, पण मनबुद्धीची कार्यक्षमताहि उणावते हें माणूस लक्षांत घेत नाहीं. कुणीतरी परिस्थिति पालटून द्यावी, तिची प्रतिकूलता नष्ट करावी, म्हणजे मला सुख लाभेल असें वाटणें खरें नाहीं. परिस्थितीवर मात करावी लागते, ती तिच्याशीं झगडून. पुरुषार्थ यांतच आहे. तो गाजविण्यासाठी धारिष्ट्य लागतें. तें नामावरच्या विश्वासानें नामधारकास प्राप्त होतें.

जो हरिभक्त आहे, नामधारक आहे, आळस न करतां भावानें नामस्मरण करणारा आहे, तो शक्त म्हणजे समर्थ होतो, शक्तिशाली होतो आणि त्याला सर्व विकारांचें आणि आपत्तींचें मूळकारण असलेल्या 'कामास' जिंकण्याचें बळ लाभते. विषयोपभोगाची अतिरिक्त वासना आणि त्यासाठी सर्व नीतिनियम, न्यायान्याय गुंडाळून ठेवून केलेले दुराग्रही प्रयत्न, हेंच काम या शंत्रूचें सैन्य आहे. नामस्मरणाच्या नियमानें आसक्तीचें तणाव शिथिल होतात त्यामुळे कामाचें बळ तुटते. मग स्वाभाविकपणेंच कामाला मारणें, जिंकणें सोपे जातें. ईश्वरनिष्ठा, नामस्मरण, अंत:करणांतील भक्तिभाव यांचा आधार असला म्हणजे माणसाला विलक्षण बळ प्राप्त होते.

श्रीतुकाराममहाराजांच्याविषयीं एक कथा ऐकली आहे ती अशी कीं कोणी एक चांगला ज्योतिषी तुकाराम महाराजांकडे आला आणि म्हणाला–पुढच्या महिन्यात तुमच्या राशीला शनि येतो आहे, तेव्हांपासून तुमच्या साडेसातीस आरंभ होईल. तुम्हांला नाना प्रकारचीं संकटें भोगावीं लागतील. तेव्हां सावध



असावें. श्रीतुकाराममहाराज हसले आणि म्हणाले–हा शनि सदा सर्वदा माझ्याच राशीला राहील असे कांहीं उपाय तुमच्या शास्त्रांत असले तर सांगा म्हणजे ते करतो. ज्योतिषी काय बोलणार यावर? पाया पडून निघून गेला.

साडेसातीचें भय सामान्यांना! थोर भगवद्भक्ताला तिचें भय नसतें. सर्व भोग हे प्रारब्धाच्या स्वाधीन असतात हें त्याने ओळखलेलें असतें. प्रारब्ध टळत नाहीं हेंहि त्याला ठाऊक असतें. निष्काम भावनेनें त्याचें संचित नाहींसे होते. ईश्वरनिष्ठेनें विहित कर्तव्यावरहि त्याचा भर दृढ असल्यानें त्याचे क्रियमाण सदैव सदाचारी कल्याणकारीच असतें. रामभक्त हनुमान हें यादृष्टीनें उत्कृष्ट उदाहरण आहे. मारूतीचें नैष्ठिक ब्रह्मचर्य, त्याचा अलौकिक पराक्रम, त्याचें अद्‌भुत बळ, त्याची विलक्षण बुद्धिमत्ता, अत्यंत विनम्र असा दासभाव हे सर्व मारुतीच्या रामभक्तीचें आणि नामस्मरणाविषयीच्या अद्‌भुत आवडीचेच परिणाम आहेत.

**बहू चांगलें नाम या राघवाचें ।**
**अती साजिरे स्वल्प सोपें फुकाचें ।।**
**करी मूळ निर्मूळ घेतां भवाचें ।**
**जिवां मानवां हें चि कैवल्य साचें ।।८८।।**

रामाचें नांव फारच चांगलें आहे. ॐकार आणि गायत्री यांच्या तोडीची मंत्रशक्ति यांत आहे. राम या शब्दातील र हा अग्निवर्ण दीर्घोच्चारयुक्त असून त्याची परिणति म या शीतल, शांत गुणाच्या ऱ्हस्व वर्णांत होत आहे. संतांचें वर्णन करतांना श्रीज्ञानेश्वरांनीं 'मार्तंड जे तापहीन' असे म्हटलें आहे. अत्यंत तेजस्वी, पराक्रमी, प्रभावी आणि तरी शांत, शीतल, प्रसन्न, कोणत्याहि प्रकारचा ताप न देतां सुखावह असणारें असें स्वरूप त्यांतून सुचविलें जातें. तीच स्थिति राम या नामाची आहे. **''नमः शांताय तेजसे''** हे वर्णन येथेंहि लागूं पडतें. तेज नसेल तर कार्यक्षमता नसते. प्रखर असेल तर जवळीक साधत नाहीं. रामनामामध्यें दोन्हींकडून अनुकूलता आहे. म्हणून समर्थ त्यांचें वर्णन ''बहू चांगलें'' अशा शब्दांनी करीत आहेत.

''बहू चांगलें'' म्हणण्याची आणखीहि कांहीं कारणें दुसऱ्या ओळींत सांगितलीं आहेत. रामाचें नांव हें साजरें म्हणजे सुंदर आहे. उत्कट आणि शुद्धभावानें तें रूपविषय होऊं शकतें. ध्यानाच्या अभ्यासानें प्रथम अंत:चक्षूंपुढे त्याचें सौंदर्य प्रगट होतें. शुद्धभावाच्या उत्कटतेनें ते चर्मचक्षूलाहि गोचर होऊं शकतें. कारण नाम आणि नामी यांच्यांत भेद नसतो असें भक्तिशास्त्र सांगतें. नामाच्या माध्यमांतून, नामाच्या सहाय्यानें नामीचा लाभ होत असल्यामुळें कधींकधीं नामीपेक्षांहि नामाला

अधिक महत्त्व दिलें जातें. साधनेवर एवढी निष्ठा असलीच पाहिजे, नाहींतर साध्य कधींच हातीं लागणार नाहीं. मूलत: अवाङ्मनसगोचर असलेले, केवळ सत्तामात्र असें, निर्गुण, निराकार, ब्रह्म, नामस्मरणाच्या सामर्थ्यानेंच सगुण साकार रूपानें साक्षात्कारास येतें. घन:श्यामल, राजीवलोचन रामचंद्राचें सर्व सौंदर्य त्याच्या 'या' नामाचें ठिकाणींहि एकवटलेलें असते. यासाठीं समर्थ 'अतिसाजिरें' असें म्हणतात. तें स्वल्प आहे. अगदीं छोटें, चिमुकलें आहे. उच्चारण्यास सोपें आहे. सुलभ आहे. त्यात कुठेंहि जोडाक्षर नाहीं आणि ते उच्चारण्यासाठीं कोणतेंहि धन वेंचावें लागत नाहीं. संतमहात्म्यांच्या कृपेनें मानवी जीवांना तें अगदीं फुकट लाभलेलें आहे. पण असें स्वल्प, सोपें, फुकाचें असलें तरी त्याची शक्ति सामान्य नाहीं, ती अलौकिक आहे. ज्याच्या पाशांत एकदां सांपडलें असता पुन्हा सुटून जाणें फार दुर्घट होते अशा सर्वदूर पसरलेल्या संसाराचें मूळच या नामाच्या जपानें निर्मूळ होतें, नाहींसे होतें. अहं आणि मम ही भावना किंवा वासना हें संसाराचें मूळ आहे. **''एकोऽहं बहुस्याम्'' किंवा ''कामस्तदग्रे समवर्तताधि''** या स्वरूपांत उपनिषदांनीं त्याचें वर्णन केलें आहे. ईश्वराच्या ठिकाणीं तें शुद्धसत्त्वात्मक स्वरूपांत असल्यानें सृष्टीची बाधा ईश्वरास होत नाहीं. जीवाचें ठिकाणीं तें रजोगुणानें आणि तमोगुणानें भारलें जात असल्यानें पुनरावर्ति संसाराचा सर्व ताप जीवाला भोगावा लागतो. भक्तिमार्गांत ईश्वरनिष्ठेनें अहं सुटतो आणि नामस्मरणाच्या सातत्यानें वासना शुद्ध होत जाऊन नीरजस्तम बनतात. अर्थातच मग त्यांतून संसार जन्म घेऊं शकत नाहीं, आणि म्हणूनच शेवटच्या ओळींत वासनाक्षयानें संसार निर्मूल करणाऱ्या नामालाच कैवल्य, मोक्ष म्हटलें आहे. संसार निर्मूल होणें म्हणजे जन्ममरणाच्या फेऱ्यांतून सुटणें, मूळ तत्त्वाशीं एकरूप होणें आणि हेंच मोक्षाचे किंवा कैवल्याचें स्वरूप आहे. कार्यकारणाचा अभेद शास्त्रसंमत असल्यानें नामाला कैवल्य म्हणणें योग्य ठरतें. निष्ठेच्या भावजगतांत तें शोभतेंहि.

**जनीं भोजनीं नाम वाचे वदावें ।**
**अती आदरें गद्य घोषें म्हणावें ।।**
**हरीचिंतनें अन्न सेवीत जावें ।**
**तरी श्रीहरि पाविजेतो स्वभावें ।।८९।।**

नामाचें महात्म्य मान्य करूनहि कांहीं लोक 'काय करावें हो! वेळच मिळत नाहीं, नाहींतर आम्हींहि नामस्मरण केलें असतें' असें म्हणतात. त्यांच्यासाठीं समर्थ एक निश्चित पण सोयीची वेळ सांगत आहेत. वेळ नसतो हें म्हणणें बहुधा खरें नसतें. राजकारणाचा काथ्याकुट, पक्षोपपक्षांच्या ध्येय धोरणांविषयींची चर्चा,



पदार्थांची महागाई, कारभारांतील भ्रष्टाचार, तरुणांचे स्वैर वर्तन, नटनट्यांचें जीवन, नाटकांची-चित्रपटांचीं कथानकें, वृद्धांचे बुरसटलेले विचार, उगीचच वेळ खाणारे खेळ, स्वत:च्या शरीराचें साजशृंगार, यांत माणसाचा किती वेळ फुकट जातो तें शोधून पाहिलें म्हणजे वेळ नसतो हें म्हणणें यथार्थ नसल्याचें पटेल. वरील गोष्टींत जाणाऱ्या वेळाचा सदुपयोग करावयाचें ठरविलें तर ''जनीं नाम वाचें वदावें'' हें सहज साधेल. पण वेळ नाहीं हें खरेंच गृहीत धरलें तरी जेवणाची वेळ तर हातांतलीच आहे. त्यावेळीं नाम घ्यावें. पूर्वी आपल्याकडे त्रिसुपर्ण, गीतेचे अध्याय म्हणण्याची पद्धति होती. जेवतांना श्लोक म्हटले जात असत. परकीय शिष्टाचाराच्या आकर्षणानें आपण पश्चिमी सभ्यतेला बळी पडलों आणि मग या गोष्टी केव्हां सुटल्या तें कळलेंहि नाहीं. भोजनाच्या वेळीं नामस्मरण सहज शक्य आहे आणि तसें केलें तर त्याचें अनेक लाभ आहेत.

अन्न नीट पचत नाहीं, अंगीं लागत नाहीं, याला मन:क्षोभ, अंत:करणांतील चिंता, शोक, भय, चित्ताला असलेले ताण, हें महत्त्वाचें कारण आहे. नामस्मरणानें हा ताण उणावतो, क्रमानें नाहींसाहि होतो, आणि त्यामुळें अन्न सुखानें पचतें, अंगीं लागतें.

खाल्लेल्या अन्नाच्या स्थूल अंशांतून जसें रसरक्तमांसादि स्थूल शरीराचें पोषण होतें, तसें अन्नाच्या सूक्ष्म अंशांतून मनबुद्धीचें पोषण होते. म्हणून अन्नशुद्धीचा विचार आपल्याकडे फार व्यापक प्रमाणांत आणि सूक्ष्मरीतीनें केला आहे. दुर्दैवानें तो केवळ स्पर्शास्पर्शाच्या अगदी ढोबळ, अगदीं बाह्य अशा नियमांच्या स्वरूपांतच टिकून राहिला आहे. अन्न कोणते आहे आणि तें कसें मिळविलें आहे हा विचार अन्नशुद्धींत फार महत्त्वाचा आहे. त्याला कोण शिवले आहे हे त्यामानानें फारच गौण आहे. **''सत्यं तु ऋतेन परिसिंचामि''** या संकल्पांत अन्नशुद्धीचा विचारच सांगितला आहे. नामस्मरणानेंहि अन्नशुद्धि होतें, आणि मग मनबुद्धीच्या शुद्धतेसाठीं त्याचा लाभ क्रमाक्रमानें होत राहतो म्हणून जेवतांना मोठ्या आदरानें ईश्वराचें नाम घेत जावें. याला तालसुराची, सुरेल कंठाची कांहीं बंधनें नाहींत. तें पद्यमय, कविताबद्ध नको. अगदीं साध्या गद्यांत मोठ्यानें म्हटले म्हणजे झाले. या नामघोषाचे सूक्ष्म स्पंद आपलें काम योग्य रीतीनें करतील. परमेश्वराच्या नामाचें चिंतन करीत जो अन्नाचें सेवन करतो, त्याला परमेश्वराची प्राप्ति सहजपणानें होते असें समर्थ सांगतात.

''अन्नाचें सेवन करणें'' या शब्दांत अन्न मिळविणें आणि प्रत्यक्ष खाणें या दोन्हींचाहि समावेश करणें शक्य आहे, आणि परमेश्वराची प्राप्ति हें फल विचारांत घेतां तो तसा केलाहि पाहिजे. जीवनांतले सर्वच व्यापार नामस्मरणानें पुनीत झाले असले पाहिजेत. अन्नभक्षण हें त्याचें प्रवेशद्वार समजावें. शरीरपोषणासाठीं आणि

जीवनधारणेसाठीं अन्नाची नितांत आवश्यकता असल्यानें, नामस्मरणानें पवित्र झालेलें अन्न जीवनालाहि पवित्र बनवील आणि मग परमेश्वराला पुढें आणून उभा करण्याइतकी उत्कटता, निष्ठा, नामस्मरणाला, अगदीं न कळत, सहजपणें, पण निश्चयानें, हळूहळू प्राप्त होत जाईल.

**न ये राम वाणी तया थोर हाणी ।**
**जनीं वेर्थ प्राणी तया नाम काणी ।।**
**हरीनाम हें वेदशास्त्रीं पुराणीं ।**
**बहू आगळें बोलिली व्यासवाणी ।।९०।।**

नामस्मरणाविषयीं आदरभाव उत्पन्न होत नाहीं, प्रेम निपजत नाहीं, ओढ लागत नाहीं हे एकवेळ समजूं शकतें, कारण प्रेमावर नियंत्रण नसतें. तें उत्पन्न व्हावें म्हटल्यानें उत्पन्न होत नाहीं. पण कर्मेंद्रियांचें तर तसें नाहीं. नुसत्या तोंडानें, वाणीनें, जिभेनें रामाचें नांव घ्यावयाचें ठरविलें तर शक्य आहे. तेंहि जो घेत नाहीं, त्याची हानी केवढी होईल तें कल्पनेनेंहि समजणें कठिण आहे. सुधारण्याचे सर्व मार्ग त्यानें आपल्या हातानें बंद करून टाकल्यासारखें हें आहे. तोंडानेंहि नामाचा उच्चार न करणाराला सर्व संतांनीं यासाठींच फार नावें ठेविलीं आहेत. कांहींनीं तर संतापून शिव्या घातल्या आहेत. न ऐकणाऱ्या नाठाळ मुलाला आईनें कळवळून 'मेल्या' म्हणावें तसेंच हें आहे.

समर्थ म्हणतात–जो नाम उच्चारीत नाहीं, त्याचें जीवन व्यर्थ आहे, आयुष्य फुकट आहे, केवळ श्वासोच्छ्वास करतो म्हणून त्याला प्राणी म्हणावयाचें असेल तर म्हणावें. लोहाराचा भाताहि श्वासोच्छ्वास करतो, तो प्राणी नाहीं, पण उपयुक्त असतो. तेवढाहि उपयोग याचा नाहीं. नामाचा उच्चार न करणाऱ्या माणसाला प्राणी म्हणण्याऐवजी काणी म्हटलें पाहिजे. काणी म्हणजे विशिष्ट रोगानें आंतून काळा पडलेला जोंधळा. वरून दाणा सामान्यत: जोंधळ्यासारखाच दिसतो. पण आतलें पीठ जंतुसंसर्गानें विषारी होऊन काळें पडलेलें दिसतें. तें अपायकारकहि असतें. नाम न घेणाऱ्या माणसाचें स्वरूप अशा काणी जोंधळ्यासारखें असतें असें समर्थ म्हणतात. कितीहि सांगितलें तरी नामाचें महात्म्य या लोकांना कसें पटत नाही तेंच लक्षांत येत नाहीं, असें समर्थ म्हणतात. भगवान् वेदव्यासांनीं नामस्मरण हें वेदशास्त्रपुराणें यांतहि, यांच्या तुलनेनेंहि फार वेगळें, अत्यंत श्रेष्ठ आहे, असें सांगितलें आहे. **''एष मे सर्व धर्माणां धर्मोऽधिकतमो मत:।''** असें वेदव्यास विष्णुसहस्रनामाच्या प्रस्तावनेंत भीष्ममुखानें म्हणतात. अशा स्थितींत जें सहज करणें शक्य आहे तें नामोच्चारण तरी अवश्य करावें असें समर्थ आग्रहानें सांगत आहेत.



**नको वीट मानूं रघूनायेकाचा ।**
**अती आदरें बोलिजे राम वाचा ।।**
**न वेचे मुखीं सांपडे रे फुकाचा ।**
**करी घोष त्या जानकीवल्लभाचा ।।९१।।**

एकच कल्पना समर्थ अनेक प्रकारांनीं पुन्हां पुन्हां सांगत आहेत. पुन्हां पुन्हां सांगण्याचा मनावर ठसण्याच्या दृष्टीनें, बुद्धीला पटण्याच्या दृष्टानें, उपयोग होतो. समर्थ म्हणतात–बाबा! माझ्या रामचंद्राचा वीट मानू नकोस, कंटाळा करूं नकोस, अतिशय आदरानें त्याचें नांव घे. कांहीं खर्च न करतां, कांहीं श्रम न करतां नामाच्या बळानें, परमेश्वराची प्राप्ति होऊं शकते म्हणून सीतापतीच्या नांवाचा सतत घोष करीत जा.

**अती आदरें सर्व ही नामघोषें ।**
**गिरीकंदरे जाईजे दूरि दोषें ।।**
**हरी तिष्ठतु तोषला नामतोषें ।**
**विशेषें हरा मानसीं रामपीसें ।।९२।।**

अत्यंत आदरानें जर नाम घेतलें, भावानें नामाचा घोष करीत राहिलें, तर माणसाच्या अंत:करणांतील सर्व दोष, कामक्रोधादि विकार, पापाचे संकल्प, हे सर्व त्याला सोडून जणूं गिरीकंदरांमध्यें, दूर दूर पर्वतामध्यें, पळून जातात. सिंहाची गर्जना, ऐकलीं कीं इतर वन्य पशुपक्ष्यांचें जसें होतें तसे रामनामापुढें दोषांचें होतें. मात्र हें नाम आदरानें उच्चारलें पाहिजे. नामाविषयीं, आपल्या आराध्यदेवतेविषयीं, नितांत आदर असला पाहिजे. असे असेल तर निश्चयानें लाभ होतो.

रामकृष्ण परमहंसांचे एक शिष्य होते. चांगले साहित्यिक होते. रामकृष्णांविषयीं त्यांच्या अंत:करणांत अतिशय पूज्यबुद्धि होती. त्यांना दारूचें फार व्यसन होतें. पुष्कळ प्रयत्न करूनहि तें सुटत नव्हतें. कोणत्याहि व्यसनाचें असेंच असतें. दारूचें तर विशेषच. एकदां त्यांनीं रामकृष्णांच्या पुढें आपलें हें दु:ख कळवळून सांगितलें. तेव्हां परमहंस म्हणाले हे बघ! प्रयत्न करूनहि दारू सुटत नाहीं ना! मग अगदीं राहवेनासें होईल तेव्हां घेत जा. पण त्यावेळीं एक कर. माझें स्मरण करून त्या दारूचा नैवेद्य मला दाखव आणि मग घे. भक्त म्हणाला–ठीक आहे. त्यानें एकदोनदा तसें केलेंहि, पण एकदां आपल्या या कृतीचा त्याला उबग आला. त्याला वाटलें श्रीरामकृष्णपरमहंसांसारख्या अत्यंत शुद्ध, पवित्र आचरणाच्या,

महापुरुषाला मी माझ्या व्यसनापायीं दारूसारखी, सर्वशास्त्रांनीं निंदा केलेली घाणेरडी वस्तु अर्पण करावी हें किती अधमपणाचें आहे! पश्चात्तापानें त्याचें अंत:करण भरून आलें. त्यानें झटक्यासरशीं दारूचीं पात्रें दूर फेंकून फोडलीं आणि त्या क्षणापासून त्या सद्‌गृहस्थाची दारू सुटली, ती नित्याचीच. रामकृष्णांविषयीं अत्यंत आदराची भावना असल्याचा हा परिणाम आहे. समर्थ प्रत्येक वेळीं नाम घ्या पण अति आदरानें घ्या असें म्हणतात तें यासाठींच. नाम प्रेमादरानें घेत राहिलें म्हणजे हातून घडत असणाऱ्या दुष्कृत्याविषयीं तिरस्कार वाटणें सहज होतें. प्रामाणिक मनाला असें वाटणारच.

प्रेमादरपूर्वक केलेल्या नामस्मरणानें परमेश्वर इतर कोणत्याहि साधनांपेक्षां अधिक संतुष्ट होतो आणि त्या भक्ताला दर्शन देण्यासाठीं आपण होऊन पुढें येऊन उभा राहतो. **''परी तयांपासीं पांडवा। मीं हारपला गिंवसावा। जेथ नामघोषु बरवा। करिती माझा।।''** (ज्ञा. ९।२०८) असें श्रीज्ञानेश्वरमहाराजहि म्हणतात. येथें नामघोषाला दिलेलें ''बरवा'' हें विशेषण लक्षांत घेतलें पाहिजे. **''नाहं वसामि वैकुंठे योगिनां हृदये रवौ। मद्‌भक्ता यत्र गायन्ति तत्र तिष्ठामि नारद।''** असें दुसरें एक संस्कृत वचन आहे. तेथें गायन्ति या शब्दाचा प्रयोग केला आहे. 'गायन्ति' म्हणजे गातात. या वर्णनातून भक्ताचा उचंबळता आनंद आणि तल्लीनता सुचविली जाते. अत्यंत आदर असण्याचींच हीं सर्व रूपें आहेत.

भगवान शंकरासारख्या देवाधिदेवाचें अंत:करणहि रामनामाच्या उच्चारानें वेडावलेलें आहे. शंकरांसारख्यालाहि रामाचें विशेष वेड आहे. मग सामान्याला तो नाद कां लागूं नये?

**जगीं पाहतां देव हा अन्नदाता ।**
**तया लागली तत्वता सार चिंता ।।**
**तयाचें मुखीं नाम घेतां फुकाचें ।**
**मना सांग पां रे तुझें काय वेंचे ।।९३।।**

अनेक प्रकारांनीं नाममहात्म्य पटवून देतांना समर्थ म्हणतात– अरे! आम्हीं पुन्हां पुन्हां आग्रहानें नाम घ्या असें सांगतों. हें आमचें म्हणणें ऐकलेंस तर तें तुझ्याच हिताचें आहे. त्यामुळें आमच्यावर, खरें म्हणजे देवावर फार उपकार झाले असें समजत असलास तर ठीक नाहीं. ईश्वराचें नांव घेण्यांत एक प्रकारची कृतज्ञता आहे. कृतघ्नपणा हें फार भयंकर पातक आहे. त्याला प्रायश्चित्त नाहीं. **''कृतघ्ने नास्ति निष्कृति:''**



सर्व सृष्टी परमेश्वराच्या कृपेनें चालते. माणसाचें सर्व जीवनहि, खरें म्हणजे ईश्वरच चालवितो. तोच त्याचा अन्नदाता आहे. आपण हें लक्षांत घेत नाहीं ही खेदाची गोष्ट आहे.

२५ वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. आमच्या ती. दादांच्याकडे मराठवाड्यांतील एक सामाजिक कार्यकर्ता, कोण्या एका धरणाच्या भूमिपूजनाचें आमंत्रण घेऊन आला. या धरणामुळें शेतीचा किती लाभ होणार आहे आणि कोण्या एका मंत्र्याच्या कृपेमुळें हें काम कसें होतें आहे तें त्यानें मोठ्या अभिमानानें गौरवून सांगितलें. तेव्हां दादा म्हणाले, ''राज्यकर्ते भरमसाठ कर गोळा करतात, मात्र अनेक प्रकारच्या विनवण्या, निदर्शनें केल्यानंतरच ही एवढीशी समाजोपयोगी कामें करतात, यांत मंत्र्यांचे उपकार कसले? त्यांचा इतका गौरव कशाला करतोस? धरणाचा उपयोग निश्चित आहे. पण पाऊसच पडला नाहीं तर धरण भरण्यासाठीं तुझा हा मंत्री काय करील?

आपण फार वरवर पाहतों, वरवर विचार करतों. आपल्या सुखस्वार्थाची कल्पनाच डोळ्यापुढें असल्यानें खोलवर जावें, मुळाशीं पहावें हें कधीं सुचत नाहीं. त्यामुळें आपली कृतज्ञताहि ''आभारी आहे'' असें म्हणण्यापुरती वरवरची असते आणि खरें म्हणजे या आभार मानण्यामागेंहि स्वत:च्या कर्तृत्वाचा अभिमानच डोकावत असतो. भूषणाचें असतें म्हणून मनुष्य आभारी आहे असें म्हणतो इतकेंच.

नीट विचार केला, चांगलें शोधून पाहिलें म्हणजे लक्षांत येतें कीं ज्या निसर्गनियमानें आणि निसर्गाच्या सहाय्यानें, आपलें जीवन चालते, सृष्टीचे व्यापार घडतात, तो निसर्ग कोणत्यातरी समर्थ जाणत्याच्या नियंत्रणाखालीं काम करीत असतो. तो जो कोणी आहे त्यालाच आपण परमेश्वर म्हणतो. तो सर्वसमर्थहि आहे, आणि सर्वज्ञहि आहे ही सार गोष्ट आहे. सर्वांची काळजी तोच वाहतो. तत्त्वत: विचार केला म्हणजे हें लक्षांत येतें. मी त्याच्यासाठीं न करतां त्यानें माझ्यासाठीं कितीतरी केलें आहे. माझ्या शरीराचा, कार्यक्षमतेचा मला अभिमान असतो, पण हें शरीर कोणाच्या सत्तेनें चालतें याचा विचार मी कधीं करीत नाहीं. पण मोरोपंत म्हणतात–''देवा तू मला कितीतरी दिलेंस कार्यक्षम इंद्रियें दिलीस, माणसाच्या जन्माला घातलेस, खाण्यापिण्याची सोय केलीस, चांगलें वाईट कळण्याची पात्रता दिलीस, सदाचाराची आवड दिलीस, कीर्तनश्रवणाचें प्रेम दिलेंस, कितीतरी तूं मला दिलेंस.'' कृतज्ञतेचा हा भाव संतांनीं बाळगलेला असतो. म्हणून तें अत्यंत नम्रपणानें परमेश्वराचे गुणानुवाद गातात, आणि आम्हां मानवांनाहि कृतज्ञ रहा म्हणून सांगतात आणि कळवळून म्हणतात–अरे! हें फुकटचें नाव घ्यायला तुझें काय खर्च होतें? घे ना नाम! एवढी तरी कृतज्ञताबुद्धि दाखव.

**तिन्ही लोक जाळूं शके कोप येतां ।**
**निवाला हरू तो मुखें नाम घेतां ।।**
**जपे आदरें पार्वती विश्वमाता ।**
**म्हणोनी म्हणा ते चि हें नाम आतां ।।९४।।**

संतापले तर तिन्ही लोकांना जाळून टाकण्याचें सामर्थ्य असलेले भगवान् शंकरहि रामनामाच्या प्रभावानें शांत झाले, सुखी झालें. त्यांनीं आपल्या प्रियपत्नी पार्वतीलाहि या रामनामाचा उपदेश केला, आणि ती विश्वाची जननी जगदंबा पार्वतीहि तें नाम आदरानें जपते. समर्थ म्हणतात– असा हा इतिहास आम्ही तुम्हांला सांगतों आहोंत आतां तरी तें नाम उच्चारा.

**अजामेळ पापी वदे पुत्रकामें ।**
**तया मुक्ति नारायणाचेनि नामें ।।**
**शुकाकारणें कुंटणी राम वाणी ।**
**मुखें बोलतां ख्याति जाली पुराणीं ।।९५।।**

श्रीमद्‌भागवतामध्यें अजामिळाची कथा आहे. हा एक अत्यंत दुर्वर्तनी ब्राह्मण होता. सारें आयुष्य अनाचारांत गेलें. त्या स्वैरवर्तनांतूनच त्याला मुलें बाळें झालीं. त्याच्या धाकट्या मुलाचें नांव नारायण. त्याचेवर अजामिळाचें फार प्रेम होतें. अरे नारायणा! अरे नारायणा! म्हणून तो त्याला सारखी हांक मारीत असे. अंतकाळीं जीव कासावीस झाला. 'अरे नारायणा धांव' असें म्हटलें आणि तेवढ्यांत त्याचा प्राण गेला. त्या पातक्याला नेण्यासाठीं यमदूत आले होते. अंतकाळीं त्यानें नारायणा धांव असें विष्णूचें नांव घेतलें या कल्पनेनें त्याला नेण्यासाठीं विष्णुदूतहि तेथें येऊन पोंचले. हें कुळ आपलेंच म्हणून विष्णुदूत व यमदूत दोघेहि भांडले. या भांडणांत अजामिळाचें मरण टळलें. तो सावध झाला. त्याच्या मनावर या घटनेचा विलक्षण परिणाम झाला. मुलाच्या निमित्तानें सहजपणें घेतलेल्या देवाच्या नावाचें जर एवढें महात्म्य आहे तर सदाचारानें वागून प्रेमादरानें मी नामस्मरण करीन तर माझें किती कल्याण होईल असे अजामिळाला वाटलें. कहाणी ऐकल्याचें हें फळ तर वसा घेतल्याचें किती, असें म्हणतात. अजामिळ पुढें नामस्मरणांत रंगून गेला व उद्धरला असें वर्णन आहे.

पिंगला नांवाची एक वेश्या होती. ती आपल्या पोपटाला बोलावयास शिकवीत असतांना पुन्हां पुन्हां राम राम म्हणाली आणि त्या बळानें उद्धरून गेली अशी एक कथा पुराणांत आहे.